

# आनंदाची डहाळी

REFBK-0025887

निर्मलकुमार फडकुले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

[सू]चना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, [परत] न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे [दंड] दा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 1 JUN 1989 | 1 + DEC 1989 |
| 8 JUN 1989 | 2 JAN 1990 |
| 9 JUL 1989 | 18 AUG 1990 |
| 7 AUG 1989 | ७।३।९२ |
| 6 AUG 1989 | ३।३।९९ |
| AUG 1989 | २५।५।९९ |
| 8 NOV 1989 | |
| 10 DEC 1989 | |

( क्रु. मा. पहा )
५०००-११-८६

# आनंदाची डहाळी

रंगश्री प्रकाशन

निबंध
संदर्भ ~~विश्वकोश~~
3391 ~~९५४४~~
२५८८७
२८५१८९

# आनंदाची डहाळी

निर्मलकुमार फडकुले

REFBK-0025887

रंगश्री

प्रकाशन क्र. १
पहिली आवृत्ती :
मे १९८८

□

● **प्रकाशिका**
सौ. जयश्री विजय अभ्यंकर
रंगश्री प्रकाशन
३ अ सुविद्यानगर
आय. टी. आय. समोर, विजापूर रोड,
सोलापूर-४१३००४

□

● **मुद्रक**
कुमुदचंद फुलचंद शाह
सन्मती मुद्रणालय
१६६, शुक्रवार पेठ,
सोलापूर-४१३००२

© निर्मलकुमार फडकुले
'विवेक' १०, विद्यानगर
उत्तर सदर बझार, सोलापूर-३

□

● **मुखपृष्ठ**
चंद्रमोहन कुलकर्णी, पुणे

किंमत छत्तीस रुपये

सौ. चेलना फुलचंद देशमाने

या माझ्या बहिणीस ........

# थोडा संवाद

माझ्या अठरा ललित लेखांचा हा संग्रह. याविषयी खरं तर मी काही बोलू नये. मला जे सांगायचं होतं ते या लेखांतून व्यक्त झालं असावं. प्रास्ताविक शब्दांची अुपाधी कशाला हवी? पण एक संकेत म्हणून या लेखनाबद्दल थोडं बोलावं म्हणतो.

ललित प्रकृतीचं गद्यलेखन अलीकडं फारसं होत नाही. अेका अर्थानं हा वाङ्मय प्रकार सोपा वाटतो, पण तो तसा नाही. जीवनाच्या अनेकांगी व्यापारात आपण सारेच गुरफटलेले असतो. कितीतरी सुखदु:खात्मक अनुभव आपल्याला भेटून जातात. कित्येक अनुभव वाहून जातात. त्यांचा मागमूसही अुरत नाही. अनेक प्रकारची माणसं आपल्या अवती भवती वावरतात. कधी त्यांच्याशी संवाद होतो, कधी विसंवादही होतो. पण काही व्यक्ती, अनुभूतीचे काही क्षण विचारांची काही वर्तुळं लक्षणीय असतात. त्यांच्यात अेकप्रकारचा जिवंतपणा असतो. आपण त्यांना विसरू म्हटलं तरी विसरू शकत नाही. अनुभवाचे हे चित्र विचित्र क्षण मनात ठाण मांडून बसतात. चिंतनशील वृत्तीच्या लेखकाला अशावेळी लेखणी अुचलण्याशिवाय गत्यंतर नसतं. मी स्वत:ला थोडाफार चिंतनशील मानतो. हे मी अहंभावानं सांगत नाही, जाणिवेच्या कक्षेत आलेले विचारानुभव काहीशा स्वैर पद्धतीनं, काहीशा अवखळपणानं आणि काहीशा गंभीरपणानं या लेखांतून मी मांडले आहेत. या विचारांत कधी अुत्साह आणि आनंद यांच्या सावल्या पडलेल्या दिसतील 'आभाळ फाटत आहे' असं वाटलं तरी या जीवनाचा वीट येत नाही. जे 'प्यार के राही' असतील त्यांना दु:खाच्या मुळाशी दडलेलं सुखही जाणवत राहतं. दु:ख आणि वेदना नाकारण्यात काय अर्थ? त्यांचं अस्तित्व आहे म्हणूनच

ऐखादी 'आनंदाची डहाळी' मनाच्या भूमीत जपून ठेवायची असते. तिची हिरवीगार पानं जेव्हा आंतरिक आशेनं सळसळतात तेव्हा त्यांचं ते संगीत अंतःकरणाला आनंद देतं, धीर देतं.

या संग्रहातल्या लेखांचा केंद्रबिंदू आशावाद हाच आहे असं मला वाटतं. खरं तर ते वाचकांनी ठरवायचं आहे. लेखकसुद्धा आपल्या लेखांचा तटस्थ वाचक असू शकतो. ललित लेखांचं स्वरूप स्वच्छंद आहे. तंत्राच्या वाटेनं ठरलेल्या चाकोरीतून जाणं मला रुचलं नसतं. म्हणूनच वाट फुटेल तिकडं, वाट शोधीत मी निघालो. याचा अर्थ या लेखनाच्या मागे लेशमात्रही योजना नसते असं नव्हे. जे भावलं आणि जे अनुभवलं ते शब्दांतून सांगताना नकळत ऐक वाट आकार घेऊ लागते. सांगण्यालाही ऐक ताल आणि तोल असतो. इतकंच भान ठेवून मी लिहीत गेलो. वाचकांचं भान लिहिताना मनात नव्हतं असंही नाही. ते थोडं फार असतंच. मुख्यतः आपल्याला आपल्याशी रुचेल तसा स्वैर संवाद करायचा आहे. कधी वादही करायचा आहे असं मानून हे लेखन केलं. विषय विविध स्वरूपाचे आहेत. त्यात तरतमभाव ठेवलेला नाही, पण जीवनाकडं पाहण्याची आनंदवादी दृष्टी मात्र या लेखांना व्यापून राहिली आहे. जीवनचिंतनाला लालित्याची बैठक मिळाली की त्याची प्रसन्नता अधिक खुलते. ही जाणीव माझ्या लेखनात वाचकांना आढळेल अशी आशा करतो.

'संचार', 'केसरी' या नियतकालिकांतून हे ललित लेख प्रथम प्रकाशित झाले. अनेक वाचकांनी आपल्या उत्स्फूर्त अनुकूल प्रतिक्रिया मला कळवल्या. त्यांत कित्येक विचक्षण लेखक आणि रसिक वाचकही होते. 'आपरितोषात् विदुषाम् न साधुमन्ये प्रयोगविज्ञानम्' ही कालिदासाची उक्ती सहज आठवून गेली. माझे मित्र डॉ. विजय अभ्यंकर यांनी रंगश्री प्रकाशनाच्या वतीनं हे लेख पुस्तकरूपानं प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरला. मी त्यांचा ऋणी आहे. वर उल्लेखिलेल्या नियतकालिकांच्या संपादकांचा आणि पुस्तकाचं सुरेख मुद्रण करणारे सन्मती मुद्रणालयाचे श्री. कुमुदचंद्र शाह यांचाही मी आभारी आहे.

'हिरव्या वाटा' या माझ्या पहिल्या लेखसंग्रहाप्रमाणंच 'आनंदाच्या डहाळी'चंही वाचक स्वागत करतील अशी मला आशा आहे.

**– निर्मलकुमार फडकुले**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | मला जगायचंय् ! | १ |
| २. | चोराच्या गावा जावे | ११ |
| ३. | काठोकाठ भरू द्या प्याला ! | २० |
| ४. | न संपणारे नाटक | २८ |
| ५. | कृष्णा, तुला आलंच पाहिजे ! | ३८ |
| ६. | अुद्धटासी पाहिजे अुद्धट | ४६ |
| ७. | मी, मी आणि केवळ मीच ! | ५४ |
| ८. | रोमन हॉलिडे | ६२ |
| ९. | व्याख्यानाचं आख्यान | ६९ |
| १०. | अहो जग पुढे गेले ! | ७८ |
| ११. | मन पाखरू पाखरू ........ | ८५ |
| १२. | पाखरा ! येशील का परतून ? | ९२ |
| १३. | आभाळ फाटत आहे ........ | १०० |
| १४. | चार दिवस सासूचे | १०९ |
| १५. | शब्दांविषयी चार शब्द | ११८ |
| १६. | हम है राही प्यार के ........ ! | १२५ |
| १७. | प्रशंसा - पुराण | १३२ |
| १८. | येथे पाहिजे जातीचे ! | १३८ |

४३१९
२५८८७
निबंध ३०।५।८९

## मला जगायचंय् !

*    *

रस्त्याच्या कडेला बसून अनेक वर्षं भीक मागणारा एक अपंग भिकारी गंभीर आजार झाल्यामुळं सरकारी रुग्णालयात दाखल झाला. कुणीही नातेवाईक नसलेला, हा सत्तरीच्या घरातला म्हातारा भिकारी डॉक्टरांना कळवळून सांगत होता, 'साहेब, मला जगवा हो ! मला जगायचं हाय, माझ्यावर उपकार करा. मला जगवा.' त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. आपले अशक्त हात जोडून तो पुन्हा पुन्हा डॉक्टरांना विनवीत होता.

मला आश्चर्य वाटलं. या भिकाऱ्याला जीवनाचा इतका लोभ वाटावा असं त्याच्या आयुष्यात काय आहे ? सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत रस्त्याच्या कडेला बसून येणाऱ्या जाणाऱ्यांपुढं हात पसरावा, तोंड वेंगाडावं, थाळीत पडलेल्या किरकोळ नाण्यांवर व काही खाद्यपदार्थांवर कशीतरी गुजराण करावी, रात्री फूटपाथवर झोपावं असा त्याचा क्रम वर्षानुवर्षं चालला आहे. खरं तर मरणासारखं त्याला दुसरं वरदान नव्हतं. एका क्षणात साऱ्या जंजाळातून त्याला मुक्त करण्याचं सामर्थ्य केवळ मृत्यूतच होतं. आपले बाहू उभारून त्यानं मृत्यूचं हर्षभरानं स्वागत करायला हवं. 'मला आता सुखानं मरू द्या' अशी डॉक्टरांची

विनवणी करण्याऐवजी हा वेडा म्हातारा भिकार आयुष्यालाच पुन्हा चिकटून राहण्याची लोचट धडपड करीत होता याला काय म्हणावं ? या जीवनानं त्याच्या फाटलेल्या अन् विटलेल्या पदरात काय बरं टाकलं होतं ? कुणासाठी आणि कशासाठी जगण्याचा हा निरर्थक ध्यास त्यानं घेतला आहे ? मी पुष्कळ विचार केला. मला काही समाधानकारक उत्तर मिळेना. दुःसह जगण्यापेक्षा मरण अधिक सुसह्य असतं. पण या म्हाताऱ्याला निसटून जाणारं जीवन आपल्या मुठीत घट्ट पकडून ठेवावं असं वाटत होतं. माणसाची जीवनेच्छा–लस्ट फॉर लाईफ–इतकी प्रबल कशी असते याचं हे एक प्रतीक होतं. अत्यंत खडतर आणि लक्तरलेल्या जीवनाच्या विळख्यातून तो बाहेर पडायला तयार नव्हता. या घटनेवर भाष्य करताना माझा एक मित्र मला म्हणाला,

'अरे जगण्याची अतिरेकी इच्छा ही एक विकृतीच असते. जगत राहणं हे एक चमत्कारिक व्यसन आहे. दारू जशी सोडवत नाही तशीच जगण्याची आसक्ती देखील माणसाच्या मनातून कधी जात नाही. आपल्या जगण्याला काहीच अर्थ नाही हे त्या भिकाऱ्याला माहीत आहे, पण तरीही जगण्याची त्याला लागलेली चटक नाहीशी होत नाही.' मला त्याचं हे उत्तर फारसं सयुक्तिक वाटलं नाही. आपलं जीवन अगदी व्यर्थ आहे, ते पूर्णपणे दुःखानं व्यापलेलं आहे, आता त्यात आनंदाचा एखादाही तरंग निर्माण होणं शक्यच नाही असं त्याला वाटत असतं तर तो मरणाला केव्हाच बिलगला असता. पण त्याच्या कंगाल, नीरस आयुष्यातही काही सुखाचे-आनंदाचे क्षण उगवत असले पाहिजेत. भिकेवर जगणं लाजिरवाणं आणि दुःखाचं असलं तरीही त्याच्या त्या जगण्याला कुठंतरी क्षीण का होईना पण सुखाचा आधार असला पाहिजे असं मला वाटतं. काळ्याकुट्ट ढगाला एखादी चंदेरी कड असते, त्याप्रमाणं त्याच्या भकास, रित्या आयुष्यातही चार दोन सोनेरी क्षण लपलेले असावेत. माणसाला जगत राहायला तेवढी शिदोरी पुरेशी असते. अंधाऱ्या वाटेनं जाताना आभाळातली एक लहानशी चांदणी सुद्धा धीर देते. त्या चांदणीकडं पहात पायाखालचे काटे रेशमी आहेत अशी मनाची गोड फसवणूक करून घेण्यात आनंद असतो, दुसरं असं की, आहे त्या

परिस्थितीतही मग ती कितीही प्रतिकूल, कितीही तापदायक असली तरी मनुष्य तिच्याशी जुळवून घेतो. तडजोडीनं जुळवून घेण्याची त्याची प्रवृत्ती अत्यंत चिवट असते. कसलीही परिस्थिती त्याच्या अंगवळणी पडते. अशा स्थितीतच त्याला बरं वाटायला लागतं. सारीच माणसं तडजोडवादी नसतात. पण बहुसंख्य माणसं वारा वाहील तशी पाठ देतात. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' असं म्हणून समाधान मानतात. कोणत्याही अवस्थेत सुख मानण्याची चमत्कारिक सवय त्याच्या रक्तात मुरते.

एक गमतीदार कथा मी ऐकली आहे, एकदा एका गुरुजींना अंतर्ज्ञानानं असं समजलं की, थोड्याच दिवसांत आपण मरणार आहोत. आपल्याला एका डुकराचा जन्म मिळणार आहे. गुरुवर्यांना अत्यंत दुःख झालं. मृत्यू केव्हातरी येणारच आहे. पण डुकराचा जन्म आपल्याला मिळावा याचं शल्य त्यांना सारखं टोचू लागलं. असल्या हीन गतीला जावं लागणार या कल्पनेनं ते खंगत चालले. अखेर त्यांनी आपल्या लाडक्या शिष्यांना जवळ बोलावून सांगितलं,

'मी लवकरच या जगाचा निरोप घेणार आहे. मी तुम्हाला शक्य तितकं ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. पण काही पूर्वकर्मामुळं मृत्यूनंतर शेजारच्याच गावात माझा डुकराच्या पोटी जन्म होणार आहे. माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे की मृत्यूनंतर काही दिवसांनी तुम्ही त्या गावी येऊन त्या डुकराच्या पिलाला म्हणजेच मला कसलीही दया-माया न ठेवता ठार मारून टाका. असल्या अमंगळ, घाणेरड्या स्थितीत मला राहायचं नाही.'

शिष्यांनाही गुरूचं म्हणणं पटलं. पण डुकराच्या अनेक पिलांतून आपल्या गुरूला नेमकं कसं ओळखायचं ? ही शंका त्यांना पडली. गुरू म्हणाले, 'मला ओळखणं तुम्हाला कठीण जाणार नाही, माझ्या मस्तकावर एक मोठा पांढरा डाग असेल. तो पाहिल्याबरोबर मला मारून टाका.'

काही दिवसांतच गुरूंचं देहावसान झालं. ठरलेल्या दिवशी शेजारच्या गावी जाण्यासाठी शिष्य निघाले. पण मुसळसार पावसामुळं

नदीला पूर आला होता. तो ओसरेपर्यंत एक-दोन दिवस त्यांना थांबावं लागलं. तिसऱ्या दिवशी ते त्या लहानशा गावी पोहोचले. डुकराचा शोध करताना त्यांना कपाळावर पांढरा डाग असलेलं ते पिलू दिसलं. त्याला त्यांनी फरफटत एका झाडाखाली आणलं. नुकतंच ते पिलू घाणेरड्या चिखलात लोळलं होतं. त्याच्या अंगाची दुर्गंधी येत होती. या चमत्कारिक अवस्थेतून आपल्या गुरूची सुटका करावी म्हणून एका शिष्यानं त्याच्यावर वार करण्यासाठी कुऱ्हाड उचलली, त्याबरोबर ते पिल्लू एकदम मनुष्यवाणीनं म्हणालं,

'माझ्या शिष्यांनो, माझ्यावर दया करा. मला मारू नका. डुकरासारख्या घाणेरड्या प्राण्याचा जन्म मला मिळणार म्हणून मी दुःखी झालो होतो. हा जन्म मला नको होता. पण आता तुम्हाला सांगतो. हा जन्म देखील मला सुखाचा वाटतो. या चिखलात लोळण्यात देखील एक प्रकारचं सुख आहे. हे डुकराचं आयुष्य सुद्धा वाटतं तितकं वाईट नाही. आपण माणसाच्या दृष्टीनं डुकराकडं पाहात होतो. पण हा जन्म सुद्धा आता मला चालेल. मला जगू द्या. मला जगायचं आहे.' शिष्य स्तंभितच झाले. घाणेरड्या चिखलात लोळण्यात सुद्धा सुख मानणारी ही आगळी प्रवृत्ती त्यांना धक्कादायक वाटली. पण ते एक निर्भेळ सत्य होतं यात शंका नाही.

नाना प्रकारच्या अनिवार्य संकटांचे चमत्कारिक धक्के बसत असून सुद्धा मनुष्य आणि कोणताही प्राणी जगण्याचा केवढा सोस धरतो हे पाहिलं की आश्चर्य वाटतं. एखादा लहानसा कीटक सुद्धा जगत राहण्याची धडपड करतो. म्युनिसिपालिटीच्या एका नोकरानं दोन-चार पिंजऱ्यांत उंदीर भरून आणले होते. गावापासून दूर असलेल्या एका मोकळ्या मैदानात ते सोडून द्यायचे आणि कुत्र्या-मांजरांनी त्यांची शिकार करायची असा क्रम होता. एकदा ते दृश्य मी पाहिलं. शेकडो उंदीर सैरावैरा पळताहेत. झाडावरच्या कावळ्यांनी आणि कुत्र्या-मांजरांनी त्यांच्यावर झडप घातली आहे. हा देखावा पाहताना माझ्या मनात आलं, जीवनाचे दोर तुटू नयेत यासाठी साऱ्याच प्राण्यांची केवढी धडपड चालू असते. इतकी प्रचंड अन् केविलवाणी धडपड करून आपण

जगत राहावं इतक्या योग्यतेचं आहे का हे जीवन ? कशाला ध्यास धरायचा जगण्याचा ? जगण्यासाठी जन्मभर उरस्फोड करण्यात काय अर्थ आहे ? पण हे झालं तत्त्वज्ञान ! ज्ञानेश्वरांनी मनुष्याच्या आत्यंतिक जीवनासक्तीवर टीका करताना एक समर्पक दृष्टांत घेतला आहे. सर्पाच्या जबड्यात सापडलेला बेडुकसुद्धा जगण्याची कशी विलक्षण धडपड करतो आणि समोरून चाललेल्या एका माशीला तशाही अवस्थेत पकडण्याचा कसा प्रयत्न करतो याचं मार्मिक चित्र रेखाटलं आहे.

एका जैन कथेतलं रूपकही असंच गमतीदार आहे. झाडाच्या फांदीला एक मनुष्य लोंबकळत आहे. फांदीचा आधार तुटला तर तो खाली असलेल्या एका खोल विहिरीत निश्चित पडणार आहे. ती फांदी कुरतडण्याचं काम काळे पांढरे उंदीर करीत आहेत. विहिरीतल्या काही महासर्पांनी फणा उभारून आपल्या जिभा बाहेर काढल्या आहेत. झाडाला लागलेल्या मोहोळातून मधाचे काही थेंब त्या माणसाच्या तोंडात पडत असले तरी त्याच्या सर्वांगाला मधमाशा डसत आहेत. त्याला त्या संकटातून सोडवण्यासाठी देवविमान जवळच आलं असून त्यानं ताबडतोब विमानात यावं अशी देववाणी होत आहे, पण मधाचे आणि आणखी काही थेंब मिळावेत म्हणून तो चिवट माणूस पोखरल्या जाणाऱ्या फांदीचा आधार घेऊन तशाही अवस्थेत दोन थेंब मधासाठी लोंबकळत राहिला आहे.

मला ही रूपक कथा म्हणजे माणसाच्या मूर्ख जीवन–लोभावरचं एक विदारक भाष्य आहे असं वाटतं. दिवस आणि रात्र हे काळे पांढरे उंदीर आमच्या आयुष्याची फांदी सतत पोखरीत आहेत. ते देवविमान म्हणजे संकटांनी विळखा घातलेल्या क्षुद्र जीवनातून शाश्वत सुखाच्या अवस्थेकडे नेणारा धर्मविचार आहे. झाडाखालची खोल भयानक विहीर आणि फणा काढलेले सर्प विनाशाचे द्योतक आहेत. सर्वांगांना चावणाऱ्या मधमाशा या नाना प्रकारच्या विवंचनांची प्रतीकं आहेत. बऱ्याच विलंबानं मोहोळातून ठिबकणारे मधुबिंदू म्हणजे माणसाच्या पदरात पडणारे काही सुखाचे क्षण आहेत. या सामान्य क्षणांसाठी असामान्य दुःखाशी तडजोड करण्याचा लोचटपणा मनुष्यानं का बरं स्वीकारावा ?

काही लक्षात येत नाही. काय असेल ते असो, मरणाच्या अंतिम क्षणी-सुद्धा या दुःखपूर्ण असलेल्या जीवनाची आसक्ती ओसरत नाही. कदाचित या अत्यंत अदम्य आसक्तीमुळंच या संसाराला सुंदरता आणि कुरूपता, मंगलता आणि अभद्रता आली असावी. या अतूट जीवनमोहानंच माणसाची प्रगती झाली तशीच त्याची अधोगतीही झाली. अनेक भोवरे असलेल्या महानदीत, पोहायला येत नसलेल्या माणसानं तरंगत राहण्याचा केविलवाणा प्रयत्न करावा तसंच हे आहे. हजारो वर्षं हाच खेळ चालू आहे. लक्षावधी वर्षं असाच चालू राहील. केव्हा सुरू झाला, कधी संपणार हे सांगणारा ज्योतिषी अद्यापी जन्माला आला नाही.

माझा मित्र म्हणाला, 'सुखाचे काही कण मिळावेत म्हणून माणसं जीवनाचा अट्टाहास धरतात आणि थोडेफार कण त्यांच्या पदरात पडतही असतात. पण काही माणसं बिनदिक्कतपणानं आत्महत्या करतात. आपल्या आयुष्याला आपल्याच हातानं पुसून टाकतात. याचं कारण काय? याचा अर्थ जीवनाच्या विरुद्ध त्यांनी बंड पुकारलेलं असत. सामान्य मनुष्याला हव्या असणाऱ्या सुखदुःखांकडं त्यांनी खुशाल पाठ फिरवलेली असते. जगण्याचा मोह त्यांनी जिंकलेला असतो असंच म्हणावं लागेल. अर्नेस्ट हेमिंग्वेसारखा शिकार खेळणारा आणि आयुष्यात बेफिकिरीनं स्वैर भटकत राहिलेला उद्दाम मनस्वी लेखकसुद्धा स्वतःवर बंदूक झाडून जगाचा बेडरपणानं निरोप घेतो. यात त्याचा मर्दपणाच दिसून यतो असं मला वाटतं. आयुष्याला चिकटलेली आणि क्षीण आशच्या फांदीला लोंबकळत राहिलेली भित्री माणसं कुठं, अन् ती दरिद्री फांदी सोडून मरणालाच जाऊन सरळ धडक देणारी धाडसी माणसं कुठं? हा रस्त्यावरचा भिकारी मरणशय्येवरदेखील मला जगू द्या म्हणून भीक मागतो. करायचं काय असलं कमंदरिद्री, म्हातारं, बापुडवाणं आयुष्य? मला तरी हेमिंग्वेचा शूरपणा आवडतो. तो म्हणाला असेल, 'बस्स झालं हे जीवन! आजपर्यंत पोट भरून खाल्लं, आकंठ प्यालो, जगभर भटकत गेलो. लिहावंसं वाटलं तेव्हा बेहोषीत लिहिलं, आता आपल्याला मरायचं आहे, हा मस्तवालपणा मला खरंच आवडतो. आत्महत्या करणारे लोक निश्चितच बेदरकार असतात. म्हणून तर

समोरचं आयुष्याचं ताट ते सहजपणानं लाथाडतात. जीवनात मुळुमुळू रडत बसणाऱ्या रडतरावांपेक्षा स्वतःहून मृत्यूला आमंत्रण देणाऱ्या, त्याला गदागदा हालवून जागं करणाऱ्या साहसी माणसांना मी अधिक मानतो.'

माझ्या मित्रानं आत्महत्या करणाऱ्या लोकांची वकिली सुरेख केली की, 'असं जर असेल तर तू आत्महत्या करून त्या महान वीरांच्या मालिकेत का सामील होत नाहीस' असं म्हणण्याचा मोह मला झाला. त्याचं भ्रामक तत्त्वज्ञान मला पटण्यासारखं नव्हतं. जगण्याचा फाजील मोह आपल्या मानगुटीवर बसू नये हे मी मान्य करतो. कारण या विचित्र, अनाकलनीय नादानं मनुष्य अधिकच दुःखी होतो यात शंका नाही. पण याचा अर्थ त्याने आत्महत्या करावी असा मात्र नाही. आत्मघात करणारे लोक शूर असतात आणि जीवनमोहापासून ते सहज अलिप्त होतात हा मुद्दा तर अगदीच हास्यास्पद आहे. ज्ञानेश्वराप्रमाणं अगदीच निर्विकल्प, निरामय वृत्तीनं जीवनाचा निरोप घेणं हा आत्मघात नव्हे. ते केवळ देहविसर्जन आहे. त्यात कशाचा लोभ नाही की मनाचा क्षोभ नाही. कुणाबद्दल द्वेषमत्सर नाही. आयुष्यासाठी हपापलेली मनोवृत्ती नाही. जीवनातलं आपलं कार्य संपलं आहे. आपण कृतार्थ आहोत ही उच्च पातळीवरच्या अलौकिक समाधानाची भूमिका त्यात असते. आपल्या तत्त्वज्ञानात या देहत्यागाला समाधी सल्लेखना म्हणतात.

मी मित्राला विचारलं,

'आयुष्याच्या ताटावरून स्वतःहून उठून गेलेल्या या लोकांना जीवनाचा लोभ नव्हता हे कशावरून म्हणतोस? आपल्या ताटात जे वाढून आलं त्यावर ते संतुष्ट नव्हते. त्यांना कशाचा तरी जबरदस्त हपाप होता. ओढ होती. ज्याची सारखी इच्छा केली, ज्यासाठी धडपडलो ते आपल्याला मिळत नाही किंवा मिळविता येत नाही याचं तीव्र दुःख त्यांच्या अंतःकरणात जळत होतं. त्या दुःखावर मात करायला त्यांच्यापाशी संयम नव्हता. मानसिक दुबळेपणाच्या आहारी जाऊन त्या आवेगात आत्महनन करणं हा भित्रेपणाच आहे. ही एक मनोविकृती आहे. यात शौर्य धैर्य काहीच नाही. उलट तीव्र स्वरूपाच्या जीवन-

मोहातूनच त्यांनी मरणाला कवटाळलेलं असतं. हेमिंग्वेच्या आत्महत्येचं तू तोंड भरून कौतुक केलंस. पण वस्तुस्थिती वेगळी आहे. त्याला आपल्या वार्धक्याची भीती वाटत होती. अनेक व्यसनं करून थकलेलं भागलेलं शरीर लोळागोळा होऊन आपण अंथरुणावर पडून राहू या भयगंडानं तो पछाडलेला असावा. म्हातारपण आणि रोग यांच्याशी झुंजत राहण्याची रगेल वृत्ती त्याच्यात उरली नव्हती. म्हणूनच भीतीच्या एका क्षणी त्यानं स्वत:वर गोळी झाडली. हेमिंग्वेचं आयुष्य बदरकार असेल, पण त्याची आत्महत्या मात्र मला तशी वाटत नाही. काही आत्महत्या उदात्त कारणासाठी कदाचित होत असतील, पण असले थोडे अपवाद वगळले तर आत्मघातामागं स्वार्थच दडलेला असतो. आयुष्याला सामोरं जाण्याचं चमत्कारिक भय अखेर आत्महत्येत परिणत होतं.'

माझ्या मित्राला हे विचार पटले असावेत. आत्मघात हा भय आणि वैफल्य यांचा आविष्कार आहे हे त्यानं मान्य केलं. रामदासांनी "स्मरण असावे मरणाचे" असं म्हटलं आहे. पण म्हणून पावलोपावली मृत्यूची आठवण ठेवून जगायचं नसतं. ती विकृतीच ठरेल. मी लवकरच मरणार आहे असं घोकत राहिलेल्या माणसाच्या जीवनात काय पुरुषार्थ उगवणार? त्याला मी तरी असाच उपदेश करीन की, 'आपला निर्णय अत्यंत उपयुक्त आहे. कृपा करून तो लांबणीवर टाकू नका. जगाच्या कल्याणासाठी त्याची शक्य तितक्या लवकर अंमलबजावणी करा.' कशासाठी मरणाचा जप करीत राहायचं? त्याच्यामागं दयेची झोळी घेऊन कशाला धावायचं? त्याच्या कृपादृष्टीसाठी तळमळत राहाणं हा दुबळेपणाच म्हटला पाहिजे. न्यूनगंडानं मन पछाडलं की आत्महत्येचा विचार मनात डोकावयाला लागतो. हिमालयातून प्रवास करताना एकदा एका प्रवाशानं डोंगरमाथ्यावरून खाली सपाटीकडं दृष्टी टाकली. भयानक खोल विक्राळ दऱ्या आपले जबडे उघडून सभोवताली पसरलेल्या होत्या. माथ्यावर अफाट निळं आभाळ, आजुबाजूला आकाशात चढत गेलेले पर्वत आणि पायथ्याशी असलेल्या काही क्षुद्र झोपड्या त्याला दिसल्या. दऱ्याखोऱ्यांतून नदीचा एक प्रवाह वेगानं उड्या मारीत चालला होता. दाट झाडीनं आच्छादलेले डोंगर आणि बर्फानं माखलेली

त्यांची उंच उंच शिखरं पाहून त्याला आपल्या क्षुद्रपणाची तीव्र जाणीव झाली. निसर्गाच्या त्या महाप्रचंडपणाचं, विराटपणाचं आणि आपल्या एकाकीपणाचं, सामान्यत्वाचं आकलन झाल्याबरोबर निराश होऊन त्यानं स्वतःला त्या उत्तुंग कड्यावरून खाली झोकून दिलं. ही घटना-सुद्धा मला त्या माणसाच्या दुबळेपणाचीच वाटते. मी तर असं म्हणेन की सारी सृष्टी एकरस आहे. मनुष्य हा सुद्धा सृष्टीचाच एक घटक आहे. सभोवताली दिसतं ते सारं आसमंत, झाडं-झुडपं, नद्या आणि समुद्र, पर्वतांची उत्तुंग शिखरं हा माझ्याच व्यक्तिमत्त्वाचा विस्तार आहे असं समजलं पाहिजे. आकाश अथांग असेल पण त्यालाही मी माझ्या मनात सामावून घेऊ शकतो. माझ्या बुद्धीनं त्याचं आकलन करू शकतो अशी जाणीव झाली पाहिजे.

मी मित्राला म्हणालो, "अगदी किरकोळ कारणांसाठी आयुष्या-तून उठून जाणारी माणसं मी पाहिली आहेत. याचा अर्थ ती परा-कोटीची दुबळी आणि भित्री असतात. एकदा एक विद्यार्थी माझ्याकडं आला. तो कमालीचा हताश झाला होता. अत्यंत व्याकुल स्वरात तो मला म्हणाला, 'सर, बी. कॉम्‌च्या परीक्षेत मी तिसऱ्यावेळी देखील नापास झालो. जग माझा धिक्कार करीत असेल, मला हसत असेल. असं वाटतं की, झोपेच्या गोळ्या घ्याव्यात आणि झोपेतच मरणाला मिठी मारावी.' मी खळखळून हसलो. माझं हसणं त्याला निर्दयपणाचं वाटलं. पण त्याचा कान धरून त्याला खडसावून म्हणालो, 'एका सामान्य परीक्षेला घाबरून तू जीवनापासून पळून चालला आहेस याचा अर्थ बी. कॉम्‌च्या परीक्षेप्रमाणंच आयुष्याच्या परीक्षेतही नापास होण्या-इतका तू नालायक आहेस. महामूर्खा, एखादी पुस्तकी परीक्षा म्हणजे सर्वस्व नव्हे. तुझ्या कर्तबगारीला कितीतरी क्षेत्रं मोकळी आहेत. दीड-दमडीची परीक्षा उत्तीर्ण होता येत नाही म्हणून भेकडासारखा सगळ्या जबाबदाऱ्या झुगारून पळपुट्यासारखा चालला आहेस. मला तुझी शरम वाटते. ऐन तारुण्यात जीवनावर सूड घेणारा तुझ्यासारखा लोटांगण-वादी माणूस म्हणजे तारुण्याचा, मर्दुमकीचा आणि आमच्या देशाचाही अपमान आहे. नामर्दांनी, षंढांनी असली नेभळी गाऱ्हाणी गावीत.

मरणाचं तुणतुणं वाजवताना जीवनाची विशाल, विराट जीवनाची प्रचंड गर्जना तुला ऐकायला येऊ नये याचं मला दुःख होतं, जा ! खुशाल जा ! झोपेच्या गोळ्या घेण्याचीही तुला जरूर नाही. कारण तू आधीच मेलेला आहेस. मरण सुद्धा वीराकडेच आकृष्ट होतं. तुझ्यासारख्या दुबळ्याला मिठीत घेताना मरणाला तरी कसला अभिमान वाटणार ?'

तीन चार महिन्यांनी तो कॉमर्सचा विद्यार्थी माझ्याकडं एक पुष्प-गुच्छ घेऊन आला. लाल पिवळ्या गुलाबाचा तो गुच्छ माझ्या हातात उत्साहानं देऊन मला म्हणाला,

'सर, मी एक स्टेशनरी मालाचं दुकान सुरू केलं आहे. माझी कल्पना नव्हती इतकं ते छान चालायला लागलंय. सेल्समन्‌शिप म्हणजे काय ? सेल्स मॅनेजमेंट कशी असते ? त्याबद्दल मला परीक्षेच्या पेपरात लिहिता आलं नाही. पण मी एक चांगला विक्रेता होऊ लागलो आहे. त्यादिवशी तुम्ही रागावून आणि धिक्कारून माझ्या स्वाभिमानाला जाग आणली. परीक्षा पास होण्याची माझी लायकी नसेलही. मोठमोठी माणसं परीक्षेत तोंडघशी पडली आहेत. पण म्हणून ती आयुष्यात फसली नाहीत. तुम्ही वर्गात उच्चारलेलं वाक्य मला आठवतं. 'आयु-ष्याच्या नाठाळ घोड्याला वठणीवर आणताना तो घोडा काही वेळा स्वाराला फेकून देण्याचा प्रयत्न करतो, पण ज्याची मांड बळकट असते, लगाम खेचण्याची शक्ती आणि इच्छा ज्याच्या हातात असते, त्याच्या-समोर हा घोडा अखेर नमल्याशिवाय राहत नाही.' सर, आता माझी मांड बळकट झाली आहे. तुम्ही शब्दांचे कोरडे माझ्या दुबळ्या मनावर मारले नसते तर हा दिवस उगवला नसता.'

त्यानं दिलेल्या पुष्पगुच्छातून जीवनाचा एक आगळा गंध दरवळत होता. मृत्युशय्येवरच्या त्या म्हाताऱ्या भिकाऱ्याचे शब्द मला आता समर्थनीय वाटत होते. 'मला जगायचंय् ! मला जगवा.'

## चोराच्या गावा जावे

◉ ◉

समर्थ रामदासांनी लोकव्यवहारावर प्रकाश टाकणारा, अगदी मर्मावर बोट ठेवणारा एक श्लोक लिहिला आहे. माणसाच्या स्वभावाचं रामदासांचं निरीक्षण कसं चौफेर होतं याची जाणीव मला तो श्लोक वाचल्यानंतर झाली. ते म्हणतात, 'लोक देवळात जातात पण ते बायकांकडे पाहात बसतात आणि कित्येक चोरटे तिथली पादत्राणं चोरून नेतात, स्त्रियांकडे चोरून पाहणं ही देखील एक प्रकारची चोरीच आहे. पण ही सुंदर चोरी आहे. या चोरीला दोष देण्यात अर्थ नाही. आता मंदिरात गेल्यानंतर या प्रकारची चोरी करावी किंवा नाही हा वादाचा विषय होईल. एखाद्या सौंदर्याकिडं पुन्हा पुन्हा चोरून पाहावसं वाटलं तर त्यात त्या सौंदर्याचाही थोडा फार दोष असू शकतो. पण मंदिरात आलेल्या भाविकांची पादत्राणं चोरून नेणं ही मात्र असमर्थनीय चोरी ठरते. मी असं म्हणतो याला एक कारण आहे. परवाच एका धार्मिक विषयावर व्याख्यान देण्यासाठी मला एका मंदिरात आमंत्रित केलं होतं. धर्म आणि नीती वगैरे विषयांवर मी बराच आवेशानं बोललो. नाहीतरी धर्म हा विषयच असा आहे की कोणालाही त्याच्याबद्दल अभिनिवेशानंच बोलता येतं. व्याख्यान संपल्यानंतर मी व्यासपीठावरून खाली उतरलो

आणि पहातो तो माझ्या नव्या कोऱ्या चपला अदृश्य झालेल्या. बरीच शोधाशोध केली, पण काही उपयोग झाला नाही. रामदासांच्या 'समर्थ वाणीची' मला रोकडी प्रचीती आली. कुणीतरी चलाख चौर्यकर्म-विशारदानं माझी पादत्राणं अगदी सहजतेन आपल्या पायांत घालून पलायन केलं होतं. माननीय व्याख्यात्यांवर हा प्रसंग ओढवलेला पाहून कार्यकर्ते थोडेसे हळहळले. मंदिरात येण्याच्या पुण्यकर्मामुळं त्या चोरट्याच्या पदरात परमेश्वरानं नव्या पादत्राणांचा प्रसाद टाकला होता. मी मुकाट्यानं राग गिळून बाह्यात्कारी हसत हसत इतकच म्हणालो की,

'माझ्या या श्रोत्यानं बहुतेक माझी आठवण काही दिवस तरी राहावी म्हणन आपुलकीनं हे कृत्य केलेलं दिसतं.' सभचे कार्यवाहही थोडे गडबडले. पुन्हा पुन्हा दिलगिरी व्यक्त करू लागले. मंदिरात येऊन चोरट्यांनी या प्रकारची चोरी करावी याबद्दल कार्यवाहांनी आश्चर्य व्यक्त केलं. मी मात्र अनवाणीच घरी परतलो. नव्या चपलांच्या चोरी-मुळं मी अस्वस्थ झालो होतो. कार्यवाहांनी मला मोठा हार गळ्यात घालून माझ आभार मानले होते. माझ्या व्याख्यानाची त्यानी स्तुतीही केली होती. पण 'चपला विरहामुळ' मला काहीच सुचत नव्हतं. सध्या चपलांच्या किमती एकल्या की खटरं मारल्यासारखा चेहरा होतो. पादत्राण नाहीसं झालं की सारं त्राण संपतं याचा मला त्या दिवशी अनुभव आला. थोड्या वेळानं या दुःखावर तात्त्विक विचारांचं पांघरूण घालून मी म्हणालो,

'उन्हाळ्याचे दिवस आहेत, कुणातरी गरीबाला या चपलांमुळं थोडातरी आराम मिळेल. पादत्रांणाची चोरी करण्याची वेळ यावी याचा अर्थ आमच्या देशातलं दारिद्र्य किती भयानक आहे पहा! जेव्हा गरजेची वस्तू सरळ मार्गानं मिळत नाही तेव्हाच माणूस चोरीकडं वळतो. हजारो माणसं अनवाणी चालत असताना मला चपला वापरण्याचा नैतिक अधिकार आहे का?' असंल काहीतरी तत्त्वज्ञान मी बोललो. पण त्या चपलेनं माझ्या जिवाला चटका लावला होता. त्या मनःस्थितीत एखादं करुण रसात्मक विरहगीत मी लिहू शकलो असतो. मनुष्य चोरी का करतो याची मानसशास्त्रीय चर्चा मला करायची नाही.

पण आपल्याला साऱ्या आयुष्यात एकदाही चोरी करण्याचा कधी मोह झाला नाही असं कुणी सांगू शकेल काय ? एखादा धाडसी मनुष्य तसं सांगेलही. पण माझा तरी त्याच्यावर विश्वास बसणार नाही. काही सुंदर गोष्टींचा मोह पडतो. आमच्या शाळेच्या पलीकडे असलेल्या एका बंगल्याच्या प्रशस्त आवारात काही पेरूची झाडं होती. मधली सुट्टी झाली की आम्ही तीन-चार मित्र तिथल्या खाष्ट रखवालदाराची नजर चुकवून झाडावरचे कच्चे पेरू तोडीत असू. स्वतः 'परिश्रमानं आणि चातुर्यानं' मिळवलेले ते कच्चे तुरट पेरू सुद्धा आम्हाला गोड लागत होते. पण एक दिवस रखवालदारानं आम्हाला दुष्टपणानं पकडलं आणि हेडमास्तरांसमोर उभं केलं. 'चोरी म्हणजे काय आणि चोरी का करू नये' या विषयावर आमच्या मुख्याध्यापकांनी अर्धा तास अत्यंत कंटाळवाणं भाषण आम्हाला सुनावलं. पेरूंच्या चोरीबद्दल ते व्याख्यान ऐकण्याची जी भयानक शिक्षा आम्हाला भोगावी लागली ती आजही स्मरणात आहे. खरं तर पेरू आम्हाला मिळत नव्हते म्हणून ती चोरी करीत होतो असं मात्र नव्हे. चोरीत एक प्रकारचं साहस होतं, त्याचंच आकर्षण आम्हाला होतं.

मंदिरातून माझी चप्पल चोरीला गेली या घटनेवरून मी विचार करू लागलो. गरज असते म्हणूनच माणूस चोरी करतो हे तितकंसं खरं नाही. सहज हातचलाखी करून एखादी किरकोळ वस्तू खिशात टाकण्यात कदाचित आनंद असेल. अशा वस्तूंची फार आवश्यकता असते असंही नाही. आमच्या शेजारचे हरिभाऊ मंडईत गेले की कुठली-तरी भाजी खरेदी करताना भाजीवालीची दृष्टी चुकवून दोन चार मिरच्या किंवा कोथिंबिरीच्या दोन काड्या शिताफीनं पिशवीत टाकतात. हरिभाऊंची आर्थिक स्थिती उत्तम आहे. मुलगा बडा सर-कारी अधिकारी आहे. असली क्षुद्र चोरी त्यांनी का करावी हे मला कळत नाही. पण या हातचलाखीनं त्यांना विजयाचं समाधान मात्र मिळत असावं. आपण कसे बनवू शकतो, आपण कसे 'हुषार' आहोत या कल्पनेतला आनंद त्यांना रुचकर वाटत असावा. मी एकदा त्यांना याबद्दल विचारलं तेव्हा ते मिशातल्या मिशात हसत म्हणाले,

'अहो, हे भाजीवाले आम्हाला फसवतात, आम्हीही त्यांना फसवतो. दुसरं काय? दोन चार कोथिंबिरीच्या काड्या पिशवीत टाकणं म्हणजे काही चोरी नव्हे. बोलून चालून भाजी ती! रानातल्या या भाजीपाल्याची किंमत ती काय! पण आम्हाला जादा भावानं विकतात. तेवढीच त्यांना सजा.' हरिभाऊ एकूण भाजीवाल्यांवर असा सूड घेतात. पण काही झालं तरी चोरी ती चोरीच! किरकोळ असली म्हणून ती चोरी नव्हे या समर्थनात काही अर्थ नाही. दादोजी कोंडदेवांनी एकदा मालकाच्या परवानगीशिवाय झाडावरचा आंबा तोडला, आपल्या चोरीबद्दल स्वत:ला शिक्षा म्हणून त्यांनी आपल्या सदऱ्याची उजवी बाही जन्मभर अर्धीच ठेवली अशी एक दंतकथा आहे. लहाणपणी क्रमिक पुस्तकात वाचलेली ही गोष्ट, त्या कोवळ्या वयात मनावर परिणाम करून गेली. पण आता जगाचं स्वरूप पाहिल्यानंतर असं वाटतं की दादोजी कोंडदेव फारच हळवे होते. त्यांच्या नैतिकतेच्या कल्पना केवळ आदर्श होत्या. या कल्पना आज प्रमाण मानायच्या झाल्या तर लाखो लोकांना आपले हात कलम करून टाकावे लागतील. चोरी ही एक इतकी सर्वसाधारण घटना झाली आहे की, ती ज्याची होते त्याला लोक बावळट हे विशेषण देऊन मोकळे होतात. चोर मात्र धूर्त आणि धोरणी ठरतो. आणि ज्याची चोरी होते तो गबाळग्रंथी, अडाणी, वेडा आणि व्यवहारशून्य आहे यावर सर्वांचं एकमत होतं. हा दारुण अनुभव मी घेतला आहे. बसमध्ये चढत असताना गर्दीत कुणीतरी माझ्या खिशातून पैशांचं पाकीट अलगद काढून घेतलं. थोड्या वेळानं ही गोष्ट माझ्या लक्षात आली. मी बसच्या कंडक्टरला आणि एकदोन सहप्रवाशांना ही कथा सांगितली. कंडक्टरनं अशा दृष्टीनं माझ्याकडं पाहिलं की मी एक जन्मजात बावळट मनुष्य आहे. स्वरात थोडीशी सहानुभूती आणून तो मला म्हणाला,

'तुम्हीच काळजी घ्यायला पाहिजे होती. खिशात पैसे ठेवून खुशाल गाडीत चढलात. चोरी होणार नाही तर काय होणार? तुमच्यासारख्या सुशिक्षित लोकांना आपला खिसा सांभाळता येत नाही याला काय म्हणायचं? अहो, खिसेकापूंचा हा उद्योगच आहे. त्यांना दोष द्यायला काहीच जागा नाही. तुमचंच चुकलं बघा साहेब.'

खिसे कापणं हा एक उद्योग आहे, हे महान् सत्य त्या कंडक्टरनं मला सांगून माझा वेडेपणा चारचौघांदेखत माझ्या पदरात बांधला. तसं पाहिलं तर कंडक्टरचं म्हणणं अगदीच चुकीचं नव्हतं. प्रत्यक्ष खिसे कापण्याची गोष्ट सोडून देऊ. पण बाजारात व्यापारी अनेक वेळा ग्राहकांचा खिसा कौशल्यानं कापतात. ही सुद्धा चोरीच नव्हे का? एकदा एका विक्रेत्यानं आपल्या मिठ्ठास वाणीनं एका वस्तूचं अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलं. तो म्हणाला,

'डॉक्टरसाहेब, तुमच्यासारख्या विद्वान माणसाला आम्ही काय सांगायचं? ( इथं माझा मूर्ख अहंकार सुखावतो. ) अडाणी गिऱ्हाईक असलं तर त्याला पटवून देण्यासाठी उरस्फोड करावी लागते. आता तुमच्यासारख्या हुषार आणि भारी मालाची कदर असलेल्या चोखंदळ माणसाला सांगणं म्हणजे आम्ही तुमचा अपमान केल्यासारखं आहे. परवाच कलेक्टरसाहेबांनी हाच माल घरी मागवून घेतला. तुमचे व्हाईस चॅन्सेलरसाहेबसुद्धा ऑर्डर देऊन गेलेत. अरे सदू, साहेबांच्यासाठी स्पेशल कॉफी आणरे! ( मी इथं नको नको म्हणतो ) तुमच्यासारख्यांचे पाय आमच्या दुकानाला लागले. बस्स. आमचं समाधान झालं. अहो, चार दर्जेदार गिऱ्हाईकांची सेवा करायला मिळणं हे आमचं भाग्य आहे.' विक्रेता प्रामाणिकपणानं आणि आपुलकीनं बोलण्याचा सुंदर अभिनय करीत होता. एका सुबक रंगीत वेष्टणात त्यानं मी मागितलेली वस्तू सुरेख रीतीनं बांधली होती. 'आपल्या घरी पाठवून देऊ का साहेब?' अशी विनयानं त्यानं विचारणा केली. मी मुकाट्यानं खिशातून शंभराच्या पाचसहा नोटा काढून त्याच्यासमोर ठेवल्या. घरी येऊन पार्सल उघडलं तेव्हा आतला पदार्थ किमतीच्या मानानं अगदीच साधारण आहे हे लक्षात आलं. त्या वस्तूचा योग्य दर लक्षात घेतला तर दुकानदारानं माझ्याकडून किमान शंभर रुपये अधिक घेतले असावेत. ही सुद्धा एक प्रकारची चोरीच मानावी लागेल. पण दुकानदार मात्र त्याला 'विक्रय-नीती' म्हणेल. एक कप कॉफी आणि स्तुतीचे काही खोटे शब्द एवढ्या भांडवलावर हा व्यवहार झाला होता. ही हकीकत मी कुणाला सांगितली नाही. उलट त्या वस्तूची किंमत

शंभर-दीडशेंनी कमी करून इतरांना सांगू लागलो. माझ्या व्यवहार-कौशल्याची त्यामुळं वाखाणणी मात्र झाली. हे सारेच प्रकार पाहून मला मोठं आश्चर्य वाटतं. सारेच व्यावसायिक आपापल्या व्यवसायात थोड्या फार चोऱ्या करतात असं विधान केलं तर ते अतिशयोक्तिपूर्ण होणार नाही. सेकंड क्लासनं प्रवास करायचा किंवा शक्य झालं तर विना तिकीटानं ऐटीत डेक्कन क्वीननं प्रवास करायचा आणि मुंबईला गेल्यावर आपण फर्स्ट क्लासनं किंवा स्वतःच्या गाडीनं मीटिंगला आलो असं लिहून द्यायचं. पैसे उकळायचे. ही सुद्धा एक शिष्टमान्य, सर्वमान्य चोरीच नव्हे काय ? व्यक्तीला फसवणं आणि एखाद्या संस्थेला किंवा शासनाला फसवणं यात तत्त्वतः काहीच अंतर नाही. पण बडी बडी माणसं अगदी सहजगत्या या प्रकारच्या चोऱ्या हसतमुखानं सराईतपणानं करीत असतात. सत्य आणि नीती या शब्दांची सभ्य लोकांच्या जगातही पावलोपावली इतकी पायमल्ली होत असताना एखाद्या गरीब माणसानं माझी नवी चप्पल चोरली तर त्या बिचाऱ्याला दोष देण्याचा आम्हाला काय अधिकार आहे ? त्याच्या चोरीची पद्धत आणि शिष्ट लोकांच्या चोरीच्या तऱ्हा यात काहीसं अंतर आहे इतकं मात्र खरं. चप्पलची चोरी ती चोर पारंपारिक पद्धतीनं करतो पण एखादा व्यापारी वनस्पती तुपात चरबी बेमालूमपणानं मिसळून डबा पॅकबंद करतो आणि त्यावर लक्षावधी रुपयांचा नफा कमावतो. एखादं मंदिर बांधून परमेश्वरालाही लाचलुचपतीनं आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न करतो. कोणत्याही चोरीचं मूळ दुसऱ्याच्या सज्जन-पणाचा गैरफायदा घेऊन त्याला फसवणं हाच असतो. मोठी चोरी सापडली आणि ते प्रकरण न्यायालयात गेलं की ती चोरी नव्हेच असं सांगण्यासाठी प्रथम श्रेणीचे वकील आपली सारी विद्वत्ता चोराच्या बाजूनं उभी करताना दिसतात. किरकोळ चोरीला मात्र न्यायालयात शिक्षा मिळते. हा थोडासा गंभीर विचार झाला. तो बाजूला ठेवू.

काही जणांना सहज काही वस्तू उचलण्याची सवय लागलेली असते. कदाचित मानसिक विकृतीचा हा भाग असेल. कुठंतरी वाचलेलं मला आठवतं. इंग्लंडच्या एका माजी पंतप्रधानाला 'उचलेगिरीची'

सवय होती. तो अत्यंत कार्यक्षम, लोकप्रिय असा नेता होता. पण एक चमत्कारिक विकृती त्याच्यात दबा धरून बसली होती. अनेक समारंभांना, भोजनाच्या पार्टीना त्याला आमंत्रणं असतं. आपल्या पुढ्यात ठेवलेले काटे चमचे किंवा एखादं काचपात्र तो सहज कोटाच्या खिशात टाकी. त्याची पत्नी यासाठीच सदैव त्याच्याबरोबर असे. घरी परतल्यानंतर त्याच्या खिशातून त्या वस्तू काढून ती तत्परतेनं परत पाठवायची. हे असलं किरकोळ वाटणारं चमत्कारिक व्यसन त्याला का जडलं असावं? सत्ता आणि संपत्ती यांची त्याला कमतरता नव्हती. कदाचित बालवयात त्याचा दारिद्र्यामुळं कोंडमारा झाला असावा. त्याच्या मनाला झालेली ही जखम खोल असली पाहिजे. मानसशास्त्राच्या आधारानं या घटनेचं विश्लेषण करता येईल. पण हा सुद्धा चोरीचा एक गमतीदार प्रकार आहे यात शंका नाही. एकदा एका प्रसिद्ध लेखकानं म्हटलं होतं, एखाद्या प्रचंड सुसज्ज ग्रंथालयात मी गेलो की मला तीव्रतेनं असं वाटतं की, संधी मिळाली तर इथल्या उत्तमोत्तम ग्रंथांची सरळ चोरी करावी. हे उत्कृष्ट ग्रंथ विकत घेण्याचं तर माझ्याजवळ सामर्थ्य नाही. चोरीशिवाय ते मिळविण्याचा काहीच मार्ग नाही. पण चोरी करायला जी सावधगिरी आणि अक्कल लागते तिचा तर माझ्यात अभाव आहे.' ग्रंथांची चोरी करण्याची इच्छा होणं सात्त्विक का तामसिक या प्रश्नाचं उत्तर मला देता येणार नाही. पण वाचण्यासाठी कुणी पुस्तकं चोरली तर मी त्याचं वकीलपत्र घ्यायला तयार होईन. ही चोरी असली तरी तिचं मूळ ज्ञानाच्या इच्छेत आहे. पुस्तकांच्या दुकानात चोर कधी कधी शिरतो; पण त्याचं लक्ष पेटीतल्या पैशावरच असतं. पुस्तकं चोरण्याची ( वाचण्यासाठी ) दुर्बुद्धी त्याला कधीच होत नाही. चोरी करून का होईना पण माणसं पुस्तकं वाचायला लागली तर माणसाचं जीवन अधिक सुसंस्कृत होईल असं मी म्हणेन. कर्णानं शस्त्रविद्या मिळविण्यासाठी आपली जात चोरली होती.

चोरीचे अनेक प्रकार आणि अनेक वाटा असतील. चोरांच्या वाटा चोरांनाच माहीत असतात. मी काय सांगणार? 'येथे पाहिजे जातीचे, येरा गबाळ्याचे काम नोहे' पण कुणाचं तरी मन चोरणं हा चोरीचा

सुंदर प्रकार आहे असं काही अनुभविकांचं म्हणणं आहे. या प्रकारात ज्याची चोरी होते आणि जो चोरी करतो ते दोघेही रात्रंदिवस बेचैन असतात. दोघांनाही एक प्रकारचा विलक्षण आनंद होत असतो. दोघेही उन्मनी अवस्थेत असतात. अशा प्रकारच्या हृदयचोरांची वर्णनं अनेक कवितांतून विखुरलेली आहेत. ज्याला कुणाचं मन चोरता येत नाही किंवा जो कुणाच्या चोरीचा विषय होत नाही त्याच्यासारखा दुर्दैवी केवळ तोच आहे. ही चोरी अशी आश्चर्यकारक की ती दिवसाढवळ्या आणि क्षणार्धात होऊ शकते. इतरांना तिचा थांगपत्ताही लागत नाही. या चोरांना कायद्यानं एकच शिक्षा सांगितली आहे. ती म्हणजे त्यांचं लग्न करून जन्मठेप सुनावणं. गोकुळात दुधादह्याची चोरी करणारा श्रीकृष्ण, गोपिकांची मनं चोरायला शिकला आणि या मनचोरानं अनेक कवींच्या प्रतिभेला नवा बहर आणला. कृष्ण-राधेच्या, कृष्ण-रुक्मिणीच्या चोरट्या प्रेमाची काव्यमय कथा कितीतरी वेळा ऐकली असेल. वाचली असेल. पण ही प्रेमाची चोरी काळ उलटला तरी अजूनही ताजी रसरशीत आहे. या चोरांनी रसिकांच्या मनाला कल्पनातीत आनंद दिला. चोरीचे व्यवहार इतके उन्मादक असू शकतात याचं नवल वाटतं. जगातल्या इतर सर्व प्रकारच्या चोऱ्या कदाचित कायद्यानं आणि दहशतीनं थांबवता येणं शक्य आहे, पण ही असली चोरी थांबविण्यासाठी कोणता कायदा करायचा ? आत्मध्यान करण्यात निमग्न झालेल्या विश्वामित्राच्या विरक्त हृदयाच्या एका कोपऱ्यात कुठल्यातरी एका क्षणी मेनकेच्या आसक्तीची आणि प्रेमाची एक चोरटी वेल, त्यालाही नकळत उमलून आली आणि मेनकेच्या प्रेमाची राजरोस चोरी करायला हा महान् तपस्वी पुढं सरसावला. मुंबईतल्या कुठल्यातरी भागाला चोरबाजार असं नाव असल्याचं मी ऐकलं आहे. आता अलीकडं मी असं म्हणतो की, मुंबईत चोरबाजार असण्यापेक्षा चोरबाजारातच मुंबई वसली आहे. पण मधुर प्रणयाच्या क्षेत्रातला हा रमणीय चोरबाजार मात्र तुम्ही आम्ही जिवंत ठेवलाच पाहिजे. काही चोऱ्या माणसाचं मन सुंदर आणि काव्यात्म बनवतात. कुणी एखाद्याचे सूर चोरतो. कुणी कल्पना चोरतो. कुणी शब्द आणि विचार चोरतो.

एखादा माणूस बुद्ध-महावीरांच्या अंतःकरणातली करुणा चोरतो. एखादी सुंदरी राधिकेच्या डोळ्यांतली उत्कट तृष्णा चोरते. असल्या चोऱ्या करणारे तर श्रीमंत होतातच पण त्यांच्या चोऱ्यांनी मानवी संस्कृतीही सुंदर आणि श्रीमंत होते. कशाची चोरी करावी हे ज्याला कळतं, तो अशी चोरी करतो की चोरीलाच प्रतिष्ठा प्राप्त होते. पण ज्याला काय चोरावं हे कळत नाही, तो फार झालं तर पादत्राणं चोरण्यावर समाधान मानतो. त्याला आपण काय करणार ?

## काठोकाठ भरू द्या प्याला !

सकाळी चहाचा पहिला घोट घेताना ताजं वर्तमानपत्र नसलं तर मला तो चहा गोड लागत नाही. चहाच्या घोटाबरोबर वृत्तपत्र चाळणं हा एक आनंदाचा प्रकार आहे. खरं तर अलीकडे वर्तमानपत्रात आनंददायक वार्ता फारशा नसतात. खून, जाळपोळ, रक्तपात, गोळीबार हे आता नित्याचे विषय आहेत. रोजरोज या बातम्या वाचून मनही बधिर होऊन गेलं आहे. रोजचे मढे, त्याला कोण रडे ! माणसानं या मृत्युलोकांवर मृत्यू किती स्वस्त करून ठेवला आहे याचं प्रत्यंतर वृत्तपत्र वाचताना येतं. अलीकडे तर सकाळचा पहिला चहा घेताना शक्य तर टेबलावर वृत्तपत्र असू नये असं वाटायला लागलं आहे. त्या दिवशी चहाचा कप ओठाला लावला आणि माझी दृष्टी एकदम समोरच्या वृत्तपत्रातील छायाचित्रावर गेली. रंगभूमीवरच्या एका अत्यंत लोकप्रिय नटाचं ते छायाचित्र होतं. त्याच्या मृत्यूची बातमीही ठळकपणे छापली होती. ही बातमी वर्ष-सहा महिन्यात केव्हातरी वाचावी लागणार याची मला धास्ती होती. दुर्दैवानं ती खरी ठरली. ऐन पस्तिशीतच या तरुण, सुंदर व्यक्तिमत्त्वाच्या कलावंताचा मृत्यू व्हावा याचं दुःख तीव्र होतं. कोणत्याही क्षेत्रातला कलावंत नाहीसा होणं ही एक सामाजिक आपत्ती असते. चित्रकार, गायक, नर्तक, नट, कवी व नाटककार हे सारेच कलावंत मानवी जीवनाला सौन्दर्याचं वरदान देतात. त्यांच्या

कलेच्या सिंचनानं जग सदैव तरुण आणि टवटवीत राहू शकतं. त्यामुळंच त्यांचा अकाल मृत्यू आपल्याला अधिक दुःखदायक वाटतो. ज्या नटाच्या मरणाची बातमी मी वाचली त्यानं रंगभूमीवर आपल्या विलक्षण कलात्मक अभिनयानं एक नवविश्व निर्माण केलं आहे. माणसाची वेगवेगळी रूपं व त्याची सुख-दुःखं आपल्या अभिनयानं जिवंत करून दाखविली. लक्षावधी रसिकांच्या गळ्यांतला तो एक ताईत झाला होता. नाटक हा कलाप्रकार त्याच्यामुळंच लोकप्रिय झाला होता. रंगभूमीवर त्याची असीम निष्ठा होती. आता त्याच्या मृत्यूनंतर आमची रंगभूमी दीनवाणी दिसणार या विचारानं मी अत्यंत विषण्ण झालो.

पण त्या कलावंताचं हे मरण नैसर्गिक नव्हतं. त्यानं स्वतःच ते ओढवून घेतलं होतं. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या या नटाला दारूचं जबरदस्त व्यसन लागलं होतं. 'एकंच प्याला'च्या धुंदीत अलीकडं तो रात्रंदिवस राहू लागला होता. रंगभूमीवर प्रवेश करतानाही दोन घोट घेऊनच ही स्वारी पुढं पाऊल टाकायची. एक दिवस हातातल्या ग्लासात हा पार बुडून जाणार याविषयी माझ्या मनात शंका नव्हती. एका नाट्यरसिकाला ही भीती मी बोलून दाखविली तेव्हा तो म्हणाला,

'तुम्ही उगीच चिंता करता, कलावंतांची कला मद्याच्या कैफाशिवाय खऱ्या अर्थानं खुलत नाही. अहो, दिलदार माणसंच दारूचा षोक करतात. गेली दहा वर्षं हा नटसम्राट पीत आहे. प्रतिभावन्तानं प्यावयाची नाही तर मग ती काय सामान्य माणसानं घ्यायची? तो पितो म्हणूनच त्याच्या शब्दांत सच्चा दर्द येतो. त्याच्या अभिनयात जिवंतपणा येतो. तुम्ही उगाच सोवळेपणानं शंकाकुशंका घेता. कलावंत कसा मस्तीत असला पाहिजे. दोन घोट घेतले की त्याच्या मेंदूला तरतरी येते. त्याच्यातला प्रत्येक कण जागा होतो. आणि मग त्या कलावंताच्या कलेचा चमत्कार पहायला मिळतो. सामान्य आरोग्यशास्त्राचे नियम कलावंताच्या मानसशास्त्राला कधीच लागू पडत नाहीत. दारू वाईट असेल, पण नटाला, लेखक-कवीला, गायकाला ती उत्तेजित करते. त्याला कलेच्या उच्च पातळीवर आणते. म्हणून मला म्हणायचं आहे की,

कलावंतांना धुंदी चढल्याशिवाय त्यांच्या ठिकाणी असलेली कला उचंबळून येत नाही. खुशाल पिऊ द्या त्यांना! त्यांनी आपले प्याले काठोकाठ भरल्याशिवाय रसिकांच्या पदरात ते कलेचं अमृत ओतू शकत नाहीत.'

या नाटयरसिकाची ही विचारसरणी ऐकून मी कपाळावर हात मारून घेतला. तसा हा रसिक एक जबाबदार नागरिक होता. नाटक, संगीत यांचा तो चाहता होता. सभा सम्मेलनांतून कधी कधी आपले कलाविषयक विचार व्यक्त करायचा. पण आज त्यानं आपले अकलेचे तारे अशा काही सामर्थ्यानं तोडले की, मी हतबुद्धच झालो. कलावंताच्या कलेला मद्यपानामुळं अधिक स्फुरण मिळतं हा विचार म्हणजे महामूर्खपणाचा कळस आहे. दारूसारखी कैफ आणणारी वस्तू आणि कलावंताची कला यांचा कसला संबंध असतो? उलट दारूचा परिणाम मेंदूवर होऊन तो निकामी व्हायला लागतो. हे सूर्यप्रकाशासारखं सत्य दारूच्या समर्थकांना समजत नाही काय? गडकऱ्यांच्या नाटकातला नायक सुधाकर अखेरपर्यंत दारूच्या विध्वंसकतेला शिव्याच देत होता, त्या भयानक व्यसनाच्या विळख्यातून सुटण्यासाठी तो सारखा धडपडत होता; पण त्याचं मनःसामर्थ्य कमी पडलं. म्हणूनच आपल्या दुबळ्या, पराभूत क्षणी तो व्याकुळपणानं म्हणाला, 'ये, मदिरे ये! मदिरे, तू देवता नाहीस हे सांगायला जगातल्या पंडितांचा तांडा कशाला हवा? तुझ्या जुलमी जादूनं जडावलेल्या जनावरालासुद्धा कळतं की, तू एक राक्षसी आहेस! तू घातकी राक्षसी आहेस! तू क्रूर राक्षसी आहेस पण तू प्रामाणिक राक्षसी आहेत. गळा कापीन म्हणून म्हटल्यावर तू गळाच कापीत आली आहेस. मृत्यूच्या दरवाजापर्यंत सोबत करण्याचे कबूल केल्यावर तू कधी माघार घेत नाहीस.' आपला संसार दारूच्या भडकत्या होळीत जळून खाक होणार याची सुधाकराला खात्री होती. तो कमालीचा दुबळा होता म्हणूनच अपमानांचं दुःख विसरण्यासाठी नादानपणानं दारू पीत राहिला. दारूचं समर्थन मात्र त्यानं कधीच केलं नाही. आणि आता हा एक नाटयरसिक दारू प्याल्याशिवाय कलावंताच्या कलेचं उत्कृष्ट रूप प्रकट होत नाही असं

सांगत आहे. मद्याचं व्यसन नसतं तर आमचा हा नट आणखी कित्येक वर्षं कलावंताचं आयुष्य जगला असता. रंगभूमीवर पाऊल टाकताच त्याच्या रोमारोमात मिसळून गेलेली अभिनयकला एखाद्या सुंदर मोहक स्वप्नाप्रमाणं प्रकट व्हायची. मग त्याच्या साध्या शब्दांनाही भावनेचा सुगंध यायचा. त्याची दृष्टी, त्याची वृत्ती, त्याची सारी हालचाल प्रेक्षकांना झपाटून टाकायची. तो एकटा रंगभूमीवर असला तरी त्या रंगपीठाला भरदारपणा यायचा. अशा श्रेष्ठ नटानं दारूच्या आहारी जाण्याची काय जरुरी होती? कलावंतांनी मद्यपान करणं म्हणजे आत्महत्याच करणं आहे. अशी आत्महत्या करण्याचा त्यांना अधिकार नाही. कोणीही मूर्खपणानं दारूची वकिली करण्याच्या भानगडीत पडू नये.

कितीतरी प्रतिभावंतांचं दिव्य आयुष्य दारूच्या बाटलीत सडून गेलं आहे. कुंदनलाल सैगलसारखा असामान्य गायक अकालीच निघून गेला. या गायकाला गाण्याच्यापूर्वी 'एकच प्याला' झोकण्याची दुष्ट सवय जडली. आपलं गाणं दारूमुळं रंगतं अशी हास्यास्पद कल्पना त्यानं करून घेतली. चित्रपट निर्माते त्याला आवरू शकले नाहीत. त्यांना केवळ धंद्यासाठी सैगलचा आवाज हवा होता. या हट्टी कलावंताला कीर्ती मिळत होती. पैसा मिळत होता. तारुण्य होतं, विलक्षण माधुर्य कंठात होतं. अविचारही होता. केव्हातरी मदिरेचा प्याला त्यानं ओठांना लावला. भोवतालच्या खुषमस्कऱ्यांनी त्याची स्तुतिस्तोत्रं गायिली आणि हा समर्थ गायक नट पहाता पहाता दारूबाज बनला. आपल्या आवाजातली ईश्वरी शक्ती, ते अद्‌भुत चैतन्य हरवून बसला. चित्रपटांतल्या त्याच्या काही भूमिका आणि त्यानं गायिलेली काही गाणी मी कधीच विसरणार नाही. आजही इतक्या वर्षानंतर त्याची गाणी मला मुग्ध करतात. त्याच्या सुरांत काय नाही? तारुण्य, प्रेम आणि दर्द यांचं एक विलोभनीय मिश्रण त्यात झालं आहे. सैगल प्रत्येक गाण्यात आपला आत्मा ओतायचा. गाण्याला तो जीवनकळा द्यायचा, पण पुढं पुढं दारूमुळं त्याच्या आवाजातली ती जन्मजात जादू ओसरायला लागली. हा कलावंत गटांगळ्या खायला लागला. त्याला किनारा

सापडेना. सैगलचा एक चित्रपट आजही माझ्या पूर्ण लक्षात आहे. शाळकरी वयात पाहिलेला त्याचा 'देवदास' ज्या दिवशी मी विसरेन त्या दिवशी माझ्यातली रसिकता संपली असंच म्हणावं लागेल. देवदासच्या जीवनातलं वैफल्य आणि कारुण्य सैगलनं ज्या सामर्थ्यानं साकार केलं तसं यश पुढील 'देवदासांना' मात्र मिळालं नाही. शरच्चंद्र चतर्जींची 'देवदास' कादंबरी शाळेत असतानाच मी वाचली होती. प्रेमभंगानं हताश झालेला देवदास हा त्या वयात मला चटका लावून गेला. या चित्रपटातला त्याचा अभिनय आणि त्याची नैराश्यानं माखलेली गाणी म्हणजे सैगलच्या कलेचा मला तरी उच्चांकच वाटतो. तो देवदास दारू पीत, पारूचा ध्यास घेत आपला प्राण सोडतो. प्रमथेश बरुआ या दिग्दर्शकानं सैगलची हीच प्रतिमा लोकमानसात रूढ केली. राहून राहून माझ्या मनात येतं, या गायकाला व्यसनानं गाठलं नसतं तर कारुण्याचा रसस्पर्श असलेला त्याचा रसमधुर आवाज आणखी शेकडो गीतांतून आम्हाला ऐकता आला असता. दारूत बुडालेले कलावंत केवळ स्वतःचं नुकसान करीत नाहीत. ते कलेची परंपरा, इतिहास आणि समाजाची अभिरुची यांचंही नुकसान करतात. कलेची धुंदी कलावंताला खरं तर जन्मभर अनुभवता येते. कृत्रिम धुंदीची त्याला काय जरुरी आहे ?

माझा एक मित्र मला त्यावर उपहासानं म्हणाला, 'तुझ्यात एक आग्रही वृत्तीचा मास्तर लपून बसला आहे. त्याचे विचार फाजील सोवळे आणि सनातनी आहेत. कुठला विषय निघाला की हा जुनापुराणा मास्तर जागा होतो. नाकावर घसरलेली चाळिशी कपाळावर ओढून तो त्रासिकपणानं मचूळ उपदेशाचे घोट प्रत्येकाला पाजायला लागतो. दारूचं व्यसन एकवेळ सुटेल पण तुझं उपदेश करण्याचं व्यसन मात्र कधीच सुटणार नाही. अरे, मास्तरानं सुद्धा चोवीस तास मास्तर राहू नये. त्यानं कलावंतांचं मन समजून घ्यावं. त्यांच्या भावनाप्रधान जीवनात मोहाचे, आनंदाचे आणि दुःखाचे अनेक क्षण येतात. ही भावनावश माणसं चटकन् मद्याच्या आधीन होतात. कलावंत मग तो पुरुष असो की स्त्री असो, मदिरेला आलिंगन देतात. कैफात बुडालेला

सैगल काही एकटाच नाही. गीता रॉयचा अंत कसा झाला ? मीनाकुमारीसारखी कारुण्याची निष्पाप देवता बाटलीतच बुडून गेली ना ? सिनेमा, नाटकातले कलावंत तर सोडच ! पण तुमचे कवी, नाटककारही मद्याचे रसिक आस्वादक आहेत. अतिरेक करू नये हा तुझा मास्तरी सल्ला ठीक आहे. पण मनातलं दु:ख विसरायला किंवा आनंदाची लज्जत वाढवायला एकच प्याल्यासारखा दुसरा रोमँटिक साथीदार नाही. तो शृंगार खुलवतो. हास्य विनोदाला खुमारी आणतो. त्याच्या स्पर्शानं पायाखालची जमीन फुलांनी बहरून निघते. आकाशातल्या चांदण्या जवळ येतात. कल्पनेची मोरपिसं गालावर प्रणयिनीच्या कोवळ्या हाताप्रमाणं फिरू लागतात. न गाणाऱ्यालासुद्धा कंठ फुटतो. पाय तालावर पडतात आणि मनातली घुंगरं वाजायला लागतात. मद्याला निष्कारण शिव्या देणारे तुमच्यासारखे अरसिक अलीकडे कमी व्हायला लागले आहेत, याचा मला आनंद वाटतो. म्हणून म्हणतो कलावंतांची मन:स्थिती जाणून घे.'

माझा हा मित्र अर्धवट कवी आहे, किंवा खरं तर तो अर्धवटच आहे. खुळचट काव्यकल्पना आणि विसंगतपणा एकत्र करून त्यानं हे विनोदी भाषण माझ्यासमोर ठोकलं. प्रसिद्ध नटी मीनाकुमारी हिच्यासंबंधीचं एक इंग्रजी पुस्तक नुकतंच माझ्या वाचनात आलं, ती आपल्या वैयक्तिक आयुष्यात हरली होती. प्रेम आणि विवाह या दोन्ही क्षेत्रांत तिला अपयश सोसावं लागलं. ती बऱ्यापैकी कविताही करायची. सौंदर्य आणि अभिनय यांबाबतीत समकालीन नटींमध्ये ती आघाडीवर होती. पण दु:ख विसरण्याचा तिचा मार्ग तिला एका अटळ दु:खाकडं घेऊन जाणारा होता. सकाळपासून ती प्याल्यात रमलेली असायची. रात्रंदिवस प्याल्याचीच संगत होती. बेशुद्धावस्थेतच तिला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. मृत्यूच्यापूर्वी ती थोडावेळ शुद्धीवर आली आणि स्फुंदत स्फुंदत आपल्या नातलगांना आणि डॉक्टरांना म्हणाली, 'मला क्षमा करा, मी चुकले, मला आणखी जगण्याची संधी द्या.' पण ही संधी परमेश्वरानं नाकारली. एका चांगल्या प्रतिभावंत अभिनेत्रीचा दुर्दैवी अंत झाला. माझ्या अर्धवट मित्राला मी विचारलं, 'दु:ख विसरायला

लावणारी शक्ती दारूत असती तर साऱ्या जगानं तिचा स्वीकार केला असता, दारूनं दुःखं विसरली जातात हा एक केविलवाणा भ्रम आहे.' दारूचे दोन प्याले पोटात रिचवल्यानंतर एक प्रसिद्ध संगीतकार ढसढसा रडत म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, ज्या प्रेयसीबरोबर मी सुखाचे आणि तृप्तीचे असंख्य क्षण अनुभवले तिच्याबद्दल घाणेरड्या द्वेषानं मी लिहायला नको होतं. ते दुःख विसरण्यासाठी मी पितो. पण हृदयाला वेढून बसलेल्या त्या दुःखद आठवणींचा भडका कितीही दारू ओतून विझत नाही.'

आपल्या अंतःकरणातच एक आनंदाचा डोह असतो. तो आपण शोधायचा असतो. ज्याच्या प्रतिभेची तार झंकारत असते त्यानं त्या स्वर्गीय नादातच बेहोष व्हायला, स्वतःला विसरायला काय हरकत आहे? मद्याचे दोन घोट घेतल्याबरोबर माणसाचा सैतान होतो असली अतिरेकी तर्कदुष्ट विधानं मी करणार नाही, पण दारुबाजाच्या मनात सैतानाला फार लवकर आश्रय मिळतो यात शंका नाही, सामान्य माणसांच्या या व्यसनाबद्दल मला काही बोलायचं नाही. कारण त्याला परावृत्त करणारी शक्ती अद्यापी जन्मालाच आलेली नाही. दारूचे गुत्ते नाहीसे करता येत नाहीत. दुबळी आणि खुजी माणसं दारू ढोसून आपल्या मित्राच्या गळ्यात गळा घालतात आणि शत्रूला चार बीभत्स शिव्या हासडतात. त्यातच दरिद्री समाधान मानतात. पण कलावंतांनी, प्रतिभावंतांनी असल्या पातळीवर उतरावं काय? ज्यांच्या हातात निसर्गानं कलेचा आणि प्रतिभेचा प्याला काठोकाठ भरून दिला आहे, त्याला क्षुद्र दारूपासून कसला लाभ होणार? जी थोड्याच वेळात उतरते असल्या कृत्रिम मदिरेपेक्षा कलेची तीव्र धुन्दी अनुभवणं किती भाग्याचं आहे. पण दुबळे आणि बेजबाबदार कलावंत आत्मघाताच्या मार्गानं जातात. त्यांना यशही पचवता येत नाही; अपयशालाही तोंड देता येत नाही.

एका सुविख्यात गायिकेशी बोलताना तिनं आपला एक चमत्कारिक अनुभव सांगितला. ती म्हणाली, लखनौच्या मैफलीत मी मनापासून गायले. या मैफलीला रसिकांची एकच गर्दी झाली होती. पण काय असेल ते असो, कधी नव्हे ते माझं गाणं पडलं. माझ्यापेक्षा कमी तयारी असलेली

एक पोरगी त्या दिवशी बाजी मारून गेली. जमलेल्या रसिकांना माझं गाणं आवडलं नाही. गाण्यात धुंदी यावी आणि गाताना थकल्यासारखं वाटू नये म्हणून थोडेसं मद्य घेऊनच मी गायला बसले होते. अतिशय तन्मयतेनं मी गायले असं मला वाटलं. पण मला कसलीच दाद मिळाली नाही. हमखास रंगणारं माझं गाणं लखनौच्या रसिकांना आवडलं नाही. पण त्या पोरीच्या प्रत्येक आलापाला दाद मिळत होती. असं का व्हावं ते मला कळलं नाही. हॉटेलात माझ्या खोलीत येऊन मी मनसोक्त रडले. टेबलाबर बाटली होतीच. आणखी दोन घोट प्याले. इतक्यात दारावर कुणाची तरी थाप पडली. त्रासिकपणानं मी दार उघडलं आणि चकितच झाले. हिंदुस्थानातला एक मशहूर गायक दारात उभा होता. त्यानं मोठ्या वात्सल्यानं मला म्हटलं,

बेटी, तुझी मन:स्थिती मी जाणतो. तू शराब पिऊन गायला बसली होतीस असं माझ्या लक्षात आलं. तुझ्या नरड्यातली नजाकत आणि ती दाणेदार तान आज आढळली नाही. तुझ्या आवाजातला कोवळेपणा व खुशबू दारूनं गिळून टाकली. कैफात तुला वाटलं की आपण फार चांगल्या गात आहोत. तुझ्या आवाजात परमेश्वरानं सौंदर्याचा एक अजब पेला काठोकाठ भरून ठेवला आहे. त्याच्यात कृपा करून शराब ओतू नकोस.' मला त्या कलावंताचं म्हणणं पटलं. दारूच्या थेंबाकडंही तेव्हापासून मी ढुंकून पाहिलं नाही. आज वयाच्या साठाव्या वर्षी सुद्धा माझ्या आवाजाची जवानी कमी झाली नाही. तानपुरे वाजू लागले की माझ्या कंठात असलेला तो सुरांचा काठोकाठ भरलेला प्याला ओसंडून वाहू लागतो. त्यातून मला जी धुंदी येते तिच्यामुळं माझं जीवनगाणं रंगून गेलं आहे.

कोणत्याही कलावंताला त्याच्या कलेतूनच एक प्रकारची दिव्य नशा मिळाली पाहिजे. कस्तुरीचा सुगंध तर त्याच्यापाशीच आहे. दारूच्या प्याल्यात तो शोधण्यात काय अर्थ ?

## न संपणारे नाटक

कॉलेजात विद्यार्थी असतानाची गोष्ट. अेकदा आम्ही काही नाटकवेडच्या मित्रांनी निर्णय घेतला की यावर्षी स्नेहसंमेलनाच्यावेळी आपण अेक दणदणीत अैतिहासिक नाटक बसवायचं. हलक्या फुलक्या सामाजिक नाटकांतून आपल्या अभिनयाचा कस लागत नाही. अैतिहासिक नाटकातच आपलं अभिनयसामर्थ्य अुजळून निघेल. आम्ही चार-पाच मित्रांनी त्यापूर्वी दोन तीन नाटकं केली होती. आम्ही फार मोठे कलावंत आहोत, मराठी रंगभूमीला आमच्यामुळंच आता नवं जीवन लाभणार आहे, आम्ही रंगभूमीचे अेकनिष्ठ अुपासक आणि अुद्धारकर्ते आहोत. असा दिव्य साक्षात्कार त्या काळात आम्हाला झाला होता. आम्हाला वगळलं तर ही रंगभूमी गरीब आणि दीनवाणी दिसू लागेल याबद्दल आमच्या मनात तिळमात्रही शंका नव्हती. नाटकाचं दिग्दर्शन अर्थात् मीच करणार होतो. विष्णुपंत औंधकरांचं 'बेबंदशाही' हे नाटक सर्वानुमते ठरलं. त्यातली संभाजीची भूमिका आपणच करणार असा हट्ट साऱ्यांनीच धरला. पण 'बेबंदशाही' नाटकात केवळ अेकच संभाजी असल्यामुळं कोणातरी अेकाचीच निवड मला करायची होती. कुणाचीही निवड झाली तरी बाकीचे संभाजी नाराज होणार होते. या प्रश्नाचा गंभीर विचार करण्यासाठी मी राजकारणी चातुर्यानं अेक त्रिसदस्य समिती नेमून टाकली. आठ दिवसांच्या आत समितीनं आपला निर्णय मला

कळवायचा होता. पण ही समिती सुद्धा भलतीच धूर्त निघाली. तिनं 'संभाजी व्हायला अुत्सुक असलेल्या कोणाही अिच्छुकाची आपणच निवड करावी. आमच्या दृष्टीने सारेच जण संभाजी होण्यास पात्र आहेत,' असं कळवून अेक भलताच राजकीय पेचप्रसंग निर्माण केला. अखेर बी. अे. च्या वर्गातल्या अेका देखण्या पोराला आम्ही संभाजी बनवून टाकला. त्याची आकृती आणि प्रकृती छत्रपती संभाजीला अनुकूल असली तरी त्याच्या भाषेत विकृती होती आणि चमत्कृतीही होती. तो 'ण' च्या ठिकाणी न चुकता 'न' म्हणायचा 'गनोजी' रानीसाहेबांना म्हनावं, कोनत्या कारनानं हे राजकारन आपन करनार आहात? आम्हाला ते चालनार नाही.' एका वाक्यात अितके नकार देणाऱ्या संभाजीमुळं 'बेबंदशाही'च निर्माण होणार. मी त्याच्या भाषेला गंभीरपणे आक्षेप घेतला तेव्हा औरंगजेबाची भूमिका करणाऱ्या नटानं संभाजीची बाजू घेतली. तो म्हणाला

'भाषेला अेवढं महत्त्व कशाला देता? संभाजीची पर्सनॅलिटी काय ग्रँड आहे! तो नुसता स्टेजवर आला की टाळ्या पडतील. भाषा शुद्ध की अशुद्ध याचा विचार करायचं कारण नाही. संभाजी तलवार-बहाद्दूर होता. तो काही मराठीचा प्रोफेसर नव्हता.'

औरंगजेबानं संभाजीला सर्टिफिकेट दिल्यावर पुढं काय बोलणार? महाराष्ट्राच्या अितिहासात संभाजी आणि औरंगजेब शत्रू होते. पण आमच्या कॉलेजच्या नाट्येतिहासात मात्र ते दोघं जीवश्च कंठश्च मित्र होते. दररोज संभाजीकडून मी संवाद घोटून घेत होतो. पण 'न' आणि 'ण' यातला फरक या महापुरुषाला कधीच कळला नाही. नाटककाराची ती प्रासयुक्त, पल्लेदार भाषा संभाजीच्या जिभेवर काही केल्या बसेना. अितर पात्रांचीही जवळजवळ हीच ओरड होती. अैतिहासक नाटक निवडण्याची चूक रंगभूमीवर नवा अितिहास घडवणार आहे याची मला कल्पना नव्हती. संमेलनाचे दिवस जवळ येत होते. नाटक मात्र सर्व अर्थानं 'बसत' चाललं होतं. अखेर नाटकाचा तो दुष्ट दिवस अुजाडला. पडदा वर गेला. रंगभूमीवर प्रकाशाचा अेक तेजस्वी झोत आला. आवेशानं बोलण्याच्या भरात आमच्या नाटकातला संभाजी अपेक्षेप्रमाणं

चुका करू लागला. प्रेक्षकांनी अुपहासाची टाळी दिली. त्यावर 'आय ॲम सॉरी' असं म्हणून संभाजी महाराजांनी आपली भाषिक चूक दुरुस्त केली आणि अिथूनच नाटक कोसळायला सुरुवात झाली. प्रेक्षकांनी नाटकगृह अक्षरशः डोक्यावर घेतलं. महाराणी येसूबाअींनी तर त्यादिवशी कमालच केली. आपल्या मनगटावर त्यांनी चक्क रिस्टवॉच बांधलं होतं. पायात अुंच टाचांचे सँडल्स घालून, हातात अेक फॅशनेबल पर्स घेअून रंगभूमीवर येण्याची आपली हौस त्यांनी फेडून घेतली. 'अहो अितके लोक आपल्याकडे पाहाणार, थोडं चांगलं दिसायला नको का ?' येसूबाअींचा हा महान् युक्तिवाद अैकून मी कपाळावर हात मारून घेतला. पुढच्या प्रवेशात संभाजीबरोबर आवेशपूर्ण, वीरश्रीयुक्त बोलताना औरंगजेबाची दाढी गळून पडली. प्रेक्षकांनी पुन्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. आपल्या समर्थ अभिनयाचं रसिकांनी हे स्वागत केलं आहे असं वाटून बादशहा अधिकच तारस्वरात बोलू लागले. शहेनशहांचे ते ध्यान पाहून संभाजी महाराज रंगभूमीवर हसू लागले. 'बेबंदशाही'चा अितका विनोदी प्रयोग महाराष्ट्रात कुठंच झाला नसेल. नाट्यदिग्दर्शक होण्याची माझी 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' नटसम्राट 'संभाजी' व 'औरंगजेब' यांनी पार धुळीला मिळवली. त्या दिवसापासून मी नाट्यसंन्यास घेतला. आपण केवळ नाटकाचे अेक प्रेक्षक राहाण्यामुळंच मराठी रंगभूमी जगणार आहे ही खूणगाठ मनाशी बांधली.

कुणी काही म्हटलं तरी नाटकाची नशा और असते. चित्रपटातली अेक लोकप्रिय नटी मधून मधून नाटकात कामं करते. नाटकासाठी म्हणून शूटिंगच्या तारखा बदलते. मी तिला अेकदा विचारलं 'केवळ नाटकासाठी तुम्ही सिनेमाकडं पाठ फिरवता, असं नाटकात तुम्हाला विशेष काय आढळतं ?' ती हसली 'माणसाचा फोटोग्राफ आणि प्रत्यक्ष माणूस यांच्यात जितका फरक असेल तितकंच अंतर सिनेमात आणि नाटकात असतं. कदाचित छायाचित्र अधिक सुन्दर दिसत असेल पण ते निर्जीव असतं. केवळ कॅमेऱ्याची करामत असते. नाटकातल्या जिवंतपणा-मुळं मला रुपेरी पडद्यापेक्षा रंगभूमीचंच अधिक आकर्षण वाटतं.

कॅमेऱ्यासमोर अुभं राहून हसताना, रडताना आपल्याला कसलाच प्रतिसाद मिळत नाही. शूटिंगच्या वेळी माझ्या भोवती माणसं असतात पण ती तंत्रज्ञ, यंत्रज्ञ असतात. ते रसिकांच्या भूमिकेत नसतात.'

'पण सिनेमाच्या माध्यमातून तुम्हाला प्रचंड कीर्ती मिळाली. लक्षावधी प्रेक्षक तुमचं चित्र पाहू शकतात. नाटकाला मात्र याबाबतीत चित्रपटाची बरोबरी करता येणार नाही.'

त्या अभिनेत्रीनं पुन्हा हास्य केलं. तिचं हे हास्य मी पडद्यावर अनेक वेळा पाहिलं होतं. हसताना तिचं सौन्दर्य, तिचा खेळकरपणा अुठून दिसायचा. पण आता प्रत्यक्षात तिचं हास्य पाहाताना त्यातला जिवंतपणा अधिक जाणवला. त्या हसण्यातली मोहकता पडद्यावरच्या हास्यापेक्षा कितीतरी वेगळी होती. जणू तिच्या मनातलं अन् व्यक्तित्वा-तलं सुंदर चैतन्य तिच्या मंद हास्यातून ओघळलं. ती म्हणाली,

'कारागिरानं बनवलेली कागदी फुलं आणि वेलीवर फुललेली नैसर्गिक फुलं यात कितीतरी अन्तर असतं. कागदी फुलं रंगीबेरंगी असतील. फ्लॉवरपॉटमध्ये ती पुष्कळ दिवस राहतील. पण माझ्या केसात मात्र मी वेलीवरचीच फुलं माळीन. कारण ती जिवन्त सुवास घेअून आली आहेत. तुम्ही काही म्हटलंत तरी मला जीवनाचा गंध जसा नाटकातून मिळतो तसा सिनेमात मिळत नाही. सिनेमात पैसा मिळतो. रंगभूमीवर समाधान मिळतं.'

किती थोड्या पण मार्मिक शब्दांतून त्या नटीनं नाटकांसंबंधीची आपली प्रतिक्रिया व्यक्त केली होती. माझ्या मते नाटक पाहाताना प्रेक्षकांनासुद्धा हेच जिवंत समाधान मिळतं. हाडामासांची माणसं आपली विलक्षण सुखदुःखं घेअून आपल्यासमोर वावरत असतात. त्यांचे शब्द आणि त्यांचे आविर्भाव आणि त्यांच्या भावना व त्यांच्या हालचाली 'नाटकी' वाटत नाहीत. सच्चेपणाच्या स्पर्शानं आपण त्या नाट्यवस्तूशी सहकंप पावतो. मी त्या नटीला पुन्हा प्रश्न विचारला, 'नाटकाच्या जिवन्तपणाबद्दल तुम्ही आता बोललात. अेखादं अुदाहरण द्याल काय ?' ती सांगू लागली,

'मागच्या आठवड्यातच मी गडकऱ्यांच्या 'अेकच प्याला' या नाटकात सिंधूची भूमिका केली. या नाटकाचा प्राण माझ्या मते सिंधूत आहे. सिंधू म्हणजे पातिव्रत्य, प्रेम आणि कारुण्य यांचं मूर्तिमंत प्रतीक. सुधाकराच्या विनाशाला त्याचा दुर्गुण जबाबदार आहे. पण सिंधू तर सद्‌गुणांची खाणच आहे. तिला भोगावी लागणारी दुःखं आणि अखेर तिचा झालेला भयानक शेवट मला माझ्या अभिनयातून, तो विलक्षण परिणाम प्रेक्षकांपर्यन्त पोहोचवायचा होता. रंगभूमीवर मी अंतर्बाह्य सिंधूच बनून गेले. सिनेमात रडताना आम्हाला डोळ्यांत ग्लिसरीन घालावं लागतं. रडायचं सोंग कॅमेऱ्यासमोर करायचं असतं; पण हजार-बाराशे जिवंत प्रेक्षकांसमोर सिंधू म्हणून वावरताना माझ्या डोळ्यात सहज अश्रू यायचे. अभिनय हा जेव्हा अभिनय अुरत नाही तेव्हाच नाटक सर्वांगांनी फुलून येतं. मी सिंधूची नक्कल करीत नव्हते. गडकऱ्यांची ती थोर मानसकन्या माझ्या मनात आणि आत्म्यात संचारली. असा अनुभव सिनेमातल्या शूटिंगच्यावेळी कधीही येअू शकणार नाही. नाटक हे माझं श्रद्धास्थान आहे. सिनेमा हा व्यवसाय आहे.'

'नटसम्राट' नाटकातला गणपतराव बेलवलकर हा नाटकासाठीच जगला आणि नाटकासाठीच त्यानं मृत्यू पत्करला असं म्हणायला हरकत नाही. त्याच्या नसानसातून नाटक अुचंबळत होतं. नाटक हाच त्याचा प्राण होता. अेखाद्या कलेचा ध्यास घेअून जगत राहिलेली माणसं अलीकडे पाहायला मिळत नाहीत. कलेचा ध्यास, कलेची अुपासना या किती सुन्दर गोष्टी आहेत ! कलेच्या प्रेमातूनच परमेश्वरभक्तीची वाट दिसते असं मला वाटतं. नाटकांचं वेड तर मराठी माणसांच्या रक्तातच रुजलं आहे.

लोकमान्य टिळक तुरुंगातून सुटून आले तेव्हा त्यांनी देशातल्या राजकारणाबद्दल जशी चौकशी केली तसंच मराठी रंगभूमीचं कसं काय चाललं आहे याचीही विचारणा केली असं सांगतात. नाटक लिहिण्याची आणि नाटकात काम करण्याची आवड अिथं असंख्य लोकांत आहे. परवा मी कॉलेजच्या सूचनाफलकावर अेक सूचना लिहिली.

'स्नेहसंमेलनातल्या नाटकात काम करण्याची अिच्छा असलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी मला भेटावे.' 'त्यांच्यातून मला निवड करायची होती. पण तीनशे मुलामुलींनी मला घेरावच घातला. साऱ्यांनाच रंगभूमीवर पदार्पण करायचं होतं. तीनशे पात्रं रंगभूमीवर नांदू शकतील अितकी ती अद्यापी व्यापक झाली नाही, याची मला खंत वाटली. पण प्रत्येक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी अहमहमिकेने सांगत होती, 'मला अेकदा संधी देअून पहा, माझ्यामुळं आपलं नाटक यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही.' नाटकासंबंधीचं हे आकर्षण मला तरी आनंददायक वाटतं. अेकदा मी पुण्याला 'हिंदविजय' मध्ये साहित्यिकांनी केलेलं अत्र्यांचं 'कवडी चुंबक' नाटक पाहिलं आहे. त्यात आचार्य अत्रे, अनंत काणेकर, वसंत बापट, शिरीष पै वगैरे लेखकांनी आपलं अभिनयकौशल्य पणाला लावून 'कवडीचुम्बक' अुभं केलं होतं. नाटकगृहात प्रेक्षकांच्या अुसळलेल्या गर्दीत पहिल्या रांगेत प्रा. ना. सी. फडके हेही होते. आचार्य अत्रे पंपूशेठ पैठणकरांची मुख्य भूमिका वठवीत होते. नाटकातलं अेक पात्र येअून पंपूशेठला त्याची मुलगी प्रियकराबरोबर पळून गेल्याचं सांगते. आचार्य अत्र्यांच्यामधला खमंग टीकाकार अेकदम जागा झाला. ते ओरडून म्हणाले,

'गेली ना ती कार्टी पळून? तिची लक्षणंच सांगत होती. अहो, हा सारा त्या फडक्यांच्या कादंबऱ्या वाचण्याचा परिणाम! फडक्यांचं साहित्य वाचून कुणी सद्गुणी निपजणं शक्य आहे काय?' आणि असं म्हणून पहिल्या रांगेत बसलेल्या प्रा. फडक्यांकडं त्यांनी मिस्किलपणं बोट दाखवलं. दोन, तीन मिनिटं थिएटरात हशा आणि टाळ्या यांचा गजर चालू होता. रंगभूमीवरची अितर पात्रंही प्रसंग विसरून हसत होती. प्रा. फडकेही या अुत्स्फूर्त विनोदाचं टाळ्या वाजवून कौतुक करीत होते. हशा ओसरल्यावर सर्वांना अैकू जाअील अशा आवाजात ते म्हणाले, 'अत्र्यांची नाटकं पाहाण्याचा हा परिणाम आहे.' अत्रे फडके यांची ही गमतीदार जुगलबंदी मला अजूनही आठवते. या दोघांचेही संबंध 'नाट्यपूर्ण' होते. दोघांनीही नाटकं लिहिली आणि नाटकांतून कामंही केली. ज्याला नाटक आवडत नाही त्याला जीवन कसं जगावं तेच कळत नाही असं मी

म्हणेन. जीवनातही नाटक असतंच. ते नसेल तर जीवन मचूळ, मिळमिळीत होईल. नाटक म्हणजे संघर्ष. नाटक म्हणजे अनेक भावभावनांचं विलक्षण तांडव. ते कधी नंदादीपासारखं सौम्य असेल. पण ते कधी विजेसारखं कडकडाट देखील करील. ते कधी सुन्दर प्रेयसीसारखं आपल्याला काव्यात्म आलिंगन देईल. ते आपल्या थिजलेल्या मनावर कोमल, रमणीय भावनांचं चांदणं शिंपीत जाईल. तर कधी आपल्या विझलेल्या मनात वीरवृत्तीच्या रसरशीत निखाऱ्यांची पेरणी करील. ते केव्हा संतांच्या अंतःकरणातल्या माणुसकीच्या अमृतधारांची वृष्टी करील तर केव्हा एखाद्या कपटी खलपुरुषांचे विषारी फूत्कार ऐकवील. हे नाना अनुभव घेताना रसिक नाटकाशी अगदी समरस होऊन जातो. त्याच्या डोक्यातून ते नाटक लवकर उतरत नाही. आपण नाटक पहात आहोत हे व्यावहारिक अर्थानं सत्य नसून ते केवळ 'नाटक' आहे याचंही भान काही प्रेक्षकांना राहात नाही. नाटकातल्या घटनांचा त्यांच्यावर तीव्र परिणाम होतो. हे हळवे आत्यंतिक भावनाशील प्रेक्षक नाटक आणि वास्तव यांच्यातल्या सीमारेषेचं भान ठेवू शकत नाहीत. नाटक पाहणं हा एक कलास्वाद असतो. रसिकाची भूमिका न सोडता नाटकातल्या रसभावनांचा कलात्मक अलिप्ततेनं आस्वाद घ्यावा लागतो. हे त्यांच्या ध्यानातच येत नाही. ते स्वतःच नाटकात पार बुडून जातात. बुडणाऱ्याला पोहोण्याचा आनंद कसा मिळणार ?

एकदा एका शहरातल्या थिएटरात एका नाटकाचा प्रयोग चालू होता. नाटकातला खलपुरुष नायिकेची प्राप्ती करून घेण्यासाठी तिला अनेक उपायांनी छळत असतो. अखेर सारे प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर तिला एकटीला गाठून तिच्या अगतिकतेचा गैर फायदा घेण्यासाठी तिचा विनयभंग करू लागतो. ती असहाय तरुणी 'धावा हो धावा' असं म्हणून रडू लागली. खलपुरुषाचा आणि नायिकेचा अभिनय अत्यंत प्रभावी होता, नाटक अत्युच्च बिंदूला पोहोचलेलं होतं. हा प्रसंग खरोखरच त्वेष उत्पन्न करणारा होता. तिसऱ्या रांगेत बसलेला एक प्रेक्षक ही नाट्यमय घटना पाहाताना अत्यंत अस्वस्थ झाला. पाहता पाहता त्यानं रंगभूमीवर चित्त्यासारखी उडी घेतली. त्या खलपुरुषाचा

हात, आपली होती नव्हती अितकी शक्ती अेकवटून त्यानं पिरगाळला. त्याच्या कमरेवर आवेशानं अेक लाथ मारली. आणि ओरडून तो म्हणाला,

' अरे हरामखोरा, हलकटा, मी अेक तासापासून पाहातो आहे. तू सारखा या गरीब स्त्रीचा राक्षसी छळ चालवला आहेस. मुकाटचानं इथून चालता हो. नाहीतर अिथल्या अिथं तुला चांगलाच धडा शिकवतो. ' त्या खलपुरुषाला आणि त्या सज्जन स्त्रीला हे काय अजब घडत आहे तेच कळेना. खलपुरुष त्या प्रेक्षकाला गयावया करून म्हणत होता, ' अहो, मला का मारता ? हे नाटक आहे. मी नाटकातला पार्ट करतो आहे. ' थिअेटरमध्ये या नवीन अुद्भवलेल्या नाटकामुळं प्रचंड खळबळ अुडाली. अखेर व्यवस्थापकानं त्या सत्प्रवृत्त पण संतप्त प्रेक्षकाची कशीबशी समजूत घालून शांत केल्यावर या अद्भुत नाटकावर पडदा पडला. काही प्रेक्षकांची अवस्था याच्याउलट असते की कितीही करुणदारुण प्रसंग जरी रंगभूमीवर घडत असला किंवा अेखादा विनोदी प्रवेश असला तरी यांच्या चेहऱ्यावर कसलाही भाव अुमटत नाही. कुणाला तरी पोचवायला गेल्यासारखा भकास चेहरा करून हे अरसिकांचे राजे स्वस्थचित्तानं बसलेले असतात. मधून मधून पान तंबाखू चघळतात आणि पिचकाऱ्या मारतात. अितकीच यांची हालचाल असते. नाट्यकला यांना हलवू शकत नाही. या महाभागांना काय म्हणावं ? नाटक म्हणजे नवरसांचा अुचंबळता सागर. पण हे सागरात बुडूनही कोरडे राहिले तर तो बिचारा सागर काय करणार ? संन्याशाला ज्याप्रमाणं स्त्रीच्या सौंदर्याशी कर्तव्य नाही तसं हे कलासंन्यासी आहेत. कला-कामिनीचा विलास यांच्या कोरडचा मनात आसक्तीची गुलाबी छटा निर्माण करू शकत नाही. असलं करंटं वैराग्य काय कामाचं ? कळकट आणि मळकट वृत्तीच्या माणसांनी कलास्वादाच्या भानगडीत पडू नये हेच खरं !

नाटकाबद्दल बोलताना मी खरं तर जीवनाबद्दलच बोलत आहे. जीवनाला नाटकाची अुपमा अनेक कवींनी, लेखकांनी दिली आहे. काही जणांच्या जीवनाची नाटकं साफ कोसळतात. कितीही तालीम केली तरी मूळ कथावस्तूच चांगली नसते. रंगरंगोटी छान झाली. नेपथ्य

आणि प्रकाशयोजना अुत्तम बिनचूक केली. पण कथेतच प्राण नसेल तर ते नाटक नीटसं अुभं राहात नाही. कोणत्या तरी अज्ञात मेकअप्मननं आपला चेहरा रंगवला आणि परमेश्वर नावाच्या महान् सूत्रधारानं आपल्याला काहीही न विचारता आयुष्याच्या रंगभूमीवर ढकलून दिलं. प्रकाशाच्या झोतात अुभं केलं. मग आपण तरी काय करणार ? आपल्या वाटचाला आलेली ही लहानमोठी भूमिका कशीतरी वठवण्याशिवाय, साजरी केल्याशिवाय गत्यंतरच नसतं. आपल्याला आपल्या अिच्छेप्रमाणं या नाटकात कधीच भूमिका मिळत नाही. ज्याला सत्ताधीशाची भूमिका हवी असते त्याला हा आकाशातला दिग्दर्शक काखेत झोळी देअून भिक्षाधीशाचा पार्ट मन लावून कर म्हणून हुकूम देतो. कोणा अेका स्त्रीला लक्षावधी रसिकाच्या हृदयाचे ठोके वाढविणारी ड्रीमगर्ल व्हायचं होतं. पण तो लहरी निर्माता तिच्या पदरात सौंदर्याचा कणही टाकीत नाही. आम्हाला नको असलेल्या चमत्कारिक भूमिका आमच्या गळ्यात जबरदस्तीनं बांधणाऱ्या या सूत्रधाराविरुद्ध बंडाचा आवाज अुठवला तरी त्याचा काहीच अुपयोग होत नाही. हा श्रेष्ठ पण लहरी नाटककार कोठे लपून बसला आहे कुणास ठाअूक ? कोणी म्हणतात, तो तर क्षीरसमुद्रात शेषाच्या मअूमअू गादीवर सुखानं पहुडला आहे. लक्ष्मी त्याची चरणसेवा करीत आहे. काही का असेना ! आम्हाला नाना प्रकारची नाटकं करायला लावून हा दिव्य निर्माता आणि दिग्दर्शक कोठेतरी अज्ञात खुर्चीवर बसून आमची भूमिका पाहात असला पाहिजे. अेखाद्या पात्राला तो अकल्पितपणे रंगभूमीवरून अुचलतो. कुणाचा अभिनय फार यशस्वी होत आहे असं पाहिल्यावर मध्येच त्याच्या अपुऱ्या भूमिकेवर निर्दयपणे अखेरचा पडदा टाकून मोकळा होतो. या जीवनाच्या विश्वसंसाराच्या महाप्रचंड, अतिविराट रंगभूमीवर तो नाना रसरंगांची अफाट अुधळण करीत राहतो. येशूख्रिस्त असो, अब्राहम लिंकन असो, की महात्मा गांधी असो या महापुरुषांच्या आयुष्य-नाटकांत तो करुणदारुण, भव्यअुदात्त प्रसंगांची रेलचेल करतो. या नाटकांचे शेवट भयानक होतात. पण त्यांचा अभिनय मात्र शतकानुशतकं पुसला जात नाही. याच नाटककारानं काही स्त्रियांच्या नाटकांत

सौंदर्य आणि शृंगार, प्रेम आणि तारुण्य, संगीत आणि नृत्य याची बहार अुडवून दिलेली असते. पण असंख्य स्त्रियांना दुःख, दैन्य आणि गुलामगिरीत पिचत ठेवलेलं असतं. तो कोणाला फूटपाथवर संसार करायला सांगतो. कोणाला तो योग्यता न पाहाता खुशाल राजवाड्यात ठेवून टाकतो.

पण काही असलं तरी हे नाटक चित्रविचित्र, रम्यभीषण, अद्‌भूत रंगांनी रंगलेलं आहे. माझ्या तर्काच्या कल्पनेच्या पलीकडचं हे रंगत चाललेलं नाटक हजारो वर्षं असंच रंगणार आहे. ते कधीच संपणार नाही. आम्ही नट संपत असतो. पण नाटक कधीच संपत नाही.

## कृष्णा, तुला आलंच पाहिजे !

✤ ✤

कधी कधी मला प्रश्न पडतो, गवळीवाड्यात वाढलेल्या, गायी-वासरांत वावरलेल्या, सवंगड्यांबरोबर अुनाडलेल्या आणि पोरीबाळींची गोड चेष्टा करणाऱ्या महाभारतीय श्रीकृष्णाच्या व्यक्तित्वात असं कोणतं दिव्य रसायन सृष्टीनं ओतलं आहे की ज्यामुळं साऱ्या जगानं त्याच्यावर प्रेम करावं? प्रतिभेच्या कोणत्या विलक्षण प्रस्फुरणाच्या क्षणी व्यासांच्या मनात हा कृष्णावतार झाला असावा? अेखादं अप्रतिम मोहक व्यक्तित्व केवळ कल्पनेच्या पातळीवर येण्यासाठी सुद्धा कवीला कित्येक जन्म तपश्चर्या करावी लागते. भूमीच्या गर्भातून अुदयाला येण्यासाठी अेखाद्या फुलाला सुद्धा पुष्कळ काळ वाट पाहावी लागते. मत्त सुगंधानं आसमंत दरवळून टाकणाऱ्या मोहक पुष्पाचं दिवास्वप्न तरुणभूमीला प्रथम पडावं लागतं. तेव्हाच तिच्या गर्भागारात निसर्ग बीजारोपण करतो. व्यासांच्या काव्यप्रतिभेला कृष्णाचं स्वप्न असंच दीर्घकाळ पडलं असेल काय? ज्या कल्पनेच्या सरस वेलीवर हे कृष्णपुष्प अुगवलं आणि बहरलं ती व्यासांची कल्पलता त्रिभुवन धन्य झाली असं का म्हणू नये? कृष्ण प्रथम व्यासमहर्षींच्या हृदयात जन्मला. नंतर तो कंसाच्या बंदीगृहात देवकीच्या पोटी आला आणि त्यानंतर गौळीवाड्यात त्याचा विकास होत गेला. महाभारतात व्यासांनी रेखाटलेली कृष्ण नावाची ही व्यक्तिरेखा अत्यंत रसरशीत आहे यात

कसलाच संशय नाही. अेका सर्वसाधारण गवळ्याच्या पोरातून परमेश्वर घडवणाऱ्या व्यास महाकवींच्या लेखणीला अमृताची शाओ लागल्या-शिवाय असा अद्‌भुत चमत्कार घडणं शक्यच नाही. त्यानं निर्माण केलेला तो नंदकिशोर आनंदाचा कंद होअून साऱ्या संसारात चैतन्याची बरसात करीत आहे.

अरे, नंद-यशोदेच्या अुनाड पोरा! कसलं दिव्यमोहन तुझ्या जवळ आहे हे आम्हा पामरांना सांगशील का? यमुनेच्या तीरावर पाणी भरायला आलेल्या तरण्याताठ्या पोरींची नाजुक प्रेमचेष्टा करणारा तू अेक खोडकर रसिक म्हणून अमर झाला आहेस. तुझ्या खोड्यांचा विषय झालेल्या त्या पोरी कौतुकाच्या कोपानं तुझ्या प्रतापांचं वर्णन यशोदेजवळ करतात. तेव्हा आपण त्या गावचेच नाही असा नाटकी अभिनय करून आपल्या आओीला तू सहज फसवू शकलास. ज्यांच्या अंगावर तू पाणी अुडवलंस, ज्यांची वस्त्रं चिंब भिजवलीस, ज्यांच्या रांजणावर तू खडे मारलेस, त्या गोपिकासुद्धा रागावण्याचं नाटकच करीत नव्हत्या काय? यमुनेच्या काठावर कृष्ण आणि गोपिका यांच्या मनात काठोकाठ भरलेलं हे प्रेमळ प्रेमनाटच युगायुगांत असं कधीच रंगलं नव्हतं. तुझ्या चरित्रातून गोपिकांबरोबर केलेला हा अत्यंत हृदयस्पर्शी प्रणयविलास जर काढून टाकला तर कृष्णा, तुझ्या चरित्रातली आणि चित्रातली ती सुंदर रंगीबेरंगी झळाळी निश्चितच कमी होओील. जगाला आवडतो तो अवखळ, वात्रट रसिक कृष्ण. गोपी नसेल तर आम्हाला कृष्ण केविलवाणा दिसायला लागेल. दह्यादुधांचे माठ फोडणारा आणि प्रेमळ चोरी करणारा, गोपींच्या मनाच्या माठांतल्या प्रेमरसात रसलीन झालेला कृष्ण हा आमच्या महाभारतीय अंतःकरणाच्या गाभाऱ्यात चिरकाल नांदणार आहे.

शृंगाराला पवित्र्याच्या रंगात रंगवून काढणाऱ्या कलावंत कृष्णा! तुझ्या शृंगाराच्या कथा जगाच्या रुक्ष, रसहीन मनावर प्रेमरंगाची पिचकारी सहज अुडवून जातात. प्रणय आणि शृंगार यांच्याकडं भलत्याच अपराधी ओशाळ्या वृत्तीनं पाहाणाऱ्या लोकांना तू खट्याळ शृंगारातली अेक आगळी जादू जाणवून दिलीस. कवींच्या लेखण्यांतून तुझ्यामुळंच

या दिव्यरसाचे पाझर वाहू लागले. राधेवर प्रेम करणारा तुझ्यासारखा संपन्न मनाचा प्रेमवीर त्या सामान्य गवळणीला देखील अमरत्व देऊन गेला. तुझ्या बासरीतून निघणाऱ्या अुन्मादक, कलापूर्ण, रुचिर, स्वरसौंदर्याच्या सागरात ती राधा तर पार बुडून गेली. गायीगुरांनाही आकर्षून घेणारी ती तुझी मुरली आजच्या जगात क्षणभर जरी अैकू आली तरी प्रेमाचं विलक्षण काव्यमय चांदणं या शापित जगात पुन्हा पडल्याशिवाय राहाणार नाही. अेका साध्या मुरलीत तू आपली सारी अद्‌भुत कलाशक्ती सहज ओतलीस. अरे मुरलीधरा ! कन्हैया ! ! त्या दिव्य अतींद्रिय प्रेमाचे अुत्कट सूर आज आम्हा करंटयांच्या कानी मुळीच पडत नाहीत. शरीराच्या आंधळया वासनेला प्रेम समजण्याचा बेशरमपणा आमच्या हातून प्रतिदिनी घडतो. ज्यांनी तुझ्या बासरीतून अुदयाला आलेले अमृतमधुर स्वर आपल्या अंगोपांगांनी पिअून घेतले त्यांचं जीवन म्हणजे चैतन्याची अेक आनंदयात्राच बनेल. जी बासरी अुत्कट प्रीतीचं अुन्मादी चांदणं निर्माण करते, रसिकतेला अुधाण आणते, प्रेमाला अुदात्ततेच्या शिखरावर चढवते, वासनेला शुद्ध प्रणयाची दीक्षा देते, मनाच्या भकास वाळवंटात जिवंत भावनांची यमुना दुथडी भरून वाहवते, संन्याशाच्या चित्तातही अनुरक्तीचा रंग अुधळते, मानव्याला देवत्वाचे रूप दाखवते, आणि मृत्यूतही जीवनाची सळसळ निर्माण करते ती बासरी आज कुठं सापडत नाही. मुरलीधरा ! ती बासरी घेअून तुला पुन्हा या शुष्क जगात नवसौंदर्याची हिरवळ फुलवण्यासाठी यावंच लागेल. तू अर्जुनाशी बोलताना आणि त्याला गीता सांगताना ‘संभवामि युगे युगे’ असं अभिवचन दिलं आहेस. केव्हा येणार तू ? जिवाचे कान करून तो दिव्य मुरली ध्वनी अैकण्यासाठी आम्ही ताटकळून बसलो आहोत. आमच्या मनात तुझ्या बासरीनं चैतन्याचे तरंग निर्माण करावेत. मळलेली मनं आणि जळलेली अंत:करणं घेअून आजचं जग केवळ वैराच्या आणि द्वेषाच्या काटेरी वाटेनं रखडत चाललं आहे. क्षुद्र स्वार्थानं बरबटलेल्या हातांनी शत्रुत्वाचे ढोल बडवीत बसलेल्या या जगाच्या कोंदट वातावरणात तुझ्या मुरलीचे सुगंधी सूर पुन्हा निर्माण झाल्याशिवाय आम्हाला सौंदर्याचा आणि शृंगाराचा

साक्षात्कार होणार नाही. स्त्री-पुरुषांनी परस्परांच्या प्रेमळ सान्निध्यात प्रणयाच्या तारा छेडीत रसील्या वृत्तीनं कसं जगावं याचे धडे तुझ्या-सारख्या पुरुषोत्तमानं अेके काळी दिले ते आज आम्ही पार विसरून गेलो आहोत. प्रेमाच्या भूलथापा देअून भोळ्या पोरींचा गळा कापणारे आणि अेकट्या दुकट्या स्त्रीला गाठून तिच्याशी जबरदस्तीनं अधम व्यवहार करणाऱ्या, प्रेमभावनेचा लवलेशही नसलेल्या नीच नरपशूंचं आज पेव फुटलं आहे. अशावेळी कंसासारख्या दुरात्म्याला ठार मारून लोकांचं न्यायी राज्य अुभारणाऱ्या तुझ्यासारख्या नरवीराची तीव्रतेनं आठवण होते. मुरलीधरानंच सुदर्शनचक्राचंही धारण करावं यातच खरं औचित्य असतं, पुन्हा अेकदा त्या बासरीतली ती धुंद सुरावट अैकून मुग्ध प्रीतीची अनंत कंपनं आमच्या मनीमानसी अुठू दे !

प्रेममार्गावरच्या अमर पथिका ! तुझ्या चरित्रात ओथंबलेला प्रेमशृंगाराचा सुगंध अितरत्र कुठंच आढळत नाही. रुक्मिणी-सत्यभामे बरोबरच्या तुझ्या प्रेमकथा अनंत पिढ्यांनी अैकल्या आहेत. अेका वेड्या मीरेनं कृष्णप्रेमाचं जरतारी स्वप्न आपल्या हृदयाच्या घरट्यात अनिवार अुत्कटतेनं जोपासलं. तुझं चिंतन करता करता मीरेच्या श्वासनिःश्वासांत, रक्ताच्या प्रत्येक बिंदूत, हृदयाच्या प्रत्येक स्पंदनात, जीविताच्या प्रत्येक क्षणात, अंगांगांच्या प्रत्येक लहरीत, विचाराच्या प्रत्येक स्फुरणात तूच मिसळून गेलास. राधा जशी कृष्ण झाली तशी मीराही कृष्णरूप झाली. तू ज्याचा किंवा जिचा होतोस त्यांचं अस्तित्वच पुसून टाकतोस. जी चांदणी चंद्राजवळ जाते ती चंद्राच्या रजतरसात समरसून जाते. कृष्णा ! तू असाच साऱ्यांना कवेत घेणारा, साऱ्यांचा जीवनचंद्र आहेस. तुझी केवळ मूर्ती मनाच्या देव्हाऱ्यात ठेवून तुझी भजनं गात गात निघालेल्या मीरेच्या हातातल्या प्याल्यातलं विषही संजीवन झालं. संसारातून अुठलेली मीरा कृष्णाशी कायमची निगडित झाली. राधेचा कृष्ण मीरेचाही झाला. आणि मीरेचा कृष्ण कुरुप कुब्जेचाही प्रियकर होता. प्रियकर होण्याची आणि प्रणयाची अुधळण करण्याची ही अद्भुत शक्ती तुझ्या आत्म्यात होती म्हणून तर तू परमात्मा होअू शकलास ! प्रणयाच्या खेळात तू कधी कपटही केलं असशील, असलं

'कृष्णकारस्थान' आम्हाला आवडतं. तू सर्वांच्या हृदयाचा लाडका चोर आहेस. ज्याची चोरी होते त्याला आनंद देण्याची तुझी किमया आम्हाला लाभली तर आमच्याही जीवनाच्या कालिंदीत नव्या अुत्साहाच्या लाटा अुचंबळतील. आमच्या जगात तर चोरांचा, महाचोरांचा बाजार भरला आहे. वरूनही कृष्ण आणि आतूनही कृष्ण असणाऱ्या या चोरांनी आणि जारांनी माणसांची संस्कृतीच काळीकुट्ट करून टाकली आहे. तुझं सारंच जीवन म्हणजे प्रेम, ज्ञान आणि पराक्रम यांची संगमभूमी होतं. जगायला या तीन मूल्यांचीच नितांत गरज असते. दुर्दैव असं की आजच्या परिस्थितीत या अुदात्त तत्त्वांच्या चिंधड्या झाल्या आहेत. ज्या प्रेमात संस्कार नाही, विवेक नाही, मर्दुमकी नाही असल्या नेभळ्या प्रीतीची फिल्मी गीतं या जमान्यात तरुणतरुणींना रुचावीत यापेक्षा अभिरुचीचा आणि संस्कृतीचा अधःपात आणखी काय बरं होणार? द्वारकेच्या सिंहासनावर बसल्यानंतरही सुदाम्याची आवर्जून आठवण ठेवणारा तुझ्यासारखा मित्र आज दुर्मिळ झाला आहे. प्रियकर, पती, पुत्र, मित्र, बंधू, शिष्य या अनेक नात्यांना कृष्णा, तुझ्यामुळंच प्रतिष्ठा आली. सामर्थ्य आलं. यमुनेच्या काळ्या पाण्यावर तू गायिलेल्या प्रेमगीतांनी हर्षाचे, नाजुक प्रणयाचे लक्षलक्ष तरंग अुठले असतील. यमुनेच्या तीरावर रंगलेली तुझी रासक्रीडा आणि घुमलेला तुझा पावा यांचा धुंद अुपभोग ज्या कालखंडानं घेतला तो काळ धन्य झाला. यमुना हे प्रेमभावनेचं आदिकेंद्र आहे असं म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. आजही यमुना वाहात आहे. तिच्या पोटातून अुठणाऱ्या लाटा कधी कधी दाहक निराशेचे सुस्कारे सोडतात. ज्या नदीच्या पाण्यात गोपिकांनी तुझ्यासमवेत क्रीडा केली त्या प्रेमपुनीत प्रवाहात निरपराध मानवी रक्ताचे पाट वाहताना कधी कधी दिसतात. ती कृतार्थ यमुना तुझ्याबरोबरच कालौघात अंतर्धान पावली. आता असलेली यमुना पूर्वीसारखी धुंद आनंदात खळाळून वाहात नाही.

....पुरुषार्थाची गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णा! अरे, तुझं आयुष्य अेक मूर्तिमंत महाकाव्य आहे. नाना रसांनी आणि रंगांनी, नाना छंदांनी आणि गंधांनी, नाना अंगांनी आणि ढंगांनी संपन्न झालेलं अितकं

आकर्षक, अितकं चित्रविचित्र आयुष्य दुसऱ्या कोणत्याच महापुरुषाला लाभलं नसेल. सूर्यकिरणात जसे रंग आहेत तसेच तुझ्या जीवितातही विविधरंग अुचंबळून आले आहेत. तुझी सगळीच रूपं आम्हाला विलक्षण देखणी वाटतात. गवळ्यांच्या पोरांबरोबर गायींच्या मेळाव्यात झाडाखाली बसून तू जो गोपाळकाला करून खाल्लास तेव्हाचं तुझं बालरूप जेवढं मोहक होतं तेवढंच सुदाम्याचे पोहे खाताना तुझं प्रौढ राजबिंडं दर्शन भुरळ पाडणारं होतं. रुक्मिणीला आपल्या हातांनी अुचलून तू रथात घेतलंस आणि द्वारकेच्या दिशेनं त्या सुंदरीला तिच्या संमतीनं पळवून नेलंस तेव्हाचं तुझं प्रियदर्शन असंच लोभसवाणं होतं. प्रणयरंगी रंगलेल्या पुरुषोत्तमाचा तो पुरुषार्थी आविष्कार होता. ही सारीच रूपं मला सदैव मोह घालतात. पण अर्जुनाचा सारथी होअून त्याच्या रथाचे घोडे हाकारणाऱ्या कृष्णाचं आगळंच दर्शन जेव्हा घडतं तेव्हा तर मी हरखूनच जातो. आज तुझ्याशी हितगुज करताना माझ्या मनाला जाळणारी अेक वेदना तुला स्पष्टपणानं बोलून दाखवतो. अर्जुनाच्या रथाची सूत्रं आणि अर्जुनाच्या मनाच्या नाठाळ घोड्याचे लगाम तुझ्या बळकट हातात होते म्हणूनच मदोन्मत्त कौरवांचा नि:पात होअू शकला आणि कुरुक्षेत्राच्या रणमैदानावर सज्जनांच्या विजयाचा ध्वज डौलानं फडफडला. आज आमच्या राष्ट्राच्या रथाचे घोडे भरकटत कुठं चालले आहेत हे अर्जुनालाही माहीत नाही आणि सारथ्यालाही कळत नाही. या राष्ट्ररथाच्या भोवती दुर्योधन, दु:शासन, आणि त्यांना मदत करणारे अनेक संपन्न राजे हातात शस्त्रं घेअून अुभे आहेत. आमच्या सैन्यात आता बेदिली निर्माण करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. परकीय शक्तींच्या दुष्ट हस्तक्षेपामुळं स्वकीयांचं स्वातंत्र्य धोक्यात आलं आहे. आमच्या रणशूर सेनापतीचा भ्याडपणानं, दगलबाजीनं खून घडवून आणण्यात हे कौरव यशस्वी झाले आहेत. शत्रूंचा वेढा पडलेल्या आजच्या अर्जुनाच्या रथाला मार्गदर्शन करण्यासाठी व अुधळलेल्या घोड्यांचे लगाम खेचून धरण्यासाठी आम्ही अेका श्रीकृष्णाच्या शोधात आहोत. आमच्यापाशी अर्जुन आहे. पण त्या अर्जुनाला गीता सांगणारा श्रीकृष्ण मात्र दुर्दैवानं कुठंच नाही. तुझी यमुना, तुझी मथुरा, तुझी

द्वारका आज भयभीत झाली आहे. मरगळून गेलेल्या भेकडपणाच्या आणि निष्क्रियतेच्या ढोलीत दडून बसलेल्या षंढ वृत्तीला तेजस्वी पराक्रमाचं स्वप्न दाखवणारा तुझ्यासारखा तत्त्वज्ञ महावीर या देशाला आज लवकर हवा आहे. गोकुळाष्टमीच्या दिवशी केवळ तुझं नाव घेऊन दहीहंडी फोडणारे सांप्रदायिक भक्त पराक्रमाचा अितिहास घडवू शकत नाहीत. दुष्टांच्या अन्यायी शक्तींवर सारी सामर्थ्ये अेकवटून प्राणपणानं तुटून पडणारी आणि नीचांना जरब बसवणारी जळजळीत कृष्णवृत्ती जोपर्यंत अुफाळून येत नाही तोपर्यंत या राष्ट्राच्या भोवती जिभल्या चाटीत अुभी असलेली कोल्ह्या-लांडग्यांची पिलावळ मागे हटणार नाही.

पुरुषार्थी तत्त्वज्ञानाच्या सम्राटा! तुझा प्राणप्रिय मित्र आणि शिष्य अर्जुन अेकदा असाच हातपाय गाळून रणांगणातून माघार घेअू लागला, तेव्हा तुझ्या ओजस्वी शब्दांच्या कठोर आसुडांनी तू त्याला फटकारलंस म्हणूनच हस्तिनापूरचं सिंहासन 'धर्माला' मिळू शकलं. 'धर्म' विजयी व्हायचा असेल तर केवळ अर्जुनभीमशक्ती अुपयोगी पडणार नाही. धर्माला जोपर्यंत कृष्ण भेटत नाही, तोपर्यंत धर्म अज्ञात-वासात आणि वनवासातच खितपत पडणार यात संशय नाही. पुरुषत्व गमावून बसलेला अर्जुन तुझ्या वाणीचं पाणी पिअून पुन्हा तेजःपुंज झाला. ते पुरुषार्थाचं दिव्य रसायन हे श्रीकृष्णा! आज आम्हाला हवं आहे. या देशात कृष्ण हा पूजेचा विषय नसून तो अनुकरणाचा आणि आचरणाचा 'धर्म' बनला पाहिजे. सोवळ्यानं तुझी पूजा बांधणारे आणि तुझ्यासमोर रासनृत्य करणारे नाच्ये पोरे तुला ओळखू शकत नाहीत. पौरुषाचा डिंडिम वाजवणारे वीरपूजकच तुझ्या व्यक्तित्वाचे पोवाडे गाअू शकतील. शूर मर्दाचा पोवाडा गाता गाता नामर्दाच्या कंगाल आयुष्यात मर्दुमकीची विद्युल्लता झळाळून अुठली पाहिजे. तीच खरी कृष्णपूजा होअील. कृष्णा! तू जसा आहेस तसा सर्व अर्थांनी या दुबळ्या बनलेल्या देशात पुन्हा अेकदा जरूर जन्म घे. तुझा जन्म झाल्याचं कळताच मदोन्मत्त झालेल्या कंस, जरासंधांना पळता भुअी थोडी झाल्याशिवाय राहाणार नाही. तू जन्माला आलास की देशातल्या

साऱ्या नद्यांच्या पाण्यावर पुन्हा नव्या स्वप्नांचे तरंग अुठतील. कोठेतरी कोपऱ्यात खिन्नपणे पडलेली ती बासरी पुन्हा अमृताचे सूर काढीत तुझ्या ओठांचं चुंबन घेअील. विकल झालेल्या राधेला, व्याकुळलेल्या मीरेला, आतुरलेल्या गोपिकांना, हुरहुरणाऱ्या गायीगुरांना हर्षाच्या अुकळ्या फुटतील. राधेच्या विपुल केशभारात सुगंधी रानफुलांची वेणी पुन्हा दिमाखानं शोभू लागेल. मीरेच्या नाजुक पायातील घुंगुरं प्रियकर स्पर्शानं पुन्हा रुणझुणू लागतील. शिशुपालाच्या विषयांध नजरेचं भक्ष्य बनलेल्या निष्पाप रुक्मिणीच्या गौरसुंदर मुखावर लज्जेची गुलाबी छटा पुन्हा खुलू लागेल. विराटाच्या घरी भिक्षुकी करून पोट भरणारे धर्मराज आणि हातात बांगड्या भरून अंतःपुरात बसलेले बृहन्नडेच्या वेषातले अर्जुन पुन्हा अेकदा आपल्या भोवतालचे सारे पाश बंडखोरपणे झुगारून स्वातंत्र्याची भीमगर्जना करतील.

हे प्रणयपुरुषा, हे पुरुषोत्तमा, हे देवकीनंदना, गोपीवल्लभा, नंदकिशोरा, पुन्हा येणार ना तू ? तुला आलंच पाहिजे. या भारताचं महाभारत करण्यासाठी तुला पुन्हा अेखाद्या गौळीवाड्यात, सामान्य माणसांच्या मेळाव्यात अवतार घ्यावा लागेल. केव्हा येणार तू ? आम्ही सारेच तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलो आहोत. तू आता कोणत्याही वेषात आलास, कोणत्याही प्रदेशातून आम्हाला साद घातलीस तरी आम्ही तुला सहज प्रतिसाद देअू. राधेच्या आणि मीरेच्या, धर्माच्या आणि अर्जुनाच्या आणि आमच्या कोटी कोटी भारतीय जनतेच्या गळ्याची शपथ घालून तुला सांगतो कृष्णा ! तुला आलंच पाहिजे.

## अद्वटासी पाहिजे अद्वट

संत एकनाथांच्या चरित्रातली एक घटना. सकाळी नित्याप्रमाणं नदीवर स्नान उरकून शुचिर्भूत होऊन ते घराकडे परतत होते. रस्त्याच्या कडेला एक गांवगुंडांचं टोळकं बसलं होतं. आपल्या 'संस्कृतीला' अनुसरून त्यांनी एकनाथांची अर्वाच्य शब्दांत कुचेष्टा केली. शिव्या दिल्या. त्यातल्या एका शूरवीरानं पानतंबाखू खाऊन त्या सत्पुरुषाच्या अंगावर एक पिंक टाकली. आपल्या कर्तृत्वाचा त्या टोळक्याला फारच अभिमान वाटला असावा. एकनाथांनी त्यांना कसलंही प्रत्युत्तर दिलं नाही. शांतपणानं ते परत फिरले पुन्हा स्नान करून घराकडं जात असताना याच प्रकाराची पुनरावृत्ती घडली. तरीही नाथांचा संयम सुटला नाही. पुन्हा स्नान आणि पुन्हा त्यांच्या अंगावर पिचकारी मारण्याचं ते गलिच्छ कृत्य असा प्रकार अनेक वेळा घडत राहिला. नाथांनी क्षुब्ध होऊन त्या अधमाला जर म्हटलं असतं, 'नीचा, आता तुझा हलकटपणा यापुढं सहन करणार नाही. इतका वेळ तुला क्षमा केली. पण आता मात्र तुझ्या तोंडातला एकेक दात मोजून तुझ्या हातात ठेवीन. तुझे असले घाणेरडे, दुष्ट चाळे सहन करायला आम्हीही मेलेल्या आईचं दूध प्यालेलो नाही.' तर त्यांचं म्हणणं योग्यच ठरलं असतं.

पण एकनाथांनी मात्र प्रत्यक्षात असं कांहीच म्हटलं नाही. त्यांच्या मनाची अपूर्व शांती त्या गुंडाच्या दुष्टपणामुळं ढळली नाही. या गोष्टीचा

शेवट असा झाला की, त्या दुर्जनाला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. आणि त्यानं एकनाथांच्या पायावर डोकं ठेवून त्यांची क्षमा मागितली. ही घटना जेव्हा प्रथम माझ्या वाचनात आली तेव्हा फारशी पटली नाही. थुंकणाऱ्याच्या तोंडावर थुंकणं शक्य नसलं तरी त्याला प्रतिकाराचे दोन-चार शब्द त्या साधुपुरुषानं ठणकावून सांगायला हवे होते. त्या गुंडांचं हृदय-परिवर्तन झालं ही घटना मला काल्पनिक वाटते. कदाचित ती खरीहि असेल. पण एखाद्या सुखान्त नाटकात मुद्दाम घडवून आणावा असा हा प्रसंग वाटतो. एकनाथांची सहिष्णुता, साधुत्व आणि अपूर्व मनःशांती यांचं दर्शन घडवणारी ही कथा आजही मला फारशी रुचत नाही. पण त्याला उपाय नाही. संतांच्या मनाची ठेवण आम्हा सामान्य माणसांना समजणं शक्य नाही. विशिष्ट काळ आणि परिस्थती यांचा संदर्भ लक्षात घेऊनच एकनाथांच्या या शांत प्रतिक्रियेची मीमांसा केली पाहिजे. असंस्कृतपणाला तशाच असंस्कृतपणानं नाथांनी उत्तर दिलं नाही हे त्यांच्या दृष्टीनं संयुक्तिकच आहे. अस्तन्या मागे सारून त्या दुष्टाच्या अंगावर एकनाथ महाराजांनी तुटून पडावं हे दृश्य कितीही रोमहर्षक असलं तरी तसं करणं त्या सज्जन व्यक्तिमत्त्वाच्या घडणीशी सुसंगत नव्हतं. आजही एकनाथांची ही कथा, कथा-कीर्तनांतून, प्रवचनांतून कधी कधी कानावर पडते. त्यावेळी एकनाथांची भूमिका बरोबर की चुकीची याचा निर्णय मात्र मी करू शकत नाही. संतांनी दुष्ट प्रवृत्तीवर हल्ला चढवू नये, दुष्टत्वाचा धिःकार करू नये हे पटण्यासारखं नाही. स्वतः एकनाथांनीच 'भावार्थ रामायण' लिहून रामाच्या शौर्यधैर्याची वीररसपूर्ण कथा साऱ्या महाराष्ट्राला ऐकवली. पण मग त्या दिवशी पान खाऊन थुंकणाऱ्याच्या तोंडावर नाथांनी प्रहार का केला नाही हा प्रश्न कधी कधी मला अस्वस्थ करतो. प्रत्येकाला वेगवेगळ्या पद्धतीनं मार्गदर्शन करावं लागतं. आपल्या सहनशीलतेतूनच त्या गुंडाचा मनःपालट होऊ शकेल असंही एकनाथांना वाटलं असेल. परवा हीच कथा मी एका सभेत सांगून श्रोत्यांना प्रश्न विचारला,

'त्या दुर्जनाला कसलाही विरोध न करता एकनाथांनी आत्मक्लेश सहन केला. ही त्यांची भूमिका तुम्हाला योग्य वाटते का? तुमचं काय मत आहे?'

एक तरुण ताडकन् उभा राहून म्हणाला,

'मी नाथांच्या जागी असतो तर त्याचं थोंड असं रंगवलं असतं की पुन्हा या जन्मात सज्जनांची आगळीक करण्याची त्याच्या बापालाही हिंमत झाली नसती.' त्याच्या या आवेशपूर्ण उत्तराला सभेत भरघोस टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला. एक प्रौढ गृहस्थ म्हणाले, 'एकनाथांचं चुकलं असं मी म्हणत नाही. त्या विशिष्ट परिस्थितीत त्यांचं शांत राहणं मला तरी समर्थनीय वाटतं. पण गुंडांना समजेल अशी भाषा त्यांना तुम्ही आम्ही एकवीत नाही हा आपला नेभळेपणा आहे. शांतपणा आणि नेभळेपणा यांची मात्र गल्लत होऊ नये. एकनाथ साधुवृत्तीचे असले तरी त्यांची विचारसरणी पुरुषार्थाला उत्तेजन देणारीच आहे.'

अन्यायी व्यक्ती आणि शक्ती यांच्यावर प्रहार करण्याचं सामर्थ्य ज्या समाजात नसतं तो समाज आपल्या स्वाभिमानाचा बळी देतो आणि अन्यायाला कुर्निसात करीत गुलामगिरी पत्करतो. यापेक्षा वाईट म्हणजे गुलामगिरीचे पोवाडे गात बसतो. आमच्या देशाच्या इतिहासात असे कांही लाजिरवाणे प्रसंग येऊन गेले आहेत. इंग्रजांचं राज्य टिकावं म्हणून एका गडगंज शेठजींनी सत्यनारायणाची महापूजा केल्याचं मी जेव्हा ऐकलं तेव्हा थक्क झालो. तसे हे श्रीमंत गृहस्थ धार्मिक होते. त्यांनी मंदिरं आणि धर्मशाळा बांधल्या होत्या. त्यांनी गरीबांसाठी अन्नछत्रं उघडली होती. पण इंग्रजांच्या गुलामगिरीत ते सुखासमाधानानं नांदत होते. स्वातंत्र्याच्या चळवळीचा त्यांना मनापासून तिटकारा होता. कुणी याबद्दल त्यांना विचारलं की ते म्हणत,

'इंग्रजी राज्याच्या विरुद्ध लढण्याची आपली ताकद आहे का ? मग कशाला उगीच विरोध करायचा ? जे जबरदस्त असतात त्यांच्या-समोर आपण नेहमी नमून असावं.' शेठजींचा हा युक्तिवाद जितका व्यवहारचतुर होता तितकाच केविलवाणाही आहे. दुष्ट शक्तींच्या पुढं जमेल तितकं वाकावं आणि आपल्या कातडीचं संरक्षण करावं या नामर्द विचारांमुळंच अन्याय करणाऱ्या प्रवृत्ती मदोन्मत्त झाल्या आहेत. अनीतीला आणि अधर्माला पाठिंबा देणारी शक्ती केवढीही बलाढ्य

असली तरी मी तिला आव्हान दिल्याशिवाय राहाणार नाही, असं म्हणणारा आणि त्याप्रमाणं कृती करणारा दुबळा माणूस शेठजींच्या दृष्टीनं अव्यवहारी वेडा आहे. पण असेच अव्यवहारी लोक जगाची घडी बसवीत असतात. व्यवहार आणि आदर्श यात मूलतःच संघर्ष असतो असं दिसतं. व्यवहारावर प्रेम करणारे लोक मुंगी होऊन साखर खाणारे असतात. साखर खाण्यासाठी मुंगी व्हावं हा व्यवहार कधीच परवडण्यासारखा नाही. त्यापेक्षा अंकुशाचा मार मिळाला तरी हरकत नाही, आम्ही ऐरावताचाच आदर्श ठेवला तर ?

मला माधव ज्यूलियनांच्या 'पुरुषाची छाती' या कवितेची आठवण होते. गजबजलेल्या रस्त्यावर भर दिवसा एक मवाली एका स्त्रीचा हात धरून तिचा विनयभंग करीत आहे. तिच्या मदतीला कुणीच पुढं जात नाही. मवाल्याच्या वाटेला आपण कशाला जायचं ? तो त्याचा 'खासगी' प्रश्न आहे, असं म्हणून तमाशा पाहणारे 'पुरुष' स्वस्थ बसतात. त्या मवाल्याच्या कृत्याबद्दल साधी नापसंती व्यक्त करण्याचंही धैर्य शहरी सुशिक्षितांत असत नाही. शिक्षणानं त्यांना स्वसंरक्षणाची मात्र महान दृष्टी दिली आहे. मवाल्यांच्या हातातल्या सुऱ्याला डरणारे हे लोक त्या स्त्रीच्या विनयभंगाकडं डोळेझाक करीत आहेत. रस्त्यातून चालणाऱ्या एका अडाणी शेतकऱ्याचं मात्र ते दृश्य पाहून रक्त उफाळून येतं. बाईमाणसावर हात टाकणाऱ्या नराधमाच्या नरडीचा घोट घ्यावा ही शिकवण त्याच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात मुरली होती. त्यानं सरळ कमरेचा विळा काढला आणि मवाल्याचा तो पापी हात मुळासकट उडवून टाकला. या शेतकऱ्याला अडाणी म्हणणं हेच अडाणीपणाचं लक्षण नव्हे का ? बाईची अब्रू लुटणाऱ्या कामांध गुंड प्रवृत्तीला त्या शेतकऱ्यानं जे उघड आव्हान दिलं त्यामुळं अनेक गुंडांना दहशत बसली असेल. या कवितेचा मी एकदा गौरवानं उल्लेख केला तेव्हा एक सुशिक्षित कायदेपंडित आपल्या 'बुद्धिवादी' दृष्टिकोनातून मला म्हणाले,

'एका बाईचा विनयभंग झाला म्हणून काही आकाश कोसळून खाली पडत नाही. पण त्या शेतकऱ्यानं आपल्या हातात कायदा काय म्हणून घ्यावा ? ही प्रवृत्ती वाढली तर कायद्याचं पावित्र्यच नष्ट होईल. कुणीही

उठावं आणि कायद्याच्या मर्यादांचं उल्लंघन करावं असं घडायला लागलं तर अराजकाला आमंत्रण मिळेल. आपली पवित्र लोकशाही जर असल्या....' वकील साहेबांचं आर्ग्युमेंट बंद करण्यासाठी मी तत्परतेनं त्यांच्यासमोर चहा आणि बिस्किटं ठेवली. हाच कायदेशीर मार्ग माझ्यासमोर होता. सुशिक्षतांच्या विचारातला तार्किक गोंधळ एकवेळ सहन करता येईल. पण त्यातल्या स्वाभिमानशून्यतेला, नामर्दपणाला आणि अन्यायाला कायदा व लोकशाही यांची नावं घेऊन संरक्षण देणाऱ्या वृत्तीला काय अर्थ आहे ?

'राम रावणाच्या युद्धात राम का विजयी झाला ?' असा प्रश्न मी एकदा बी. ए. च्या वर्गात विचारला. एक विद्यार्थी म्हणाला,

'रामाची बाजू न्यायाची आणि सत्याची होती म्हणूनच त्याला विजय मिळाला. सत्याचाच अखेरीला विजय होतो.' मी त्याला विचारलं,

'रामाजवळ उत्तम सैनिक आणि शस्त्रे नसती तर केवळ सत्याच्या बळावर त्याला विजयी होता आलं असतं का? तसं असतं तर भारतावरच्या स्वारीत इंग्रज कधीच विजय मिळवू शकले नसते. त्यांनी इथल्या राज्यकर्त्यांची सत्ता काही न्यायाच्या रक्षणासाठी नष्ट केली नाही. स्वार्थासाठी त्यांनी सत्य आणि न्याय दोन्हीलाही हरताळ फासला. राम न्यायी होता आणि सत्याचा पूजक होता हे तर खरंच; पण तेवढ्यामुळं तो रावणाला जिंकू शकला नाही. ठोशाला ठोसा देण्याची रग जेव्हा न्यायात आणि सत्यात निर्माण होते तेव्हाच ही मूल्यं विजयी होतात. अशी श्रेष्ठ मूल्यं समाजात रुजवण्यासाठी नुसती सद्भावना असून चालत नाही. चांगल्या मूल्यांशी वैर करणाऱ्या शक्तीचा कोथळा बाहेर काढायला वाघनखंही बाळगावी लागतात. अखेर तुमच्या ताकदीलाच भीत असतात असल्या दुष्टशक्ती. दुर्जनांच्या शौर्यामुळं नव्हे; तर सज्जनांच्या भित्रेपणामुळंच आपली लोकशाही आणि स्वातंत्र्य यांच्यावर संकट येत असतं.'

माझ्या विवेचनामुळं तो विद्यार्थी थोडासा गोंधळला. त्यानं आपली एक शंका माझ्या समोर मांडली. तो म्हणाला,

'सत्यात, न्यायात मुळातच एक तेजस्वी सामर्थ्य असतं असं मी अनेक ठिकणी वाचलं आहे. ते काय खोटं म्हणायचं का?' त्याच्या प्रश्नातला भोळेपणा त्याचा स्वतःचा नव्हता. तो एक आपल्या समाजात परंपरेनं चालत आलेला भाबडा वारसा होता. मी देखील लहानपणी कीर्तनांत असल्याच भोळसर, अशास्त्रीय गोष्टी आनंदानं ऐकल्या होत्या. एका पतिव्रतेला म्हणे तिच्या सतीत्वानं असं सामर्थ्य प्राप्त झालं होतं की परपुरुषानं पापी मनानं तिच्याकडं नुसतं पाहलं तरी तो जळून खाक व्हायचा, पातिव्रत्याची कल्पना स्त्रियांच्या मनात बिंबवण्यासाठी असल्या कथानकांचा उपयोग होत असेल. पण अनेक आक्रमकांनी इथल्या अश्राप पोरीबाळी, विवाहित स्त्रिया जबरदस्तीनं पळवून नेल्या. नाना अत्याचार केले. पण त्या अत्याचारी शक्तीला नेस्तनाबूत करण्यासाठी एखादी 'दैवी' शक्ती काही धावून आली नाही. कोणतीही दैवी शक्ती स्वर्गातून आयात करता येत नाही. ती जमिनीवरच माणसांच्या मनांत तयार करावी लागते. या मातीलाच स्वप्नं पडावी लागतात. पराक्रमाची आणि पुरुषार्थाची. इथल्या मातीतच बीजे पेरावी लागतात शौर्य धैर्याची, आदर्शाची. या मातीच्या कणाकणांतून नाचणाऱ्या शक्तीचा गंध घेऊन नवे पुरुषोत्तम निर्माण व्हावे लागतात. सज्जनता आणि सामर्थ्य यांच्या संयोगातूनच आकाराला येतो अवतारी पुरुष. तो एक योगायोग नसतो. समाजाला त्या पुरुषश्रेष्ठाच्या निर्मितीचं स्वप्न आपल्या मनोगर्भात जोपासावं लागतं.

मी त्या विद्यार्थ्याला म्हणालो,

'कोणताही गुण, मग तो चांगला असो की वाईट. त्याला त्याचं स्वतःचं असं सामर्थ्य असत नाही. अनेक हलकट प्रवृत्तीचे लोक ऐषआरामात जगतात. अनेक सत्प्रवृत्त माणसं वनवास भोगतात. आपण अशी समाजव्यवस्था उत्पन्न केली पाहिजे की तिच्यात सदगुणांना आधार मिळेल. सद्भावना आणि सत्प्रवृत्ती यांच्या रक्षणासाठी आम्ही आमचं रक्त बिनदिक्कत सांडायला तयार आहोत हे समजलं की दुष्प्रवृत्ती आपोआप निर्वासित होतील. पण अशी मनोरचना आणि समाजव्यवस्था निर्माण करणं तितकं सोपं नाही. संत फक्त आदर्श व्यवस्थेचं स्वप्न



निबंध ३३१९८ २५/८८ ३०/१०/८

समाजासमोर उभं करतात. त्यांच्या हातात समशेर नसते. लेखणी आणि वाणी यांच्या बळावर ते माणसांची मनं बदलू शकतात. पण दुष्टांनी अनेकवेळा संतांच्या सुंदर स्वप्नांच्या चिधड्या केल्याची नोंद इतिहासात आहे. महात्म्यांनी आशाआकांक्षा फुलवाव्यात आणि क्षुद्रात्म्यांनी त्यांचा पार चोळामोळा करून टाकावा असा क्रूर खेळ शतकानुशतके चालला आहे. नुसतं संतत्व जग बदलू शकेल असं मला वाटत नाही. 'पसायदान' मागताना ज्ञानेश्वरांनी सज्जनांचा उल्लेख 'दाहकता नसलेले सूर्य' असा अत्यंत काव्यमय पद्धतीने केला आहे. पण सज्जनांच्या ठायी काही अंशी दाहकता असणं आवश्यक आहे. शिवाजीच्या हाती असलेल्या समशेरीला संतांच्या वाणीचे पाणी होते. पण तिची धारही तशीच उग्र होती. दुर्जनांचं रक्त पिऊन सज्जानांच्या पायी विलीन होणाऱ्या त्या तरवारीनं एक नवा इतिहास घडवला. भला भेटला तर कमरेची लंगोटीही देईन पण नाठाळाच्या टाळक्यात तडाखा हाणल्याशिवाय राहाणार नाही हा तुकोबांचा मंत्र शिवाजीनं जन्मभर जपला. सज्जनाचं आदर्श चित्र शिवचरित्रात दिसतं. एक हात पेरणारा आणि दुसरा आवश्यक असेल तिथं वार करणारा पाहिजे. यालाच मी खरा 'वारकरी' म्हणतो.

'प्रत्येकाला वेगवेगळी भाषा समजते. शब्दांनी शहाणे होणारे फार थोडे. ज्याला शस्त्राचीच भाषा कळते त्याला समजावून सांगताना शब्दांची भाषा निरुपयोगी आहे.'

'पण शस्त्रांचा वापर करणं हे रानटीपणाचं लक्षण नव्हे का?' त्या विद्यार्थ्यानं प्रश्न केला. त्याचा प्रश्न चुकीचा नव्हता. माणूस घडविण्यासाठी शस्त्र निरुपयोगी ठरतं. समाजाच्या मानसिक, बौद्धिक घडणीला तलवारी आणि बंदुका निरर्थक आहेत. पण हे अंतिम अर्थानं. शस्त्रास्त्रांची गरजच लागणार नाही अशी आदर्श व्यवस्था अस्तित्वात येईल असं चिन्ह दिसत नाही. जोपर्यंत शस्त्रानंच दुष्टांना वळवता येतं, अन्य भाषा समजण्याची ज्यांच्यात कुवत नाही त्यांच्या व्यवस्थेसाठी शस्त्रे हवीतच. जेव्हा पायतली हातात घेण्याचा प्रसंग येतो तेव्हा ती घेतलीच पाहिजे. संतत्वाचं रक्षण करायचं असेल तर, प्रतिष्ठा ठेवायची

असेल तर हे अपूर्व साधनही सज्ज ठेवण्यास हरकत नाही. स्वामी विवेकानंदांनी परदेश प्रवासात एका धर्मनिंदकाला सज्जड शब्दात सुनावलं होतं, 'माझ्या देशाला आणि धर्माला बेवकूफपणानं शिव्या देशील तर नीचा, तुला उचलून सरळ समुद्रात फेकून देईन. याद राख.' आश्चर्याची गोष्ट अशी की त्या निंदकाला ही भाषा समजली. खेटरांची भाषा काहीवेळा लवकर समजते. म्हणूनच ती परिणामकारक असते. समर्थ रामदासांच्या एका वचनाची इथं मला आठवण होते.

धटासी आणावा धट ।
उद्धटासीं पाहिजे उद्धट ।
खटनटासी खटनट ।
अगत्य करी ।।

## मी, मी आणि केवळ मीच !

एका नामांकित नटाचं नवीन नाटक पाहायला मी गेलो होतो. या नटानं रंगभूमीची दीर्घकाळ सेवा केली होती. सुदृढ शरीर, देखणं, रुबाबदार व्यक्तिमत्त्व, स्वच्छ, मधुर आणि प्रभावी आवाज, भावपूर्ण अभिनय यांच्या बळावर हा नट रंगभूमीचा जणू अनभिषिक्त राजा होऊन बसला होता. लोक त्याला पाहण्यासाठी रस्त्यातसुद्धा गर्दी करीत असत. कित्येक तरुण स्त्रिया त्याच्यासाठी वेडया झाल्या होत्या असं मी ऐकलं होतं. ते खरं असावं. कारण दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याची आणि विशेषतः स्त्रियांना मंत्रमुग्ध करण्याची मोहक शक्ती त्याच्या व्यक्तिमत्त्वात होती यात शंका नाही. कुठल्याशा संस्थानची राजकन्या आपलं घरदार सोडून कित्येक दिवस त्याच्या बरोबर फिरत असल्याची एक आख्यायिका मी ऐकली होती. या देखण्या नटाच्या व्यक्तित्वाभोवती असल्या रोमँटिक कथाचं एक वलय गुंफलेलं होतं. त्याच्या अनेक भूमिका मी पाहिल्या होत्या. अभिनयाच्या दृष्टीनं त्या चांगल्या असल्या तरी आपल्या ठायी असलेल्या आकर्षणसामर्थ्याचा एक चमत्कारिक अहंकार त्याच्या मनात रुजून बसला असावा. तो कमालीचा आत्मकेंद्रित होता. त्यामुळं त्याची नाटकातली भूमिकासुद्धा मला विशेष आवडायची नाही. आपल्या भूमिकेशी समरस होण्यापेक्षा, आपल्या अभिनयाचा आणि संभाषणाचा श्रोत्यांवर कसा प्रभाव पडत आहे याचा आनंद घेण्यातच

तो अधिक रंगून जायचा. कलेच्या दृष्टीनं हा उणेपणा आहे असंच कुणीही म्हणेल. पण प्रचंड लोकप्रियतेच्या लाटेवर तंरगणाऱ्या या कुर्रेबाज कलावंताला समजुतीचे शब्द कोण सांगणार ? कदाचित कोणी सांगितले तरी त्याकडं लक्ष देण्याइतकी सावधानता त्याच्यात कुठून असायला ? सामान्य माणसंसुद्धा क्षुद्र यशाच्या कैफानं मस्तवाल बनतात. मग कलावंताला आपल्या कीर्तीची धुंदी चढली नाही तरच नवल !

आजच्या नवीन नाटचप्रयोगाला या नटानं मला अत्यंत आर्जवानं आमंत्रण दिलं होतं. मलाही आश्चर्य वाटलं. या कलावंताच्या सदोष कलाविष्कारावर मी अनेक वेळा टीका केली होती. त्यामुळंच आमचं फारसं सख्य नव्हतं. विधायक टीकेचे संयमी शब्दसुद्धा त्याला रुचत नव्हते. पण आज इतक्या वर्षानंतर ' माझं नवं नाटक पाहाण्यासाठी आणि त्यावर स्पष्ट अभिप्राय देण्यासाठी आपल्यासारख्या समीक्षकाला मी मुद्दाम आमंत्रण पाठवीत आहे ' ही त्याच्या पत्रातली वाक्यं होती. रंगभूमीवर पंचवीस तीस वर्षं ठाण मांडून बसलेला हा लोकप्रिय कलावंत कटुता विसरून आमंत्रण देत आहे तर आपण त्याच्या शब्दांना अनुसरून गेलं पाहिजे. असा विचार करून मी नाटकगृहात आलो. नाटकगृहाच्या बाहेर जाहिरातीचे मोठमोठे फलक लावले होते. प्रत्येक फलकावर या नटवर्यांचीच छबी होती. त्याच्याच नावाची भडक प्रसिद्धी केली होती. थोड्याच वेळात प्रयोगाला सुरुवात झाली. नाटकाचा नायक-तो प्रसिद्ध नट-रंगभूमीवर आला. प्रकाशाचा एक झोत त्याच्या मुद्रेवर योजकतेनं टाकण्यात आला. त्या मंद प्रकाशझोतात नीटनेटकी रंगभूषा केलेली त्याची मुद्रा मला प्रथमदर्शनी देखणी वाटली. पण कुशल रंगभूषासुद्धा त्याच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या लपवू शकत नव्हती. डोक्यावरचे केस ऐटबाजपणे वळवले होते. पण ते कृत्रिम केस आहेत हे लक्षात येत होतं. तरुण नायकाची भूमिका त्याला मुळीच शोभत नव्हती. त्याच्या हालचालीत चपळपणा उरला नव्हता. आवाजातलं ते मोहक तारुण्य पार नाहीसं झालं होतं. त्याला पाहिल्यावर साठीच्या आसपास असलेला एक स्थूल प्रकृतीचा बरा दिसणारा वयस्क माणूस आपण पहात आहोत हीच जाणीव प्रामुख्यानं होत होती. आणि

हा तर पंचविशीतल्या एका तरुण मनस्वी योद्ध्याची भूमिका करीत होता. प्रणय आणि पराक्रम या दोन रसांनी ज्याचं जीवन आणि मन रसरसलेलं आहे अशा रसिक मर्दाची भूमिका त्याच्या आजच्या ध्यानाला अगदीच विसंगत वाटत होती. त्याच्या शब्दोच्चारातसुद्धा कसली रग जाणवत नव्हती. पण नाटकातली मध्यवर्ती भूमिका आपणच करायची, आपल्याशिवाय ती कुणालाच पेलता येणार नाही अशा समजुतीत तो असावा. कोणत्याही नाटकात आपणच नायक असलं पाहिजे असा स्वतःच्या बाबतीत त्याचा अलिखित संकेत होता. मी-मी आणि मी, सर्व ठिकाणी मीच. यापलिकडं तो विचारच करू शकत नव्हता. साठाव्या वर्षी तरण्याबांड माणसाची भूमिका यथातथ्य रीतीनं सजवता येणं शक्य आहे का ? निसर्गाला किती काळपर्यंत फसवता येईल ? निसर्ग कधीच फसत नाही. आपण निसर्गाला फसवीत आहोत अशा भ्रांतिष्ट समाधानात रहातो आणि स्वतःच स्वतःची दारुण वंचना करून घेतो, हे सत्य त्या कलावंताला तरी निदान कळायला हवं. एखादा समजूतदार, संयमी कलावंत असता तर त्यानं या नाटकात नायकाची भूमिका कधीच स्वीकारली नसती. एखाद्या तरुण उदयोन्मुख कलावंताला त्यानं संधी दिली असती. नाटकाच्या निर्मितीत आणि दिग्दर्शनात त्यानं रस घेतला असता. पण आत्मप्रेमाच्या विळख्यात सापडलेल्या अहंपूजक माणसाला हा विवेक कधी सुचत नाही. जेव्हा सुचतो तेव्हा फार विलंब झालेला असतो. घड्याळाचे काटे तर मागे फिरवता येत नाहीत. गेलेल्या दिवसांत अविचारानं केलेल्या चुका पुन्हा सुधारता येत नाहीत. तळ्याच्या काठावर उगवलेल्या वेलीवरच्या एका फुलानं पाण्यात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबाकडं पाहिलं. स्वतःच्या रूपलावण्यावर आणि यौवनावर ते लुब्ध झालं. पाण्यातल्या प्रतिबिंबावरच ते अहर्निश प्रेम करू लागलं. अखेर एक क्षण असा आला की वेलीवरून गळून पडलेल्या त्या फुलाला जलसमाधीच घ्यावी लागली. कुठल्याशा विचारवंतानं या प्रवृत्तीला नार्सिसिझम् हे नाव दिलं आहे. आपण सारेच थोडेफार नार्सिसिस्ट असतो. आपल्याच दृष्टिकोनातून जे दिसतं ते केवळ सत्य आणि सुंदर असं मानण्याचा प्रमाद करतो. पण दुसऱ्याची दृष्टी ही

देखील सत्यशोधक असू शकते हे मात्र आपण कधीच मान्य करायला तयार होत नाही.

नाटक संपल्यावर त्या नटश्रेष्ठानं मला रंगपटात बोलावून घेतलं. आरशातल्या आपल्या प्रतिबिंबाकडं आत्मीयतेनं पहात त्यानं मला विचारलं,

'कशी काय वाटली माझी भूमिका ? उगीच लोक माझ्यावर टीका करतात. काही मत्सरी लोक म्हणतात, यानं आता तरुणाच्या भूमिका करू नयेत. पण मी अजूनही पूर्वीइतक्याच सामर्थ्यानं तारुण्य-सुलभ भूमिका रंगवू शकतो. अजूनही मला कित्येक तरुणींची प्रेमपत्रं येतात. मी पूर्वीचाच आहे. 'अभी तो मै जवान हूँ।' माझ्यावर टीका करणारे मात्र म्हातारे झाले आहेत. या रंगभूमीवर माझ्या अमर कलेचा झेंडा असाच फडकत राहील. तुमचं काय मत आहे ?'

माझ्या मनात वेदनेची एक कळ उमटली. अजूनही या माणसाची आत्माहंकराच्या कुंपणातून सुटका होत नाही याचा मला खेद वाटला. खरं तर त्यानं मला स्वतःच्या भूमिकेविषयी प्रश्न विचारायला नको होता. 'नाटक कसं काय वठलं ?' हा प्रश्न मला अभिप्रेत होता. त्याची भूमिका हा त्या नाटकाचा एक भाग होता. पण आपली भूमिका म्हणजेच सारं नाटक, ही धारणा त्याच्या चित्तातून जात नव्हती. आयुष्याच्या नाटकात कदाचित एखादी मोठी, इतरांपेक्षा अधिक महत्त्वाची भूमिका आपल्या वाट्याला आलीही असेल. पण केवळ ती भूमिका हेच संपूर्ण नाटक आहे असं मानण्यात गर्वापेक्षाही मूर्खपणाचाच वाटा अधिक असतो. कवी तांब्यांच्या ओळी मला आठवतात. 'रामकृष्णही आले गेले, त्यांविण जग का ओसचि पडले ?' नटश्रेष्ठांशी हस्तांदोलन करीत मी म्हणालो,

'तुमचं हे नवं नाटक खरोखरच आशयपूर्ण आहे. त्याची मांडणीही अत्यंत परिणामकारक झाली आहे. हे नव्या जाणीवेचं कलात्मक नाटक रंगभूमीवर आणल्याबद्दल मला तुमचं मनःपूर्वक अभिनंदन करायचं आहे. पण आता मी तुम्हाला एक विनंती करणार आहे. तरुण

नायक म्हणून तुम्ही रंगभूमीवर उभं राहू नये. तुमच्या हजारो प्रेक्षकांचा एक प्रतिनिधी म्हणून मी हे बोलत आहे.'

ते नटवर्य माझ्या बोलण्यामुळं फारच नाराज झाले. आपली अस्वस्थता ते लपवू शकले नाहीत. कदाचित या प्रकारची अप्रिय सूचना त्यांच्या तोंडावर कोणी केली नसेल. काहीशा संतप्त स्वरात ते म्हणाले,

'तुम्हा सर्वांना रंगभूमीवरची माझी दिगंत कीर्ती आणि माझी कला पाहवत नाही. तुम्हाला वाटतं मी तरुणाची भूमिका करणं हा कलेवरचा अन्याय आहे.' आता मलाही थोडा राग आलेला होता. त्या भरात मी म्हणालो,

'केवळ कलेवरच नव्हे तर आम्हा प्रेक्षकांवरही आहे. नाटक चालू असताना तुमच्या भूमिकेबद्दल प्रेक्षकांची काय कुजबूज चालली होती ते मी प्रत्यक्ष ऐकलं आहे. हा वेडा हट्ट सोडून द्या. तुमच्या हितासाठीच मी हे सांगत आहे.' नटवर्यांचा निरोप घेऊन मी घरी आलो. स्वत:शीच विचार करू लागलो. रंगभूमीची वर्षानुवर्षं सेवा केलेल्या एका नाटकवेड्या कलावंताला मी फार कठोर बोललो काय? पण त्यात माझं चुकलं नव्हतं. स्वत:च्याच अहंकाराला कुरवाळीत बसल्यामुळं या कलावंताच्या मनाची आणि व्यक्तित्वाची नीटशी वाढ झाली नव्हती. सदैव आईच्या कडेवरच बसून तिच्या कोडकौतुकाचा सारा वाटा आपल्यालाच मिळाला पाहिजे, असं वाटणाऱ्या हट्टी बालकासारखी त्याची स्थिती होती. आपापल्या कर्तव्याच्या रंगभूमीवरून केव्हा निवृत्त व्हायचं याचा समंजस हिशेब प्रत्येकानं करायला हवा. आपल्या दिमाखदार, कलात्मक रसिक प्रवृत्तीनं हजारो प्रेक्षकांना पंचवीस-तीस वर्षं मी भरभरून आनंद दिला. आता तसा धुंद आनंद कलावंत म्हणून मला देता येत नाही; हे जाणून रंगभूमीवरून खाली उतरून, तोंडावरचा रंग पुसून प्रेक्षकांच्या मेळाव्यात बसायला हवं आणि प्रेक्षक या नात्यानं रंगमंचावरील नव्या कलावंतांच्या कलेचा आनंद लुटायला पाहिजे. आयुष्यात ही वेळ केव्हा तरी येते. ती येणारच असते. क्रिकेटच्या खेळासारखंच हे नाही का?

उत्तम फलंदाजी करून तो कसलेला फलंदाज शतक काढतो. पण केव्हातरी एखादा चेंडू चुकतो व तो बाद होतो. अशा वेळी त्या विकेटला चिकटून राहण्यात काय अर्थ ? त्यानं समाधानानं तंबूत परतावं आणि सहकाऱ्याचा खेळ उत्साहानं पाहावा. क्रिकेटच्या क्षेत्रातून निवृत्त होतानाही त्याच्या मनात नैराश्य असू नये. आपल्या योग्यतेचा, आपल्याशी स्पर्धा करू शकणारा दुसरा खेळाडू असणंच शक्य नाही असं वाटणं हा अवास्तव अहंकार आहे. अहंकार हे अज्ञानाचंच अपत्य आहे.

कुठल्याशा राजाची अशी एक गोष्ट सांगतात की, आपल्या भोवती माणसांनी सदैव पिंगा घालावा असं त्याला वाटायचं. आपण जिथं जाऊ तिथं आपल्यासाठी उच्चासन असावं, आपला शब्द अंतिम असावा. आपला आदेश वेदवाक्याप्रमाणं लोकांनी स्वीकारावा. विरोधाचा, मतभेदाचा एकही शब्द आपल्यासमोर कोणी उच्चारू नये असा त्याचा दंडक होता. हातात निरंकुश सत्ता असल्यामुळं त्याची आत्मकेंद्रित वृत्ती टोकाला पोहोचली होती. एकदा जंगलात शिकारीला गेला असताना तो रस्ता चुकला. कित्येक मैल पसरलेल्या दाट झाडीतून त्याला रस्ता सापडेना. रात्र पडली. अंधार वाढत चालला. कुठंतरी आसरा घेणं आवश्यक होतं. दूरवर मिणमिणणाऱ्या एका दिव्याच्या दिशेनं तो चालू लागला. ती एक झोपडी होती. कुणीतरी थकलेला, वाट चुकलेला माणूस आसऱ्यासाठी आला आहे हे पाहून झोपडीच्या मालकानं त्याचं जमेल तसं आतिथ्य केलं आणि प्रश्न विचारला,

'पोटासाठी कोणता उद्योगधंदा करतोस ?' राजाला हा प्रश्न सर्वस्वी नवीन होता. त्यानं फक्त नकारार्थी मान हलवली. तेव्हा तो झोपडीतला माणूस म्हणाला, 'एकूण तू आमच्या राजासारखा निरुद्योगी आणि ऐतखाऊ दिसतोस. आमचा तो वेडा राजा रात्रंदिवस आपल्याच मस्तीत राहतो. कोणाची फिकीर करीत नाही, असं मी ऐकलंय. केव्हातरी भेटला तर त्याचा कान पिरगाळून त्याला खडसावून सांगेन, 'स्वतःच्या भोवती वेड्यासारखं फिरत राहाण्यामुळं काय साधणार आहे ? राजानं प्रजेच्या भोवती फिरलं पाहिजे आणि एक दिवस आपली सत्ता दुसऱ्या

लायक माणसाच्या हाती दिली पाहिजे. जो माणूस स्वतःतंच गुरफटून जातो त्याची माणूस म्हणूनसुद्धा नीट वाढ होत नाही. एक दिवस त्या मूर्ख राजाला पश्चात्ताप करावा लागणार आहे. उंबरातले किडे उंबरालाच जग मानून त्यात मरेपर्यंत राहातात. त्या किड्यांना उंबराबाहेरचं जग आणि मोकळं आकाश कधी दिसतच नाही. पण जाऊ दे! त्या शतमूर्ख राजाबद्दल आता बोलायलाच नको. हातपाय धुवून घे. थोडा भाकर-तुकडा खा आणि विश्रांती घे.' तो झोपडीचा मालक एखाद्या तत्त्वज्ञाप्रमाणं बोलत होता. त्याच्या प्रत्येक शब्दाला समंजसपणाचा गंध येत होता. या अशिक्षित, रानवट माणसांच्या तोंडचे खडखडीत बोल ऐकून राजा अवाक् झाला. पण यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे? मोकळ्या आकाशाखाली मोकळेपणानं वावरणाऱ्या या 'वन्य' माणसाला आपल्या भोवती पसरलेलं जग केवढं अफाट आहे याची कल्पना आली होती. पण सदैव सत्तेच्या, संपत्तीच्या आणि खुषमस्कऱ्यांच्या वर्तुळातच ठाण मांडलेल्या राजाच्या मनाची, जाणिवांची वाढ होणं शक्यच नव्हतं. तो साऱ्या जगाचा आपणच केंद्रबिंदू आहोत असं समजत होता. असल्या अज्ञानमूलक कल्पनेत बहुसंख्य माणसं असतात. त्यांचं प्रेम फक्त स्वतःवरच असतं. उपनिषदात याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी यांचा संवाद आहे त्यात याज्ञवल्क्य म्हणतो,

'पत्नीला पती हा पतीसाठी म्हणून नव्हे तर स्वतःसाठी प्रिय होतो. पतीलाही पत्नी पत्नीसाठी म्हणून नव्हे तर स्वतःसाठीच प्रिय होते. 'आत्मनस्तु कामाय सर्वम् प्रियम् भवति ।' या उक्तीत तथ्य आहे यात संशय नाही. आमच्या शेजारचे एक गृहस्थ नेहमी स्वतःविषयीच बोलतात. दुसरा कोणताच विषय त्यांना रुचत नाही. साध्या बोलण्यातसुद्धा ते स्वतःचा इतक्या वेळा उल्लेख करतात की ऐकणारा शेवटी कंटाळून निघून जातो. जगात इतके सुंदर विषय असताना ही माणसं स्वतःच्या संदर्भातच अर्थशून्य, रसहीन बडबड का करतात हेच कळत नाही. एकदा भारताच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल मी त्यांच्याशी बोलत होतो. परराष्ट्रांशी आपले संबंध सुधारले पाहिजेत अशा आशयाचं विधान केल्याबरोबर मला मध्येच अडवून हे गृहस्थ उत्साहानं म्हणाले,

'अहो हेच माझं पूर्वीपासूनचं मत आहे. परवा रोटरी क्लबात याच विषयावर माझं अत्यंत सुरेख व्याख्यान झालं. व्याख्यान संपल्यावर अनेकांनी मुद्दाम भेटून माझं अभिनंदन केलं. एकजण तर म्हणाला, तुमच्यासारखा मनुष्य भारताचा परराष्ट्रमंत्री असता तर समस्या आतापर्यंत उरल्या नसत्या. अहो, आपल्या देशाच्या राजकारणाचा माझ्याइतका सूक्ष्म अभ्यास कुणी केला नसेल.'

निरुपायानं मी विषय बदलून म्हणालो, 'आज मी कुमार गंधर्वांच्या गायनाला जाणार आहे.' त्यावर हे गृहस्थ म्हणाले, 'अलीकडं तो पूर्वी-सारखा गात नाही, परवा मी त्याला म्हणालो, की गाताना मन एकाग्र केलं पाहिजे. गाण्याच्या बाबतीच मी त्याला नेहमीच सल्ला देतो. अहो, संगीताची मलाही विशेष आवड आहे. एकदा भीमसेन मला म्हणाला, तुम्ही जातिवंत रसिक आहात. तुमच्यासारखे रसिक फार कमी भेटतात. मग मी त्याला रसिकता म्हणजे काय हे समजावून सांगितले. माझ्या भाषणानं तो फार प्रभावित झाला. मी परवाच त्याला सांगितलं....'

हरे राम! मी, मी आणि मी यापलीकडे त्याला विषय नव्हता. 'मी' पणाचा गळफास यांच्या गळ्याला कायमचा बसलेला असतो. यातून यांची सुटका केव्हा होणार हे मी तरी सांगू शकत नाही. 'मी' च्या काळोखातून 'आम्ही आणि आपण सर्व' या प्रकाशापर्यंत गेल्याशिवाय आपण खऱ्या अर्थानं समाधानी होऊ शकणार नाही.

# रोमन हॉलिडे

● ◉

बऱ्याच वर्षांपूर्वी 'रोमन हॉलिडे' या नावाचा अेक सुंदर चित्रपट मला पाहायला मिळाला. अितकी वर्षं अुलटली तरी त्या चित्राची कथा, त्यातल्या गमतीदार घटना, त्यातली वेधक दृश्यं अजून माझ्या स्मरणात आहेत. ग्रेगरी पेक् आणि ऑड्रि हेपबर्न यांच्या भूमिका माझ्या मनात रुजून बसल्या आहेत. अशा प्रकारचे कलात्मक, प्रसन्न घटनांनी ओथंबलेले चित्रपट आपल्याकडं फारसे तयार होत नाहीत. तसं पाहायला गेलं तर या चित्रपटाचं कथानक अगदी साधं आहे. कुठल्याशा देशातली युवराज्ञी आपल्या दैनंदिन यांत्रिक पद्धतीच्या आयुष्याला कंटाळलेली असते. त्या तरुण मुलीचे हसण्या बागडण्याचे सुंदर दिवस राज्ञीपदाच्या प्रतिष्ठित रूक्ष आवरणात गुरफटून गेलेले असतात. तिला कुणाशी मनमोकळेपणानं बोलता येत नाही. खळखळून हसता येत नाही. शहरातल्या अेखाद्या नृत्यगृहात जाअून नृत्यसंगीताच्या मैफलीत सहभागी होता येत नाही. मुक्तकंठानं गाता येत नाही. सतरा-अठरा वर्षांच्या या किशोरीला राजपदाची प्रतिष्ठा सांभाळायची असते. त्यामुळं तिनं गंभीर राहाणं आणि काटेकोरपणं मोजकंच बोलणं आवश्यक असतं. मर्यादेनं हसायचं आणि माफकपणं संभाषण करायचं, दरबारी कृत्रिम शिष्टाचार कटाक्षानं पाळायचे असल्या संकेतांच्या पिंजऱ्यात बंदिस्त झालेल्या या रसिक मैनेला तो बंदिवास असह्य होतो. अेका रात्री आपल्या सेक्रेटरीची नजर चुकवून आणि प्रासादातल्या रक्षकाला गुंगारा देअून ती बाहेर पडते.

पिंजऱ्याचे गज आता अुरलेले नसतात. अेक गाणं गुणगुणत, नाचत, बागडत ती रोम शहराच्या प्रशस्त पदपथावरून आनंदात चाललेली असते. पाय नेतील तिकडे, मन सांगेल तिकडे ती रमत गमत जाते. आता तिला 'युवर हायनेस' असे कुणी म्हणणार नसतं. कारण अत्यंत अनौपचारिक वेषात ती बाहेर पडलेली आहे. दिव्याच्या चकचकाटानं रोम शहर जणू पेटल्यासारखं दिसत होतं. वाऱ्याच्या अवखळ झुळकी-प्रमाणं ही 'राजकन्या' मनःपूत स्वातंत्र्याचा आस्वाद घेत निघाली आहे. तिच्या साऱ्या वृत्ती अुत्फुल्ल झाल्या आहेत. तोंडावरचा तो खोटा, अुसना प्रतिष्ठितपणाचा मुखवटा तिने केव्हाच फेकून दिला आहे. यानंतर घडणाऱ्या अनेक गमतीदार घटनांचं चित्रण त्या चित्रपटात अितक्या सहजपणानं केलं आहे की प्रेक्षक त्या चित्राशी समरसून जातो.

अनेक वर्षं हा चित्रपट माझ्या मनात ठाण मांडून बसला आहे. आता मला त्याच्या कथालेखकाचं आणि दिग्दर्शकाचं नावही आठवत नाही. पण 'रोमन हॉलिडे' मधली ती हसरी, खेळकर, कलाप्रिय, प्रेमळ नवतरुण नायिका आजही मला विसरता येत नाही. याचं कारण शोधताना मला असं जाणवलं की मुक्त स्वातंत्र्यासाठी आसुसलेल्या त्या नायिकेच्या मनाचे हुंकार आपल्याला विशेष आकृष्ट करून घेतात. राजघराण्यातल्या प्रतिष्ठेचं दडपण तिच्यातल्या रसिक प्रवृत्तीला असह्य होत होतं. स्वभावसिद्ध अूर्मीला आवर घालणं त्या तरुण नायिकेला अशक्य व्हावं यात आश्चर्य नव्हतं. ती युक्तीप्रयुक्तीनं दोन दिवस स्वतंत्रपणे, स्वेच्छेनं वावरते. पुन्हा त्या राजघराण्याच्या प्रतिष्ठित बेड्या आपल्या पायात पडणार आहेत याची तिला जाणीव आहे. पण निर्भेळ स्वातंत्र्याच्या वातावरणात जमेल तितका वेळ तिला रमायचं आहे. चित्रपटाची ही मध्यवर्ती कथा-कल्पना केवळ रंजक नाही. माणसाच्या मनाचा अुत्कट धर्म त्यातून प्रकट झाला आहे.

अब्राहाम लिंकन हा अेक विनोदप्रिय, रसिक मनुष्य होता. अेकदा आपल्या सहकाऱ्यांशी राजकीय चर्चा करीत असताना कुठल्याशा अेका विनोदाला तो सातमजली हसला. पोट धरधरून हसला. अेक सहकारी गंभीरपणे त्याला म्हणाला, 'लिंकनसाहेब, आपण राष्ट्राचे प्रमुख

आहात. अध्यक्ष आहात. अितक्या मोठ्यानं हसणं आपल्या प्रतिष्ठेला मानवणार नाही. आपण बेतानंच हसलं पाहिजे.' लिंकननं यावर काय अुत्तर दिले असेल ? 'मी मोकळेपणानं हसण्यामुळं माझी प्रतिष्ठा जाणार असेल तर असली बेगडी प्रतिष्ठा गेलेलीच चांगली !' लोक काय म्हणतील ? आपल्या पोझिशनशी हे सुसंगत आहे का ? असले प्रश्न कित्येक लोकांच्या डोक्यांत नेहमी भिरभिरत असतात. पोझिशन आणि प्रतिष्ठा या मानीव कल्पनांच्या कुंपणात सदैव कोंडून घेणाऱ्या माणसांची मला दया येते. ओठाला लावलेला रंग विस्कळीत होअून आपला मेकअप् बिघडेल या भीतीनं आपल्या अपत्याचं चुंबन न घेणारी आअी मी पाहिली आहे. आपल्या आअीपणापेक्षा मेकअप्ला महत्त्व देणाऱ्या या बाअीला काय म्हणावं ? हृदयात दाटलेल्या भावनेला कोणत्यातरी मानीव कल्पनेच्या आहारी जाअून प्रतिबंध करण्यात कसला सूज्ञपणा आहे ?

अेका गायकाच्या रंगत चाललेल्या मैफलीतले श्रोते त्याच्या दिव्य संगीतानं धुंद झाले. गायकाच्या कंठातून विलक्षण मधुर सूर अुमटत होते. जणू आपल्या आत्म्याची सारी शक्ती त्यानं त्या स्वरात ओतली होती. संगीताच्या अमृतस्पर्शानं त्या दिवाणखान्यातलं वातावरण सुगंधी झालं होतं. गायकाच्या प्रत्येक आलापाला रसिकांची अुत्स्फूर्त भरघोस दाद मिळत होती. कलावंत आणि रसिक यांच्या मीलनाचा अेक अपूर्व सोहळा आम्ही अनुभवत होतो. माझ्या शेजारीच अेका विशेष अधिकारावर असलेली महत्त्वाची व्यक्ती गंभीर चेहरा करून बसलेली होती. अलौकिक संगीताचा तो कलावंत मेघ मुक्तपणे बरसत असतानाही हा अधिकारी मात्र कोरडा राहिल्यासारखा दिसत होता. कुठल्याशा वनस्पतीच्या पानावर पाण्याचा थेंब ठरत नाही. कितीही पाअूस पडला तरी ती पानं जलधारांपासून स्वत:ला अलिप्त ठेवतात. हा अधिकारी त्याच जातीचा असला पाहिजे. नितांतसुंदर स्वरांच्या सान्निध्यात राहूनसुद्धा याच्या अंत:करणाची सतार मुखरित झाली नाही हा अेक दुर्दैवी चमत्कार नव्हे काय ? त्या अधिकाऱ्याबद्दल माझा मित्र नंतर म्हणाला,

गायकाच्या तोंडून निघणाऱ्या प्रत्येक सुंदर सुराला आपण सारेजण हळुवारपणे झेलीत होतो आणि ते सूर मनाच्या मखमली पेटीत अदबीनं ठेवीत होतो. मैफलीतला प्रत्येक श्रोताच काय पण त्या दिवाणखान्याच्या भिंतीसुद्धा त्या अपूर्व गायनानं रोमांचित झाल्या असतील. पण हा अधिकारी मात्र थंडपणानं, निर्जीव तटस्थपणानं आपल्या आसनावर बसून होता. अेखाद्या कलात्मक आलापालाही त्यानं दाद दिली नाही. हा अधिकारी अष्टौप्रहर आपल्या अधिकाराच्या वलयातच गुरफटलेला असतो. 'साहेब', 'साहेब' या निरर्थक शब्दाची त्याला अितकी चटक लागली आहे की त्याची बायको आणि मुलेसुद्धा त्याला 'साहेब' म्हणूनच हाक मारतात. माणसाचा असा 'साहेब' होणं मला तरी दुःखाचं वाटतं. आपलं प्रेस्टिज, आपली पोझिशन, समाजातला आपला वरिष्ठ दर्जा हा कधीच विसरत नाही. त्याची अतिरेकी जाणीव ठेवल्यामुळंच त्याच्यातली रसिकता आणि माणुसकी संपुष्टात आली आहे. गायनाच्या मैफलीत आपण सारे श्रोते आहोत आणि आपण साऱ्यांनी श्रोतृत्वाच्या समान पातळीवर येअून रसास्वाद घ्यायचा आहे, ही जाणीव हा गृहस्थ पूर्णपूणे विसरून गेला आहे. खरंतर अशा रंगणाऱ्या सुरांच्या रंगांनी रंगून जाण्याची अुत्कट अिच्छा ज्याच्या मनात अुचंबळत नाही त्याला कशाची अुपमा द्यावी ? 'मुलांत मूल व्हावं आणि फुलांत फूल व्हावं' असं म्हणतात. पण हे व्हायला आपल्या व्यक्तित्वावरचे सारे कृत्रिम अुपचार अुतरून ठेवावे लागतात. सर्व रसांत ज्याला समरस होता येतं त्याच्यासारखा सुखी कुणीच नाही.'

माझ्या मित्रानं केलेली ही विधानं अत्यंत मार्मिक आहेत. 'रोमन हॉलिडे' मधल्या त्या नायिकेनं राजेशाही प्रतिष्ठेचा पायघोळ झगा अुतरला आणि अेका हलक्या-फुलक्या खेळकर, अनौपचारिक वातावरणात मुक्तपणे जगण्यासाठी ती बाहेर पडली. तसं या अधिकाऱ्याला का वाटू नये ? पण अशी विचित्र, विकृत माणसं असतात. अशा लोकांच्या आनंदाच्या आणि सुखदुःखांच्या कल्पना कुठल्या तरी संकेतानं बांधलेल्या असतात. कृत्रिम पाश झुगारून देण्यात अेक विलक्षण आनंद असतो याची त्यांना कल्पनाच असत नाही. निळयाभोर आकाशात पंख पसरून ऊंच

झेप घेणारा पक्षी हे माझ्या दृष्टीनं स्वातंत्र्याचं आणि स्वच्छंदाचं अेक सुंदर प्रतीक आहे. पिंजऱ्यात कोंडलेल्या पक्ष्याला कदाचित दररोज डाळिंबाचे दाणे मिळत असले म्हणून त्यानं अथांग आकाशाला विसरावं काय ? निर्भरशील मनानं नेहमीच स्वातंत्र्याची स्वप्नं रंगवावीत आणि स्वातंत्र्याच्या वातावरणात स्वैर भरारी घ्यावी. 'रोमन हॉलिडे' मधली ती नायिका राजशिष्टाचाराच्या आणि प्रतिष्ठित कर्मकांडाच्या विळख्यात सापडली होती. मैफलीतल्या त्या अधिकाऱ्यासारखी तिची क्षुद्र वृत्ती असती तर आपला पायघोळ झगा सावरीत, दरबारी कुर्निसात घेत ती आपल्या आसनावर सुखानं बसली असती. पण मग असल्या शिळपट आणि साचेबंद सोपस्कारात तिचं हृदय जिवंत राहिलं नसतं. माणसाच्या हृदयाची नैसर्गिक स्पंदनं ज्या वातावरणात होअू शकत नाहीत, ते वातावरण कितीही वैभवसंपन्न असलं तरी ते दरिद्रीच मानावं लागेल. प्राणसख्याच्या सान्निध्याचा आनंद लुटायचा असेल तर औपचारिकतेची कुंपणं ओलांडून त्याला कडकडून भेटलं पाहिजे. अेका संतकवीनं म्हटलं आहे. 'वेडेवाकुडे गाअीन, परी तुझाच म्हणवीन' आपलं गाणं शास्त्राच्या चौकटीत बसतं की नाही यापेक्षा ते अंतःकारणाचे बांध फोडून अुचंबळून येतं की नाही हेच अधिक महत्त्वाचं आहे. शास्त्राच्या चौकटीची मातब्बरी वाटली असती तर ती नायिका शहरात स्वैरपणे भटकली नसती. शास्त्राची अटक मानली असती तर राधेला कृष्णसखा कधीच भेटला नसता. कृष्णप्रेमाच्या मुरलीतून निघणाऱ्या बेभान सुरांनी देहभान हरपून गेलेली राधा खऱ्या अर्थानं भानावर आली आणि प्रेमाच्या कृष्णडोहात तिनं बिनदिक्कत अुडी घेतली. राजवाड्याची सीमा ओलांडल्यानंतरच रानावनात भटकत आर्त भजनं गाणाऱ्या मीरेला तिचा प्रियकर भेटू शकला. आपण स्वतःच आपल्या भोवती काही तटबंदी अुभ्या करून ठेवतो आणि त्यात कायमचे बंदिवान होतो. हृदयाची हाक अैकायची सवय ज्याच्या कानांना कधी लागत नाही त्याला स्वर्गीय संगीताचा नाद कसा अैकता येणार ?

बुद्ध चरित्रातली सर्वपरिचित कथा अिथं मला आठवते. राज्य-वैभवात राजपुत्र सिद्धार्थ कधीच रमू शकत नाही. सिंहासनाचा मोह

त्याच्या मनाला केव्हाच स्पर्श करत नाही. माणसाच्या माथ्यावर अगणित दुःखाचा भार आहे आणि दुबळा अेकाकी माणूस त्याच्या खाली अगतिकपणे दडपला गेला आहे ही विदारक जाणीव सिद्धार्थाच्या मनाचे लचके तोडीत आहे. दुःखाच्या वेटोळचांत सापडलेल्या माणसाला मुक्तीची वाट दाखविण्यासाठी अेका नव्या वाटेचा शोध करीत हा राजपुत्र सर्वस्वाचा त्याग करून निघाला. महालातल्या मंचकावर गाढ झोपलेल्या यशोधरेचा व आपल्या प्रियपुत्र राहुलचा मूक निरोप घेअून सिद्धार्थ गौतम रानावनातले काटेकुटे तुडवीत निघून जातो. या कथेचा अर्थ पूर्वी मला नीट कळत नव्हता. आता ती यशोधरा, तो राहूल, ते राज्यसुख आणि वैभव ही सारी मला जीवात्म्याच्या वाटेत अुभी राहिलेली विघ्नं वाटतात. परम स्वातंत्र्याचा आणि मुक्तीचा हा प्रवासी हळुवार हातांनी पण कठोर मनानं हे पाश बाजूला सारतो आणि आपल्या अंतःकरण प्रवृत्तीला प्रमाण मानून चालायला लागतो. आपली पोझिशन आणि प्रेस्टिज यांच्या वर्तुळात गौतम अडकून पडला असता तर तो केव्हातरी 'बुद्ध' झाला असता काय ? स्वातंत्र्यासाठी आत्म्यानं केलेली धडपड, मानवतेच्या सुखासाठी स्वातंत्र्याचा संदेश देणारा अेक स्वतंत्र पथिक हाच या कथेचा मध्यवर्ती आशय आहे असं मला वाटतं.

मी तत्त्वज्ञानाच्या फारच खोल जंगलात शिरलो आहे. कुठल्याही तत्त्वज्ञानाचे दोर माणसाला जर आवळून टाकत असतील तर तेही त्यानं कापून टाकले पाहिजेत. अुगीच स्वतःला बांधून टाकणारी तत्त्वज्ञानं हवीत कशाला ? 'रोमन हॉलिडे' मधली ती नायिका ज्या स्वच्छंद अूर्मीनं बाहेर पडली आणि आपल्याला भेटलेल्या अेका दिलदार रसिक तरुणाच्या प्रेमात पडली, त्याप्रमाणं आपणही आपली प्रेमदृष्टी व्यापक करावी. थोडं स्वैर आणि स्वच्छंद व्हावं. अंतराळात एक झेप घ्यावी. संगीताच्या मैफलीत बुडून जावं. नर्तकीच्या पायातल्या घुंगुराबरोबर आपल्याही मनाचे घुंगुर धुंदपणे नाचवावे. अेखाद्या सुंदर ध्येयाच्या पाठीमागं प्राणशक्ती एकवटून धावत सुटावं. त्यातलं सुख आणि दुःख खुशाल भरभरून घ्यावं. खोटे अुपचार आणि खोटे मुखवटे घेअून वावरण्यात काहीच अर्थ नाही मला माहीत आहे हे तुम्हाला पटणार

नाही. कुणी म्हणेल हा साराच लहरीपणा आहे. चंचलपणा आहे. पण कुणी काहीही म्हटलं तरी रोमच्या प्रशस्त फूटपाथवरून मुक्तपणानं निघालेली ती स्वातंत्र्यप्रिय राजकन्या मला मोह घालते. आम्ही सामान्य माणसं आयुष्याच्या ठरलेल्या वाटेवरून धापा टाकीत जातो. चाकोरी सोडून कधी चाललोच नाही. हृदयाच्या गाभ्यापासून आम्ही कुणावर आत्यंतिक प्रेमही केलं नाही. माफक प्रेम, मचूळ द्वेष, मरगळलेलं मन, आणि सांकेतिक वाट यापलीकडं काहीच मिळवलं नाही. पण कधीतरी अेखादा क्षण असा येतो, तो अुंच अुंच आभाळात घेअून जातो. 'रोमन हॉलिडे' चा अर्थ त्यावेळी मला कळतो.

## व्याख्यानाचं आख्यान

एखादं विचारसुंदर व्याख्यान ऐकायला मिळणं अलीकडं फार दुर्मिळ झालं आहे. पण व्याख्यानांची संख्या वाढली आहे. दररोज निरनिराळ्या व्यासपीठांवरून शेकडो व्याख्यानं झडत आहेत. गावोगाव अनेक व्याख्यानमाला चालू आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनावरून कित्येक व्याख्यानं होत असतात. राजकारणी नेत्यांच्या बद्दल तर बोलणंच नको ! बोलण्याची अनिवार हौस असलेली ही माणसं-नव्हे हे पुढारी आपल्या सभांना श्रोते आणण्याची खास व्यवस्था करतात असं मी ऐकलं आहे. कदाचित व्याख्यानासाठी श्रोते पुरवणाऱ्या काही ठेकेदारांच्या कंपन्या निघालेल्या असणं शक्य आहे. हे श्रोते मधून मधून टाळ्या वाजवण्याचं आणि पुढाऱ्याच्या जयजयकाराच्या घोषणा देण्याचं काम इमानीपणानं करीत असतात. या अतिउत्साही श्रोत्यांना कुठं टाळ्या वाजवाव्यात याचंही तारतम्य नसतं. ते फक्त आपली 'ड्यूटी' करीत असतात. एक पुढारी व्यासपीठावरून वीरश्रीयुक्त आवाजात बोलत होते. आपल्या भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांपासून आजच्या सर्वश्रेष्ठ पदावर असलेल्या नेत्यांपर्यंत सर्वांचा ओढून ताणून उल्लेख केला आणि नंतर ते म्हणाले,

'अरे, या देशात आजही स्त्रियांना आणि शूद्रांना नीट वागणूक दिली जात नाही' हे वाक्य त्यांनी आवश्यकतेपेक्षा अधिक उंच स्वरात

उच्चारल्याबरोबर त्या कर्तव्यतत्पर श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. 'आजही हरिजनांना आपण नीट वागवीत नाही' या वाक्यालाही कडकडून टाळी पडली. पुढं ते म्हणाले, 'सामाजिक न्याय प्रस्थापित केल्याशिवाय आम्ही राहणार नाही.' इथं मात्र श्रोत्यांनी काहीच हालचाल केली नाही. सभेला गर्दी होती ती 'श्रोत्यांची' नव्हती. गर्दी दाखविण्यासाठी आणि पुढारी महाशयांना संतुष्ट करण्यासाठी श्रोत्यांची आयात केली होती. हेच श्रोते पुढाऱ्याच्या दुसऱ्या भाषणासाठी राखून ठेवलेले असतील. राजकीय व्यासपीठाचं सोडून द्या. पण सामाजिक आणि शैक्षणिक व्यासपीठांवरसुद्धा एखादा नवा, उत्साहवर्धक स्पष्ट, रसरशीत विचार ऐकायला मिळत नाही. ही अनेकांची खंत आहे. व्याख्यान ऐकणं हा एक रोमांचक अनुभव असतो. असा अनुभव देणारे विचारवंत वक्ते अलीकडं इतके दुर्मिळ का व्हावेत हा एक प्रश्न आहे. एखाद्या ज्ञानी मनुष्याला 'बहुश्रुत' अशी संज्ञा आपण देतो. याचा अर्थ त्यानं पुष्कळसं ऐकून ज्ञान मिळवलेलं असतं. या अर्थानं आज 'बहुश्रुत' होता यईल काय याची शंकाच आहे. वक्ते नाहीत म्हणून श्रोतेही नाहीत. वक्तृत्व आणि श्रोतृत्व या दोन्ही गोष्टी ओसरत जाव्यात ही सांस्कृतिक हानी आहे असं मला वाटतं. परवा माझ्या एका मित्रानं आपली तक्रार काहीशा तीव्र आणि 'वक्तृत्वपूर्ण' शब्दांत मांडली. तो म्हणाला,

'घरोघरी जाले कवी, हे सुपाटोपलीचे कवी' असं म्हणून तुकारामानं जसा कवींच्या पैदाशीवर हल्ला चढविला, तसा मला वक्त्याच्या जमातीवर हल्ला करायचा आहे. काय समजतात हे लोक स्वतःला ? व्यासपीठ दिसलं की त्यांना कंठ फुटतो. तोंडातून आवाज काढणं म्हणजे वक्तृत्व असा भलताच भ्रम झालेल्या या लोकांनी वक्तृत्वाच्या कलेचा अगदी चोळामोळा करून टाकला आहे. त्यांना काय सांगायच आहे तेच कळत नाही. तास दीडतास ते श्रोत्यांचा छळ करतात बिचारे श्रोते सहनशील असतात म्हणूनच वक्ते धडपणानं व्यासपीठावर उभे राहू शकतात. बहुतेक वक्त्यांची भाषणं श्रोत्यांच्या सौजन्यानं पार पडतात. अनेकांना साध्या साध्या शब्दांचा सुद्धा नीट

उच्चार करता येत नाही. भाषेचा पावलोपावली विनयभंग करीत बोलणाऱ्या या वक्त्यांचा मला संताप येतो. अरे, शब्दाला एक आकार असतो. त्याचं स्वतःचं असं एक वैशिष्टच असतं. शब्दाला अनेक गुण-धर्म असतात. शेवटी वक्तृत्व हे शब्दांतूनच साकार होत असतं ना? शब्द हे तर भांडवल. या भांडवलाच्या साहाय्यानं विचारांच्या पायावर वक्तृत्वाची इमारत उभी करायची असते. पदवीधर झालेल्या वक्त्यांना सुद्धा शब्दांचा व्यवस्थित उच्चार करता येत नाही. स्त्री प्रमाणंच शब्दांचीही पाऊल वाकडं पडलं की त्यांची किंमत कमी होते आणि मग ते कुचेष्टेचे विषय होतात. इस्त्री केलेल्या साध्या, हलक्या कपड्यालाही एक देखणं सौष्ठव येतं, तसंच शब्दांचं असतं. तोंडातून गलथानपणानं बाहेर पडलेला बेंगरूळ शब्द कानामनाला वीट आणतो.'

माझ्या मित्रानं शब्दांची बाजू प्रभावी शब्दांत मांडली. त्याच्या म्हणण्यातलं तथ्य नाकारण्यात काहीच अर्थ नाही. अनेक वक्ते, शब्दांची, वाक्यांची आणि अर्थाची चमत्कारिक, अर्थशून्य ओढाताण करतात. मलाही या घटनेचा संताप येतो. एकदा एक तथाकथित वक्ता मला आढ्यतेनं म्हणाला,

'तुम्ही प्राध्यापक मंडळी म्हणजे केवळ शब्दांचे व्यापारी. शब्दाला मी कसलंच महत्त्व देत नाही. अर्थ हाच अधिक महत्त्वाचा असतो. उगीच शब्दांची मांडणी आणि घाटणी, उच्चार आणि आघात असल्या निरर्थक गोष्टी मला आवडत नाहीत. शब्द कसाही असला तरी चालेल. आपण फक्त अर्थ घ्यायचा असतो. समजलं?' आपण फारच 'अर्थपूर्ण' बोललो अशा आविर्भावानं त्यानं माझ्याकडं पाहिलं. मी त्याला सहज म्हटलं, 'जाऊ द्या हा विषय! अर्थ तेवढा महत्त्वाचा हे मला मान्य आहे.' त्या वक्त्याच्या अंगावरचे कपडे अत्यंत टापटिपीचे होते. त्याच्या शर्टाची बटणं कापडाच्या रंगाशी मिळतीजुळती होती. त्यानं आपले केस सफाईनं वळवले होते. तुळतुळीत दाढी केली होती. आम्ही ज्या हॉटेलात बसून हे संभाषण करीत होतो ते हॉटेलही उंची, शोभिवंत होतं. वेटरनं चहाची किटली आणि कपबशा टेबलावर आणून ठेवल्या. एका कपाचा रंग उडाला होता. दुसऱ्या कपाचा कान तुटलेला आढळला.

टेबलावर ठेवलेल्या पुष्पपात्रातली फुलं पार सुकून गेली होती. मी किटलीतून चहा कपात ओतायला लागलो. वक्ते महाशय मला लगबगीनं म्हणाले,

'थांबा! चहा ओतू नका. काय ही गैरव्यवस्था आणि निष्काळजीपणा!' त्यानं ओरडून वेटरला बोलावलं आणि सांगितलं, 'चांगले कप घेऊन ये. असले कानतुटके आणि जुनाट झालेले कप मला आवडत नाहीत. या फ्लॉवरपॉटमधली फुलं कशी ताजी टवटवीत पाहिजेत.'

मी त्याला विचारलं, 'अहो, पण या गोष्टींचा चहा पिण्याशी काय संबंध आहे? कप कसाही असला तरी मी फक्त चहाला महत्त्व देतो. उगीच नसत्या गोष्टींचं काय स्तोम माजवायचं? आपल्याला चहा मिळाल्याशी कारण' आता मात्र वक्ते महाशय माझ्यावर रागावले.

'तुम्हाला कलात्मक दृष्टी नाही' असा शेरा मारून ते म्हणाले, 'सुबक घाटाच्या कपातून गरम गरम चहा घेताना किती बरं वाटतं ते तुम्हाला अजून कळलेलं नाही. चहा रुचकर होण्यासाठी दूध, साखर आणि चहाची पावडर याचं व्यवस्थित मिश्रण आवश्यक असतं. ज्या टेबलावर आपण चहा घेतो ते सुद्धा सजवलेलं असावं. फुलदाणीतील फुलं रंगीबेरंगी आणि तजेलदार असावीत. चहा घेणं आणि चहा ढोसणं यातला मूलभूत फरक कृपा करून लक्षात घ्या. ज्यांना केवळ चहाच महत्त्वाचा वाटतो त्यांना मी काय सांगणार? चहासारखं उकळलेलं पाणी पिणं आणि चहाचा आस्वाद घेणं, अनुभव घेणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.'

खरं तर वक्ते महाशय माझीच बाजू मांडीत होते. शब्द कसेही असले तरी चालतात असे म्हणणाऱ्या या विद्वानाला चहा पिताना मात्र चांगली कपबशी, शोभिवंत किटली, दूधसाखरेचं विशिष्ट प्रमाण हे सारे घटक अत्यंत महत्त्वाचे वाटत होते. आपलं व्यक्तिमत्त्व खुलून दिसावं म्हणून तो आपल्या कपड्यांच्या बाबतीत दक्ष होता. पण व्याख्यानातली शब्दयोजना अर्थपूर्ण आणि सुंदर असावी हे विधान मात्र तो मान्य करीत नव्हता. कोणत्याही व्याख्यानाचं किंवा साहित्यकृतीचं वस्त्र हे अखेर शब्दांच्या उभ्या-आडव्या धाग्यांनीच विणायचं असतं. त्यामुळं

हे शब्द, दर्शन आणि श्रवण या दोन्ही दृष्टींनी परिणामकारक असावेत, अशी अपेक्षा का करू नये ? शब्द प्रमाणिक असावेत, अस्सल असावेत, म्हणजे त्यांचं सौंदर्य अधिकच खुलतं. पण एखादा लेखक किंवा वक्ता आपले विचार कलापूर्ण शब्दांतून व्यक्त करू लागला तर त्याच्याकडं वक्रदृष्टीनं पाहण्यात काय अर्थ आहे ? कित्येक वर्षांपूर्वी अच्युतराव पटवर्धनांचं 'साहित्य आणि समाजवाद' या विषयावरचं एक नितांत सुंदर व्याख्यान मी ऐकलं होतं. अच्युतरावांचे शब्द अत्यंत प्रभावी आकार धारण करून एखाद्या सुगंधी झुळकीप्रमाणे हलकेच वाहत येत होते. सुखवीत होते. फुलवीत होते. उत्तेजित करीत होते. अंतर्मुख करीत होते. प्रत्येक वाक्याला एक टोक होतं. प्रत्येक विधानाच्या मागे वक्त्याचं-त्याच्या अंतर्मनाचं दर्शन घडविणारं सामर्थ्य होतं. साहित्याचा आणि वक्तृत्व कौशल्याचा एक जातिवंत नमुना त्यादिवशी मला पाहायला मिळाला. वक्त्याचे शब्द वाऱ्यावर फार लवकर उडून जातात. पण अच्युतरावांचं त्यादिवशी अनुभवलेलं ते विचारसुंदर व्याख्यान मला विसरणं शक्यच नाही. त्यात काय नव्हतं ? सळसळत्या भावनांनी भरून आलेले शब्द भावविचारांचा श्रोत्यांवर मुक्तपणानं वर्षाव करीत होते. सुंदर शब्द म्हणजे मऊ, मवाळ, लुसलुशीतपणा असलेले असा अर्थ करणं चुकीचं आहे. जे शब्द बाजारी असतात अशा शब्दांना काहीच अर्थ नसतो. काहीतरी सनसनाटी निर्माण करण्यासाठी केलेली ती एक केविलवाणी धडपड असते. जाहिरातबाजी करूनच मग असले खोटे तकलादू शब्द घरपोच 'खपवावे' लागतात. पण चांगलं व्याख्यान म्हणजे परिणामकारक शब्द आणि अर्थपूर्ण विचार यांचा समसमा झालेला संयोग असतो. एखादं गाणं बेसूर होऊ लागलं तर जो मनस्ताप होतो तसंच व्याख्यानांच्या बाबतीतही म्हणता येईल. एखादा तुटका फुटका सामान्य विचार व्यक्त करायचा झाला तर त्यासाठी सुद्धा थोडंफार शब्दसामर्थ्य गाठीशी असावं लागतं. कोणताही शब्द मी उच्चारला तरी त्याचा फक्त भावार्थच श्रोत्यांनी घेतला पाहिजे असं म्हणून चालेल काय ? रंगभूमीवर कोसळत जाणारं नाटक पाहताना जसा चमत्कारिक वैताग येतो त्याप्रमाणंच एखादं विस्कळीत झालेलं

अर्थहीन, अकलात्मक व्याख्यान ऐकताना मानसिक त्रास होतो. व्याख्यान ही एक कलाकृती असते. प्रत्येक कलेला तिचं असं काही तंत्र असतं. 'मला सुचेल ते मी बोलतो, जे मला मनापासून सांगायचं आहे तेवढंच मी सांगतो. मी काही वक्ता नाही. मला वक्तृत्वाचं तंत्रबिंत्र कळत नाही' असं म्हणारा वक्तादेखील मनातल्या मनात विचारांची आणि शब्दांची रचना करीतच असतो. आपल्या विचाराचा प्रभाव श्रोत्यांवर पडावा, त्यांनी आपल्या विचारांचा स्वीकार करावा अशीच त्याची इच्छा असणार. पण अखेर शब्द हे व्याख्यानाचं काय किंवा वाङ्मयाचं काय साधन मात्र असतं. विचार आणि भावना हाच त्यांचा आत्मा, फार बोलणारा म्हणजेच केवळ बडबड करणारा हा वक्ता असतो असा गैरसमज करून घेण्यात अर्थ नाही. वक्तृत्वासंबंधी इतक्या चुकीच्या, विपर्यस्त आणि परस्परविरोधी कल्पना अनेकांच्या मनात ठाण मांडून बसल्या आहेत की त्या नाहीशा करण्यासाठी बृहस्पतीलाही बरेच श्रम घ्यावे लागतील. बेसुमार बोलणं म्हणजे वक्तृत्व नव्हे. सोफोक्लीस या ग्रीक नाटककार वक्त्यानं म्हटलं आहे, 'बरेच बडबडणे आणि चांगले अर्थपूर्ण बोलणे यात बरेच अंतर आहे.'

काही वर्षांपूर्वी मी मुंबईला सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांचं एक व्याख्यान ऐकलं. ते केवळ वीस मिनिटं बोलले. त्या वीस मिनिटांत तुडुंब भरलेल्या सभागृहात रामस्वामींच्या शब्दांचं आणि विचारांचं जे श्रवणमधुर नृत्य चाललं होतं त्याचं वर्णन करणं अशक्य आहे. मोरोपंतांच्या कवितेतली एक ओळ अशी आहे, 'गगन कसे गगनासम, सागर भासे जसाचि सागर तो' आकाश आकाशासारखं आहे आणि समुद्र कसा म्हणाल तर तो समुद्रासारखाच आहे. दुसरी उपमा देता येत नाही. रामस्वामी अय्यरांचं व्याख्यान केवळ याच कोटीतलं होतं. ऐंशी वर्षांचा हा तेजस्वी गोरापान म्हातारा आपल्या गळ्याभोवतालचं उपरणं नीटनेटकं करून ध्वनिक्षेपकासमोर जेव्हा ताठपणानं उभा राहिला आणि आपल्या मधुर आवाजात 'लेडीज् अॅण्ड जन्टलमेन्!' अशी साद घालून त्यानं सभागृहाकडं सर्व दिशेला आपुलकीनं आणि विश्वासानं पाहिलं तेव्हाच त्याच्या शब्दांतल्या आर्जवी पण हुकमी

स्पर्शानं त्यानं सभा जिंकून घेतली होती. सी. पी. रामस्वामी क्षणभर सभेकडे पाहात राहिले. आपल्या बंद गळ्याच्या कोटावरून त्यांनी पुन्हा उपरणं नीट केलं आणि मग त्यांच्या सुंदर, ठाशीव, अर्थसंपन्न, धीरगंभीर कधी क्षुब्ध तर कधी संथ, कधी चपळ तर कधी हळुवार अशा शब्दांची ती रसवंती कुठेही खंडित न होता एका विशिष्ट वेगात वाहात राहिली. त्यांच्या ठायी विलक्षण शब्दप्रभुत्व होतं. एका शब्दाला ते आणखी दोनतीन प्रतिशब्द देऊन आपला अर्थ व भाव अधिकच प्रत्ययकारी बनवीत होते. भारतीय संस्कृतीचा, तत्त्वज्ञानाचा, संस्कृत आणि इंग्रजी ग्रंथांचा त्याचा व्यासंग स्तिमित करणारा होता. शिक्षणासारख्या एका अतिपरिचित, नावीन्य संपलेल्या विषयावर नवीन पद्धतीनं ते बोलत होते. आपलं मत अभिनिवेशानं मांडताना काही तत्वज्ञांची वचनं त्यांनी सहजतेनं उद्धृत केली. ती अवतरणं जशी मार्मिक तशीच रसपूर्णही होती. एक-दोनच महत्त्वाचे विचार त्यांनी सांगितले आणि त्यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा शिक्का ठोकून त्यांनी श्रोत्यांपुढे ते सामर्थ्यानं मांडले. मला तरी त्या दिवशी तो अभिनववाग्विलास आणि तो अद्‌भुत विचारविहार एका वेगळ्याच वातावरणात घेऊन गेला. रामस्वामींच्या रुचिर आणि पक्व जीवनदृष्टीची साक्ष देणारं ते व्याख्यान आजही हृदयाच्या एका कोपऱ्यात मी जतन करून ठेवलं आहे. सुंदर शब्दांच्या, सकस विचारांच्या आणि समर्थ व्यक्तित्वाच्या सान्निध्यातले ते सुवर्णक्षण अजूनही माझ्या प्रमाणंच ते भाषण ऐकणाऱ्या शेकडो श्रोत्यांना एक आगळा, अपूर्व अनुभव देऊन गेले असतील यात शंका नाही. त्या व्याख्यानानं मला इतकं का मोहित करावं? असा प्रश्न जेव्हा मी आज विचारतो तेव्हा त्याचं उत्तर असं की, रामस्वामींच्या भाषणात विद्वत्ता, प्रतिपादन चातुर्य, स्वतंत्र जीवनदृष्टी, शब्द रचनेची कुशलता, विचारावरील निष्ठा, अभिनिवेश आणि श्रोत्यांविषयीची आत्मीयता इतक्या घटकांची त्यात सरमिसळ झाली होती. चांगलं व्याख्यान म्हणजे केवळ सुंदर शब्द आणि उत्तम विचार इतकंच असत नाही. त्यात वक्त्याचं मन आणि जीवनही मिसळलेलं असतं तेव्हाच ते रसायन चांगलं जमतं. व्याख्यान म्हणजे केवळ शब्दज्ञान अशी ज्यांची भाबडी समजूत आहे त्यांना मी इतकचं म्हणेन की, तसं असतं तर

कोणताही शब्दकोशकर्ता हा उत्कृष्ट वक्ता होऊ शकला असता. श्रोत्यांच्या भावनेला भिडणारे शब्द आणि विचार यांची निर्मिती कोणत्याही शब्दकोशातून किंवा ज्ञानकोशातून होत नाही. चांगली साहित्यकृती ही जीवनातूनच निर्माण होते. चांगल्या व्याख्यानाला वक्त्याच्या अंतःकरणाचा सुवास यावा लागतो. अशी व्याख्यानं काही वर्षांपूर्वी जितकी ऐकायला मिळत होती तितकी आज मात्र आम्ही ऐकू शकत नाही याची खिन्नता वाटते.

मी स्वातंत्र्यवीर सावरकरांचं एक व्याख्यान पुण्याच्या स. प. कॉलेजच्या मैदानावर प्रचंड गर्दीत ऐकलं. सावरकर अगदीच दुबळे झाले होते. त्यांना खुर्चीतून सभास्थानी आणावं लागलं. शरीरानं विकल झालेल्या या प्रतिभावंताच्या मनात मात्र चैतन्यपूर्ण विचारांची वेल रसरसून फुललेली होती. या वेलीला लागलेल्या अग्निफुलांचा दाहक वर्षाव सावरकरांच्या कलावती, संपन्न वाणीतून जेव्हा तीव्र वेगानं होऊ लागला तेव्हा आमच्या बर्फाळलेल्या मनातही वीरवृत्तीची एक आवेश-पूर्ण ज्वाळा उफाळून उठली. श्रोत्यांच्या हृदयात आपल्या शब्दांनी पराक्रमाच्या सहस्र ज्योती पेटविणारा हा वक्ता माझ्या मनात ठाण मांडून बसला आहे. ज्याची जन्मभर आराधना केली, जे मिळविण्यासाठी आयुष्याच्या वस्त्राची चाळण केली, जिवाभावाच्या माणसांकडं पाठ फिरवली, वैयक्तिक सुखवैभवाच्या साऱ्या स्वप्नांना स्वतःच्या हातांनी भडाग्नी दिला अशा एका स्वातंत्र्यवीराचे ते 'स्वतंत्र' जळजळीत विचार बिसरू म्हटले तरी अशक्य आहे.

त्या दिवशी ऐकलं ते वक्तृत्व होतं काय ? ती केवळ कला होती काय ? तो केवळ शब्दांचा खेळ होता काय ? स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी जीवनाचा जुगार मांडून बिनदिक्कत खेळणाऱ्या एका शूराच्या आयुष्याचा उग्र गंध घेऊन प्रकट झालेलं ते एक जीवनस्तोत्र होतं. म्हणून तर ते मंतरलेल्या शब्दांनी ओथंबलेलं होतं. सावरकरांसारखे वक्ते गल्लोगल्ली निपजणं शक्य नसतं याची मला जाण आहे, पण चांगले वक्तृत्व करण्या-साठी विचारांची जन्मभर जोपासना करावी लागते. अखंड परिश्रम घेऊन प्रतिभा फुलवावी लागते याचं भान राहिलं नाही.

एक गायक आपल्या तासभराच्या गायनासाठी मोठी बिदागी घेतो हे पाहून असंतुष्ट झालेल्या एका अरसिकानं त्याला विचारलं,

'तोंडातून आवाज काढण्यासाठी तुम्ही एवढे पैसे घ्यावेत हे बरोबर नाही.' तो गायक म्हणाला,

'मी केवळ गळ्यानं गातो आणि माझ्या ओठांतून सूर बाहेर पडतात असं तुला वाटतं. हे तुझं अज्ञान आहे. गाणं आधी माझ्या हृदयात उमटावं लागतं आणि हृदयात गाणं भरून घेण्यासाठी मला साऱ्या सृष्टीचंच गाणं मनानं ऐकावं लागतं. सृष्टीच्या गाण्याचे सूर मी मोठ्या परिश्रमानं मिळवितो. त्यातलाच एखादा सूर मी तुम्हा रसिकांच्या पुढे सादर करतो, ज्याला हृदयानं गाता येत नाही तो कधीच गायक होत नाही.' त्या अरसिकाचं कितपत समाधान झालं कुणास ठाऊक ? त्याला गाणं ही केवळ कारागिरी वाटत होती. कदाचित त्यानं अस्सल गाणं ऐकलंच नसेल. साहित्याच्या आणि वक्तृत्वाच्या संबंधातही त्या अरसिकासारखेच गैरसमज करून घेणारे पुष्कळ दुर्दैवी लोक असतील. उत्तम वक्त्याला विचारांच्या विराट क्षेत्रात अखंड हिंडावं लागतं. चिंतनातून आणि अध्ययनातून त्याला आपली वाणी सतेज ठेवावी लागते. जीवनाच्या विविध अनुभवांचा बरा - वाईट वास मुक्त-पणानं त्याला हुंगावा लागतो. शब्दांवर आणि त्यांच्या अभिव्यक्तीवर, विचारांच्या प्रतिपादनावर आणि स्वत:वर त्याला विश्वास ठेवावा लागतो.

आज व्याख्याते वाढले पण वक्ते कुठे आहेत असा प्रश्न विचारण्याची आपत्ती आली आहे. बऱ्याच दिवसांत चांगलं व्याख्यान ऐकायला मिळालं नाही म्हणजे मी सावरकरांचं एक भाषण वाचू लागतो आणि वाचतानाच त्यांची ती सावेश मुद्रा मला दिसू लागते. ते आपल्या ऊर्जस्वल शैलीत बोलत असतात :

'गाऊ द्या मलाही माझे एक गाणे. मलाही एक स्वप्न रंगवू द्या. ते स्वप्न खोटे ठरले तर मी वेडा ठरेन. पण खरे झाले तर जग मला द्रष्टा म्हणेल....' हे भाषण वाचताना मी झपाटून जातो. व्याख्यानाचा उत्कट अनुभव मला मिळतो.

# अहो जग पुढे गेले !

*     *

एखाद्याच्या असंस्कृतपणाचा उल्लेख करायचा झाला तर आपण त्याला 'पशू' म्हणून मोकळे होतो. पशूंना ज्ञान आणि संस्कृती नाही अशी आपली समजूत आहे. पोटभर चरायला मिळालं की पशू संतुष्ट असतात. ते आपल्या पोटापुरतं पाहातात. बाकीच्या भानगडीत पडत नाहीत. लक्षही घालीत नाहीत. इतका समंजसपणा माणसांत असतो का ? एकदा एका प्राणीसंग्रहालयातले नाना प्रकारचे पशुपक्षी पाहायला आम्ही गेलो होतो. एका भल्या मोठ्या पिंजऱ्यात दोन तीन वाघ निवांतपणे डोळे मिटून बसले होते. वाघ म्हणजे रानटीपणाचा आणि निर्दयवृत्तीचा अर्क मानला जातो.

आमची चाहूल लागल्यावर त्या प्राण्यांनी क्षणभर आपले डोळे उघडले. आम्हाला वाटलं की आता ते एखादी गर्जना करून आपली प्रतिक्रिया व्यक्त करतील. आम्ही त्यांना थोडं डिवचण्याचाही प्रयत्न केला. ते शांतपणानं आपल्या जागेवरून उठले आणि दुसऱ्या कोपऱ्यात जाऊन पुन्हा डोळे मिटून ध्यानमग्न झाले. आमच्याकडं पाहण्याइतकीही त्यांनी आमची दखल घेतली नाही. आमची एवढी घोर उपेक्षा कुणीच केली नव्हती. खरं तर आम्ही 'सर्वश्रेष्ठ मनुष्य प्राणी' होतो. त्यातही आम्हाला काही 'सामाजिक प्रतिष्ठा' होती. आमच्यापैकी एकजण बडा सरकारी अधिकारी होता. त्याला पाहिल्याबरोबर माणसं हस्तिदंती

करीत हात जोडून उभे राहात. त्याच्या कृपादृष्टीची मार्गप्रतीक्षा करीत. पण या प्राणीसंग्रहालयातल्या प्राण्यांनी आमच्याकडं विशेष कुतुहलानं-सुद्धा पाहिलं नाही. 'बोलून चालून माणसं ! यांच्याकडं काय पाहायचं ! रिकामटेकडे दिसतात' अशा आविर्भावानं ते माना वळवायचे आणि आपापल्या व्यवहारात गुरफटून जायचे. माणसांच्या जगात काय चाललं आहे याच्याशी त्यांना काहीच कर्तव्य नव्हतं. आपल्या दैनंदिन गरजा भागल्या की त्यांचं समाधान होई. अशा पशूंना असंस्कृत, रानटी म्हणण्याचा आम्हाला खरोखरच काय अधिकार आहे ?

माझा मित्र म्हणाला, 'पशू निर्बुद्ध असतात. जेवढं निसर्गानं दिलं आहे तेवढ्यावरच ते जगतात. पण माणसानं आपल्या बुद्धीच्या बळावर निसर्गाला वाकवून स्वतःची स्वतंत्र संस्कृती निर्माण केली आहे. पशूला हे कधीतरी करणं शक्य आहे का ?'

मी म्हणालो, 'माणसांची संस्कृती किती महान आहे, किती उच्च कोटीची आहे याची साक्ष इतिहासाच्या प्रत्येक पानावर रक्ताच्या अक्षरांनी नोंदली आहे. काल परवाचंच उदाहरण घेतो. फारतर एक महिना झाला असेल. फलटणच्या दलित वस्तीवर सवर्णांनी जो अमानुष हल्ला चढवला, दलितांच्या झोपड्या जाळून टाकल्या आणि तिथल्या निरपराध, असहाय्य भगिनींची जी लाजिरवाणी विटंबना केली, त्यामुळं आमच्या संस्कृतीचं 'वैभवशाली, भव्य दिव्य दर्शन' घडलं यात शंका नाही. आणि हे 'शूर कृत्य' करीत असताना त्या 'पराक्रमी सुसंस्कृत' लोकांनी शिवाजी महाराजांचा आणि श्री तुळजाभवानीचा जयघोष करून आपल्या संस्कृतीची पताका नाचवली. यावर तुझं काय म्हणणं आहे ?'

माणसांनी शरमेनं मान खाली घालावी असा हा प्रकार आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या महाराष्ट्रात ही घटना घडते. एकविसाव्या शतकाकडं आपण वाटचाल करीत आहोत असं अभिमानानं सांगणाऱ्या लोकांना आपल्या प्रगतीच्या या वाटा समजल्याच पाहिजेत. आम्ही आकाशात किती उपग्रह सोडले याचा सांस्कृतिक हिशेब आपण सवडीनं करू. पण

जमिनीवर माणसांबरोबर आम्हाला साध्या माणुसकीनं जगण्याची अक्कल मिळालेली नाही, एवढं लहानसं सत्य तरी जाणून घेऊ. द्रौपदीची निरी धरून तिला विवस्त्र करण्याचा नीच प्रयत्न करणाऱ्या दुःशासनाला एक भीम भेटला होता. त्या भीम पुरुषानं दात ओठ खात प्रतिज्ञा केली होती 'तुझ्या रक्तानं माखलेल्या हातांनी मी द्रौपदीचा हा वेणीसंहार परत बांधीन. तोपर्यंत तिचे केस मोकळेच राहतील.' आज भर दिवसा द्रौपदी रस्त्यावर ओढली जात आहे आजच्या प्रगत संस्कृतीच्या ठेकेदारांकडून ! पशू कितीही पशू झाले तरी असलं 'मानवी' कृत्य त्यांच्या हातून घडेल काय याचा मी विचार करीत आहे.

मनुष्य पशूपेक्षा अधिक बुद्धिमान आहे यात शंका नाही. पण त्यामुळं तो सुसंस्कृत ठरतो असा दावा करता येणार नाही. एक सुंदर चित्र मी पाहिलं आहे. वाघीण आणि गाय एकाच पात्रात पाणी पीत उभ्या आहेत आणि गायीचं वासरू वाघिणीचं अन् वाघिणीचं बछडं गायीचं स्तनपान करीत आहे. हा केवळ कल्पनाविलास आहे असं आपल्याला वाटतं. पण तो एक आदर्श आहे. एक मंगल स्वप्न आहे. कदाचित पशू आपलं वैर विसरतील. कारण तें बुद्धिहीन असल्यामुळं वैराचे निखारे फुलवीत ठेवण्याची चतुर तरतूद त्यांना करता येणं शक्य नाही. ज्यांच्या जवळ बुद्धिमत्ता आहे ते आपल्या शत्रुत्वाचे नगारे सारखे वाजवीत राहतात. त्याच आवाजावर त्यांना जगायचं असतं. अद्यापी काश्मीरचा प्रश्न मिटला नाही. असं पुन्हा पुन्हा ओरडून आव्हान द्यायचं असतं. आपल्या रानटी वैराला कुठल्यातरी भंपक तत्त्वज्ञानाचा रंग फासल्याशिवाय आपल्याला सुसंस्कृत कोण म्हणणार ?

माझी सरबत्ती माझ्या मित्रानं बराच वेळ सहन केली. मी उत्तेजित होऊन वाद करू लागलो की हा धूर्त माणूस मुकाट्यानं माझं आवेशपूर्ण व्याख्यान ऐकत असतो. मधून मधून काहीतरी शेरे मारून, पुन्हा वादाला रंगत आणण्याचा प्रयत्न करतो, तो म्हणाला,

'तुझ्या विचाराशी मी सहमत आहे. पण माणूस हा पशूपेक्षा असंस्कृत आहे असा जो सूर तुझ्या बोलण्यातून डोकावतो, तो मात्र मला मान्य नाही. हजारो वर्षांपासून माणूस उत्तरोत्तर अधिकाधिक

प्रगती करीत वेगानं चालला आहे. त्यानं नाना प्रकारचे शोध लावले. यंत्र, अन्न, वस्त्र, कलाकौशल्य यांत त्यानं प्रचंड, क्रांतिकारक स्वरूपाची कामगिरी केली. काल डोंगरकपारीत अर्धनग्न अवस्थेत राहणारा हा रानटी माणूस आलिशान फ्लॅटमध्ये, उंची झुळझुळीत कपड्यांत वावरत आहे. संस्कृतीच्या विकासाचं हे चित्र केवढं विलक्षण आहे ! पण हे मान्य करण्याची मात्र तुझी तयारी दिसत नाही.'

माझ्या मित्रानं युक्तिवाद करताना गल्लत केली. पशू आणि माणूस यांच्यातलं बौद्धिक अंतर उघड आहे. त्याबद्दल वाद करण्याचं काहीच कारण नाही. एका रात्रीत आकाशाला भिडणारी प्रचंड इमारत माणूस आज उभी करू शकतो. आमच्या घरादाराची उंची वाढली हे खरं आहे. पण आमच्या हृदयाला वेढून बसलेलं शतशतकांचं करंटेपण कसं कमी व्हायचं ? माझ्या मते संस्कृतीचा संबंध बुद्धीपेक्षा अंतः-करणाशी अधिक आहे. सुसंस्कृतपणाचा दावा करणारं अत्यंत प्रगत राष्ट्र मानवतेची राखरांगोळी करू शकणाऱ्या शस्त्राची पूजा करीत बसलेलं आम्ही पाहात आहोत. हिंस्त्र पशू आपल्या अन्नासाठी एखाद्या निरपराध कोकरावर हल्ला चढवील. पण बुद्धिमान मनुष्य आपल्या क्षुद्र स्वार्था-साठी लाखो लोकांची कत्तल करण्यातला 'बौद्धिक' आनंद घेत राहील. माणूस ज्ञानी झाला पण तो शहाणा आणि समजुतदार होऊ शकला नाही हीच आजच्या ज्ञानी माणसांची केविलवाणी शोकांतिका आहे.

अिमर्सन हा एक प्रतिभावंत तत्त्ववेत्ता होऊन गेला. ज्यानं त्याचे विचार 'ऐकले' नाहीत त्याला सुसंस्कृत म्हणाताना मला थोडा विचार करावा लागेल. त्याचं वाङ्मय म्हणजे सुंदर विचारांचं एक अपूर्व भांडार आहे. जीवनाविषयी सखोल आणि सर्वांगीण चिंतन करणाऱ्या या विद्वानानं संस्कृतीची फारच मार्मिक व्याख्या केली आहे. काही लोकांना ती विक्षिप्तपणाची वाटेल. संस्कृतीची किंमत कशावर अवलंबून आहे या प्रश्नाला उत्तर देताना तो म्हणाला, 'संस्कृती म्हणजे लोकसंख्या नव्हे. शहरांचा आकारही नव्हे. ज्या लायकीचा माणूस त्या संस्कृतीत राहातो त्यावरून संस्कृतीची किंमत करायची असते.' आम्ही वेडे लोक माणसाची लायकी त्याच्या विद्यापीठीय पदवीवरून मोजतो. आता

विद्यापीठाच्या पदव्यांची किंमत काय आहे. असला गैरसोयीचा प्रश्न कोणी विचारू नये. पदवीसाठी धडपडणारे आणि पदवी देण्यासाठी उत्सुक झालेले दोन्ही पक्ष इतक्या खालच्या पातळीवर येऊन उभे राहतात की त्यांना मग कोणतो 'पदवी' द्यावी हाच प्रश्न पडतो. पदवीचा संबंध आता ज्ञानाशीही नाही आणि संस्कृतीशी तर त्याहून उरलेला नाही. पदवीधरांच्या मूर्खपणाच्या सुरस आणि चमत्कारिक कथा इतक्या प्रसिद्ध आहेत की त्याविषयी बोलणं हे मूर्खपणाचं ठरेल. माणसाच्या योग्यतेचं मोजमाप म्हणजे त्याचं बँकबुक, त्याची गाडी आणि बंगला. त्याच्या अंगावरचे अद्ययावत् धाटणीच्या शिलाईचे कपडे, त्याच्या ओठांत ठेवलेली इंपोर्टेड सिगरेट आणि लायटर. या साधनावरच संस्कृतीचा हिशेब करीत बसणारे अकौंटंट सर्टिफिकेट देऊन मोकळे होतात. गरीब बिचारे ! त्यांना संस्कृती म्हणजे परसातला भाजीपाला वाटतो.

महात्मा गांधींनी लंडनमध्ये एकदा जॉर्ज बादशहाची भेट मागितली. बादशहाच्या सेक्रेटरीनं गांधीजींना अट घातली की, भेटीच्या-वेळी गांधीजींच्या अंगावर अंगभर कपडे असलेच पाहिजेत. आखुड धोतर आणि अंगावर उपरणं चालणार नाही. असली हास्यास्पद अट मान्य करण्याइतके गांधीजी असंस्कृत नव्हते. संस्कृती म्हणजे अंगावरचे कपडे इतकीच सांस्कृतिक समज असलेल्या बादशहाला गांधीजी आपल्या अपुऱ्या वस्त्रातच भेटले. हस्तांदोलन करताना हसून ते बादशहाला म्हणाले, 'महाराज, माझ्या अंगावर जरी कमी कपडे असले तरी त्याची उणीव तुमच्या अनावश्यक कपड्यांनी भरून काढली आहे. तेव्हा हिशेबात आता काही चूक राहिली नाही.' गांधीजींच्या अवखळ विनोदानं बादशहाही हसले आणि त्यांची चर्चा सुरू झाली. साधनांच्या विपुल निर्मितीला सांस्कृतिक विकास ही संज्ञा देणाऱ्यांना संस्कृतीचा आत्मा सापडणं शक्य नाही.

सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या एका क्लबात संध्याकाळी 'पॉश' संस्कृतीचे काही महत्त्वाचे आधारस्तंभ जमले. त्यांच्या वातानुकूलित गाड्या क्लबच्या प्रशस्त आवारात रांगेनं उभ्या होत्या. त्यांतून

उतरलेल्या सदस्यांच्या अंगावर भरपूर मांस होतं. कपड्यांना इस्त्री आणि बुटांना पॉलिश होतं. चर्चेला रंग भरावा या सदिच्छेनं टेबलावर काचेचे प्याले ठेवण्यात आले. फसफसत्या द्रव्यानं ते प्याले ओसंडायला लागल्यावर चर्चा आता उच्च पातळीवर झेप घेऊ लागली. जिभेला चेतना मिळाली. स्त्री सौंदर्याबद्दल रसिकपणानं, नंतर बेतालपणानं आणि त्यानंतर बेवकूफपणानं 'परिसंवाद' सुरू झाला. अमुद्रणीय शब्द आणि वाक्प्रचार यांचा स्पष्ट उच्चार अभिनयासह सुरू झाला. सुशिक्षित प्रतिष्ठितांच्या संस्कृतीचं ते दर्शन धक्कादायक असलं तरी अपवादात्मक मात्र नव्हतं. असे सांस्कृतिक कार्यक्रम गावोगावी बड्या हॉटेलांतून आणि क्लबांतून झडत असतात. मॉडर्न सोसायटीत राहायचं तर हे कल्चर ॲडॉप्ट केलंच पाहिजे. त्यात ॲब्नॉर्मल् काहीच नाही. आता या लोकांना पुन्हा पुन्हा सांगण्याचा प्रयत्न काही श्रेष्ठ संतांनी, तत्त्ववेत्त्यांनी आणि कवींनी केला. बहिणाबाई चौधरीसारखी एक अशिक्षित, खेडवळ पण सुसंस्कृत स्त्री आपल्या साध्या शब्दांतून एक उत्कट, व्याकुळ प्रश्न विचारते, 'मानसा मानसा, कधी व्हशील रे मानूस ?' बहिणीबाईंच्या मते आम्ही माणसं अद्यापी माणूसपणाच्या पातळीपर्यंत आलोच नाही. विसाव्या शतकातल्या या कवयित्रीला माणसानं केलेली प्रगती हिशेबात घ्यावीशी वाटली नाही. ती बाह्य साधनांच्या भौतिक विकासाला दिपून जाण्याइतकी ठिसूळ मनाची नाही. अंतःकरणाच्या निर्मळ सुगंधातच संस्कृतीचं संगीत तिच्या मनाला ऐकू येतं. मला तर अमर्सन् आणि बहिणाबाई चौधरी यांच्या विचारात विलक्षण साम्य दिसतं. अमर्सन्‌ही हेच सांगतो. तो म्हणाला, 'सुसंस्कृत मानवानं वाहनाचा शोध लावला, पण त्या नादात तो स्वतःच्या पायांचा उपयोग करायला विसरून गेला.' भाराभर पुस्तकं वाचून आणि चार व्याकरण-शुद्ध अक्षरं खरडून संस्कृती मिळवता येते या भ्रमात वावरणाऱ्या पुस्तक पंडितांना तुकाराम आपल्या आर्ष पण तथाकथित गांवढळ वाणीनं जे फटकारे मारतो ते खरोखरच पाहाण्यासारखे आहेत. 'पुस्तकांची मोट पाठी वाहणाऱ्या विद्वानांच्या हृदयाला त्यातल्या विचारांचा स्पर्श होत नाही तोपर्यंत या पंडितांना सुसंस्कृत म्हणण्यात काय अर्थ आहे ?'

वनात राहणारे पशू 'वन्य' असावेत यात आश्चर्य नाही. पण सुधारलेल्या नगरातले नागरिक 'जंगलाचा न्याय' प्रमाण मानून आचरण करीत असतील तर काय बोलायचं? आम्ही पृथ्वीवरची जंगलं साफ केली. आमच्याच मनांतली वेडीवाकडी जंगलं मात्र आम्ही मनापासून जोपासली. आज ती प्रचंड प्रमाणात फोफावली आहेत. इच्छेइतका हुंडा मिळाला नाही तर कोवळ्या पोरीला, अंगावर रॉकेल ओतून पेटवून देताना सूडाचं समाधान घेणारा विद्याविभूषित सुसंस्कृत माणूस आम्हाला अनेकवेळा दिसतो. दारूला पैसे दिले नाहीत म्हणून बापाचा खून करणारे 'सुपुत्र' समाजात वावरताना दिसतात. यापेक्षा प्राणीसंग्रहालयात माणसाच्या करमणुकीसाठी कोंडून ठेवलेले प्राणी कितीतरी चांगले आहेत! धर्म आणि संप्रदाय, वर्णीय अहंकार, विषमता, आर्थिक शोषण असल्या गोष्टींचा वासही नसलेले हे भोळे भाबडे पशू आणि पक्षी दिलासा देतात. माणसांच्या 'मानवी' चेष्टांकडं पाहून ते आपली करमणूक करून घेतात.

माझा मित्र म्हणाला 'उगीच निराशावादी होऊ नकोस. जग पुढं गेलं आहे. ते पुढेच जाणार आहे.' 'मला हसू आलं. खरं बोललं म्हणजे निराशावादी म्हणतात. बरं बोललं तर आशावादी ठरवतात. जग पुढं गेलं म्हणजे नक्की काय झालं कुणास ठाऊक! मला मंगेश पाडगावकरांची कविता आठवली. संस्कृती आणि प्रगती यांच्यावर या कवीनं फर्मास भाष्य केलं आहे.

आता संस्कृती म्हणजे
रेशमाचा बुशकोट
आता संस्कृती म्हणजे
लाल रंगलेले ओठ
आता संस्कृती म्हणजे
प्रचार नि जाहिरात
आता सारे बदलले
अहो जग पुढे गेले!

□ □

## मन पाखरू पाखरू....

◉ ◉

माणसाच्या मनासारखं आश्चर्यकारक, अद्‌भुत असं दुसरं काही असेल काय? त्याला कशाची उपमा द्यावी हेच कळत नाही. काही कवींनी मन समुद्रासारखं अथांग आणि खोल आहे असं म्हटलं. पण ही उपमा यथार्थ वाटत नाही. सागर कितीही खोल असो, त्याचा ठाव घेणारे, त्याच्या तळाशी जाऊन तिथल्या चित्रविचित्र चिजा बाहेर काढणारे अनेक पाणबुडे आहेत. पण मनाच्या समुद्राचा असा ठाव कुणाला घेता येईल का? मानवी मन म्हणजे अनंत आकाश आहे असं मला वाटतं. कधी हे आभाळ काळचाकुट्ट ढगांनी झाकळून जातं. कधी ते अरुणाच्या कोवळ्या प्रकाशरंगानं माखून जातं. कधी संध्याकाळच्या अनेक रंगांचं गमतीदार संमेलन त्यात होतं. कधी क्रुद्ध विजेचा लखलखता चाबूक घेऊन ते कडाडत राहातं. कधी एखादं पिसाट वादळ त्याला वेढून बसतं. कधी चांदण्यांची असंख्य फुलं माळून ते एखाद्या नववधू प्रमाणं नटून थटून बसतं. ते कधी कुंद होतं. कधी धुंद होतं. त्याची कितीतरी रूपं आहेत. पण म्हणूनच मनाचं हे आकाश आपल्याला पूर्णपणानं कधीच समजत नाही. मानसशास्त्रज्ञांनी कितीही वल्गना केल्या तरी मनाच्या या खोल गुहेत काय काय लपलं आहे हे त्यांना सांगता येईल असं मला वाटत नाही. मनासंबंधी आपण मनसोक्त विचार केला तरी वाऱ्यासारखं चपळ अन् पाऱ्यासारखं चंचल मन आपल्याला समजणं खरोखरंच अशक्य आहे.

आपल्याला आपलं मन तरी नेमकं कुठं कळतं? पण म्हणूनच आपल्या आयुष्यात काही गमतीदार रंग निर्माण होतात. कुणीतरी मनाला घोड्याची उपमा दिली आहे. ज्या काळात घोडा हे एकमेव वेगवान वाहन होतं त्या काळात हे ठीक आहे. पण आज त्याची धाव अद्ययावत् विमानापेक्षाही अधिक आहे असंच म्हणावं लागेल. कुणाच्या मनात काय असू शकेल हे कळत नाही. ही एका अर्थानं चांगली घटना आहे. पण काही मुत्सद्दी माणसं दुसऱ्याच्या मनाचा नेमका ठाव घेतात तेव्हा आश्चर्य वाटतं.

महाभारताला एक प्रसंग. कर्णासारखा महारथी वीर पांडवांच्या बाजूला यावा म्हणून श्रीकृष्णानं त्याच्यासमोर धूर्तपणानं हस्तिनापुराच्या सिंहासनाचं आमिष ठेवलं. माणसं फोडायची झाली तर सत्तेचा एखादा तुकडा त्यांना चघळण्यासाठी देऊन त्यांचं तोंड बंद करावं लागतं, ही कुटिल राजनीती कृष्णाला चांगलीच अवगत होती. माणसं पळवण्याचं आणि पक्षांतर करण्याचं राजकारण केवळ आजच चालू आहे अस नव्हे. ते रामायण-महाभारतातही आढळतं. पळवापळवीच्या राजकारणाला नीतिविशारद लोक नाकं मुरडतात. नाक मुरडण्यापेक्षा तत्त्वाला मुरड घालण्याचं चातुर्य राजकारणात अधिक महत्त्वाचं असतं. कर्णाच्या मनातली अनेक स्पंदनं कृष्णानं अत्यंत तत्परतेनं टिपली होती. माणसांच्या मनांचा इतका खोल अभ्यास करणारा दुसरा राजकारणी नेता कृष्णाशिवाय त्या काळात कुणीच नसावा. एके दिवशी कृष्ण कर्णाच्या निवासस्थानी गेला. कर्णाला आश्चर्य वाटलं. त्याला तसाच काही वेळ आश्चर्यात ठेवून कृष्ण गंभीरपणानं म्हणाला,

'कर्णा, तुझ्यासारखा महारथी-तुझ्यासारखा तेजस्वी पराक्रमी पुरुष खरं तर हस्तिनापूरच्या सिंहासनावरच शोभतो. तू मानधन आहेस. कुणाच्या तरी आश्रयानं तुला जगण्याचं काहीच कारण नाही.'

कर्ण स्तंभित होऊन ऐकत होता. त्याचा आपल्या कानावर विश्वास बसेना. पांडवांचा पाठीराखा श्रीकृष्ण आपल्या मस्तकावर हस्तिनापुराचा राजमुकुट ठेवायला उत्सुक आहे या घटनेचं त्याला विलक्षण नवल वाटलं. कर्णाला कृष्णाचं मन समजणंच शक्य नव्हतं. पारिजातकाचं झाड

सत्यभामेच्या अंगणात लावून त्याची फुलं मात्र रुक्मिणीच्या महालाच्या आवारात पडतील अशी चतुराई करून दोन्ही राण्यांना प्रसन्न करणारा, स्त्रियांच्या गूढ मनाशी खेळणारा कारस्थानी कृष्ण कर्णाला समजणं शक्यच नव्हतं. तो मनातून सुखावला. पण त्याचा मानी स्वभाव उफाळून आला. हस्तिनापुराच्या सिंहासनाची आपल्याला मुळीच अभिलाषा नाही असं त्यानं ठामपणानं म्हटलं. कृष्णानं समोरच्या माणसाला सहज जिंकू शकणारं आपलं सुप्रसिद्ध हास्य केलं. कोणाच्या मनातली कोणती तार केव्हा, कशी आणि कितपत छेडावी हे त्याला चांगलंच माहीत होतं. पुन्हा गंभीरपणानं कृष्ण म्हणाला.

'तुझ्यासारख्या पराक्रमी वीराला सिंहासनाचा लोभ नसतो हे मला माहीत आहे, पण कर्णा! तू पहिला पांडव आहेस. तू ज्येष्ठ आहेस. युधिष्ठिरापेक्षा सिंहासनावर तुझाच अधिक हक्क आहे. जे जे पांडवांच्या मालकीचं आहे. ते ते 'सारं' तुझंही आहे. तुझ्या हक्काचं आहे.' कर्ण गोंधळून गेला. कृष्ण मात्र आपल्या हळुवार हातांनी कर्णाच्या मनात एका वादळाची बीजं पेरीत होता. त्याच्या महत्त्वाकांक्षेला आणि अभिमानाला कुरवाळीत होता. थोडा वेळ थांबून कृष्ण पुन्हा म्हणाला, 'अरे, विचार कसला करतोस? कोणताही वीर पुरुष आलेल्या संधीकडं पाठ फिरवीत नाही. तू पहिला पांडव असल्यामुळं हस्तिनापूरचं सिंहासनच काय पण द्रौपदीवर सुद्धा तुझा अधिकार आहे.' हा कृष्णबाण मात्र कर्णाच्या काळजाला भेटून गेला. आपल्या विशाल हृदयात कर्णानं द्रौपदीवरच्या काव्यात्म प्रेमाचं एक उत्कट गीत जपून ठेवलं होतं. तो द्रौपदीवर मनापासून लुब्ध होता. प्रत्यक्ष परमेश्वरानं जर त्याला विचारलं असतं "तुला राजमुकुट हवा की द्रौपदी?" तर त्यानं द्रौपदी म्हणून उद्‌घोष केला असता. द्रुपद राजाची ही कन्या स्वयंवर मंडपात हातात वरमाला घेऊन उभी असलेली त्यानं ज्या क्षणी पाहिली त्याचक्षणी तो घायाळ झाला. या सुंदर तेजस्विनीच्या सहवासात खडतर आयुष्याची वाटचाल करताना आपण कधीच थकणार नाही. हे त्यानं जाणलं होतं. त्याच्या धनुष्याची दोरी जशी चिवट होती तशीच द्रौपदीसंबंधीची त्याची अभिलाषाही पीळदार होती. पण त्या मानिनीनं त्याला धुडकावून अर्जुनाला वरलं

होतं. तेव्हापासून कर्णाची जखम वहात होती. आणि आज कृष्णानं त्या ठसठसणाऱ्या जखमेवर अमृताची फुंकर घातली होती. कर्णाचं मन सैरभैर झालं. द्रौपदीच्या विषयीची ती चोरटी आशा आता त्याला खुणावू लागली. त्याच्या वृत्तीतली चलबिचल कृष्णानं हेरली. 'पहा बुवा ! विचार करून मला सांग' असं म्हणून कृष्ण निघून गेला.

कर्णाच्या मनाची काय स्थिती झाली असेल हे सांगणं कठीण ! त्याच्या मनातल्या विविध, विचित्र कंपनांची यथार्थ कल्पना कुणाला करता येईल काय ? अनेक वर्षे या वीरानं आपलं एक प्रेमस्वप्न हृदयाच्या पिंजऱ्यात आत्मीयतेनं पाळलं होतं. जोपासलं होतं. कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर अर्जुनाच्या बाणांनी घायाळ होऊन पडलेल्या कर्णाला मरत्या क्षणीसुद्धा त्या प्रणयस्वप्नानं आपला धुंद सुगंध दिला असेल असं मला वाटतं, त्याच्या मनाचे श्वासनिश्वास त्याच्या निकटवर्तीयांना सुद्धा समजले नसतील.

रोमँटिक मनाच्या माणसांना मनोभंगाची वेदना नेहमीच सोसावी लागते. 'काटा रुते कुणाला, मज फूलहि रुतावे, हा दैवयोग आहे' या ओळी मला मार्मिक वाटतात. निगरगट्ट मनाची माणसं कर्णाच्या हळवेपणाला हसतील अन् म्हणतील, 'नाही मिळाली द्रौपदी तर त्यात एवढं दुःख करण्यासारखं काय आहे ? गेलीस तर खुशाल जा असं म्हणावं आणि द्रौपदीच्या नाकावर टिच्चून दुसऱ्या एखाद्या सुंदर बाईशी लग्न करावं. जन्मभर झुरत बसायचं यात काय पुरुषार्थ आहे ?' आता हा विचार करणाऱ्यांच्या मनाला काय म्हणावं ते कळत नाही, तडजोड करणारी मनोवृत्ती आणि तत्त्वाला चिकटून राहणारी मनोभूमिका यांत श्रेयस्कर काय आहे याचा विचार प्रत्येकानं आपल्या मनाशी करावा. मनातल्या भावभावनांची छायाचित्रं अचूक घेणारे कॅमेरे केव्हातरी निर्माण झाले तर काय होईल याची कल्पनाच केलेली बरी.

समजा, दोन मुत्सद्दी नेते एकत्र बसून चर्चा करीत आहेत. दोघेही मैत्रीचा, आदरातिथ्याचा नाटकी देखावा करीत आहेत. एकजण दुसऱ्याला म्हणतो, 'आपल्या भेटीमुळं दोन महान देशांतील मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध अत्यंत दृढ होतील अशी मला आशा वाटते.

आज मी आपल्या देशाला आणि आपल्याला माझ्या कोटी कोटी लोकांच्या वतीनं त्यांचा एक प्रतिनिधी म्हणून भेटत आहे. माझ्या देशाला केवळ शांतता हवी आहे. आपला महान देश या बाबतीत मला योग्य ती साथ देईल असा माझा विश्वास आहे.' दुसरा मुत्सद्दी पहिल्यापेक्षाही अधिक लफ्फेबाज शब्दांतून आपला आनंद व्यक्त करतो आणि म्हणतो, 'शांतता आणि सहजीवन या तत्त्वासाठीच आम्ही अखंड धडपडत आहोत. आपल्या आगमनामुळं शांती आणि विश्वबंधुत्व या मंगल तत्त्वांचा विजय आता दूर राहिलेला नाही अशी मला आशा वाटत आहे.' त्या नेत्यांच्या मिरवणुका निघतात, पुष्पहारांचा त्यांच्यावर वर्षाव होतो. जयजयकाराच्या पढवलेल्या घोषणा तारस्वरात उच्चारल्या जातात. टी. व्ही. चे कॅमेरे पुढे सरसावतात. हे सारे सोपस्कार होत असताना या दोन नेत्यांच्या मनातले प्रामाणिक विचार टिपून घेणारा कॅमेरा काय सांगेल? ते नेते वरवरच्या शिष्टाचाराची जरतारी भाषा केवळ एक उपचार म्हणून बोलत असतात. पण त्यांचं मन मात्र त्याचवेळी आतल्या आत म्हणत असतं, 'एक दिवस माझ्या डावपेचांपुढं तुला नामोहरम केल्याशिवाय राहणार नाही. शांती आणि विश्वबंधुत्व असल्या खुळचट कल्पनांवर विश्वास ठेवायला मी तुझ्यासारखा भोळसर नाही. मला पदभ्रष्ट करण्यासाठी तुझ्या कारवाया आतून चालू आहेत. हे माहीत असल्यामुळंच मुद्दाम मैत्रीचा देखावा निर्माण करण्यासाठी आज मी इथं आलो आहे. तुझी तयारी कितपत आहे याचा अंदाज घेण्यासाठीच ही मैत्रीची रंगरंगोटी केली आहे.'

माणसाचं मन अतर्क्य, अनाकलनीय आहे. आपल्याला मनाचा शोध लागला अशी उगीच बतावणी करण्यात काय अर्थ आहे? वारांगनेचं प्रेम ओळखणं जसं कठीण तसंच मनाचं गूढही उकलणं अशक्य, पण म्हणून काय मनाचा अभ्यास सोडून द्यायचा? आज मनाचे प्रदेश मानवी बुद्धीला फारसे पादाक्रांत करता आले नसतील. कुणी सांगावं उद्या मनाचं कोडं उलगडायच्या दिशेनं प्रगती होऊ शकेल. सारेच कलावंत आपापल्या कलाव्यापारातून माणसाच्या मनाचा प्रकृतिधर्म प्रकट करण्याचा प्रयत्न करीत असतात. एका चित्रकारानं सौंदर्य

प्रसाधनात रममाण झालेल्या एका रमणीचं अत्यंत लक्षणीय चित्र काढलं होतं. आरशात पाहणाऱ्या त्या तरुणीला रूप सौंदर्याची जाणीव आहे असं दिसत होतं. तिच्या प्रसाधनचातुर्याबरोबरच ती कुणाला तरी भेटण्यासाठी उत्सुक आहे हेही जाणवत होतं. आपण कुणाला तरी जिंकणार आहोत, कुणावर तरी आपल्या मोहनास्त्रांचा मारा करायचा आहे हे मनोभाव सूचित करणारा रंगरेषांचा तो विलास मला मनोज्ञ वाटला. त्या रमणीचं उत्फुल्ल, शृंगारप्रिय मन फलकावर किती सहजतेनं चित्रकारानं रेखाटलं होतं, मी त्याला विचारलं, 'किती सामर्थ्यानं तू रंगवलं आहेस, कसं तुला साधलं?' चित्रकार हसून म्हणाला, 'त्या सुंदरीचं मन समजून घेताना मीच ती प्रसाधन करणारी रमणी झालो. मन समजत नाही असं तुम्ही म्हणता. पण आपल्या मनानं दुसऱ्याच्या मनाशी मिसळून जाण्याची पराकाष्ठा केली की मन समजायला लागतं. मनाचे सारे तपशील, त्याची सारी रहस्यं काही प्रमाणात कळू लागतात. हे चित्र काढल्यावर मला जाणवलं की ती शृंगारसाज करणारी रमणी हे माझ्याच मनाचं एक आगळं रूप आहे.' या चित्रकारानं किती थोडक्या शब्दांत कलाप्रक्रियेचं मर्मच सहजपणानं सांगून टाकलं. जोपर्यंत द्वैत आहे तोपर्यंत एकाला दुसऱ्याचं मन कळणं शक्य नाही. पण एकदा अद्वैत भाव मनात उत्पन्न झाला की साऱ्या विश्वाचं मनोगत समजून घेणं सुकर होणार आहे. व्यासानं रेखाटलेला कर्ण आणि अर्जुन, दुर्योधन आणि धृतराष्ट्र, कृष्ण आणि द्रौपदी व्यासांचीच रूपं नव्हती काय? कवीच्या प्रतिभेचा उन्मेष त्याच्या मानसिक विकासाचाच एक आविष्कार असतो. माता बालकाशी समरस होते कारण ती देखील एका निरागस शैशवाचंच रूप आहे. दुसऱ्याचं मन कसं ओळखावं या प्रश्नाचं उत्तर मनानंच मन ओळखता येतं हेच नव्हे काय? आपल्या पोटासाठी कोंबडीला मारणारा माणूस तिच्या मनातला कोलाहल कधीच समजू शकणार नाही. कोंबडीच्या मनाशी त्याला काहीच कर्तव्य नसतं. कोंबडी हे केवळ त्याचं खाद्य असतं. माणसाचं मन तिलाही कळत नाही. कारण दोघांत एक विलक्षण द्वैत उत्पन्न झालेलं असतं. एक सूफी कवी म्हणतो.

सैय्यादसे गुल्शनमे-रोरो-कहा बुलबुलने ।
क्यूं हो गया दीवाना ? जो तू है वोही मै हूँ !

बुलबुलानं शिकाऱ्याला रडत रडत सांगितलं. मला जाळ्यात पकडण्याच्या कल्पनेनं असा वेडा का झाला आहेस ? जो तू आहे, तो तूच मी आहे. तुझ्या माझ्यात द्वैत कुठं आहे ? तूच बुलबुल अन् तूच पारधी ! याचा अर्थ तूच तुला पकडण्यासाठी अस्वस्थ झाला आहेस. हे विलक्षण तत्त्वज्ञान मनात मुरल्यानंतर विश्वाचे मनोव्यापार कळायला उशीर लागणार आहे काय ? पण हेच कळत नाही. आपल्या मनात देखील आपल्याला नीटपणानं आणि धीटपणानं डोकावून पाहता येत नाही. आपल्याच मनाच्या वारुळात दबा धरून बसलेला विषारी साप आपण कुठल्यातरी कृत्रिम विचाराच्या टोपलीखाली झाकून ठेवतो. त्याचं बौद्धिक समर्थन करण्याचा प्रत्यन करू लागतो. माणसाच्या हेकट, अडाणी मनाचं वर्णन बहिणाबाई चौधरीनं एका कवितेत फारच सुरेख केलं आहे. उभ्या पिकात एखादं नाठाळ जनावर शिरावं तसं माणसाचं मन आहे असं सांगून या अजब मनाची देवानं कशी घडण केली असावी याबद्दल आश्चर्य व्यक्त केलं आहे.

आपल्याला जगात एकही सज्जन दिसत नाही; सारे बदमाष आहेत असा मनःपूर्वक निर्णय दुर्योधनानं दिला होता. युधिष्ठिराला मात्र एकही दुर्जन दिसला नाही. आपलीच प्रतिबिंबं या महाभागांना सर्वत्र दिसत होती हे उघड आहे. एका तत्त्ववेत्त्यानं म्हटलंय, 'प्रत्येक मानवी मनात वाघ, डुक्कर, गाढव आणि बुलबुल यांचा निवास असतो. या साऱ्यांच्या चत्मकारिक संकरातून मानवी स्वभाव बनत गेला आहे.' अनेक वर्षं साधना केलेल्या एका साधकानं मला एकदा प्रामाणिकपणानं सांगितलं, 'मनासारखा दुसरा घाणेरडा नरक नाही. हे पापी मन देवपूजेत गुंतत नाही. ते नको तिथं भराऱ्या मारतं. उकिरडे फुंकत राहातं. राहून राहून मनात येतं की मन नसतंच तर किती बरं झालं असतं. पण असं म्हणूनही चालत नाही. मनासारखं दुसरं मंदिर नाही. या मनातच निर्मळ विचारांची गंगा उगम पावते. या मनालाच सौंदर्याचे आणि सत्यशिवत्वाचे पंख फुटतात. मनाचं हे पाखरू मग उदात्ताच्या आकाशात गरुडभराऱ्या घेऊ लागतं.'

## पाखरा ! येशील का परतून ?

❖ ❖

तीसपस्तीस वर्षांपूर्वी ज्या लहानशा गावात माझं प्राथमिक शिक्षण झालं त्या गावी परवा व्याख्यानाच्या निमित्तानं जाण्याचा योग जुळून आला. योग हा शब्द मी मुद्दामच योजला आहे. या शब्दात नियतीचा संकेत सूचित होतो. या शब्दाला एक प्रकारचं मानीव पावित्र्याचं वलय आहे. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुढं मी मुंबईला आलो आणि वर्षानुवर्षं मुंबईतच राहिलो. पक्का मुंबईकर बनून गेलो. महाराष्ट्राच्या एका टोकाला, आडवळणाला असलेलं ते लहानसं गाव केवळ माझ्या स्मरणात होतं. तिकडं जाण्याची संधी मात्र मला कधीच मिळाली नाही. पण त्या चिमुकल्या गावाला माझ्या अंतःकरणात महत्त्वाचं स्थान होतं यात शंका नाही. तीनचार वर्षं मी त्या गावात काढली. चौथीपर्यंतचं शिक्षण तिथल्या शाळेत घेतलं. त्यानंतर पुणे-मुंबई झाली. अमेरिकेतलंही एक विद्यापीठ गाठलं. अनेक पदव्या गोळा केल्या. पण कधीकधी ते लहानसं गाव मला आपल्या विशिष्ट स्वरात साद घालायचं. एखादं झाड ज्याप्रमाणं आकाशात भरारी घेणाऱ्या पाखराला आपल्या हिरव्या सळसळत्या स्वरात परतण्याची हळवी साद घालतं, त्याप्रमाणं ते गाव मला प्रेमळ आवाहन करायचं. रात्री बिछान्यावर पडलो की कधीकधी स्वप्नात येऊन मला विचारायचं 'अरे, मला विसरलास काय ? तुझ्या भेटीसाठी मी फार उत्सुक आहे. पोरा, तू आता मोठा झालास. तुझ्या पंखांना आभाळ

ठेंगणं झालं. तू खुशाल उंच उंच भराऱ्या घे. पण मला विसरू नकोस' आणि मग ते गाव आपले अदृश्य हात माझ्या पाठीवर वात्सल्यानं फिरवीत राहायचं. त्याचा स्पर्श मला एक आगळा, कधीच न ओसरणारा प्रेमळ सुगंध देतो. त्या स्पर्शानं मला जाग यायची. ते चिमुकलं गाव मनाच्या एक हळुवार कोपऱ्यात, सुंदर आठवणीच्या देव्हाऱ्यात एका शांत नंदादीपासारखं संथपणानं तेवत आहे. पण आश्चर्य असं की माझ्या नाना प्रकारच्या व्यापांतून मला तिकडं जाताच आलं नाही. आता मात्र ती संधी अकल्पितपणे मिळाली होती. ज्या शाळेत मी शिकलो त्याच शाळेच्या पन्नासाव्या वाढदिवसाला प्रमुख पाहुणा म्हणून मला आमंत्रित केलं. एखाद्या बालकाच्या उत्साहानं सूटकेसमध्ये चार कपडे घाईघाईनं टाकले आणि त्या सुंदर प्रवासासाठी मुंबईहून निघालो.

या प्रवासात मला निदान दीड दिवस घालवायचा होता पण त्याचा मला त्रास वाटला नाही. मला ते माझं प्रिय गाव कितीतरी वर्षांनी भेटणार होतं. त्या गावातल्या लाल धुळीत पुन्हा माझी पाऊलं उमटणार होती. तिथल्या नदीकाठचा भिरभिरता वारा फार वर्षांनी माझ्या कानात आपली लाडिक कुजबुज करणार होता. तिथल्या झाडांची आणि माडांची सळसळ दीर्घ कालवधीनंतर मी अनुभवणार होतो. नुसत्या कल्पनेनंच मी हरखून गेलो. इतकी वर्षं इच्छा असूनही तिकडे जाऊ शकलो नाही याची अपराधी जाणीव मनाला टोचत राहिली. आता मात्र गावात पाऊल टाकलं की त्याच्याशी मी मनसोक्त बोलणार होतो. त्याची क्षमा मागून त्याला म्हणणार होतो, 'अरे, तुला मी कसा विसरेन? विसरणं शक्य आहे का? तू तर मला फुलवलंस. तुझ्या आभाळाखाली मी नाचलो, बागडलो. तू दिलेल्या प्रेमावरच लहानाचा मोठा झालो. ज्या आईनं दूध पाजलं तिला विसरणं कसं शक्य आहे? आता निदान दोन तीन दिवस तरी तुझ्या उबदार सहवासात मला गुरफटून जायचं आहे. पस्तीस वर्षांपूर्वीच्या त्या सुंदर जगात पुन्हा एकदा मला वावरायचं आहे.'

खरंच, काही व्यक्ती, काही वास्तू आणि काही गावं आपल्या मनाला अत्यंत आपुलकीची घट्ट मिठी मारून बसलेली असतात. त्यांच्या

प्रेमात कसलीही प्रदर्शनाची जाणीव नसते. भक्तीला आणि प्रेमाला जाहिरातीची काय बरे आवश्यकता आहे? पण आजच्या व्यापारी जगात या सुंदर कोवळ्या भावनांचा बाजार भरवला जातो. निष्ठेच्या प्रदर्शनाचे पब्लिक मेळावे भरवले जातात. त्या गावानं मला काय काय दिलं हे शब्दातून सांगणं सुद्धा मला चमत्कारिक वाटतं. पण आता शब्दांशिवाय दुसरं कोणतंच साधन उरलेलं नसल्यामुळं शब्दांची मदत मी घेत आहे. पस्तीस वर्षांपूर्वी या गावातल्या एका आमराईत आम्ही शाळेतली मुलं संध्याकाळी खेळायला जात असू. अंधार दाटत चालला म्हणजे मग निरुपायानं परतत असू. ती आमराई आजही मला आठवते. एकदा एका झाडावर चढण्याच्या प्रयत्नात मी खाली पडलो आणि चार दिवस त्या दुखण्यामुळं मी घरी पडून होतो. तेव्हा आमचे देशमुख मास्तर शाळा सुटल्यावर घरी यायचे. एखादी गमतीदार गोष्ट सांगून मला पोटभर हसवायचे. त्यांच्याबरोबर वर्गातली मुलंही यायची. कुणी बोरं आणायचा, कुणी पेरू घेऊन यायचा. त्या सर्वांच्या डोळ्यांतून जे आपुलकीचं चांदणं झिरपायचं ते आठवून मी आजही भारावून जातो. आज मला तशाप्रकारचं नि:स्वार्थी निरागस प्रेम मिळत नाही. करताही येत नाही. माणसं प्रौढ झाली की ती व्यवहाराच्या आहारी जातात. उत्स्फूर्तपणानं प्रामाणिक प्रेम करण्याची त्यांची प्रवृत्ती मावळून जाते. स्वार्थ साधायचा असला म्हणजे ही प्रौढ आणि ज्ञानी झालेली माणसं धूर्त-पणानं प्रेमाचं नाटक वठवतात. प्रेमाचं ओव्हरअ‍ॅक्टींग करतात. तसं करावंच लागतं. खऱ्या राजानं अंगावर दागिने घातले नाहीत आणि भरजरी पोषाख केला नाही तरी तो राजाच असतो. त्याचं राजेपण गळून जात नाही. पण खोट्या राजाला मात्र राजेपणाच्या देखाव्यासाठी अलंकारांची फार जरूर असते. लहानपणीच्या त्या लहानशा आजारात मला माझ्या छोट्या सवंगड्यांनी सहज प्रेमानं, बोरं, पेरू, करवंदं आणून दिली. त्यातला जिव्हाळा आज माझ्या ऑफिसातले लोक माझ्या वाढदिवशी फळांच्या करंड्या घेऊन येतात त्यात अल्पांशानंही असत नाही. ती फळं उत्तम असतात. रसाळ असतात. पण त्या भेटीमागं दडलेली इच्छा मात्र फारशी रसमय नसते. तो केवळ औपचारिक शिष्टाचार असतो. 'सर, मेनी हॅपी रिटर्नस् ऑफ द डे' असं म्हणून हस्तांदोलन करणाऱ्या त्या माणसांच्या

मनातलं आंदोलन आता सरावानं मी ओळखू शकतो. कदाचित मी सुद्धा इतरांच्या बाबतीत असंच तोंडदेखलं वागत असेन, मी ऑफिसात 'बॉस' असल्यामुळं माझा वाढदिवस सगळ्यांनी पक्का लक्षात ठेवला आहे. माझ्याविरुद्ध कारस्थानं कारणारे कारकून आणि माझे सहकारी त्या दिवशी मात्र प्रेमादराचा जो अभिनय करतात तो पाहून एखाद्या नामवंत नटानंसुद्धा चकित व्हावं. पण याबद्दल कोणाला दोष देण्यात काय अर्थ आहे ? नाटक केल्याशिवाय जगता येऊ नये असं नाटकी जग आम्हीच निर्माण केलं नाही का ? जगाच्या नाटकगृहात सारेच नट आहेत. साऱ्यांच्याच तोंडावर नाटकी मुखवटे आहेत. या मुखवट्यांची आम्हाला आता अितकी सवय झाली आली आहे की आमचा खरा चेहरा कोणता हेच आठवत नाही. मी त्या गावातलं चौथीपर्यंतचं शिक्षण संपवून मुंबईला येण्यासाठी निघालो, तेव्हा हरी कोकणे नावाचा माझा बालमित्र स्फुंदून स्फुंदून रडला होता. मीही त्याच्या अश्रूंत अश्रू मिसळले होते. आमच्या देशमुख मास्तरांचे डोळे त्या दिवशी पाणावले होते. उत्कट प्रेमानं ज्या डोळ्यांत अश्रू येतात ते डोळे सुंदर दिसतात. कारण त्यांच्यात एक जिवंत भावना थरथरत असते. पुढं काही वर्षांनी रेव्ह. टिळकांची 'पाखरा येशिल का परतून' ही कविता माझ्या वाचनात आली. बालकवी ठोंबरे नावाचं टिळक पती-पत्नींनी मायेनं जोपासलेलं एक काव्यपाखरू आपलं घरटं सोडून निघालं होतं तेव्हा टिळकासारखा तत्त्वज्ञ कवी अंतर्बाह्य व्याकुळ झाला. त्याच्या लेखणीतून शब्दांचे अश्रू ठिबकू लागले. टिळक म्हणाले.

'ये आता घे शेवटचे हे अश्रु दोन पिऊन. पाखरा! येशिल का परतून ?'

आमचे देशमुख मास्तर काही कवी नव्हते. शब्दांतून त्यांना आपली भावना व्यक्त करणं जमण्यासारखं नव्हतं. त्यांनी फक्त थरथरल्या हातानं माझ्या मस्तकावरून हात फिरवला आणि उपरण्यानं डोळे पुसले. माझेही आणि त्यांचेही, ते अितकंच म्हणाले,

'पोरा, फार दूर चाललास. मोठा हो. गावाची आठवण ठेव. मला विसरलास तरी चालेल. या गावाला मात्र विसरू नको.' आज ते

शब्द, ते गहिवरलेले आणि भावनेने भिजलेले शब्द मला आठवतात. मन गलबलून जातं. अनेक व्यापामुळं त्या माझ्या गावी गेल्या पस्तीस वर्षांत मी जाऊ शकलो नाही. खरं तर माझ्या हातून हा मोठाच गुन्हा घडला होता. पण ते गाव मात्र माझ्या मनात घर करून राहिलेलं होतं.

त्या शांत आणि स्वच्छ गावात माझ्या घराशेजारीच एक राम मंदिर होतं. तो धनुर्धारी राम आणि त्याच्या शेजारी सीता अशा उभ्या मूर्ती फार सुबक होत्या. देशमुख मास्तर आम्हाला शाळेत रामायणातल्या गोष्टी सांगत असत. राम हे त्यांचं परमश्रद्धेचं स्थान होतं. रामाची गोष्ट सांगताना ते जणू रामाबरोबर वनवासातली दुःखं भोगीत असत. रामानं जेव्हा रावणाला रणांगणावर ठार केलं तेव्हा ते जणू काही त्याच्याबरोबरच होते अशा आविर्भावानं रामकथा सांगत असत. कथेशी आणि कथेतल्या पात्रांशी, त्यांच्या सुखदुःखांशी समरस होऊन मास्तर बोलत असल्यामुळं आम्हा लहान मुलांच्या डोळ्यासमोर ती अयोध्या नगरी, ते दंडकारण्य, तो वानरांनी बांधलेला सेतू, ती हनुमानानं पेटवलेली लंका जशीच्या तशी उभी राहायची. समरस होऊन शिकवणारे शिक्षक त्यानंतर मला पुढच्या आयुष्यात भेटलेच नाहीत. ज्या मुलांचं गणित कच्चं होत त्यांना देशमुख मास्तर संध्याकाळी आपल्या घरी तास दीड तास जिव्हाळ्यानं गणित शिकवायचे. या विषयात मी अगदी मठ्ठ होतो. पण मास्तरांनी माझा कधीही उपहास केला नाही. ते माझ्यावर कधीही रागावले नाहीत. माझं गणित बरोबर येईपर्यंत अगणित वेळा त्यांनी मला आस्थेनं पुन्हा पुन्हा समजावून सांगितलं. ही शिकवणी स्वखुषीची होती. कोणाही विद्यार्थ्यानं यावं आणि मास्तरांकडून कोणताही विषय शिकावा. विद्यार्थ्यांना शिकवणं आणि त्यांच्यावर पोटच्या मुलांसारखी माया करणं एवढ्या दोनच गोष्टी त्या मास्तरांना माहीत होत्या. आता प्रत्येक गावातून ट्युशन्स घेणारे विद्वान टीचर्स आपल्या ज्ञानाचा रतीब पैशाच्या मोबदल्यात ठरलेल्या वेळी ठरलेल्या पद्धतीनं घालीत असतात. या पार्श्वभूमीवर देशमुख मास्तरांची मला आठवण होते. आदर्श शिक्षक म्हणून त्यांचा शासकीय पातळीवर कोणी गौरव केला नाही. राज्य-पुरस्कार किंवा राष्ट्रपती पुरस्कार मिळवण्यासाठी कोणा मंत्र्याचे पाय

त्यांनी कधी धरले नाहीत. मंत्रालयाच्या दारात जाऊन एखाद्या आमदार नामदाराची त्यांनी कधी हुजरेगिरी केली नाही. ते केवळ लहान मुलांत रमले होते. ते आमच्यात पूर्णपणे मिसळून गेले होते. त्यांना पद्मश्री नको होती. मानपत्र, एखादी भपकेदार पदवी असल्या गोष्टींचा त्यांना लोभ वाटला नाही. त्या लहानशा गावातला हा ऋषितुल्य शिक्षक आता पंचाहत्तरीच्या पलीकडे गेला होता. त्यांना भेटण्यासाठी मी उत्सुक झालो होतो.

पस्तीस वर्षांपूर्वीचे ते छोटेसे टुमदार निर्मळ गाव, गावाजवळून वाहाणारी ती चंद्रकांता नदी, तिच्या पलीकडची आंबराई, टेकडीच्या पायथ्याशी असलेली माझी लहानशी शाळा, शाळेच्या पलीकडचं ते रामाचं देऊळ हे सारं सारं पाहाण्यासाठी मी आता उत्सुक झालो होतो.

एस. टी. ची बस धूळ उडवीत त्या माझ्या गावात घुसली. एका प्रशस्त अिमारतीजवळ थांबली. अिमारतीचं नाव वाचलं. एका राजकीय पुढाऱ्याचं नाव दिलेलं ते हायस्कूल होतं. या पुढाऱ्यानं बऱ्याबुऱ्या मार्गानं सत्ता मिळवून आणि नंतर कुठले तरी 'प्रतिष्ठान' काढून प्रचंड संपत्ती गोळा केली होती. याच हायस्कूलच्या समारंभासाठी मला प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित केलं होतं. मी याच शाळेचा पस्तीस वर्षांपूर्वी विद्यार्थी होतो असं मला सांगण्यात आलं. शाळेची जुनी छोटेखानी अिमारत केव्हाच पाडून टाकण्यात आली होती. आता सिमेंट कॉंक्रीटची एक भव्य बिल्डिंग त्या जागी उभी होती. मला धक्काच बसला. ही बिल्डिंग म्हणजे 'माझी शाळा' नव्हे. ही मला पूर्णपणे परकी वाटू लागली. शाळेच्या पलीकडे असलेलं रामाचं देऊळही आता तिथं उरलं नव्हतं. रस्ता रुंद करण्यासाठी म्युनिसिपालिटीनं रामाची उचलबांगडी करून त्याला पुन्हा वनवासात पाठवलं होतं. रामाचंही मंदिर तेथून काही अंतरावर नव्यानं बांधलं होतं. मंदिर प्रशस्त असलं तरी मला ते फारसं आवडलं नाही. त्या जुन्या देवळात रात्रीच्या वेळी होणारी कीर्तनं आणि भजनं अजून माझ्या कानांत मनात निनादत आहेत. हे नवं देऊळ मला देवळासारखं वाटेना. मी पलीकडच्या आंबराईकडं निघालो. पण आंबराई होतीच कुठं? ती दाट झाडी आता उरली नव्हती. कसला तरी

कारखाना आपले अवाढव्य हातपाय पसरून तेथे उभा होता. कारखान्याच्या चिमणीतून धुराचे लोट बाहेर पडत होते. झाडंझुडपं नव्हती. पाखरांचा चिवचिवाट नव्हता. पस्तीस वर्षांपूर्वीची आंबराईतील ती हिरवीगार शांती, त्या वाऱ्याच्या झुळकी, ती पानांची सळसळ, ती दाट सावली ! अरे हे सर्व कुठं हरवलं ? माझी आवडती नदी तरी जागेवर आहे की नाही हे पहाण्यासाठी लगबगीनं पाऊलं उचलू लागलो. शाळेचे हेडमास्तर माझ्याबरोबर होते. त्यांनी नदीकडे बोट दाखवलं. काय, हीच ती चंद्रकांता नदी ? जिच्या पाण्यावर आमचा पिंड पोसला, जिच्या प्रवाहात आम्ही मनसोक्त डुंबलो, उड्या मारल्या तीच का ही नदी ? या पाण्यात पलीकडच्या साखर कारखान्यातली मळी सोडली होती. एक घाणेरडा–चीड आणणारा वास साऱ्या आसमंतात फिरत होता. छे, छे ! हे माझं गाव नव्हे. पस्तीस वर्षांपूर्वी ज्या मातीवर मी मनमुराद खेळलो आणि बागडलो ती माझ्या ओळखीची भूमी कुठं तरी हरवली. तो नदी काठ आणि तो नदीवरून वाहणारा प्रसन्न उनाड वारा माझ्या ओळखीचा होता. पण ते सारं आता कुठं कुणास ठाऊक लुप्त होऊन गेलं.

कुठल्यातरी कादंबरीत रिपव्हॅन विंकल या नावाची एक व्यक्तिरेखा आहे. हा माणूस गावाच्या बाहेर चार-पाच कोसावर एका झाडाखाली विश्रांतीसाठी बसतो, तो चाळीस वर्षांनंतर झोपेतून जागा होतो. आपल्या गावी परत येतो. पण आता त्याला कोणीही ओळखत नाही. घरं बदलली, माणसं बदलली, सारंच वातावरण बदलून गेलं. चाळीस वर्षांपूर्वीचं त्याचं ओळखीचं गाव आता तेथे राहिलंच नव्हतं. तशीच माझी अवस्था झाली. छोट्या छोट्या कौलारू घरांच्या जागी सिमेंट कॉंक्रीटच्या स्नेहशून्य इमारती उभ्या होत्या. गावात दारुविक्रीची चार–सहा दुकानं मुख्य रस्त्यावर मोठ्या डौलानं उभी होती. एका सिनेमा थिएटरच्या आवारात तिकीटासाठी झुंबड उडाली होती. माणसं पान-तंबाखू चघळून रस्त्यावर पिचकाऱ्या मारीत होते. रामाच्या देवळाजवळच एका हॉटेलातून सिनेमातली गाणी कर्ण्यावर ऐकू येत होती. पस्तीस वर्षांत 'उद्योगधंदे' वाढले. गावाचा सर्व बाजूंनी 'विकास' झाला. पण खरं सांगायचं तर माझ्या दृष्टीनं गाव 'भकास' झालं.

मी देशमुख मास्तरांना भेटायला गेलो. त्यांची स्मरणशक्ती आता क्षीण झाली होती. आठवण करून दिल्यानंतर मात्र त्यांचा तो सुरकुतलेला म्हातारा हात अपार वात्सल्यानं माझ्या पाठीवरून फिरला. ते म्हणाले, 'पोरा,–' त्यांच्या तोंडचा 'पोरा' हा शब्द मला अमृतासारखा गोड वाटला. तो शब्द ऐकताच पस्तीस वर्षांपूर्वीचं त्या गावातलं माझं हरवलेलं बालपण जणू मला पुन्हा कडकडून भेटलं. मास्तरांच्या त्या शब्दानं मी त्या जुन्या जगात परतून आलो. त्या चिमुकल्या गावावरचं ते जुनं पण स्वच्छ, नितळ आभाळ मला दिसू लागलं. रामाच्या देवळात रंगलेल्या एका विलक्षण सुंदर भजनाचे स्वर पाखराप्रमाणं माझ्या मनाभोवती घिरट्या घालू लागले. आता मी त्या आंबराईतल्या स्नेहशीतल सावलीत विसावलो होतो. गावाबाहेरची ती प्रेमळ टेकडी आणि तिच्या पायथ्याशी उभी असलेली माझी लहानशी शाळा मला पुन्हा भेटली. ती झुळझुळणारी नदी खट्याळपणानं माझ्या अंगावर तुषार उडवू लागली. आंबराईतल्या पाखरांचा एकच गोड चिवचिवाट मला ऐकू येऊ लागला. मास्तर माझ्या पाठीवर पुन्हा हात फिरवून म्हणाले,

'अरे, आता ते दिवस पाखरासारखे कुठल्या कुठं उडून गेले. पस्तीस वर्षांपूर्वीचं गाव वाहून गेलं. आता नवं गाव, नवी शाळा, नवं शिक्षण यांचे दिवस आहेत.' मी म्हणालो, 'ती हिरवीगार आंबराई कुठं हरवली ? आंबराईत किलबिलाट करणारे ते पक्षी–तेही नाहीसे झाले. मास्तर, ते जुने दिवस कुठे भेटतील ? माझ्या बालपणाचं ते भोळंभाबडं आनंदी पाखरू मला पुन्हा भेटेल का ?' मास्तर क्षीणपणे हसले. ते म्हणाले,

'एकदा उडून गेलेली पाखरं पुन्हा परतून येत नाहीत. ज्या फांदीवर ती बसली होती ती फांदी पोरकीच राहाते. काही दिवसांनी वठून जाते'

ते गाव हरवलं होतं. त्या गावातलं माझं अवखळ बाल्यही आता कायमचं हरवलं होतं. आता पाखरू परतणार नव्हतं.

## आभाळ फाटत आहे....

पंचाहत्तर हजार रुपये कॅपिटेशन फी देऊन माझ्या अेका मित्रानं आपल्या मुलाला खाजगी मेडिकल कॉलेजात दाखल केलं. मी त्याला विचारलं.

'केवळ प्रवेश मिळवण्यासाठी अितकी जबरदस्त सक्तीची देणगी देण्यात कसला शहाणपणा आहे? तुझा मुलगा अभ्यासू आहे. त्याला चित्रकलेची चांगली आवड आहे हे मला माहीत आहे. कायद्याचा अभ्यास करून आपण नामांकित वकील व्हावं असाही त्याच्या मनाचा कल आहे. ज्या विषयाची त्याला आवड नाही त्या क्षेत्रात तू त्याला जायला भाग पाडीत आहेस हे मला तरी योग्य वाटत नाही. अजूनही विचार कर.'

माझा मित्र तुच्छतेनं हसला. थोडावेळ तो काहीच बोलला नाही पण नंतर माझा अुपहास करीत म्हणाला,

'तुम्हा प्राध्यापकांना-त्यातून आर्टस् कॉलेजातील प्राध्यापकांना काडीचंही व्यवहारज्ञान नसतं. त्याला तुम्ही तरी काय करणार? अक्कल असती तर तुम्ही प्राध्यापक कशाला झाला असता? अरे गृहस्था, चित्रं काढून पोट भरणार आहे काय? वकिलीच्या बाबतीत म्हणशील तर बेकार वकीलांत माझ्या मुलाची भर कशाला घालायची?

सध्या पैसा मिळवण्याचा आणि वर्ष दोन वर्षांत गाडी घेण्याचा, बंगला बांधण्याचा अेकच मार्ग आहे. तो म्हणजे डॉक्टर होणं. प्रवेशासाठी पंचाहत्तर हजार रुपयांची देणगी द्यायला मी काही मूर्ख नाही. अरे, ही अिन्व्हेस्टमेंट आहे. या भांडवलावर माझा मुलगा लाखो रुपये मिळवीत राहील. राजकीय पुढारी होणं आणि डॉक्टर होणं या दोन्ही गोष्टी सध्या किफायतशीर आहेत. पण यातलं तुला काय कळणार ? '

त्याची व्यवहारवादी 'अर्थपूर्ण' विचारसरणी अैकून मी थक्क झालो. मुळातच विद्येच्या क्षेत्रात कॅपिटेशन फीचा प्रवेश होणं ही अेक भयानक विकृती आहे. त्यातून केवळ खोऱ्यानं पैसा ओढावा आणि बंगला, गाडी मिळवावी म्हणून मेडिकल कॉलेजात शिकून सर्टिफिकेट घ्यावं ही आणखी चमत्कारिक 'रुग्ण' कल्पना आहे. आपल्या मुलावर अेखाद्या विशिष्ट शाखेचं शिक्षण लादणं शैक्षणिक दृष्टचा चुकीचंच आहे. पण माझ्या या विचारावर टीका करीत हा महाभाग मला म्हणाला,

'तुझे अुदात्त आणि आदर्श विचार अैकून आमचं पोट भरणार नाही. डॉक्टर होणं म्हणजे श्रीमंतीचा शॉर्टकट् आहे. माझ्या दृष्टीनं दोन तीन वर्षांतच जो आपली गाडी घेतो आणि आपल्या मालकीच्या बंगल्यात राहातो तो अेस्टॅब्लिश्ड् सक्सेसफुल डॉक्टर आहे. मला तुमचं बाकीचं तत्त्वज्ञान नको. पोट भरायला फक्त पैसा अुपयोगी पडतो. तुमचे ज्ञानेश्वर आणि तुकाराम आमचे प्रॉब्लेम्स सोडवू शकत नाहीत. सर्व रंगांत शंभर रुपयांच्या नोटेचा रंग माझ्या दृष्टीनं सर्वात सुन्दर असतो. हिरव्या वाटांपेक्षा हिरव्या नोटा ज्याला सापडतात तो माझ्या दृष्टीनं पुरुषोत्तम असतो.'

आता या व्यवहारपंडितापुढं माझ्या शहाणपणाला काहीच अर्थ नव्हता. पण पाउण लाखाच्या भांडवलावर आपल्या मुलाला त्यानं डॉक्टर होण्याचं परमिट मात्र मिळवून दिलं होतं. परमिटसाठी-मग ते कशाचं का असेना सध्या पैसे खर्च करावेच लागतात. कोणी काही म्हटलं तरी पैसा हाच परमेश्वर आहे. परमेश्वराचं दर्शनसुद्धा दहा रुपयांची नोट पुजाऱ्याच्या हातात टिकवल्याशिवाय घडत नाही. काही

दिवसांपूर्वी जगन्नाथपुरीला गेलो होतो. तिथल्या प्रसिद्ध मंदिरात प्रवेश करताच प्रमुख पुजाऱ्यानं, 'ही जगन्नाथजींच्या झोपेची वेळ आहे. ते आता झोपले आहेत. दर्शन संध्याकाळी पाच वाजता होईल.' असं सांगितलं. आम्ही काहीसे निराश होअून परतू लागलो तेव्हा पुजारी महाशयांनी परत बोलावून म्हटलं,

'पच्चीस रुपये रख देना महानुभाव। मै जगन्नाथजी को जगा देता हूँ। दरसन मिलेगा।' पण झोपलेल्या देवाची झोपमोड करणं आम्हाला अिष्ट वाटेना. पुजाऱ्याच्या वशिल्यानं पंचवीस रुपयांत मंदिराच्या बाजारात विकत मिळणारं ते 'दर्शन' मला तरी सयुक्तिक वाटलं नाही. देव देखील झोपी जात असेल तर तो पैशाच्या लोभानं जागा होतो असं मानणं हा त्या देवाचा अपमानच नव्हे काय ? देवालाही जागवण्याचं सामर्थ्य असलेला पैसा हाच माणसाच्या देव्हाऱ्यातला सध्या महादेव होअून बसला आहे. डॉक्टर झाल्याबरोबर बंगल्याचं आणि गाडीचं सुखस्वप्न पडणं हे देखील मग स्वाभाविकच म्हटलं पाहिजे. कोणत्याही विद्यनं पैसा मिळवून देण्यास साहाय्यक व्हावं हे ठीक आहे. पण ज्ञान आणि पैसा यांचं घनिष्ट समीकरण करणं कितपत सयुक्तिक आहे ? मी केवळ द्रव्यसंपादन करण्यासाठी डॉक्टर झालो असं विधान कुणी केलं तर ते मला तरी अनुचितपणाचं वाटेल. रोगानं तळमळत असलेल्या माणसाच्या वेदना नाहीशा करण्यातला अेक अत्यंत अुच्च प्रतीचा आनद डॉक्टर मिळवू शकतो. जगातले रोग – माणसाला होणारे रोग हे डॉक्टरांचं भांडवल नव्हे. रोगी मनुष्य म्हणजे पैसे मिळवून देणारा 'बकरा' नव्हे. तो करुणेचा आणि सहानुभूतीचा विषय आह. आपली विद्या पणाला लावून रोगटपणाविरुद्ध लढाअी पुकारणं हा डॉक्टराचा धर्म असतो. पैसा हा धर्म आहे असं कोणत्याही धर्मप्रेमी डॉक्टराला कधीच वाटणार नाही.

रात्री अकराच्या सुमाराला अेका डॉक्टरमहाशयांचा फोन खणखणला. अत्यंत त्रासिक मुद्रेनं त्यांनी फोन घेतला. आणि खेकसून विचारलं, 'कोण ? काय पाहिजे ?' पलीकडून अेक केविलवाणा आवाज अैकायला येत होता. कुणी तरी अत्यंत काकुळतीनं काहीतरी

सांगत होतं. डॉक्टरांनी रुक्ष स्वरात सांगितलं, 'मला वेळ नाही. दुसऱ्या अेखाद्या रिकामटेकड्या डॉक्टरला बोलवा.' त्यांनी फोन आपटला. रमीचा डाव आत्ता कुठे रंगत चालला होता. हा डाव सोडून कुठल्या तरी कोपऱ्यातल्या रोग्याला तपासून औषध देण्यासाठी रात्रीच्या भलत्याच वेळेस जाण्यात शहाणपणा नव्हता. त्यातून हा फोन गरीब विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातून आलेला. फी चे पैसेही मिळाले नसते. डॉक्टर-साहेबांनी आपली अुंची सिगरेट पेटवली आणि आपल्या वाट्याला कोणते पत्ते आले आहेत याचा ते अंदाज घेअू लागले. सिगरेटचा सुगंधी धूर, समोरच्या टेबलावर काचपात्रात ठेवलेलं सुगंधी पेय, मित्रमैत्रिणींचा मादक सहवास, हातात आलेले राजाराणी आणि गुलाम या सुंदर वातावरणाशी मघाचा आलेला फोन अगदीच विसंगत होता. म्हणे डॉक्टराचा धर्म ! आमचा धर्म आम्हाला कळतो. अितक्यात पुन्हा अेकदा फोन खणखणला. क्षुब्ध मुद्रेनं साहेबांनी फोनमध्ये गर्जना केली, 'मी रात्रीच्या वेळी कोणाही पेशंटला तपासायला येत नाही. मला काही प्रायव्हेट लाअिफ आहे की नाही ? काय म्हणता ? मुलगा सीरियस आहे ? त्याला मी काय करणार ? सकाळी दहा वाजता माझ्याकडे या. नाही, नाही. मी येअू शकत नाही.' आता त्यांनी फोनचा रिसीव्हरच काढून टाकला. डिस्टर्ब झालेल्या डॉक्टरांनी पुन्हा रमीच्या खेळात अिंटरेस्ट घेतला. फोनमधून येणारा तो कापरा, व्याकुळ आवाज ते क्षणार्धात विसरून गेले. माणसंसुद्धा रात्रीच्या भलत्यावेळी आजारी पडतात याला काय म्हणावे ? काही तरी डिसिप्लीन पाहिजे. डॉक्टर म्हणजे कोणत्याही वेळेला पेशंटला औषधोपचार करायला धावत जाणारा मजूर वाटला काय यांना ? आमच्यासाठी रोगी आहेत. रोग्या-साठी आम्ही नाही. आपल्या खेळात रसभंग झालेला डॉक्टरांना सहन झाला नाही.

हे चित्र कल्पनेनं रंगवलेलं नाही. ते शंभर टक्के वास्तव आहे. आपण आपलं कर्तव्य बाजूला सारून भलत्याच गोष्टीत रस घेत आहोत याची खंत त्यांच्या मुद्रेवर मुळीच दिसत नव्हती. डॉक्टरांना वैयक्तिक व कौटुंबिक जीवन असतं की नाही असा प्रश्न यावर कुणी अुपस्थित

करील. प्रश्न मुळीच चुकीचा नाही. पण प्रत्येक व्यवसायाची काही वैशिष्टचं असतात. अन्न आणि औषध या अशा गोष्टी आहेत की त्या वेळेवर मिळाल्या नाहीत तर मनुष्यजीवनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. गरीबातल्या गरीब माणसाला सुद्धा औषध मिळणं अत्यावश्यक आहे. पण आमच्या या देशात औषधाच्या थेंबालाही महाग असलेले असंख्य लोक कसेतरी जगत आहेत आणि कसे तरी मरत आहेत. अनेक वेळा असा अनुभव येतो की अपघातात जखमी झालेला माणूस किंवा हृदयविकाराचा तीव्र झटका आलेला रोगी रुग्णालयात दाखल करून घेण्याच्या तांत्रिक क्रियेलासुद्धा कित्येक तास लागतात. रोगी ॲडमिट झाल्यानंतर त्याच्यावर अुपचार करण्यासाठी कोणी तिकडे ढुंकूनही पाहात नाही. विचारणा केली तर माजोरीपणाची अुत्तरं मिळतात. अुत्तमातल्या अुत्तम समजल्या जाणाऱ्या हॉस्पिटलमध्ये देखील अशा प्रकारचा कारभार असल्याचं वाचायला, अैकायला मिळतं. अेकेकाळी भारताचे अुपपंतप्रधान असलेल्या यशवंतराव चव्हाणांना अखेरच्या आजारात दिल्लीतल्या प्रथमश्रेणीच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांच्या बाबतीत सुद्धा हाच कडवट अनुभव आला असं जेव्हा वाचनात आलं तेव्हा कपाळावर हात मारून घेण्याशिवाय आपल्या हातात दुसरं काय आहे ? रुग्णांविषयी कमालीची अुदासीन बेफिकिरी दाखवणारे अुच्चविद्याविभूषित डॉक्टर्स, आरोग्याधिकारी आणि नर्सेस पाहिल्यानंतर कर्माला दोष देण्यापलीकडं आपल्या हातात काय असतं ? जे जे होईल ते ते पाहावे, ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असो द्यावे समाधान' या संतवचनाचा अशा वेळी अुच्चार करावा आणि मनगटं चावीत बसावं. अेवढा एकच समर्थ अुपाय आहे. आकडेशास्त्र असं सांगतं की प्रत्येक डॉक्टराच्या मागं समाजाचे हजारो रुपये खर्च होतात. अेक डॉक्टर घडविण्यासाठी शासनाच्या तिजोरीतून अमुक अितका पैसा ओतावा लागतो असं म्हटलं जातं. ते खरंही आहे. परीक्षेत अुत्तीर्ण होअून पदवी हातात पडली की हा नवशिका डॉक्टर अफाट श्रीमंतीची स्वप्नं साकार करण्याच्या अुद्योगाला लागतो. अेक तरुण डॉक्टर मला म्हणाला,

'माझ्या बापानं कर्ज काढून मला शिकवलं. आता थोड्याच अवधीत ते कर्ज फेडून टाकावयासाठी केवळ पैसा मिळवायचा या पलीकडे माझ्यासमोर दुसरं ध्येय नाही. सेवा हा डॉक्टरांचा धर्म आहे वगैरे सगळी सुभाषितं मला तोंडपाठ आहेत. व्यापारी जर काळाबाजार करतो आणि तिजोरी भरतो, अधिकारी जर लाच घेतात, आणि निवडून गेलेले लोकप्रतिनिधी जनतेला लुटण्यात समाधान मानताना दिसतात तर माझ्यासारख्या कर्जबाजारी डॉक्टरानं स्वार्थ का साधू नये? गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचाराची गटारगंगा वाहात आहे. मी अेकटयानं संत तुकाराम व्हावं अशी अपेक्षा कशी करता येअील? मी मिळवलेलं ज्ञान हे माझं भांडवल आहे. याच्या बळावर जमेल तितका पैसा गोळा करणं हा माझा धर्मच आहे. नाहीतर माझ्यासारखा मूर्ख मीच म्हटला पाहिजे.'

तो तरुण डॉक्टर निखळ सत्य बोलत होता. तर्कशुद्ध आणि सुसंगत बोलात होता. पायापासून मस्तकापर्यंत किडून गेलेल्या समाजाबद्दल योग्य तेच बोलत होता. हा आमचा भारतीय समाज म्हणे आध्यात्मिक प्रेरणांनी संपन्न आहे. जगाच्या मार्गदर्शनासाठी केवळ भारतच काही नैतिक संदेश देअू शकेल असली बेताल बडबड मी अनेक वेळा अैकली आहे. त्या तरुण डॉक्टराला किंवा डॉक्टरांच्या जमातीला केवळ दोष देण्यात काहीच अर्थ नाही. संपत्तीची पूजा करीत बसलेल्या आणि सत्तेसाठी कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळलेल्या, नागडया अुघडया झालेल्या, भ्रष्टतेच्या अुंच टोकावर बसलेल्या साऱ्या आदर्शांना पराभूत करणाऱ्या आजच्या स्वार्थी, कळकट समाजाला जबाबदार धरलं पाहिजे. जे पेरावं तेच अुगवतं. स्वातंत्र्योत्तर काळात गेली चाळीस वर्षं आम्ही या सस्यश्यामल भूमीत खरोखर काय पेरलं याचा शांत मनानं विचार केला पाहिजे.

या आमच्या भूमीत आम्ही भ्रष्टाचार पेरला. स्वार्थ आणि दांभिकता यांची बीजं निष्ठेनं पेरली. लोभाचं आणि मोहाचं खतपाणी घालून भ्रष्टाचाराचं अुदंड पीक काढलं. आता ते नाहीसं कसं करायचं हाच अेक जटिल प्रश्न होअून बसला आहे. जिथं लाच खाणं हा स्वधर्म

मानला जातो. आणि जिथं प्रामाणिकपणाला बावळटपणा समजून त्याचा अुपहास करण्यात येतो अशा देशात चांगले डॉक्टर्स, चांगले व्यापारी, चांगले शिक्षक कोणत्या आकाशातून पडणार आहेत? मी फारच निराशेनं आणि कडवटपणानं बोलत आहे असं कुणाला वाटेल. पण जिकडं तिकडं हेच दृश्य दिसत असल्यामुळं 'पाहू नको, डोळे शीव माझ्या मना बन दगड' असा अुपदेश आपल्या मनाला करावा हेच योग्य आहे. याचा अर्थ या समाजाला काहीच भवितव्य नाही असा मात्र कोणी करू नये. डॉक्टरांच्या असामाजिक दृष्टीवर टीका-टिप्पणी करताना मला ही जाणीव आहे की, अनेक श्रेष्ठ डॉक्टरांनी आणि वैद्यांनी आपली आत्मशक्ती अेकवटून निःस्वार्थपणे रोग्यांची सेवा केली आहे. कित्येक डॉक्टरांच्या हृदयातून वाहाणारी माणुसकीची गंगा मी पाहिली आहे. अनुभवली आहे. हजारो रुग्णांना आपल्या स्वतःच्या पैशांनी मोफत औषधं वाटणारे काही वैद्य माझ्या परिचयाचे आहेत. त्यांच्या त्यागासमोर त्यांच्या ठायी असलेल्या देवासमोर अवनम्र होण्यात मला अभिमान वाटतो पण दुर्दैवानं असे धन्वंतरी अत्यल्प आहेत. हाताच्या बोटावर मोजताना दोन्ही हातांची बोटे दुमडावी लागणार नाहीत याची खात्री आहे. जिकडं तिकडं धोत्र्याची फुलं अुमलली आहेत. काटेकुटे पसरले आहेत. या गर्दीत अेखादा मोगरा आणि क्वचित अेखादा गुलाब भेटला तर तो आनंददायक अपवाद आहे. अशाच अेका चांगल्या डॉक्टराच्या दालनात मी रोगी या नात्यानं प्रवेश केला होता. मी आलेला पाहाताच पन्नाशी अुलटलेल्या त्या डॉक्टरांच्या मुद्रेवर मला आपुलकीचं रुचिर हास्य अुमटलेलं दिसलं. माझं नाव त्यानं नुकतंच केसपेपरवर वाचलं होतं. तोपर्यंत या नावाचा अेखादा मनुष्य अस्तित्वात आहे काय याची त्याला कल्पनाही नव्हती. पण अत्यंत स्निग्ध स्वरात माझ्या नावाचा अुच्चार करून डॉक्टर म्हणाले,

'बसा, कसलीही शंका किंवा भीती बाळगू नका. तुमची चिंता सांगा. मनमोकळेपणानं बोला. तुमची वेदना दूर करण्याचा मी निश्चित प्रयत्न करीन.' डॉक्टरांच्या डोळ्यांत आणि स्वरात वात्सल्य होतं आश्वासन होतं. डॉक्टरांच्या जागतिक परिषदेत या गृहस्थानं आपल्या

व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची छाप पाडली होती. हजारो रोग्यांना मृत्यूच्या दाढेतून त्यानं अटीतटीनं बाहेर काढलं होतं. नवजीवनाचा आनंद दिला होता. पण या श्रेष्ठ धन्वंतरीच्या मुद्रेवर अहंकाराचा लवलेशही नव्हता. रोग्याशी बोलण्याची त्याची पद्धती प्रेमळ होती. त्याच्याशी बोलतानाच आपण रोगमुक्त होअू असा विश्वास रोग्यांच्या मनात अुत्पन्न व्हायचा ! हा डॉक्टर जसा मोठा डॉक्टर होता तसा तो अंतर्बाह्य मोठा माणूस होता. रोमरोमांतून माणूस असल्याशिवाय माणसाला डॉक्टर होता येत नाही. कवी-कलावंत होता येत नाही. शिक्षक किंवा नेता होता येत नाही. माणूसपण हे तर साऱ्याच व्यवसायांचं प्रमुख अधिष्ठान आहे. या डॉक्टरानं रुग्णांच्या घरी जाण्याची फी सुद्धा अनेक वेळां नाकारली. गरीबांच्या झोपडीत तो प्रथम जायचा. त्याच्या दालनात सोनेरी अक्षरांचा अेक फलक होता त्यावर लिहिलं होतं. 'मला तुमची जात आणि धर्म कोणता ते सांगू नका. तुमची राजकीय मतंही बोलू नका. मला केवळ तुमचं दुःख काय ते सांगा' जीवनावर प्रेम करण्याची, जीवनाचं संरक्षण करण्याची आणि जीवन रोगमुक्त करण्याची अेकच अुदात्त आकांक्षा त्या डॉक्टराच्या मनात अुचंबळत होती. त्याच्या दालनात भिंतीवर येशू ख्रिस्ताचं चित्र लावलेलं होतं. क्रूसावर लटकलेला आणि रक्तबंबाळ झालेला तो महात्मा आपल्या मारेकऱ्यांना परमेश्वरानं क्षमा करावी म्हणून प्रार्थना करीत होता. यापेक्षा अहिंसेचा आणि क्षमाभावाचा दुसरा कोणता आदर्श असेल ?

आज सकाळीच वृत्तपत्रात अेक बातमी वाचायला मिळाली. अेका मोठ्या सरकारी अिस्पितळाचे प्रमुख डॉक्टर आजारपणाची खोटी सर्टिफिकिटं देतात, सरकारी औषधं खाजगी दुकानांत विकतात आणि रुग्णालयात अनेक गैरप्रकार करतात या आरोपावरून त्यांना अटक करण्यात आली. या महाशयांचे हात म्हणे मुंबअी आणि दिल्लीपर्यंत पोहोचलेले असल्यामुळं वर्षानुवर्षं त्यांचा 'धंदा' शिस्तीत चालू होता. बहुतेक सरकारी अिस्पितळांतून अशा प्रकारचं वातावरण असतं असं म्हणतात. रोग्यांना दिलं जाणारं अन्न, फळं आणि औषधं अधिकाऱ्यांच्या

घरातच जातात हे साऱ्यांना माहीत असतं. पण याबद्दल अुघडपणे बोलायचं नसतं असाही अेक संकेत आहे. मी अस्वस्थ झालो. जीवनाचं प्रत्येक क्षेत्र असं बरबटलेलं असेल तर या समाजाला खरोखरच काही भविष्य आहे काय? माथ्यावरचं आभाळ अुत्तरोत्तर फाटत चाललं आहे. पायाखालची जमीन अधिकाधिक दुभंगत आहे. माणसं राजरोसपणे धर्माचा धंदा करण्यात वाकबगार झाली आहेत. सगळीकडेच बाजारीपणाची अवकळा आल्यावर विश्वास कुठं ठेवायचा हेच कळत नाही. मी अेका मित्राला व्यथित होअून म्हणालो,

नानाप्रकारचे तडे पडत चाललेला हा समाज कसा जोडला जाअील? हे सारं थांबवणारी अेखादी शक्ती आपल्याला सापडेल काय?' हा मित्र हसून मला म्हणाला,

'अरे, हे असंच चालणार! यात खंड पडेल असली आशा करण्यात काही अर्थ नाही. अुगीच फाटलेलं आकाश शिवण्याचा प्रयत्न करण्यात शहाणपण नाही. सत्तेपुढं झुकावं. अन्याय करणाऱ्या प्रवृत्तीपुढं नमावं. नाहीतर जगणं कठीण होअील. फाटत चाललेल्या आभाळाकडं दुर्लक्ष करण्यातच समंजसपणा आहे.'

त्याचं हे अुत्तर मला मुळीच रुचलं नाही. समाधानकारक अुत्तर शोधण्याचा मी प्रयत्न करू लागलो.

## चार दिवस सासूचे

*      *

आमच्या शेजारच्या विमलाबाई चार दिवसांपूर्वी मला म्हणाल्या, 'बऱ्याच दिवसांपासून तुम्हाला सांगावं की नाही याचा विचार करीत होते. आज सांगतेच. माझी सून स्वतःला फार शहाणी समजते. चार पुस्तकं शिकली म्हणजे काही आभाळाला हात लागत नाहीत. झाली असेल बी. ए. मला काय त्याचं! पुस्तकं वाचली म्हणजे संसार नीट करता येत नाही. आम्ही किती कष्टानं संसार केला ते आमचे आम्हाला माहीत. या कालपरवाच्या नाचऱ्या पोरींना त्याची काय कल्पना असणार? तू बी. ए. झाली असलीस तरी मी तुझं बारसं जेवून बसले आहे म्हणावं! तुझ्यासारख्या थिल्लर पोरीला मी भिणार नाही. एक दिवस तुझा पार नक्षा उतरवून टाकीन, तेव्हा तुला समजेल. उगीच नाही! पंचवीस, तीस वर्षं संसार करत्येय्. कानामागून आलीस आणि तिखट झालीस. पण तुझे असले थेर मी चालू देणार नाही.'

विमलाबाई फारच आवेशानं बोलत होत्या. जणू आपली सून समोर उभी आहे आणि आपण तिच्याबरोबर दोन हात करीत आहोत असाच त्यांचा आविर्भाव होता. आपल्या सुनेसंबंधीचा तक्रार अर्ज त्यांनी माझ्याकडं का आणला असावा हे मला कळेना. पण एका लढाऊ सासूच्या पवित्र्यात उभं राहून त्या माझ्यावर आपल्या वीररसपूर्ण शब्दांच्या फैरी झाडीत होत्या. मी त्यांना विरोध केला नाही. किंवा

मध्येच अडवलं नाही. अभिव्यक्तीचं पूर्ण स्वातंत्र्य त्यांना मिळालं होतं. एका सहनशील श्रोत्याच्या भूमिकेत मी बसून राहिलो होतो. पण विमलाबाईंचा अभिनिवेश जबरदस्त होता. आपली सून कशी उद्धट आणि चढेल झाली आहे, सासू तिच्या दृष्टीनं कशी केरसुणीसारखी कःपदार्थ आहे आणि तिनं आपल्या मुलावरही करणी करून त्याचं कसं पाळीव मांजर बनवलं आहे यावर एक परिणामकारक व्याख्यान देऊन त्या मला म्हणाल्या,

'आता तुम्हीच सांगा असल्या दीड शहाण्या पोरीसमोर मी बसल्या उठल्या नरमाईनं वागावं असं तुमचं म्हणणं आहे काय? माझ्या घरात मी असलं काही खपवून घेणार नाही. माझ्या नवऱ्यालासुद्धा माझ्यासमोर तोंड वर करून बोलण्याची हिंमत नाही. तिथं या अवदसेनं माझ्यावर हुकूमत गाजवली तर ती मी सहन करीन म्हणता काय? तिला चार उपदेशाचे शब्द सांगा, सोनारानं कान टोचले म्हणजे रडू येत नाही, तिची चांगली कानउघाडणी करून वठणीवर आणा.' विमलाबाई आवेशातच निघून गेल्या. मला आश्चर्य वाटलं. कॉलेजातल्या विद्यार्थ्यांना मी शिकवीत असलो तरी एका सुनेची कानउघाडणी करण्याची 'शिकवणी' एका संतप्त सासूबाईनं माझ्या गळचात टाकावी याचा चमत्कार वाटला. शिक्षक आणि प्राध्यापक म्हणजे हरकामे, रिकामटेकडे लोक असं एक समीकरणच होऊन बसलं आहे. शाळेतल्या शिक्षकांनी तर वर्षाकाठी काही कुटुंबनियोजनाच्या केसेस शस्त्रक्रियेसाठी आणल्या पाहिजेत अशी सक्ती केली जाते अशीही एक नवलकथा मी ऐकली आहे. आता सासूच्या जन्मसिद्ध अधिकाराला उर्मट आव्हान देणाऱ्या एका सूनबाईचं हृदयपरिवर्तन करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली होती. सासू-सून हा व्याकरणात आणि व्यवहारात द्वंद्व समास आहे. दोघींचे संबंध पुरातन काळापासून भलतेच 'प्रेमळ' आहेत अशी नोंद लोकसाहित्यात सापडते. सासू आणि सून यांचे संबंध एकाद्या ठिकाणी सुतासारखे सरळ आढळले तर तो एक सृष्टिचमत्कार मानावा असं माझा एक मित्र म्हणतो.

विमलाबाई गेल्यानंतर एक तासानं त्यांचा शत्रुपक्ष म्हणजे सूनबाई येऊन दाखल झाल्या. त्यांच्या कपाळावर पडलेली आठी मला

जाणवत होती. त्रासिक मुद्रेनं त्यांनी मला जाब विचारला, 'आमच्या सासूबाई आत्ता थोड्या वेळापूर्वी इथं आल्या होत्या काय? त्यांनी माझ्यासंबंधी नाही नाही त्या कागाळ्या तुम्हाला सांगितल्या असतीलच. पण त्यांची ही थेरं मी चालू देणार नाही. मुकाट्यानं दोन वेळा ताटात पडेल ते गिळावं आणि हरी हरी करीत स्वस्थ बसावं. ते सोडून नसत्या गोष्टीत नाक खुपसण्याची त्यांना सवयच आहे. पण त्यांना तुम्ही सांगा की आता तुमचे दिवस संपले. माझ्या संसारात त्यांची लुडबूड केलेली मला चालणार नाही. घर माझं आहे. नवरा माझा आहे. आम्ही कसं रहावं, कसं वागावं याचे धडे आम्हाला देऊ नका म्हणावं! तुमच्या त्या जुनाट कल्पना मला चालणार नाहीत. तुमची सून असले म्हणून मी काही तुमची गुलाम नाही. मी माझी स्वतंत्र आहे. तुमच्यासारख्यांनी आमच्या सासूबाईंना थोडी अक्कल शिकवली पाहिजे. इतकं वय झालं तरी अजून त्यांची हुकुमशाही संपत नाही. पण मीच त्यांच्या त्या हुकुमशाहीला सुरुंग लावणार आहे. चार उपदेशाचे शब्द सांगून त्यांचं डोकं ताळ्यावर आणा.'

सूनबाईंचं ओजस्वी व्याख्यान मला शांतपणानं ऐकावंच लागलं. त्या रणमर्दिनीनं माझ्यावर आपल्या धारदार वाणीची समशेर मोठ्या सफाईनं चालवली होती. मी केवळ ऐकत होतो. मधेच एकदा बोलण्याचा मी केविलवाणा प्रयत्न करून पाहिला. तिच्या वक्तृत्वाची महानदी माझ्यासारख्या सामान्य माणसाला अडवणं शक्यच नव्हतं. एकाच दिवशी तासाभराच्या अंतरानं सासूसुनांची दोन तडाखेबंद भाषणं विजेसारखी माझ्या मस्तकावर कोसळल्यामुळं मी कासावीस झालो. घशाला कोरड पडली. तांब्याभर थंडगार पाणी पिऊन जिवाला थोडी तरतरी आणली. वक्तृत्वाच्या बाबतीत स्त्रिया नेहमीच पुरुषाला सहज मागं टाकतात यात शंका नाही. काही स्त्रिया तर बोलायला लागल्या की जगातली कोणतीही शक्ती मग त्यांचं तोंड धरू शकत नाही. एका कवितेत गडकऱ्यांनी म्हटलं आहे, तोंडाळ बायको चालून आल्यावर काय करावे या प्रश्नाला उत्तरच नाही. 'विहिणींचा कलकलाट' या नावाच्या आणखी एका कवितेत विहिणींच्या वक्तृत्वपूर्ण

भांडणाचं त्यांनी वर्णन केलं आहे. पण गडकऱ्यांसारख्या शब्दप्रभू कवीलासुद्धा त्यांचं यथातथ्य वर्णन करता आलं की नाही याबद्दल शंका वाटते. माझ्या एका डॉक्टर मित्रानं आपल्या व्यवसायातला एक आश्चर्यकारक अनुभव मला एके दिवशी सांगितला. त्याच्याकडं 'पेशंट' म्हणून आलेल्या एक स्त्रीनं केवळ दोन वाक्यांतच आपल्या आजाराचं स्वरूप त्याला सांगितलं होतं. हा अद्‌भुत अनुभव त्याला फार आनंदाचा वाटला. कमीत कमी बोलणाऱ्या त्या स्त्रीला त्यानं कसलीही फी आकारली नाही. हा थोडासा विनोदाचा भाग झाला. पण सासू आणि सून या दोघींनीही त्यादिवशी माझ्यावर चढवलेल्या अनपेक्षित हल्ल्यामुळं मी बराच अस्वस्थ झालो. दोघींनी आपापल्या भूमिका नको तितक्या स्पष्ट शब्दांतून माझ्यासमोर हिरीरीने मांडल्या होत्या. त्यांच्या मनात जो असंतोष उफाळत होता त्याच्या कारणांची मी थोडी चिकित्सा करू लागलो.

सासूच्या अस्वस्थतेचं आणि संतापाचं मूळ तिच्या हातातून आता गृहराज्याची सत्तासूत्रं निसटत चालली या घटनेत होतं. आपण करू ती पूर्व. आपण आखू तेच धोरण! आपला शब्द हा अंतिम असला पाहिजे हा अहंकार विमलाबाईंनी कित्येक वर्षं जोपासला होता. या अहंकाराच्या घरट्यातच ती रमली होती. पण या घरट्यात आता आणखी एक प्रतिस्पर्धिनी ताज्या दमानं उतरलेली पाहिल्याबरोबर संघर्षाची ठिणगी पडावी यात आश्चर्य नाही. सूनबाईनं आपल्या 'आज्ञेत' रहावं ही तिची अपेक्षा, पण सुनेलाही सत्ताग्रहणाची स्वप्नं पडत होती. एका लहानशा प्रपंचात सत्तेचं राजकारण चातुर्यानं खेळलं जाऊ लागतं, त्याची अखेर काहीही झाली तरी मत्सर ईर्षा, स्पर्धा, मानसिक ताण, निंदानालस्ती यांचं वातावरण कायम राहतं. एकाच घरात दोन भावांना परस्परप्रेमानं राहाता येत नाही. तिथं दोन वेगळ्या घरांतून आलेल्या भिन्न प्रवृत्तीच्या आणि भिन्न संस्कारातल्या स्त्रियांना कसं राहता येईल? हाच प्रश्न मला एकदा माझ्या मित्रानं विचारला होता. काहीशा वेगळ्या संदर्भात तो बोलत होता. मी त्याला म्हणालो,

'माणूस हे एक विचित्र, अनाकलनीय सत्य आहे, त्याचं सर्वात अधिक प्रेम स्वतःवरच असतं, या अतिरेकी प्रेमातूनच अहंकार

जोपासला जातो. अहंकाराचं समाधान करण्यासाठी लहानमोठी सत्तेची केंद्रं तो हस्तगत करण्याचा प्रयत्न करतो. सत्तेच्या त्या वर्तुळातच स्वत:ला स्वामी समजून तो सदैव राहण्याची धडपड करतो. पण कुणीतरी त्या वर्तुळाला छेद दिला की त्याचा तोल जातो. मग दंड थोपटले जातात. आव्हानं दिली जातात. सत्तेला चिकटून राहण्यासाठी निकराचा लढा सुरू होतो. अहंकार आणि सत्ताप्रेम यांतूनच हे कधीही न संपणारे संघर्ष सुरू होतात. विमलाबाई आणि त्यांची सून यांच्यातली लढत याच स्वरूपाची आहे. त्यात जगावेगळं काहीच नाही. देशोदेशीच्या राजकारणात, समाजशासनात आणि साऱ्याच क्षेत्रांत हे सासूसुनेचं भांडण आहे.' माझा मित्र माझ्या या रूक्ष, तार्किक भाषणानं थोडासा वैतागला. तो म्हणाला, 'तुझं हे मानसशास्त्र बाजूला ठेव. अरे, अहंकार, सत्तेचं प्रेम नसेल तर व्यक्तीची काय नि समाजाची काय काहीच प्रगती होणार नाही. आपल्या सत्तेला कुणी आव्हान दिलं तर त्याच्याशी झगडलंच पाहिजे. आपली सत्ता खुशाल कुणाला तरी देऊन टाकणं हा शहाणपणा आहे काय? सासूचं न ऐकणाऱ्या उद्धट सुनेपुढं सासूनं शरणागती पत्करावी असं झालं तर ती अनुभवशून्य पोरगी सासूच्या डोक्यावर चढून बसेल. तिच्यावर अंकुश ठेवणं हा सासूचाच अधिकार आहे.'

या प्रतिपादनातला तथ्यांश मी नाकारीत नाही. पण सत्तेला मिठी मारून बसण्याची चिवट प्रवृत्ती आणि स्वत:वरलं आत्यंतिक प्रेम यामुळंच माणसं आपलं सुखसमाधान हरवून बसतात. सत्तरी ओलांडली तरी सासूनं कमरेच्या किल्ल्या सुनेला देऊ नयेत या सत्ताप्रेमाला काय म्हणावं? मग केव्हातरी अटळ संघर्षाचा क्षण येतो. हातातली सत्ता हिसकावून घेतली जाते. ज्यांच्या हाती ती जाते तेही सत्तेला अशीच मगरमिठी मारून बसतात. त्यापेक्षा आपण होऊन ती योग्य व्यक्तीच्या हातात वेळीच सोपवण्याची दक्षता घेतली तर? माझ्या या अव्यवहारी प्रश्नाचं माझ्या मित्राला हसू आलं, तो म्हणाला, 'कोणत्या जगात तू वावरतोस याची काही कल्पना आहे का? कालच्या जगातही अहंकारी वृत्तीनं माणसांनी सत्तेसाठी, संपत्तीसाठी रक्त सांडलं आहे. आजही तेच

घडत आहे. उद्यासुद्धा हेच घडत राहणार. माणूस इतिहासापासून काहीच शिकत नाही हा इतिहास आहे.'

आपलं विधान स्पष्ट करण्यासाठी त्यानं एक चांगला दृष्टांत दिला. तो म्हणाला, 'मुख्यमंत्रीपदावर काही वर्षं राहिलेल्या एका गृहस्थाची खुर्ची अंतर्गत गटबाजीच्या राजकारणामुळं कोलमडली. हे गृहस्थ बरेच दिवस बेचैन होते. खरं तर आठ दहा वर्षं ते मुख्यमंत्री होते. सत्तेची छत्रचामरं त्यांच्या मस्तकावर सारखी ढाळली जात होती. एक दिवस कुणीतरी आपल्याला धक्का देईल ही भीती त्यांच्या मनात होतीच. दुसऱ्या योग्य व्यक्तीसाठी आपलं आसन रिकामं करावं हा विचार त्यांनी झटकून टाकला. 'यावच्चंद्र दिवाकरौ' आपणच त्या पदावर असलं पाहिजे हा अहंकार त्यांच्या मनात ठाण मांडून बसला होता. कुणीतरी त्यांना पदभ्रष्ट केलं. त्यानंतर काही दिवसांनी हे माजी मुख्यमंत्री मला एका हॉटेलात भेटले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मी त्यांना सरळ प्रश्न विचारला, 'सत्ता गेल्यामुळं अवघड जबाबदाऱ्या संपल्या, ते दगदगीचे दौरे संपले. आता आपल्याला पुष्कळच हलकं वाटत असेल ना ?'

ते म्हणाले, 'तुमचा प्रश्न मला थोडा त्रासदायक असला तरी मी त्याचं अत्यंत मनमोकळं उत्तर देतो. मी मुख्यमंत्री होतो तेव्हा पहाटे-पासून मध्यरात्री झोपेपर्यंत माझ्याभोवती लोकांची सारखी वर्दळ असायची. सारी माणसं—त्यांत बडे अधिकारी असायचे. कारखानदार असायचे. माझ्या एका शब्दासाठी ते तासन्तास खोळंबलेले असायचे. माझ्यासमोर नम्रतेचं नाटक करायचे. माझ्याबद्दल अत्यंत आदरानं बोलायचे. त्यातलं खरं खोटं मला कळत होतं. कारण मीसुद्धा याच वातावरणात वाढलो आहे. केवळ माझ्या सत्तेमुळं माणसं माझ्यापुढं झुकतात याची मला कल्पना होती. पण खरं सांगू ? त्यामुळं माझा अहंकार कुरवाळला जायचा. मला बरं वाटायचं. मी काही साधुसंत नव्हतो. माझी सत्ता आणि माझा अहंकार यांच्या तेजोवलयात मी खरोखरच सुखी होतो. पण खुर्ची गेली आणि तो सारा झगमगाट संपून गेला. आता मी रस्त्यानं चालत निघालो तरी लोक माझ्याकडं लक्ष

देत नाहीत. माझ्या अहंकाराची नांगी त्यामुळं ठेचली जाते. मला कुणी विचारत नाही. मला पाहून पूर्वीसारख्या नाटकी विनयाचा नमस्कार कुणी करीत नाही. ही जाणीव टोचत राहते. खरं तर या प्रकारच्या 'स्वार्थी' विचारातून मी बाहेर पडलं पाहिजे. पण काय करू ? इंद्रियांना पडलेलं वळण काही केल्या जात नाही.'

त्या माजी सत्ताधीशाचं हे आत्मनिवेदन प्रामाणिक होतं यात शंका नाही. भल्या भल्या संतांच्या सुद्धा मनातलं आत्मप्रेम लवकर ओसरत नाही, तिथं त्या मुख्यमंत्र्याला दोष देण्यात काय अर्थ आहे ? माणसाच्या अनेक दुःखांचं आणि विवंचनांचं मूळ त्यांच्या अतिरेकी अहंपणातच सामावलेलं असतं. जी माणसं आपल्या अहंभावनेच्या वाढत्या प्रदेशाला कुंपणं घालून त्यांना अडवू शकतात त्यांचं आयुष्य समाधानी होतं हेच खरं ! अलेक्झांडर दि ग्रेट या नावानं ओळखल्या जाणाऱ्या सम्राटाला अहंपणाची, सामर्थ्याची, संपत्तीची आणि सत्तेची अशी एकदा अफाट नशा चढली होती. त्या तोऱ्यातच तो रहायचा आणि साऱ्यांना तुच्छतेनं वागवायचा. एके दिवशी आपल्या गुरूला– डायजोनिसला तो अत्यंत आढ्यतेनं म्हणाला,

'सांगा, तुमची काय इच्छा आहे ? तुम्हाला जे पाहिजे असेल ते हा त्रिखंड विजयी सम्राट सहज देऊ शकतो. जे मागायचं असेल ते मागा.' अलेक्झांडरच्या मुद्रेवरून उन्मत्त अहंकाराचे ओघळ वाहात होते. छाती काढून तो उभा होता. गुरू डायजोनिस थंडीचे दिवस असल्यामुळं सकाळचं ऊन अंगावर घेत बसले होते. त्यांना अलेक्झांडरच्या शब्दांतला अहंपणाचा दर्प जाणवला. प्रचंड सत्तेतून आणि सत्ताप्रेमातून उद्‌भवलेला हा मद त्यांनी ओळखला. अलेक्झांडरकडं त्यांनी मान वर करूनही पाहिलं नाही. अत्यंत थंड स्वरात ते त्याला म्हणाले, 'माझ्यासमोर उभं राहिल्यामुळं ऊन अडून राहिलं आहे. थोडा बाजूला उभा राहा, इतकंच माझं मागणं आहे.'

आपली सत्ता घटकाभराची असते म्हणून तिचा शक्य तितका लोककल्याणासाठी उपयोग झाला पाहिजे असं मानणारे काही सत्ताधीश असतात. सत्तेमुळं त्यांची नम्रता आणि सुसंस्कृतवृत्ती बधिर होत नाही.

लालबहादूर शास्त्री रेल्वेमंत्री असताना एक रेल्वे अपघात घडल्याबरोबर त्याची जबाबदारी स्वीकारून त्यांनी राजीनामा देऊन टाकला. दिल्लीच्या विमानतळावर ते विमानातून उतरले. आपली बॅग घेऊन ते निघाले तेव्हा नोकर तत्परतेनं बॅग घेण्यासाठी पुढे आला. शास्त्रीजी त्याला हसत म्हणाले, 'आता मी मंत्री नाही. माझी बॅग मीच घेतली पाहिजे.' त्यांच्या स्वरात विषाद नव्हता. सत्तेवर नसूनही कित्येक व्यक्ती सदैव लोकमान्य असतात व त्याच खऱ्या अर्थानं सत्ताधीश राहतात यात शंका नाही. मी माझा डाव अटीतटीनं, आनंदानं खेळलो आहे. आता दुसऱ्या खेळाडूची बॅटिंग मला तितक्याच आनंदानं रस घेत पाहाता आली पाहिजे असं म्हणणारा खेळाडू जीवनाच्या सर्व क्षेत्रांत दिसायला हवा. घरातल्या अधिकाराची सूत्रं सुनेच्या हाती देऊन तिचा संसार तृप्त मनानं पहाण्याची सुजाण वृत्ती सासूत आली तर आजचं जीवन कितीतरी स्वारस्यपूर्ण होईल. काय असेल ते असो! मनुष्य स्वार्थाच्या वलयातून बाहेर पडतच नाही. चार दिवस सासूचे असले तर चार दिवस सुनेचेही असतात आणि ते असले पाहिजेत हे समंजसपणानं लक्षात ठेवलं पाहिजे. हे कळतं पण वळत नाही हीच तर मनुष्याची शोकांतिका आहे. संतकवी तुकारामानं या विसंगतीवर आपल्या मर्मभेदी विडंबक दृष्टीनं नेमकं बोट ठेवलं आहे. मानवी प्रकृती आणि प्रवृत्ती यांचा सूक्ष्म अभ्यास या संतानं केला होता. माणसाच्या ढोंगावर अचूक कोरडे ओढताना आणि त्याला हास्यास्पद करताना तुकारामाच्या प्रतिभेला एक वेगळंच तेज येतं.

'आवा चालली पंढरपुरा' हा त्यांचा एक मार्मिक अभंग आहे. पंढरपूरला निघालेल्या एका सासूला घराचा मोह सुटत नाही. ती आपल्या गावच्या वेशीपर्यंत जाते आणि पुन्हा परत येऊन सुनेला काहीतरी प्रापंचिक सूचना देत राहाते. आपलं जातं, उखळ, मुसळ दूध-दुभत्याचं फडताळ तिच्या मनातून जातच नाही. ती पुन्हा वेशीपर्यंत जाते आणि पुन्हा घराकडे परत येते. सुनेनं तिला आश्वासन देऊन सांगितलं, 'सासूबाई, तुम्ही इथली चिंता करू नका, तुम्ही खुशाल पंढरपूरला जा.' पण सुनेची ही सूचना ऐकून सासूला वाटतं की आपण

पंढरपूरला जावं म्हणून सून फार उत्सुक झाली आहे. ती आपल्याला घालवायलाच बसली आहे. आता मी घर सोडणार नाही. क्षुद्र मोहात आणि क्षुद्र सत्तेच्या लोभात माणसं अकारण गुरफटून पडतात आणि स्वतःची फजिती करून घेतात. याचं तुकारामानं रेखाटलेलं चित्र जितकं विनोदी तितकंच अर्थपूर्ण नाही का ? पण जी गोष्ट तुकारामाला कळते ती साऱ्यांनाच कळू लागली तर सारेच तुकाराम झाले नसते का ? आपले चारच दिवस असतात हे प्रत्येक सासूनं मनात वागवायला हवं. आपणही कधीतरी सासू होणार आहोत हे सुनेनंही लक्षात ठेवायला हवं. लक्षात ठेवण्यासारख्या पुष्कळ गोष्टी असतात. पण लक्षात कोण घेतो ?

## शब्दांविषयी चार शब्द

ज्ञानेश्वर हे शब्दसृष्टीचे ईश्वर होते. शब्दाच्या सामर्थ्याचं आणि सौंदर्याचं त्यांनी अत्यंत प्रभावी वर्णन केलं आहे. ते म्हणतात, 'शब्द खरं तर श्रवणाचा विषय आहे. पण मी असे शब्द योजीन की, डोळे म्हणतील मला त्यांचं रूप पाहू द्या. रसना म्हणेल मला या शब्दांची रुची चाखू द्या. नाक म्हणेल मला यांचा सुगंध मनसोक्त घेऊ द्या. सारे शरीर म्हणेल, मला या शब्दांचे स्पर्शसुख अनुभवू द्या. कान म्हणतील आम्हाला या शब्दांतलं दिव्य संगीत ऐकू द्या. सर्व इंद्रिये शब्दांच्या उपभोगासाठी परस्परांत कलह करू लागतील. पण ज्याप्रमाणं एकच सूर्य सर्व सृष्टी उजळू शकतो त्याप्रमाणं माझे शब्द एकाच वेळी सर्व इंद्रियांची तृप्ती करू शकतील.' आपल्या शब्दशक्तीबद्दल या कवीश्वराला केवढा प्रचंड विश्वास वाटत होता! तुकारामांनीही 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने' असं म्हणून शब्द हे आमच्या जीवाचं जीवन आहे व शब्द वाटून आम्ही लोकांना सुखी करू असंही आश्वासन दिलं आहे. शब्द म्हणजे केवळ वारा किंवा पाण्यावर उत्पन्न झालेला एक सामान्य बुडबुडा अशी ज्यांची समजूत असते त्यांना शब्दांतून उत्तर देणं कठीण आहे. शब्दांचं माहात्म्य शब्दातीत आहे. वाणीची देवता सरस्वती. तिला 'अभिनव वाग्विलासिनी', 'चातुर्यकलाकामिनी', 'विश्वमोहिनी' या शब्दांतून गौरविलं आहे. सरस्वतीच्या अंतःकरणाचं सौंदर्य श्रेष्ठ प्रतिभावंत जणू

आपल्या शब्दांतून प्रकट करीत असतो, ज्या शब्दांमागं मन नाही, भावना आणि उचित अर्थ नाही, असल्या शब्दांची मी कधीच तरफदारी करणार नाही. पण ही शब्दसृष्टी अपूर्व आणि असीम आहे. आपलं सारं जीवनच नानाप्रकारच्या शब्दांनी ओतप्रोत भरलेलं व भारलेलं आहे. शब्द नसले तर आयुष्याला अर्थ उरला असता काय ? कुठल्याशा एका नाटकातला प्रेमी नायक म्हणतो, 'हा तिच्याच पावलांचा आवाज. तिच्या पायांतले पैंजण केवढा बरं मधुर शब्द करीत आहेत. त्यांतून ते मला एक मोहक आमंत्रण देत आहेत. या नूपुरांचा शब्द कानावर आला की माझ्या साऱ्या गात्रांतून विजेची लहर खेळू लागते. असं वाटतं की, या शब्दांच्या धुंदीत सारं आयुष्य व्यतीत करावं. तिची पावलं जर इतकी सुरेख बोलतात तर तिचे ओठ किती मिष्टमधुर बोलत असतील याची कल्पनाच केलेली बरी. ते शब्द माझ्या साऱ्या अंगांगांना लपेटून बसतात. तिच्या हसण्याचा शब्द, तिच्या हातातल्या कंकणांचा शब्द, तिनं परिधान केलेल्या रेशमी वस्त्राचा सळसळणारा शब्द हे सारेच जादूचे शब्द आहेत. या शब्दांशी माझं नातं कायमचं जोडलं गेलं आहे.'

तो प्रेमिक पागल होता काय हे मला माहित नाही. पण केव्हा आणि कसं पागल व्हावं हे त्या शहाण्या माणसाला निश्चित कळलं होतं. आपल्या प्रेयसीचा शब्द कोणाच्या अंगावर रोमांच उभे करणार नाही ? प्रेमाचा शब्द अजाण बालकालाही कळतो. एकाकीपणाच्या भीतीनं रडणारं अर्भक आईचा शब्द कानांवर येताच सुखावतं. आपण सुरक्षित आहोत याची त्याला साक्ष पटते. शब्द खरे असोत किंवा खोटे असोत, माणसाला ते धीर देऊ शकतात. वेदनांनी तळमळत असलेल्या एका रुग्णाला इंजेक्शन देऊन सुद्धा झोप येत नव्हती. तो अस्वस्थ होता, सारखा कण्हत होता. पण त्याची म्हातारी आई आपला अशक्त सुरकुतलेला हात त्याच्या अंगावरून फिरवीत त्याला म्हणाली, 'बाळ शांत झोप, आता तुझ्यावरचं गंडांतर टळलं आहे. उद्या सकाळपर्यंत तुझं सगळं दुखणं पळून जाईल. माझ्या म्हातारीचा शब्द खोटा होणार नाही. आता तू शांत झोप घे.' आणि आपल्या कापऱ्या थकलेल्या आवाजात तिनं तुकोबाचा एक अभंग भाविकपणानं म्हटला. आणि काय आश्चर्य

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**
**( ठाणे जिल्हा वाचनालय )**
सरस्वती मंदिर, नेताजी सुभाष पथ, ठाणे ४०० ६०१. दूरध्वनी : ५३३३५७६

दि. १०/२/१९९९

## * १०५ वा वार्षिकोत्सव *

प्रमुख पाहुणे – जेष्ठ साहित्यिक **प्रा. गंगाधर गाडगीळ** यांचे

## साहित्य संमेलन – स्वरुप आणि अपेक्षा

**या विषयावरील व्याख्यान**

**बुधवार, दि. २४ फेब्रुवारी, १९९९, सायंकाळी ६-३० वाजता.**
**स्थळ – मराठी ग्रंथ संग्रहालयाचे सरस्वती मंदिर सभागृह, सुभाष पथ, ठाणे.**

अवश्य यावे, ही विनंती.

आपले नम्र,

| | | | |
|---|---|---|---|
| ज. के. दातार | सौ. अ. मं. कंटक | भा. शं. प्रधान | पां. के. दातार |
| प्रमोद नाईक | विद्याधर वालावलकर | *कार्याध्यक्ष* | *अध्यक्ष* |
| *कार्यवाह* | | | |

आम्हाला या शब्दातलं दिव्य संगीत ऐकू द्या. सर्व इंद्रियं शब्दांच्या उपभोगासाठी परस्परांत कलह करू लागतील. पण ज्याप्रमाणं एकच सूर्य सर्व सृष्टी उजळू शकतो त्याप्रमाणं माझे शब्द एकाच वेळी सर्व इंद्रियांची तृप्ती करू शकतील.' आपल्या शब्दशक्तीबद्दल या कवीश्वराला केवढा प्रचंड विश्वास वाटत होता ! तुकारामांनीही 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने' असं म्हणून शब्द हे आमच्या जीवाचं जीवन आहे व शब्द वाटून आम्ही लोकांना सुखी करू असंही आश्वासन दिलं आहे. शब्द म्हणजे केवळ वारा किंवा पाण्यावर उत्पन्न झालेला एक सामान्य बुडबुडा अशी ज्यांची समजूत असते त्यांना शब्दांतून उत्तर देणं कठीण आहे. शब्दांचं माहात्म्य शब्दातीत आहे. वाणीची देवता सरस्वती. तिला 'अभिनव वाग्विलासिनी', 'चातुर्यकलाकामिनी', 'विश्वमोहिनी' या शब्दांतून गौरविलं आहे. सरस्वतीच्या अंतःकरणाचं सौंदर्य श्रेष्ठ प्रतिभावंत जणू

आपल्या शब्दांतून प्रकट करीत असतो, ज्या शब्दांमागं मन नाही, भावना आणि उचित अर्थ नाही, असल्या शब्दांची मी कधीच तरफदारी करणार नाही. पण ही शब्दसृष्टी अपूर्व आणि असीम आहे. आपलं सारं जीवनच नानाप्रकारच्या शब्दांनी ओतप्रोत भरलेलं व भारलेलं आहे. शब्द नसले तर आयुष्याला अर्थ उरला असता काय ? कुठल्याशा एका नाटकातला प्रेमी नायक म्हणतो, 'हा तिच्याच पावलांचा आवाज. तिच्या पायांतले पैंजण केवढा बरं मधुर शब्द करीत आहेत. त्यांतून ते मला एक मोहक आमंत्रण देत आहेत. या नूपुरांचा शब्द कानावर आला की माझ्या साऱ्या गात्रांतून विजेची लहर खेळू लागते. असं वाटतं की, या शब्दांच्या धुंदीत सारं आयुष्य व्यतीत करावं. तिची पावलं जर इतकी सुरेख बोलतात तर तिचे ओठ किती मिष्टमधुर बोलत असतील याची कल्पनाच केलेली बरी. ते शब्द माझ्या साऱ्या अंगांगांना लपेटून बसतात. तिच्या हसण्याचा शब्द, तिच्या हातातल्या कंकणांचा शब्द, तिनं परिधान केलेल्या रेशमी वस्त्राचा सळसळणारा शब्द हे सारेच जादूचे शब्द आहेत. या शब्दांशी माझं नातं कायमचं जोडलं गेलं आहे.'

तो प्रेमिक पागल होता काय हे मला माहित नाही. पण केव्हा आणि कसं पागल व्हावं हे त्या शहाण्या माणसाला निश्चित कळलं होतं. आपल्या प्रेयसीचा शब्द कोणाच्या अंगावर रोमांच उभे करणार नाही ? प्रेमाचा शब्द अजाण बालकालाही कळतो. एकाकीपणाच्या भीतीनं रडणारं अर्भक आईचा शब्द कानांवर येताच सुखावतं. आपण सुरक्षित आहोत याची त्याला साक्ष पटते. शब्द खरे असोत किंवा खोटे असोत, माणसाला ते धीर देऊ शकतात. वेदनांनी तळमळत असलेल्या एका रुग्णाला इंजेक्शन देऊन सुद्धा झोप येत नव्हती. तो अस्वस्थ होता, सारखा कण्हत होता. पण त्याची म्हातारी आई आपला अशक्त सुरकुतलेला हात त्याच्या अंगावरून फिरवीत त्याला म्हणाली, 'बाळ शांत झोप, आता तुझ्यावरचं गंडांतर टळलं आहे. उद्या सकाळपर्यंत तुझं सगळं दुखणं पळून जाईल. माझ्या म्हातारीचा शब्द खोटा होणार नाही. आता तू शांत झोप घे.' आणि आपल्या कापऱ्या थकलेल्या आवाजात तिनं तुकोबाचा एक अभंग भाविकपणानं म्हटला. आणि काय आश्चर्य

सांगावं ? इंजेक्शननं जो परिणाम झाला नाही तो आईच्या आणि एका संताच्या उत्कट वाणीनं घडवून आणला. तळमळणारा तो रुग्ण गाढ झोपी गेला. केवळ मनावर नव्हे तर आत्म्यावर आणि साऱ्या आयुष्यावर अद्‌भुत परिणाम करण्याची असामान्य शक्ती सामान्य वाटणाऱ्या शब्दांत सामावलेली असते. ज्ञानेश्वर तर शब्दसौंदर्याच्या नंदनवनात बसून आपली शब्दसतार छेडीत राहिलेला एक आगळाच कलावंत आहे. त्याचे शब्द म्हणजे केवळ कृत्रिम कल्पनेचा रंग घेऊन आलेले निरर्थक शब्द नव्हेत. ग्यानबा तुकारामांचे शब्द त्यांच्या चैतन्यपूर्ण मनाचे द्योतक आहेत. ज्यांच्या मनाचा मळकटपणा वाढत चालला आहे अशा कळकट माणसांच्या शब्दांना प्रास अनुप्रासांची कितीही आभरणे घातली तरी त्या शिळपट शब्दांतून सुवास येणे अशक्य आहे. संतकवी सहज आणि साधे शब्द लिहीत, बोलत होते. पण त्यांत अर्थांचं, भावनांचं, अनुभवांचं, आत्मसाक्षात्काराचं स्वच्छ चांदणं पडलेलं असायचं. अशा माणसांच्या तोंडून निघणाऱ्या अपशब्दांना सुद्धा अमृताची गोडी चढलेली असते. तुकारामांपेक्षा मंबाजी नावाचा त्याच्याच काळातला एक ढोंगी 'पायघोळ संत' हा व्याकरणाच्या दृष्टीनं अधिक चांगले शब्द लिहायचा पण त्याचं शिकल्या शब्दांचं कवित्व केव्हाच वाहून गेलं. तुकोबांचे शब्द मात्र इतकी वर्षे उलटली तरी अभंग आहेत. ते शब्द आणखी कित्येक शतके माणुसकीचा सुगंध देत राहतील.

शब्द जसे फुलवतात तसेच ते पेटवतात. 'आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या तर आम्हीही सुंदर झालो असतो' हे शिवसुंदर शब्द ऐकून इतिहास पुरुषाचं मन फुलून गेलं असेल. कारण असे अमृतात न्हालेले, दिव्यत्वाचा स्पर्श असलेले शब्द इतिहासाला फारसे ऐकायला मिळत नाहीत. सत्तामदानं झिंगलेले, वासनेनं बरबटलेले अशिव शब्द त्यानं अनेक वेळा ऐकले आहेत. पण तारुण्य आणि सौंदर्य यांची उधळण करणारी यवनसुंदरी पाहूनसुद्धा शिवप्रभूंच्या शब्दांतील पवित्रता कणभरही विचलित झालेली नाही. ते शब्द आजही आम्हाला फुलवतात. पण 'नामर्दांनो, तुमचा बाप तिकडं मरून पडला आहे आणि तुम्ही शेळपट लोक जीव घेऊन पळत सुटलात. थूः तुमच्या जिनगानीवर !'

या म्हाताऱ्या शेलारमामाच्या शब्दांतल्या धि:कारानं पळून जाणारं मराठी सैन्य अंतर्बाह्य पेटून निघालं आणि पाहता पाहता त्यानं शत्रूची लांडगेतोड केली. इतिहासाची पानं चाळताना आठ ऑगस्ट १९४२ हा दिवस दृष्टीसमोर येतो. मोहनदास करमचंद गांधी नावाचा एक अंगानं फाटका आणि अंगावर अपुरे कपडे असलेला म्हातारा माणूस विलक्षण तारुण्यसंपन्न शब्दांतून समोर पसरलेल्या विराट सभेसमोर बोलू लागला. त्याच्या शब्दांत रग होती, आग होती. बाह्यत: ते शब्द साधे होते पण त्यांत स्वातंत्र्यभावनेचे पेटते स्फुल्लिंग होते. त्याचा एकेक शब्द लक्षावधी श्रोत्यांच्या मनाला भिडत होता, झोंबत होता, दंश करीत होता, जबरदस्त धक्के देत होता, त्यांना उठवीत होता, त्यांना चेतवीत होता, त्यांच्या रक्ताला उधाण आणीत होता, भावनांचं प्रचंड वादळ निर्माण करीत होता. माणसांच्या पसरलेल्या त्या महासागरावर गांधींचे शब्द बलोद्धत लाटेप्रमाणं उफाळत होते. सभेतला प्रत्येक माणूस एकेक निखारा बनत होता. लाखो निखारे रसरसून पेटले. त्यांची ज्वाला झाली. त्या ज्वालाग्राही वातावरणाची उष्णता इंग्रजांच्या हुकुमशाहीला जाळू लागली. हा शब्दांनी घडवून आणलेला चमत्कार नाही काय ? शब्द लहान असतो आणि शब्द महानही असतो. क्षुद्र माणसाच्या तोंडचा महान वाटणारा शब्दसुद्धा अत्यंत खत्रूड असतो. पण महापुरुषाच्या शिवीलाही ओवीचं मांगल्य प्राप्त होतं. जेव्हा माणसं आपल्या अंत:करणाच्या गाभ्यापासून उत्कटतेनं बोलू लागतात तेव्हा त्यांच्या शब्दांना पराभूत करण्याचं सामर्थ्य कोणत्याच शक्तीत नसतं. पण पोटात एक आणि ओठात दुसरंच असं ढोंग करून शब्द वापरणाऱ्या दांभिकाच्या शब्दांना बाहेरून अत्तर चोपडलं असलं तरी त्यांचा गटारवास ते लपवू शकत नाहीत. असे शब्द लवकर मरून जातात. भ्रष्टतेतून उत्पन्न झालेल्या शब्दांना नष्ट झाल्याशिवाय गत्यंतर नसतं.

शब्द संहारही करतात आणि संरक्षणही करतात. त्यांच्या ठायी सृजनाची हिरवी शक्ती असते आणि विध्वंसनाची दाहकताही असते. बुद्ध, महावीर, ख्रिस्त यांच्या वत्सल शब्दांतून अन्यायाचं निवारण होऊ शकत होतं. दुष्टत्वाला आणि दांभिकतेला मान खाली घालावी लागत होती. समत्व आणि ममत्व, न्याय आणि निष्ठा यांनी ओथंबलेले असे

शब्द आजच्या जगात दुर्मिळ झाले आहेत. असे शब्द कदाचित कोणत्याही भाषेच्या शब्दकोशात सापडतील. पण ते कागदावरचे शब्द केवळ कागदी असतात. ज्याच्या जीवनातच हे शब्द मुरले आहेत असं जीवन मात्र आज कोठेच दिसत नाही. शब्दकोष भरलेले पण हृदयकोष मात्र रितेच राहिलेले. ही आजची शोकांतिका आहे. बगलेत सुरी लपवून ठेवलेल्या माणसाच्या तोंडी 'राम' हा शब्द असावा यासारखा शब्दांचा दुरुपयोग नसेल. नाटकी शब्दांना भाव येत आहे आणि प्रामाणिक शब्दांचा प्रभाव कमी होत आहे. हे दुःख कोणत्या शब्दांतून सांगावं? पण समर्थ माणसाच्या शब्दांत रक्षणाची शक्ती असते यांत शंका नाही. चुकून वाकडचा वाटेनं गेलेल्या एका तरुणीला काही तथाकथित 'पुण्यवान' लोक दगडांनी ठेचून मारीत होते. ती आक्रंदत होती. रक्तबंबाळ झालेली ती असहाय स्त्री प्राणाची याचना करीत होती. येशू ख्रिस्तानं हे दृश्य पाहिलं. तो महापुरुष म्हणाला,

'ही पापिणी आहे म्हणता? असं असेल तर जरूर हिच्यावर दगड फेकावेत. पण पहिला दगड ज्यानं कधी पाप केलं नाही त्यानंच टाकावा.' ख्रिस्ताच्या शब्दात त्याची न्यायबुद्धी होती. त्याप्रमाणंच त्याचं अपार वात्सल्य होतं. क्षमाभावही होता. त्या शब्दांतल्या साऱ्या सुंदर विचारांचा शीतल स्पर्श त्या संतप्त जमावाला झाला. हातातले दगड खाली गळून पडले. पेटलेली डोकी शांत झाली. सारी माणसं निघून गेली. त्या स्त्रीचे प्राण सुरक्षित राहिले. तिनं ख्रिस्ताच्या पायां-वर डोकं ठेवलं. तिचं जीवन आता अंतर्बाह्य बदलून गेलं. गांधीजींनी अन्यायाविरुद्ध एक ज्वाला शब्दांची फुंकर घालून पेटवली होती. येशू-ख्रिस्तानं येथे पेटलेली एक अन्यायी ज्वाला शब्दांच्या शीतल सिंचनानं विझवून टाकली होती. गांधीजींनी एकमेकांचे रक्त सांडणाऱ्या लोकांच्या हृदयातला धगधगता अग्नी अनेकवेळां विझवला, महापुरुषांचे शब्द फुलवणारेही असतात आणि अन्यायाला जाळण्यासाठी मनं पेटवणारेही असतात.

लेखक कवीच्या शब्दांतही अशी किमया असते. स्पर्शरूपरसगंध-मयी शब्दकला योजून रसिकांच्या मनांत ते विचारभावनांनी अनेक कंपनं निर्माण करतात. पण काही लोक शब्दद्वेष्टे असतात, शब्दांचाही मोह

पडायला रसिकता लागते. अरसिकांना शब्दांची सुंदरता समजत नाही. त्यांचा प्रभावही त्यांना जाणवत नाही. अशा लोकांबद्दल मी रामदासांच्या समर्थ शब्दांत इतकंच म्हणेन की, 'तो एक मूर्ख !' असा एक मूर्ख माणूस परवा मला म्हणाला,

'या लेखक कवींचं तुम्ही भारीच कौतुक चालविलं आहे. हे सगळे नुसते शब्दशूर असतात. अर्थ नसलेले उडाणटप्पू शब्द लिहून वाचकांची ते केवळ नजरबंदी करतात. तुमचे ज्ञानेश्वर काय, गडकरी काय किंवा शिरवाडकर काय सगळेच शब्दांच्या उतरंडी रचून ठेवणारे केवळ कसरत करणारे लोक आहेत. चारदोन भडक शब्द जुळवले की वाचक चाळवले जातात याची त्यांना कल्पना आहे. कवी, नाटककारांच्या शब्दांनी माणूस बदलत नाही. समाज आणि राष्ट्रही बदलत नाही, शब्दांनी शब्द मात्र वाढतात. तुमचं सारं साहित्य म्हणजे अर्थशून्य शब्दांचा एक बाजार आहे. हातात लेखणी घेतली की वाटेल तितके शब्द लिहिता येतात.'

मी थोडासा हसलो, या माणसाच्या कानाखाली हाताने शब्द काढून उत्तर द्यावे असा मला मोह झाला, पण हा हिंसेचा मार्ग मला मुळातून आवडत नाही. मी त्याला म्हणालो,

'लेखक-कवी अर्थहीन शब्दांच्या उतरंडी रचतात, असा तुमचा आक्षेप आहे. तुम्ही चार अर्थपूर्ण आणि परिणामकारक शब्द लिहू शकता का ? बाजीरावानं मस्तानीवर आणि मस्तानीनं बाजीरावावर आषक होणं नैतिकदृष्टचा योग्य नव्हे अशी तक्रार एखाद्या पाप्याच्या पितरानं करण्यापूर्वी आपला चेहरा आरशात नीट न्याहाळून पहावा. त्याच्यावर कुब्जादेखील कधी भाळणार नाही. असल्या माणसानं पराक्रमी पुरुषाच्या प्रणयविलासाबद्दल नाक मुरडणं जेवढं शहाणपणाचं आहे तेवढंच शहाणपण गडकरी, शिरवाडकरांच्या शब्दविलासाला नावं ठेवण्यात आहे. या प्रतिभावंतांनी आपल्या शब्दांनी प्रत्यक्ष पाषाणालासुद्धा पाझर फोडला. त्यांच्या शब्दांत अनेक अनुभवांचे सुगंध दाटलेले आहेत. मराठी सारस्वताच्या उद्यानात हे कस्तुरीमृग आहेत म्हणूनच एका धुंद सुवासानं हे उद्यान कोंदून गेलं आहे. अशा शब्दसम्राटांच्या वाणीचं पाणी मिळालं म्हणून तर साहित्याची बाग बहराला आली. शब्द

हे साहित्याचं मूलद्रव्य आहे. साहित्याचा संसार शब्दांच्या पायावरच उभा राहिला आहे. शब्द जीवनातूनच उमलतात आणि जीवनालाही शब्दांतूनच पोषण मिळतं. ज्यांना दोन शब्दही नीट लिहिता किंवा वाचता येत नाहीत त्यांच्या अंत:करणातही भावनेची पहाट शब्दप्रभूंनी फुलविली आहे. शब्दाला ब्रह्म म्हटलेलं आहे. शब्द आणि अर्थ हे शिव आणि शक्तीप्रमाणं एकत्र असतात असं कालिदासानं म्हटलं आहे. शब्दांचा प्रपंच विटून गेला तर खाली काहीच उरणार नाही. मेघांचा गडगडाट, विजेचा कडकडाट, पावसाची रिमझिम, सागराचा खळबळाट, पक्ष्यांचा किलबिलाट, झऱ्यांची झुळझुळ हे सारे शब्दच नव्हेत काय ? परमेश्वरानं निर्माण केलेल्या या शब्दांना भाव आणि अर्थ देऊन मनुष्यानं शब्दांची एक भव्य सृष्टी निर्माण केली. तुझ्यासारख्या करंट्याला शब्दांची किमया कळत नाही.'

त्या आक्षेपकाचा चेहरा आता बराच पडला होता. मला काहीतरी उत्तर देण्याचा तो प्रयत्न करू लागला पण त्याला शब्दच सुचेनात. त्यामुळं शब्दही न उच्चारता तो निघून गेला. माणसाला मिळालेल्या अनेक प्रकारच्या आश्चर्यकारक सामर्थ्यांत त्याला मिळालेली शब्दांची शक्ती सर्वात अधिक प्रभावी आहे, यात संशय नाही, शब्द आहेत म्हणूनच आम्ही आमच्या भावना व्यक्त करू शकतो, हजारो मैल दूर असलेल्या जिवलग व्यक्तीचा शब्द टेलिफोनवरून कानावर पडतो तेव्हा मन आनंदानं नाचू लागतं. आईच्या उदरातून बाहेर आलेलं बालक आपलं दु:ख किंवा सुख रडणाऱ्या शब्दांतूनच प्रकट करतं. प्रेमानं झपाटलेले पक्षी शब्दांतूनच एकमेकांच्या जवळ येतात. शब्द माणसांना जवळ आणतात आणि दूरही नेतात. शब्दांच्या उदरात सारे गंध सामावलेले आहेत. शब्द लोचट असतात, बोथटही असतात. पण त्याबरोबरच ते बाणेदार आणि आक्रमकही असतात. शब्द गातात तसेच रडतात. हसतात तसेच फसवतात. काही शब्द शालशिष्ट असतात आणि काही उघडे-नागडेही असतात. कधी शब्दांतून सूर्योदय होतो. साऱ्या दिशा उजळू लागतात. 'दुरितांचे तिमिर निरसून' टाकण्याची शक्ती एखादा ज्ञानेश्वर आपल्या शब्दांतून प्रकट करतो. शब्दांविषयी शब्दांतूनच किती सांगावं ?

## हम है राही प्यार के....!

कुठल्यातरी चित्रपटातलं अेक गीत पार माझ्या मनात जाअून बसलं आहे. तो चित्रपट मी पाहिलेला नाही. कवी आणि गायक कोण याचीही माहिती नाही. पण केव्हातरी रेडिओवरून ते गीत माझ्या कानी आलं आणि मनी रुजलं. गीतातलं स्वरसौंदर्य अुत्तम आहे. पण त्यातलं अर्थसौंदर्य मला अधिकच आवडलं. ज्या गीतात भावना आणि अर्थ यांचा अुत्कट संगम होतो ते गीत स्वरदृष्टचाही सहज लोकप्रिय होतं. गाण्याला केवळ सूर असून चालत नाही. सुराबरोबर भावार्थाची फुलंही गाण्यातून आपला सुगंध घेअून रसिकाच्या अंगावर हळुवारपणे पडावीत अशी माझी अपेक्षा असते. या क्षणी कितीतरी भावमधुर गाणी माझ्या मनात पिंगा घालीत आहेत. भावोत्कट गीतं विसरता येत नाहीत. ती मनाच्या खोल तळाशी राहतात. आज अचानक चांदण्यातून हिंडताना त्या गीताच्या ओळी आठवल्या. 'चाँदनी मिली तो, हम चाँदनी में सो लिये। जो भी प्यारसे मिला, हम अुसीके हो लिये॥' त्या गीताचा अेकूण आशय म्हणजे अेका स्वच्छंद, रसिक मनाचा आनंदी आविष्कार आहे. तो कवी म्हणतो 'जो कोणी प्रेमानं, आत्मीयतेनं मला भेटला तो माझाच झाला. मी केवळ प्रीतीचा भुकेला आहे. सुखाची फुलंही मी जितक्या अुत्साहानं टिपली तितक्याच अुत्सुकतेनं दुःखांच्या काट्यांचंही स्वागत केलं. सर्व रंगांची फुलं माझ्या आयुष्याच्या मालेत मी गुंफली

आहेत. मला माझं जीवनाचं गाणं प्रेमानं रंगवायचं आहे. जिथं मला सौंदर्य दिसतं, जिथं मला शुद्ध प्रीतीचं सान्निध्य मिळतं, तिथं मी पूर्णपणानं रमून जातो. सुखदुःखांपेक्षाही मला अुत्कट प्रेमाचा ध्यास आहे, या भावनेनं जो कोणी मला भेटतो तो सर्वस्वी माझा होतो आणि मीही त्याचा होतो.' अशा आशयाचं ते गीत पुन्हापुन्हा मनात अुचंबळून येतं. आता या गीताचं सामर्थ्य नेमकं कशात आहे ? स्वर, शब्द, भावविचार, आणि रचनातंत्र यांपैकी कोणत्या घटकामुळं हे गाणं झपाटून टाकतं ? दुधात साखर आणि केशर मिसळून त्यांचं अेक विशिष्ट रुचकर रसायन बनावं त्याप्रमाणं काव्याचे आणि गीताचे सारेच गुणधर्म या गाण्यात मिसळलेले दिसतात. पण मला यात कवीची व्यक्त झालेली जीवनदृष्टी अधिक महत्त्वाची वाटते. कदाचित त्यामुळंही हे गीत माझ्या मनानं जपून ठेवलेलं असण्याची शक्यता आहे.

जीवनाला मुक्तपणानं आणि निकोपपणानं सामोरं जाण्याची अेक दुर्मिळ, रसिक दृष्टी या गाण्याला व्यापून अुरली आहे. रडक्या दुःखवादाचं तुणतुणं अनेक गीतांतून आणि कवितांतून वाजवलं जातं ते लोकप्रियही होतं. रडकी गाणी अनेकांना आवडतात. अशा रडवणाऱ्या गाण्यांचं आणि नाटक सिनेमांचं मध्यंतरी पेव फुटलं होतं. रडवणारी पुस्तकं आणि सिनेमे आवडणारा अेक वर्ग आहे. बायकांच्या प्रकृतीला रडणं अधिक मानवतं असं म्हणतात. अेकदा वि. स. खांडेकर आणि वा. म. जोशी हे दोन कादंबरीकार अेका घरी पाहुणे म्हणून गेले. दोन लेखक घरी आले हे पाहून सुगृहिणीला आनंद वाटला. तिलाही वाचनाची आवड होती. जेवताना खांडेकरांनी तिला विचारलं,

'आमच्यापैकी तुम्हाला कुणाची पुस्तकं विशेष आवडतात ?' बिचारी सुगृहिणी पेचात पडली काय अुत्तर द्यावं ते तिला कळेना. ती म्हणाली, 'मला तुम्हा दोघांचंही वाङ्मय आवडतं' पण खांडेकरांनी पुन्हा प्रश्न केला, 'कुणाचं लेखन अधिक आवडतं ?' ती गोंधळून खाली पाहू लागली. वा. म. जोशी म्हणाले, 'मी सांगतो. तुम्हाला आमच्या भाअूसाहेब खांडेकरांचीच पुस्तकं अधिक आवडलेली असणार. बायकांना रडवणारं साहित्य जास्त आवडतं.' जाता जाता खांडेकरांच्या साहित्यावर

आणि स्त्रियांच्या मनोवृत्तीवर वा. मं. नी अेक शेरा ठोकून दिला. पण बहुधा त्यांचं म्हणणं खोटं ठरवता येत नाही. अेका कौटुंबिक नाटकातला अेक शोकपूर्ण प्रसंग रंगभूमीवर घडत होता. या नाटकाला स्त्रियांचीच गर्दी अधिक होती. ( या कारणासाठी मी त्या नाटकाला गेलो होतो असा गैरसमज कृपया होअू नये. ) रडवण्याची शपथ घेअूनच नाटकारानं ते नाटक लिहिलं होतं. रंगभूमीवरचा तो प्रसंग पाहताना कित्येक स्त्रियांनी डोळ्यांना रुमाल लावला. काही बायका रुमालात तोंड खुपसून फुसफुसू लागल्या. अेकीनं तर चक्क गळाच काढला. नाटकगृहाच्या व्यवस्थापकानं मनसोक्त रडण्यासाठी तिला घरी पाठवून दिलं. खरं सांगायचं तर ते नाटक शोकात्म नव्हतं. ते केवळ रडवं होतं. दुःखाला सुद्धा अेक प्रकारची अपरिहार्य अुदात्त बैठक असेल तरच ते दुःख माणसाच्या मनाला हेलकावे देतं. मुद्दामच अुगाळलेली कृत्रिम दुःखं नाटक-सिनेमात जेव्हा भडक रंगात समोर येतात तेव्हा हसण्याशिवाय गत्यंतर नसतं. माझं हे विधान हळव्या प्रेक्षकांना आवडणार नाही याची मला जाणीव आहे. सुख काय किंवा दुःख काय जेव्हा ते जीवनाच्या गाभ्यातून अुचंबळतं तेव्हाच ते माणसाच्या मनाचा तीव्र दाह करतं. असली दुःखं देखील अनुभवायला मन निकोप असावं लागतं. अति क्षुद्र सुख-दुःखांच्या चिंधोट्यांचं गाठोडं तुम्ही आम्ही सर्वसामान्य माणसं जन्मभर मस्तकावर वागवीत असतो. पण जाअू द्या हा विषय. ते मघाशी सांगितलेलं गीत मला त्यातल्या धीट आणि नीट, सहज आणि सुंदर, त्यागी आणि भोगी, तात्त्विक आणि रसिक, खेळकर आणि काहीशा खोडकर जीवनदृष्टीमुळं आवडलं, नुसतं आवडलं नाही तर ते स्मरणात ठाण मांडून बसलं.

'हम है राही प्यारके' असं म्हणून 'जो भी प्यारसे मिला' त्याचं मुक्त मनानं बाहू पसरून अत्यानंदानं स्वागत करण्याची ही मनोवृत्ती अुत्तरोत्तर ओसरत चालली आहे याचं मला दुःख वाटतं. वीस-पंचवीस वर्षं अेकत्र राहिलेले जिवलग मित्र अेखाद्या अति क्षुल्लक, निरर्थक कारणानं अेकमेकांचं तोंडही पाहात नाहीत. द्वेषानं आणि असूयेनं जळत राहाणंच पसंत करतात. असली कंगाल दृश्यं जेव्हा पाहायला मिळतात तेव्हा 'प्यारका राही' हे केवळ स्वप्नरंजन वाटतं. प्रेम हा माणसाचा

स्वाभाविक धर्म असताना वैराच्या वाटेनं वळणं घेत चाललेली मूर्ख माणसं माणुसकीचाच अवमान करतात. रामायणातला रावण हा आपण दुष्टत्वाचा अेक नमुना मानतो. पण तो राक्षस नव्हता. तसा असता तर सीतेला भ्रष्ट करायला त्यानं क्षणाचाही विलंब लावला नसता. चौदा चौकड्यांचा हा राजा सीतेसमोर प्रेमयाचना करीत होता. सीतेची दृष्टी आपल्याविषयी प्रेममय झाल्याशिवाय त्याला सीता नको होती. मी रावणाला सज्जन ठरवण्याचा प्रयत्न करीत नाही. कारण दुसऱ्याची बायको पळवणं हे कधीच सुजनत्वाच्या चौकटीत बसणार नाही. पण सीतेचं प्रेम त्याला हवं होतं. या अर्थानं तो अेक निराश आणि निर्दय प्रेमिक होता असं त्याच्या स्वभावाचं विश्लेषण करणं शक्य आहे. प्रचंड सामर्थ्य आणि अपार अैश्वर्य व विलक्षण अहंकार असलेला हा लंकाधिपती अेका वनवासी स्त्री समोर हतबल होअून प्रेमाची भीक मागतो हा प्रेमतत्त्वाचाच विजय नव्हे काय ? अेक महान् सत्ताधीश प्रेमयाचक म्हणून आपल्यासमोर अुभा आहे हे पाहून सुद्धा राज्य हरवून बसलेल्या आणि रानावनात भटकणाऱ्या रामावरच आपल्या नितांत प्रेमभावनेचा वर्षाव करणारी सीता हे प्रेमतत्त्वाचं सोज्ज्वळ आणि सुंदर रूप पाहून कुणाचंही मन अुल्हसित होअील. राम आणि सीता, कृष्ण आणि राधा हे खरे 'प्यारके राही' होते. प्रेमभावनेला त्यांनी प्रतिष्ठा दिली. प्रेमाचं दिव्य संगीत साऱ्या जगाला त्यांनीच अैकवलं.

'प्यारके राही' या शब्दांचा केवळ स्त्री-पुरुषांचं प्रेम अितकाच मर्यादित अर्थ मला अभिप्रेत नाही. या मर्यादित अर्थात देखील पुष्कळ भव्यता आहे. प्रणयाराधनाच्या काळात गुलगुलीत शब्दांतून आपलं झुळझुळीत प्रेम व्यक्त करणारी प्रेमपत्रं काही लोक लिहितात, प्रेम नसतानाही प्रेमपत्रं लिहितात. चार-सहा महिन्यांच्या काळात ती भाषा विरून जाते किंवा तीच भाषा आणि तेच प्रेमपत्र दुसऱ्या व्यक्तीला लिहिलं जातं. सरड्याप्रमाणं रंग बदलणाऱ्या प्रेमिकांना प्रीतीचा अर्थ कधीच कळत नाही. त्यांच्यासंबंधी बोलण्यातही अर्थ नाही. हे नुसतेच 'राही' असतात. कुठल्याही रस्त्यानं भटकत राहिलेले भटके अितकीच यांची किम्मत असते. भटकण्यालाही काही तात्त्विक निष्ठा असाव्यात. देशाच्या स्वातं-

त्यासाठी सुभाषचंद्र देशोदेशी भटकले. भारताचं स्वातंत्र्य हा त्यांच्या प्रेमाचा विषय होता. प्रेमपूर्तीसाठी हा स्वातंत्र्यसैनिक वणवणत राहिला. या प्रेमाच्या यज्ञात त्यानं स्वतःची आहुती दिली. अेखाद्या कलेवरील प्रेमामुळं स्वास्थ्याचं आयुष्य सोडून जगभर भटकत राहिलेले काही अवलिये मला माहीत आहेत. अेकदा अेक जर्मन तरुणी गोव्यात भेटली. मराठीत बोलण्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत होती. तिच्या जिभेला आमचे खणखणीत मर्दानी मराठी शब्द नीट पेलवत नव्हते. पण ती आपला देश सोडून मराठीतल्या संतकाव्याचा अभ्यास करण्यासाठी अिकडं आली होती. मी तिला विचारलं,

'संतांच्या कवितेचं तुम्हाला अेवढं आकर्षण कशामुळं वाटलं? आमच्या महाराष्ट्रात हे काव्य पिकलं. पण पिकतं तिथं विकत नाही. संतकाव्य वाचणं आणि अभ्यासणं हे वैचारिक दृष्टचा मागासलेपणाचं लक्षण आहे असं काही विचारवंत म्हणतात. अहो, बोलून चालून बैल-गाडीच्या युगात काही खेडवळांनी लिहिलेली ही कविता असा तिचा अुपहास होतो. तुम्ही तर अत्यंत प्रगत देशाच्या रहिवासी. संत काव्या-कडं-त्यातून मराठीतल्या साहित्याकडं कशा वळलात?'

ती जर्मन तरुणी थोडा वेळ गोंधळली. पण आपल्या मोडक्या तोडक्या मराठीत तिनं जे सांगितलं त्यावरून ती आमच्या ग्यानबा-तुकारामांच्या प्रेमात पडली असावी असं दिसलं. आमचा नामदेव, आमचा अेकनाथ साता समुद्रापलीकडल्या या पाश्चात्य युवतीला आपल्या भाषेनं आणि विचारानं वश करून घेतो याचा मला अभिमान वाटला. ती म्हणाली, 'टुकारामाच्या अभंगाट ह्यूमन व्हॅल्यूज् आहेत. त्याची पोअेट्री डेहूच्या नदीत बुडवली तरी त्यातल्या व्हॅल्यूज् बुडत नाहीत.' आणि असं म्हणून तिनं तुकारामाचा 'आनंदाचे डोही....' हा अभंग आपल्या किनऱ्या आवाजात, शब्दांची मोडतोड करीत पाठ म्हणून दाखवला. 'धन्य तो टुकोबा आणि त्याचे डेहूगाव!' संत वाङमयातून प्रकट झालेल्या मानवी मूल्यांचा आणि जीवनदृष्टीचा अभ्यास करण्यासाठी ही अैन पंचविशीतली बाअी पैशाचं फारसं पाठबळ नसताना आपला देश सोडून आमच्या देशात आली. जिथं ड्यानेश्वर आणि टुकाराम जन्माला आले होते त्या भूमीचं दर्शन घेण्यासाठी ती प्रेमभरानं भटकत होती.

'हम है राही प्यारके' असंच जणू ती सांगत होती. प्रेमिकाचा हाही अेक नमुना आहे. केरळविद्यापीठातल्या अेका अिकॉनॉमिक्सच्या प्राध्यापिकेनं भीमसेन जोशीनं गायिलेली तुकारामाची अभंगवाणी अैकून मला म्हटलं होतं, 'आय लव्ह महाराष्ट्र बिकॉज ऑफ तुकाराम ओनली.' आम्ही देखील रवीन्द्रनाथ आणि शरदबाबू यांच्यामुळं बंगालवर प्रेम करतो. पुरंदरदासांमुळं कर्नाटक आमचा जिवलग बनला. वाङ्मयाचं प्रेम अखेर साऱ्या मानवतेला अेकत्र जोडू शकतं. कलावंतांनी शेकडो तुकड्यांत विभागलेली माणसं अेकत्र जोडून दाखवली. पण स्वार्थी राजकारण्यांनी मात्र ती फोडून दाखवली. चार्ली चॅप्लीन नावाचा अेक कलंदर कलावंत जन्मानं अिंग्लिश होता. पण त्याच्या विलक्षण कलेनं पंचखंडातली काळी, गोरी आणि पिवळी माणसं तो मानवतेच्या धाग्यानं अेकत्र गुंफीत होता. बालकांपासून वृद्धांपर्यंत आणि अडाण्यांपासून पंडितांपर्यंत सारे लोक हा कलावंत पडद्यावर दिसला की विलक्षण आनंदानं टाळ्यांचा कडकडाट करीत होते. त्याच्या अभिनयानं सर्वांच्याच अंत:करणात कारुण्याची सतार झंकारत राहायची. आणि त्याच्या विदूषकी बावळटपणामुळं प्रचंड हास्याच्या कल्लोळात ही जनता बुडून जायची. व्हाअिट मॅन असो किंवा काला आदमी असो, सर्वांच्या हृदयात अेकाच मानव्याचे नितांत-सुंदर सूर भरले आहेत याची प्रतीती आम्हाला या श्रेष्ठ कलावंतानं दिली. ही प्रतीती देण्याचं दिव्य सामर्थ्य त्याच्या प्रेमवृत्तीमुळंच त्याच्या ठिकाणी असळत होतं. त्याचं आत्मचरित्र जेव्हा मी वाचलं तेव्हा कित्येक ठिकाणी माझे डोळे पाणावले. चार्ली चॅप्लीनच्या अंतर्यामात दु:खितां-बद्दलचा अेक तीव्र कळवळा होता. माणसांविषयी त्याला अुत्कट प्रेम होतं. तो देखील जणू म्हणत होता, 'हम है राही प्यारके, हमसे कुछ ना बोलिये। जो भी प्यारसे मिला। हम असीके होलिये।

आता असे कलावंत दुर्मिळ झाले आहेत. आता आजचा 'लोकप्रिय' कलावंत आपल्या लोकप्रियतेचं भांडवल करून लाखो रुपये मिळवतो. जमलेला काळा पैसा तो परदेशातल्या बँकेत नि:शंकपणे ठेवतो आणि लोकप्रेमाची ढोंगी नाटकं करीत लोकांचा प्रतिनिधी म्हणून लोकसभेतही जाअून बसतो. अेखादा कलावंत भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झाले तरी आपलं मुख्यमंत्रीपद सोडायला तयार होत नाही. हे

देखील 'प्यार के राही' च असतात. सत्ता हीच यांना प्यार असते. सत्तेची खुर्ची ही यांची चिरतरुण प्रेयसी असते. तिच्या मिठीत हे 'प्यार के राही' राहाण्यात धन्यता मानतात.

भ. महावीरांच्या दिव्य जीवनातला अेक प्रसंग. त्यांच्या धार्मिक प्रचाराला विरोध करणाऱ्या काही लोकांनी आपल्या मार्गातला हा काटा दूर करण्याचं ठरवलं. अेके दिवशी हातात लाठ्या-काठ्या घेऊन हे महावीरांना मारण्यासाठी त्यांच्या समोर आले. महावीरांच्या मुद्रेवर पराकाष्ठेची प्रसन्न शांती होती. ओठावर प्रेममधुर स्मित होतं. दृष्टीत स्नेहभाव होता. आपल्या मारेकऱ्यांना ते म्हणाले, 'या, मी तुमचं स्वागत करतो. तुमच्या क्षोभाला मी कारण झालो याचं मला दु:ख होतं.' त्या प्रशांत, प्रेमळ तपस्व्याच्या तप:पूत वाणीतून प्रेमगंगा वाहात होती. मारायला आलेल्या लोकांबद्दल त्यांच्या चित्तात क्रोधाची किंवा भीतीची लहानशीही रेषा अुमटली नाही. मुखमंडलावरचं स्मित कायम होतं. पायाजवळ येणाऱ्या अेका लहानशा कीटकाला त्यांनी अत्यंत हळुवारपणानं तळहातावर घेतलं. आणि जिथं कुणाचं पाअूल पडणार नाही अशा सुरक्षित ठिकाणी त्याला अलगद ठेवलं. ते म्हणाले,

'सर्वांनाच सुख शांतीनं जगण्याचा निसर्गदत्त अधिकार आहे. बोला, माझ्या मित्रांनो, मी तुमच्यासाठी काय करावं? प्रेमपथावरून चालण्याचा प्रयत्न प्रत्येक पथिकानं करायचा आहे. तुमचे आमचे रस्ते अलग नाहीत. तसे असतील तर ते आपण सलग करू या.' महावीरांच्या प्रत्येक शब्दात प्रेम आणि आत्यंतिक जिव्हाळा होता. कडक अुन्हाळ्यात अेखादी सुगंधी, शीतल वाऱ्याची झुळुक अंगांगांना स्पर्शून जावी तसं त्यांचं बोलणं होतं. मारेकऱ्यांनी हातातल्या काठ्या भिरकावून दिल्या. त्यांचे डोळे आता पाझरत होते. वृत्ती निवल्या होत्या. महावीराच्या चरणांवर लोटांगण घेत ते म्हणाले, 'प्रभो, आम्हाला क्षमा करा. आम्ही चुकलेल्या रस्त्यानं चाललो होतो. प्रेमाचा आणि शांतीचा हा मार्ग आपल्यामुळं आम्ही पाहू शकलो. 'दुष्मनी के राही' आता 'प्यार के राही' बनले होते.

कधीकधी 'हम है राही प्यार के' हे सुंदर गीत आठवतं आणि मन सैरभैर होतं.

## प्रशंसा - पुराण

*          *

गेल्या आठवड्यातली गोष्ट. अेक अपरिचित गृहस्थ मला भेटण्यासाठी आले. दृष्टभेट होताच अत्यंत विनयानं, आर्जवी मुद्रेनं मला नमस्कार केला. स्थानापन्न झाल्यावर ते माझ्याशी फारच अदबीनं बोलू लागले. माझ्या ठिकाणी असलेल्या आणि नसलेल्या गुणांची त्यांनी अतिशयोक्त शब्दांत मुक्तकंठानं स्तुती केली. ते म्हणाले, 'तुम्ही समाजभूषण आहात. ( समाजभूषण हा अेक अुडाणटप्पू शब्द. कुणाच्याही बाबतीत वापरता येतो. वापरून गुळगुळीत आणि अर्थशून्य बनलेला हा शब्द खोटी स्तुती करताना विशेष अुपयुक्त. ) तुमच्या कार्याचं आणि गुणांचं वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. ( हा आणखी अेक बेरकी वाक्यप्रयोग. धादांत खोटं बोलताना मुत्सद्दी लोक या वाक्याचा सहज अुपयोग करतात. अैकणारा मूर्ख असला तर त्याला या वाक्यानं गुदगुल्या होतात. ) आम्हाला तुमच्याबद्दल फार आदर वाटतो. तुमच्यासारखी माणसं आहेत म्हणून तर जगाचं बरं चाललं आहे. ( माझ्यामुळे जग बरं चालावं हे अैकून मला आश्चर्य वाटलं. ) आज तुमचं दर्शन घडलं याचं समाधान झालं, मी तुम्हाला ओळखतो. पण तुम्ही मला ओळखत नसाल म्हणून प्रथम माझा परिचय करून देतो.'

त्यानं आपल्या कामाचं स्वरूप सांगिल्यावर मला त्याच्या स्तुतिस्तोत्र पठणाचा अुलगडा झाला. खोट्या गौरवाचे चार अर्थहीन

शब्द माझ्यावर अुधळले म्हणजे मी सहज विरघळून जाअीन असं त्याला वाटावं हा माझा अपमान होता. त्यानं केलेली स्तुती हास्यास्पद आहे हे मला समजत होतं. आपल्या नापास झालेल्या मुलाला वरच्या वर्गात घालण्याची मी खटखपट करावी, मुख्याध्यापकांना त्या बाबतीत मी गळ घालावी असं सांगण्यासाठी या गृहस्थांनी माझ्या मस्तकावर नाटकी शब्दांच्या अक्षता टाकल्या होत्या. मुख्याध्यापक माझे मित्र होते त्यामुळं हे काम माझ्याकडून होणार असा त्याचा अंदाज होता. अेकूण माझ्या स्तवनामागील त्यांचा 'आंतरः कोऽपि हेतुः' असा होता तर!

मी त्या सद्गृहस्थांना स्पष्टपणानं सांगितलं, 'हे पहा तुमच्यासारख्या महनीय व्यक्तीच्या स्तुतीचा विषय होण्यासारखं माझ्या हातून आजपर्यंत काहीही घडल्याचं मला आठवत नाही. दुसरं असं की मुख्याध्यापकांच्या कामात ढवळाढवळ करण्याअितका मी मूर्ख नाही. जवळ जवळ सर्वच विषयांत नापास झालेल्या विद्यार्थ्याला वरच्या वर्गात घालणं ही शिक्षणाची विटंबना आहे.' आता त्या गृहस्थाच्या मुद्रेवरचे विनयाचे भाव पूर्णपणे बदलून गेले. तो ताडकन् खुर्चीवरून अुठत म्हणाला,

'फारच घमेंडखोर दिसता तुम्ही! अेका विद्यार्थ्याचं कल्याण व्हावं यासाठी दोन शब्दही खर्च करण्याची तुमची तयारी नाही. तुम्ही अितके माणूसघाणे असाल असं मला वाटलं नव्हतं.'

आता त्या गृहस्थाचा नम्रतेचा, आर्जवाचा मुखवटा गळून पडला होता. थोड्याच वेळापूर्वी मी त्याच्या दृष्टीनं 'समाजभूषण' होतो. आता 'माणूसघाणा' झालो. माझ्यात अितक्या लवकर परिवर्तन होअू शकतं याची मला कल्पना नव्हती, स्वार्थ साधायचा असला तर माणसं गोड गोड शब्दांची साखरपेरणी करतात. अेरवी चुकूनही 'रसग्रहण' करीत नाहीत. पण यात त्यांचा तरी काय दोष आहे? खोटे का असेनात पण दोन गौरवाचे शब्द कानांवर पडले की सारेच सुखावतात. कुणीतरी आपल्याला मान द्यावा. प्रतिष्ठेचं आसन द्यावं. आपण केलेल्या कार्याचं भरघोस शब्दांतून वर्णन करावं असं जर साऱ्यांनाच वाटत असेल तर मग खोट्या, नाटकी स्तुतीचे पुष्पहार घालण्यासाठी सज्ज असलेल्या

धूर्त लोकांनी मागं का राहावं? काहीतरी नाटक करून त्यांना आपला कार्यभाग साधायचा असतो. पण स्तुतीचं नाटकसुद्धा कलात्मक कौशल्यानं सादर केलं पाहिजे. ते भडक झालं की मग त्याचा विपरीत परिणाम होतो. अेका सर्वसाधरण कवीच्या काव्य संग्रहाचं प्रकाशन करताना अेक वक्ते म्हणाले,

'महाकवी कालिदासानंतर अितकी सुंदर काव्यरचना केवळ आमच्या छगनभाअू अुंदीरगावकरांनीच केली आहे. आज कालिदास असता तर त्यानं छगनभाअूंची पाठ थोपटली असती. अनेक शतकांतून असा अेखादाच श्रेष्ठ कवी जन्माला येतो.' या अप्रस्तुत प्रशंसेमुळे श्रोत्यांची चांगलीच करमणूक होत होती. ते अुपहासाने टाळ्या वाजवीत होते. 'वाहवा' चे अुद्गार काढीत होते. वक्ते महाशय अशा समजुतीत होते की, आपलं भाषण भलतंच रंगत चाललं आहे. अखेर श्रोत्यांनी त्यांना 'प्रेमानं' खाली बसवल्यामुळं त्यांचा निरुपाय झाला. कोणत्याही सामान्य कवीला कालिदासाच्या पंक्तीत अेकदम प्रवेश देणं म्हणजे औदार्याची पराकाष्ठा झाली. कालिदासाचाच यात अवमान होतो हे स्तुतिपाठकांच्या लक्षात येत नाही. मूर्खांनी केलेल्या प्रशंसेपेक्षा जाणकाराची टीका अधिक चांगली असते, खरं तर ती दुर्मिळ असते. पण जाणत्यानं केलेलं दोषदिग्दर्शन बहुधा लोकांना रुचत नाही. कुणी सद्धेतूनं दोष दाखवला तरी त्याच्या प्रामाणिक हेतूबद्दल शंका घेण्यात येते. टीका जाणूनबुजन मत्सरी वृत्तीनं केलेली आहे असं त्यांना वाटतं. स्तुती आणि निंदा यांच्यापलीकडं गेलेले काही लोक असतात. अेक समाजसुधारक मला म्हणाले,

'माझ्या कार्याला सुरवात केली तेव्हा सर्व बाजूंनी माझ्यावर प्रतिकूल टीकेचा, निंदानालस्तीचा वर्षाव झाला. मला कमालीचं नैराश्य आलं. कार्य सोडून घरात बसलो. या कुचाळखोर जगाशी संबंधच नको असं मी ठरवलं. पण लवकरच माझी चूक मला समजली. तुकारामांनी म्हटलं आहे. 'निंदकाचे घर असावे शेजारी' खरं सांगायाचं तर शेजारी नेहमीच निंदक असतो. कुणाचे भलेबुरे शब्द अैकून मनावर परिणाम करून घ्यायचा म्हटलं तर काहीच कार्य करता येणार नाही. कार्यकर्त्याचं कातडं गेंड्याचं असावं. कठोर शिव्याशापांचे भालेसुद्धा

त्या कातडीपुढं बोथट ठरले पाहिजेत. सुरवातीला हे अवघड वाटायचं पण आता कुणी मानपत्र दिलं काय किंवा अंगावर चार दगडधोंडे टाकले काय मला त्याचं खरंच काही वाटत नाही.'

या समाजसुधारकाची ही 'स्थितप्रज्ञ' वृत्ती खरोखरच आदर्श आहे. पण ही वृत्ती जोपासायला फार मोठी तपश्चर्या करावी लागते. गौरवाचे शब्द राहू द्या पण निदान निष्कारण निंदा तरी करू नका ही अपेक्षा असते. स्वार्थासाठी कुणाचीही स्तुती करणारा मनुष्य कुणाचीही निंदानालस्ती करताना कचरत नाही. असल्या दुष्ट निंदेच्या चक्रातून रामकृष्णांचीही सुटका झाली नाही. सीतेला वनात सोडण्याची कृती रामाला करावी लागली, याचं मूळ अेका धोब्यानं केलेल्या रामसीतेच्या निंदेतच आहे. भवभूती या संस्कृत कवीनं म्हटले आहे, 'स्त्रियांची आणि सज्जनांची निंदा करायला व त्यांच्यावर चिखलफेक करायला दुष्ट लोकांना कारणाची जरूर नसते. सज्जनपणा हाच त्यांच्या द्वेषाचा विषय होतो. स्त्री दिसली की ती बदचालीची असणारच अशी या दुर्जनांची धारणा असते.' भवभूतीचं हे म्हणणं त्याच्या समाजनिरीक्षणाचं द्योतक आहे. सूर्यावर थुंकणारे अतिशहाणे कमी नसतात. आपण त्याच्यावर थुंकण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला याची त्यांना अुलट फुशारकी वाटते. फुले आणि आगरकर या समाजनिष्ठ सुधारकांना तर निंदेच्या वणव्यात होरपळावं लागलं. स्तुती आणि निंदा या दोन्हीकडं दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती ज्याच्या ठायी निर्माण होते तोच खरा सुखी मनुष्य म्हटला पाहिजे.

अेकदा अेक सत्ताधारी अधिकारी मला म्हणाले 'आज माझ्या हातात अधिकार आहे. मी मनात आणलं तर सत्तेच्या बळावर बरेवाअीट करू शकतो. म्हणून तर माझ्या भोवती खुषमस्कऱ्यांनी वर्तुळ केलं आहे याची मला जाणीव आहे. सत्तेच्या कवच कुंडलांचा हा परिणाम आहे. ज्या दिवशी ही कवचकुंडलं नाहीशी होतील त्या दिवशी हेच लोचट स्तुतिपाठक माझी निंदा करायला पुढं सरसावतील. याचा अर्थ यांची स्तुतीही निरर्थकच आहे. 'साहेब, आपल्यासारखा मोठा माणूस दुसरा कोण आहे?' अशी बेवकूफ भलावण करणारे हे लोक अुद्या माझ्याकडं ढुंकूनही पाहाणार नाहीत. हे मी मनातल्या मनात ओळखून

आहे. सत्ताधाऱ्यांच्या भोवती नेहमीच स्वार्थी लाचारांचा तांडा जमत असतो.'

लोकशाहीर रामजोशी यांची अेक कविता मला आठवते. त्यांनी म्हटलं आहे, 'ताट बसाया, पाट रुप्याचे, दाट त्यामध्ये दूधरवा ! धनावयाला बसेल घसरा मग विसरा हो गोड रवा' सगेसोयरे सुद्धा आपली सरबराअी करताना, चांदीचं ताट पाट देतांना आपली श्रीमंती आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचा विचार करतात. पैसा आणि प्रतिष्ठा नसेल तर नुसत्या 'माणसाचं' आदरातिथ्य होत नाही. 'दाम करी काम आणि बीबी करी सलाम' असले वाक्प्रचार सार्वत्रिक अनुभवातूनच निर्माण झाले. पण स्तुती आणि टीका सर्वस्वी अनुचित असते असं मात्र मला म्हणायचं नाही. या दोन्ही गोष्टी अवास्तव, अतिरेकी व स्वार्थमूलक असू नयेत. त्यांच्या मुळाशी विधायक हेतू असावा. कधी कधी माफक व अुचित स्वार्थानं या गोष्टी घडल्या तर त्या फार दोषास्पद ठरणार नाहीत. अुदाहरणार्थ केवळ बायकोला खूष करण्यासाठी तिच्या सौंदर्याची अतिशयोक्तीपूर्ण स्तुती करण्याचा 'मुत्सद्दीपणा' नवऱ्याला आवश्यक वाटला तर त्याबद्दल कशाला तक्रार करायची? तो त्यांचा खाजगी प्रश्न आहे. अशी तोंडदेखली स्तुती करतानासुद्धा तारतम्य ठेवलं पाहिजे. अेकदा अेका नवऱ्याला बायकोची स्तुती करण्याची कधी नव्हे ती लहर आली. भोजनाच्या वेळी बहुधा पत्नीच्या स्वयंपाकावर खरपूस टीका करणारा हा पतिदेव तिला सहज म्हणाला, 'वा अुत्कृष्ट, आजची भाजी तर लाजवाब झाली आहे. अितकी रुचकर फर्मास भाजी मी माझ्या आयुष्यात प्रथमच खाल्ली. भाजी करण्याची जर आमच्या विद्यापीठानं परीक्षा घेतली तर त्यात या भाजीला मी शंभरापैकी अेकशेअेक गुण देअीन. जणू अमृताची चव भाजीला आली आहे. अभिनंदन !'

ही अफाट स्तुती अैकताच पत्नीच्या कपाळावर आठ्या पसरल्या. स्तुतीच्या अेकेक शब्दानं तिचा तिळपापड होत होता. अखेर तिला 'रसग्रहणाचे' हे शब्द असह्य झाले. हातातलं भाजीचं भांडं दाणकन् तिनं जमिनीवर आदळलं आणि तारस्वरात ती गरजली,

'बरोबरच आहे! ही भाजी तुम्हाला आवडणारच! कारण ती शेजारणीनं दिलेली आहे ना!' तिच्या तोंडाचा पट्टा बराच वेळ चालू होता. पतिदेव मात्र विजेचा शॉक बसल्याप्रमाणं अवाक् झाले. स्तुती कशी करावी, कितपत करावी, कुणाची करावी आणि कोठे करावी याची अक्कल नसली म्हणजे असा अनवस्था प्रसंग ओढवणारच! काही वेळां मात्र प्रशंसेचे शब्द टॉनिकसारखे अुपयोगी पडतात. अेका कवीच्या लेखनात सुरुवातीला अनेक हास्यापद दोष असायचे. पण त्याचे गुरू त्याला अुत्तेजन देण्यासाठी त्याचा गौरव करीत असत. 'तुझी काव्यशैली अुत्तम आहे. तुझ्या कवितेतले भाव अत्यंत योग्य शब्दांतून तू व्यक्त करतोस. त्यामुळं कविता परिणामकारक होते.' अशी स्तुती ते मधून मधून करीत असत. कौतुकाचे हे शब्द कवीच्या काव्यशक्तीला चालना देअू लागले. तो अधिकाधिक निर्दोष आणि सुंदर रचना करू लागला. पण सुरुवातीलाच त्याच्यावर कठोर टीका झाली असती तर कवित्वाचा तो कोवळा अंकुर करपून गेला असता. प्रशंसेचं रक्तपाणी घातल्याशिवाय कर्तृत्त्वाचं रोप वाढत नाही हेच खरं!

## येथे पाहिजे जातीचे!

परवाच अेका शहरात ज्ञानेश्वरांच्या कार्याविषयी आणि साहित्या-विषयी मी दोन व्याख्यानं दिली. दोन्ही दिवशी श्रोत्यांची संख्या संयोजकांनी अपेक्षा केली त्यापेक्षा अधिक होती. दूरदर्शनच्या वाढत्या प्रसारामुळं अलीकडं श्रोत्यांच्या संख्येवर परिणाम झाला आहे अशी ओरड काही ठिकाणी अैकू येते. पण हा अनुभव त्या शहरात मात्र सुदैवानं मला आला नाही. याचा अर्थ ज्ञानेश्वर हा सातशे वर्षांनंतरही ताजा टवटवीत राहिलेला विषय आहे यात शंका नाही. काही व्यक्ती आणि विषय नित्यनूतन असतात. त्यांच्या लोकप्रियतेला कधी ओहोटी लागत नाही. ही दोन्ही व्याख्यानं अैकल्यानंतर अेक श्रोता मला म्हणाला,

'तुमची व्याख्यानं चांगली झाली. पण ज्ञानेश्वरांसारख्या अेका अुच्चवर्णीय संताचा तुम्ही गौरव करावा ही मला तुमच्या प्रतिगामी वृत्तीची खूण दिसते. वस्तुतः तुम्ही तुकाराम, चोखामेळा, नामदेव या कनिष्ठ स्तरातल्या संतांच्या वाङमयाविषयी बोलायला हवं होतं. श्रेष्ठ वर्णीय संत किंवा विचारवंत यांचं कौतुक आता पुरे झालं.'

मला त्याचे शब्द धक्कादायक वाटले. माणसं कोणकोणत्या पातळीवर जाअून विचार करतील हे सांगता येत नाही. काहीशा संतप्त स्वरात मी त्याला म्हणालो,

'तुमचा दृष्टिकोनच प्रतिगामी आहे. नुसता प्रतगामी नव्हे तर तो काहीसा विकृतही आहे. ज्यांनी जातीपातींपेक्षा माणसाची माणुसकी श्रेष्ठ मानावी असा विचार सतत मांडला त्या श्रेष्ठ संतांच्या कपाळावरच जातीची लेबलं तुम्ही चिकटवीत आहात. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, कबीर वगैरे संतांकडं जातीय दृष्टीनं पाहाणं हा अेक लाजिरवाणा गुन्हा आहे. सामान्य माणूस संताला सुद्धा जात चिकटवतो ही दुर्दैवाची गोष्ट आहे. दोन दिवस माझी भाषणं अैकून त्यांतून तुम्ही हा अित्यर्थ काढला असेल तर तुमचं दुर्भाग्य आहे. कोणताही माणूस केवळ मनुष्यत्वाच्या तराजूनं तोलायचा असतो. तुमच्या मनात मूळ धरून बसलेली सांप्रदायिक विचारांची मोजमापं आता खरं तर पार गंजून गेली आहेत. आकाशाला ज्याप्रमाणं कशाचाच लेप लागत नाही, ते सदैव निर्लेप असतं त्याप्रमाणं संतालाही जातीपातीचा लेप लागत नाही. खळाळत निघालेली नदी आपल्या पात्रातून पाणी घेणाऱ्याची जात किंवा धर्म कधी पाहात नाही. तहानलेल्याची तहान भागवणं हाच तिचा धर्म असतो. विशाल वृक्षाची सावली ब्राह्मणांसाठी नसते, तशीच ती शद्रांसाठीही नसते. ती थकल्या भागल्या माणसांसाठी असते. मला प्रतिगामी ठरवताना तुम्हीही थोडं आत्मपरीक्षण केलं असतं तर बरं झालं असतं. आणि दुसरं असं की मी जसा ज्ञानेश्वरांवर बोलतो तसाच चोखामेळा आणि तुकाराम यांच्या-वरही लिहितो व बोलतो. तुमच्यासारख्या शंकेखोराचं समाधान करणं मात्र मलाच काय ब्रह्मदेवालाही अशक्य आहे. भर्तृहरीनं अेका ठिकाणी म्हटलं आहे, 'प्रक्षुब्ध झालेल्या विषारी नागाला हातात घेअून शांत करणं अेक वेळ शक्य आहे. चिमूटभर साखरेनं खारट समुद्र गोड करणंही शक्य आहे. पण तुमच्यासारख्याची समजूत घालणं मात्र अशक्य कोटीतलंच कार्य आहे."

तो 'चिकित्सक श्रोता' थोडासा लज्जित होअून निघून गेला. पण मी मात्र अस्वस्थ झालो. अेका वेड्या माणसानं अुपस्थित केलेल्या शंकेमुळं मी आपली मन:शांती गमावण्याचं काहीच कारण नव्हतं. पण हा श्रोता खरोखरच वेडा होता काय? पुष्कळसे लोक या श्रोत्याच्या पातळीवरचेच असतात. त्यांचे सारेच हिशेब जात आणि संप्रदाय

अितकंच नव्हे तर अुपजात आणि पोटजात या मोजमापांतूनच होत असतात. मला अनेकांनी माझी जात विचारली. अेकजण मला म्हणाला, 'तुमच्या नावावरून नीट लक्षात येत नाही म्हणून विचारतो तुमची जात कोणती?' मी हसून म्हणालो, 'मला, कोणत्याही जातीचा समजलात तरी माझं त्यामुळं काहीही बिघडणार नाही.' तरीही तो गळेपडूणानं म्हणाला, 'तरी देखील आपल्याला कुठली तरी जात असतेच. आता सांगा. तुम्ही कोणत्या जातीचे आहात? अहो, देवालासुद्धा जात असते. संतांनादेखील जात असते.'

या 'चिकट जातीच्या जातिवंत' माणसाला थांबवण्यासाठी मी म्हणालो, 'संत कबीराचं अेक वचन तुम्हाला सांगतो,

जाति न पूछो साधुकी। पूछ लीजिए ज्ञान
मोल करो तरवार का। पडा रहन दो म्यान

कबीर हिंदू होता की मुसलमान होता? त्याच्या अज्ञानी भक्तांनी त्याच्या कपाळावर आपापल्या मतांप्रमाणं भिन्न भिन्न जातींचे शिक्के ठोकले. पण कबीर मात्र अंतर्बाह्य अेक निरुपाधिक माणूस होता. संत होता. आपल्या काव्याच्या माध्यमातून परमेश्वराची पूजा करणारा अेक महान कलावंत होता. कबीराच्या जातीबद्दल वाद करणारे निर्विवाद मूर्ख आहेत. पण काय असेल ते असो, मूर्खांचं बहुमत वाढत आहे. शहाणे मात्र अुत्तरोत्तर अल्पसंख्य, होत चालले आहेत. आज ज्याप्रमाणं, 'देवीचा रोगी कळवा, हजार रुपये मिळवा.' असं भिंतींभिंतीवर लिहिलं आहे त्याप्रमाणं, 'शहाण्याचा पत्ता कळवा, लाख रुपये मिळवा.' अशी लाखमोलाची जाहिरात कदाचित करावी लागेल.

अेकदा अेक पुढारी व्यासपीठावरून बोलत होते. व्यासपीठावर गांधी आणि आंबेडकर यांची हार घातलेली छायाचित्रं ठेवण्यात आली होती. पुढारी महाशय आपल्या मिठ्ठास वाणीनं श्रोत्यांना सांगत होते 'बंधूनो! कशाची जात आणि पोटजात घेअून बसलात? सगळी माणसं सारखीच आहेत. मी कधीच कुणात फरक केला नाहीं. अरे, कशाचा फरक करायचा? तुमचं माझं रक्त अेकच आहे.' त्याबरोबर श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. कुठं टाळ्या वाजवायच्या हे त्या ट्रकमधून

आणलेल्या श्रोत्यांना पढवलेलं होतं. त्यामुळं श्रोते योग्य त्या ठिकाणी टाळ्या देत होते आणि पुढाऱ्याच्या नावाचा जयजयकार करीत होते. भाषण मोठं परिणामकारक झालं. पुढारी महाशय मोठ्या खुषीनं व्यासपीठावरून खाली अुतरले. आणि आपल्या खास विश्रामगृहाकडं गेले. ते निवडणुकीला अुभे होते. त्यांनी सेक्रेटरीला सांगितलं.

'सकाळी आम्हाला लवकर अुठवा. थोडं कठीण काम आहे ते. कारण रात्री आम्हाला बरीच कामं करावी लागतात. झोपायला अुशीर होतो.' पी. अे. घाअीघाअीनं म्हणाला, 'होय साहेब! काळजी करू नका. रात्रीची सगळी व्यवस्था केली आहे. अस्सल स्कॉच आणली आहे.' पुढारी खेकसून म्हणाले, 'ते तर असेलच हो! पण तरीही सकाळी लवकर अुठवा, फुले मंडअीत जाअून फुल्यांच्या पुतळ्याला हार घालायचा आहे. नंतर दुसऱ्या चौकात सावरकरांच्या पुतळ्याला हार घालायचा आहे. त्यानंतर नअू वाजता अेका मशिदीला भेट द्यायची आहे. अहो, सगळ्या जातीचे लोक आम्हाला सांभाळावे लागतात. त्याबरोबरच आपल्या जातीचेही लोक अुद्या भेटायला येणार आहेत. ह्या मतदार संघात आपल्या जातीची दहा हजार मतं आहेत, ती सगळी मलाच मिळतील. अहो जातीशिवाय कुठं निवडणुका जिंकता येतात का? 'येथे पाहिजे जातीचे,' असं कुठल्या तरी संतानं म्हटलंच आहे.' पी. अे. साभिप्राय हसला आणि म्हणाला,

'बाकी साहेब, आजचं भाषण झकास रंगलं. लोक जाम खूष होते.' 'जातीयवादाचं मढं गाडल्याशिवाय आम्ही राहाणार नाही, ह्या तुमच्या वाक्याला प्रचंड टाळ्या पडल्या.' आता पुढारी देखोल स्तुतीनं हरभऱ्याच्या झाडावर चढले. आणि म्हणाले,

'बरं, आता आमच्या कार्यक्रमाचं होअू द्या. आजची व्यवस्था चांगली आहे ना?' पी. अे. प्रसन्नतेनं म्हणाला, 'खास अिम्पोर्टेड माल आपल्याला भेट म्हणून शेटजींनी पाठवून दिला आहे. अगदी जातिवंत आहे. अस्सल स्कॉच, अेकदम अुच्चवर्णीय.' पुढारी महाशय खळखळून हसले. ते स्वत:वर फारच संतुष्ट होते. जातीयवाद गाडण्याची भीष्म-प्रतिज्ञा करून त्यांनी टाळ्या मिळवल्या होत्या. आणि आता मतदार

संघात आपल्या जातीची किती मतं आहेत याची ते मोजदाद करीत होते. धर्मनिरपेक्ष लोकशाहीचं भवितव्य असेच पुढारी आपल्या कर्तृत्वानं घडवीत आहेत! भारतात धर्म, जाती आणि पोटजाती, कुळ आणि वंश, हलके आणि अुच्च अशा शेकडो हजारो फळ्या पडलेल्या आहेत. म्हणून तर अिथल्या संतांनासुद्धा जात चुकत नाही. त्यांनी चुकवली तर आम्ही बिनचूकपणे त्यांना जातींच्या गळफासात अडकवून टाकतो. महावीर केवळ जैनांचा, बुद्ध फक्त बौद्धांचा, बसवेश्वराची जयंती लिंगायतांनीच केवळ साजरी करायची. गुरू नानकाला शीखांच्या ओटीत घालण्यात आलं आहे. ज्ञानेश्वर ब्राह्मणांचा आणि त्यातून तो अधिकांशानं देशस्थांचा. त्यातही ऋग्वेदी, यजुर्वेदी असे भेद असू शकतील. आंबेडकर फक्त अस्पृश्यांचे. किती सुंदर आणि शिस्तबद्ध विभागणी आम्ही या लोकांची करून ठेवली आहे! अुगीच वाद नको. आपापल्या जातीचे महापुरुष वाटून घ्या. आपले देव्हारे वेगळे. आपली दैवतं निराळी. मेल्या-नंतरसुद्धा आपण आपली स्मशानं जिवंतपणीच वेगळी करून ठेवल्यामुळं आता मतभेदाचा मुद्दाच अुरला नाही. प्रत्येकानं आपापल्या कुंपणात राहावं आणि दुसऱ्याच्या कुंपणाकडं पाहून नाक मुरडावं. अशी श्रमविभागणीही आम्ही चातुर्यानं केली आहे! मधून मधून व्यासपीठावरून जातीयवादा-बद्दल धोरण म्हणून विरोधी विचार व्यक्त केले की पुरोगामित्वाचं अेक सर्टिफिकेट आपल्याला देण्यात येतं. त्या भांडवलावर जगायचं. आणि आपल्या जातीय कारवाया चालू ठेवायच्या. असले अुद्योग करणारे धूर्त लोक कमी नाहीत.

माझा अेक मित्र असेंब्लीच्या निवडणुकीला अुभा होता. तो जात आणि संप्रदाय या विचारांच्या पलीकडं केव्हाच जाअून पोहोचला होता. तो केवळ व्यवसायनं नव्हे तर वृत्तीनं डॉक्टर होता. कोणत्याही रोग्याच्या जातीची त्यानं कधीही चौकशी केली नाही. प्रत्येकाला आत्मीयतेनं तपासून तो औषधं देत असे. रोगी जेवढे पैसे हातावर ठेवील तेवढे न मोजता तो आपल्या खिशात टाकीत असे. गावातल्या झोपडपट्टीत जाअून अनेकवेळा त्यानं मोफत औषधं वाटली आणि रुग्णांवर निःस्वार्थपणे अुपचार केले. पंधरावीस वर्षे त्याची ही रुग्णसेवा अखंड चालू होती.

रोगी माणसाच्या मुद्रेवर आरोग्याचं प्रसन्न हास्य चमकलं की तो अत्यंत आनंदित व्हायचा. हा डॉक्टर कोणताही विशिष्ट देव मानीत नव्हता. कोणत्याही धर्माचा किंवा संप्रदायाचा तो अुपासक नव्हता. तो नेहमी म्हणायचा माझा देव माझ्या सेवेतच मी पाहू शकतो. रोग्याच्या डोळ्यांतले अश्रू पुसणं याहून मला दुसरा धर्म माहीत नाही. झोपडपट्टीतली सारी माणसं त्याला 'देवदूत' म्हणायचे. खरं तर असल्या देवमाणसानं निवडणुकीच्या भलत्याच फंदात पडण्याचं काय बरं कारण होतं? त्याला सत्तेचं कसलंही आकर्षण नव्हतं, पण चांगल्या माणसांनी राजकारणात येअून जनतेची सेवा करावी असं कुणीतरी त्याच्या मनात भरवून दिलं. आणि अेका दुबळ्या क्षणी त्यानं निवडणुकीचा अर्ज भरला. त्याचा कुठलाही पक्ष नव्हता. पण त्याचं सेवाकार्य अितकं प्रसिद्ध होतं की त्या बळावर तो प्रचंड मतांनी निवडून येणार अशी विरोधकांना धडकी भरली. विरोधकांनी त्या मतदार संघात जातीय आणि धार्मिक भावनेला अुत्तेजित करणारी भडक भाषणं ठोकून दिली. कळ कुठे दाबावी या व्यवहारज्ञानात मुरलेल्या राजकारणी लोकांनी प्रचाराची धमाल अुडवून दिली. अेक विरोधक आपल्या भाषणात म्हणाला,

'मित्रहो, औषधं विकण्याचा धंदा करणारा हा डॉक्टर आता राजकारणात अुतरला आहे. असेंब्ली म्हणजे याला दवाखाना वाटला काय? या भागात आपण बहुसंख्य लोक अेका जमातीचे आहोत. आपल्या जातीच्या अुत्कर्षासाठी आपली सुखदुःखं समजून घेणारा आपल्याच जातीचा माणूस आपण निवडून दिला पाहिजे. हा डॉक्टर कधीही कोणत्या देवळात गेला नाही. मशिदीत किंवा चर्चमध्ये दिसला नाही. जो कोणती जातच मानीत नाही तो आपल्याला काय न्याय देणार? जातीसाठी माती खाण्याची आमची तयारी आहे. (या वाक्याला टाळ्यांचा कडकडाट आणि झिंदाबादच्या गर्जना होतात.) आपल्या जातीसाठी आणि धर्मासाठी मी माझी आहुती द्यायला तयार आहे. आपल्या धर्मानं आणि आपल्या जातीच्या लोकांनी या देशाच्या अितिहासावर आपला ठसा अुमटवलेला आहे. आपल्या संस्कृतीचा झेंडा नाचवण्यासाठी तुम्ही मलाच असेंब्लीत निवडून द्या!'

डॉक्टर गल्लीगल्लीतून फिरत होता. त्याच्या बोलण्यात आणि प्रचारात जात, धर्म, संप्रदाय याचा ओझरताही अुल्लेख कधी आला नाही. तो प्रामाणिकपणानं सांगत होता 'गरीब माणूस सुखी व्हावा यासाठी मी धडपड करीन. मी कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा प्रतिनिधी नाही. मला केवळ माणुसकीचा झेंडा ऊंच धरायचा आहे.' लोक त्याची भाषणं अैकत होते. पण कोणतीही भडक, नाटकी आणि अतिशयोक्तीपूर्ण भाषा न बोलणाऱ्या या डॉक्टरचं मिळमिळीत भाषण लोकांना फारच आळणी वाटायचं. निवडणुकीतली भाषणं जळजळीत आणि ठसठशीत व्हावी लागतात. त्या भाषणांत भंपकपणाच्या घोषणा पेराव्या लागतात. जनतेच्या जातीय अहंकाराला खतपाणी घालावं लागतं. 'आपला धर्म धोक्यात आहे.' अशी हाकाटी पिटली म्हणजे मतांचा पाअूस पडतो हे राजकारणी लोकांना कळलेलं असतं. डॉक्टर बिचारा कमालीच्या प्रामाणिकपणानं निवडणूक लढवीत होता. आपला गाजावाजा कसा करावा, निरनिराळ्या जातीच्या मतदारांना कशी भरघोस आश्वासनं द्यावीत, याची त्याला कल्पनाही नव्हती आणि असती तरी त्या वाटेनं तो जाअू शकला नसता. जनतेची नाडीपरीक्षा त्याला करता येत नव्हती. याचा अेकच परिणाम होणं शक्य होतं. निवडणुकीच्या आखाड्यात हा डॉक्टर चारीमुंडे चीत झाला. जातीय वृत्तीची मात्र जीत झाली. खरं तर डॉक्टरानं त्या गावात सर्वत्र आपल्या सद्भावना पेरल्या होत्या. रात्री-अपरात्रीसुद्धा पेशंटच्या घरी जाअून तो अुपचार करायचा. त्याच्याबद्दल गावात सर्व थरांतल्या लोकांत आदरभाव होता. त्याचं औषध घेताना लोकांनी त्याच्या जातीची कधीही चिकित्सा केली नाही. पण निवडणुकीला अुभा राहिल्याबरोबर त्याच्या जातीचं 'संशोधन' सुरू झालं. निवडणुकीच्या निकालानंतर त्याच रात्री अेका आसन्नमरण झालेल्या रुग्णाला त्यानं रात्रभर जागून मरणातून वाचवलं. शुद्धीवर आलेल्या त्या रोग्याच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रू वाहात होते आणि त्याच्या प्रेमळ भावना पाहून डॉक्टराचे डोळेही पाणावले होते. निवडणुकीतल्या पराभवाचं दुःख त्यानं केव्हाच गिळून टाकलं होतं. तो मनातल्या मनात म्हणाला,

'माझाच रस्ता चुकला होता. माणसाला माणसाचे अश्रू पुसता येतात हाच त्याचा श्रेष्ठ धर्म आहे. अश्रू पुसण्याच्या या क्रियेला कोणत्याही जातीचा आणि धर्माचा अडसर नाही. संताला आणि कलावंताला जशी जात नसते, तशी डॉक्टरलाही जात नसते. पण सेवेच्या क्षेत्रापलीकडं जो विस्तीर्ण प्रदेश पसरला आहे त्यात मात्र जातीपातींच्या कल्पनांनी शेवाळलेली असंख्य डबकी आहेत. या डबक्यांत अगणित बेडूक राहातात. त्या डबक्यालाच जग समजून ते आत्मसंतुष्टतेनं 'डरांव डरांव' करीत राहातात. ही डबकी जोपर्यंत नाहीशी होत नाहीत तोपर्यंत या बेडकांना महासागराचं दर्शन होणार नाही. डबकी नाहीशी करण्यासाठी जे जे महापुरुष आले त्यांच्या निर्वाणानंतर तेही या डबक्यांचेच रहिवासी आहेत असा प्रचार करण्याची प्रचंड मोहीम स्वार्थी लोकांनी हाती घेतली. सामान्य, पोटार्थी आणि अज्ञानी लोकांनी माझा पराभव केला याचं मला दुःख नाही. पण ते आपला स्वतःचाच पराभव करीत आहेत याचं मात्र दुःख वाटतं.

डॉक्टराच्या मनातले हे अुद्गार कोणालाच अैकू जाणं शक्य नव्हतं. कोणी अैकले असते तरी त्यामुळं काहीच फरक पडला नसता. कारण आमच्या साऱ्याच व्यवहारावर जातीपातींची घनदाट सावली आम्ही पसरवून ठेवली आहे 'येथे पाहिजे जातीचे' ही आमची चिरंतन घोषणा आहे.

REFBK-0025887

# आनंदाची डहाळी

जेव्हा मनाच्या भूमीतच आनंदाची डहाळी अुगवते तेव्हा तिचे प्रत्येक पान हिरवेगार रसरशीत असते. त्या पानांचा रंग, गंध आणि स्पर्श रसिकतेने टिपला आहे निर्मलकुमार फडकुले यांच्या रसशोधक, शैलीदार लेखणीने.

आयुष्याच्या मातीत कितीतरी चित्रविचित्र सुखदुःखे रुजतात. आपल्या भोवतालचे जीवन या सुखदुःखांनी वेढले आहे. जीवनातल्या या नानाविध प्रवृत्तींचे, अूनपावसाचे चिंतन लेखकाने केले आहे. आशावादी वृत्तीचे अधिष्ठान असल्यामुळे या जीवनचिंतनालाही अेक आगळा सुगंध येतो. दुःख आणि वेदना लेखक नाकारीत नाही. पण प्रगल्भतेने आणि रुचिरतेने तो त्यांचा स्वीकार करू पाहतो तेव्हा वेदनांची फुलेही आनंदित करतात.

‘हिरव्या वाटा’ या ललित लेखसंग्रहानंतर ‘आनंदाच्या डहाळीचा’ शोध निर्मलकुमार फडकुले यांनी घ्यावा हे स्वाभाविकच आहे. लालित्य आणि चिंतनशीलता, रसिकत्व आणि अवखळपणा यांच्या वाटेने स्वैर संवाद करीत चाललेला हा लेखक आपल्या रससिद्ध शब्दांनी वाचकांच्या पदरात काही हिरवे क्षण निश्चित टाकील.

रंगश्री